**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1116/2009**

श्री रमो सुखदेव बांगरे
मु. पो. अडयाळ
ता. पवनी जि. भंडारा 441903 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा
ता. जि. भंडारा
2) श्री आर. आर. कुंभारे
जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
भंडारा ता. जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी भंडारा यांचेकडे त्यांनी अर्जासोबत दि.3.7.2009 रोजी सभापती नरेश केशवराव डहारे कृषि पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती यांनी उपविभागीय अधिकारी भंडारा यांना दिलेल्या पत्राच्या संदर्भातील कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 25.11.2009 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 16.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी कार्यवाही का करण्यात आली नाही अशी विचारणा केलेली आहे. त्याबद्यल युक्तीवाद करतांना असे सांगितले की सदरच्या मोजणीच्या संदर्भामध्ये मुद्याम वाद उत्पन्न करुन त्यांचेकडे पैशाची मागणी केली होती. माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की उपविभागीय अधिकारी भंडारा यांचेकडे जरी सभापती यांनी अर्ज दिलेला असला तरी वनहक्क समितीकडे दावा दाखल केलेला असल्यामुळे त्या संदर्भातील मोक्यावर मोजणी करण्याकरीता कर्मचारी गेले असता वाद निर्माण झाला व त्यामुळेच मोजणी होवू शकली नाही. त्यानंतर वनहक्क समितीकडे दाव्याचा निर्णयण्याकरीता आदेश दिलेले आहेत. व त्याप्रमाणे वनहक्क समितीचा निर्णय मान्य न

झाल्यास अपीलकर्ता यांना जिल्हा समितीकडे अपील करता येईल. त्यामुळे कार्यवाही करण्यात आलेली नाही असे म्हणता येणार नाही. त्याबाबतचे पत्र दि. 21.10.2009 रोजी देण्यात आलेले असून त्या पत्राची प्रत तहसिलदार पवनी यांना देण्यात आलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांची अपेक्षा अशी दिसून येते की गुणवत्तेच्या बाबत तपासणी करुन निर्णय मिळावा अशी त्यांनी विनंती केली आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहिती जशी आहे तशी उपलब्ध होते. कोणत्याही तक्रारीच्या संदर्भात गुणवत्तेच्या दृष्टीने तपासणी करुन माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती विहित मुदतीत असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1119/2009**

श्री गोपाल जगबंधु टिकेदार
सुभाषग्राम पो. गुंडापल्ली
ता. चामोर्शी जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री गुंफावार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी
पंचायत समिती मुलचेरा
ता. मुलचेरा जि. गडचिरोली
2) श्री एच. आर. नवखरकर
जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती मुलचेरा
ता. मुलचेरा जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती मुलचेरा यांना बांगला शिक्षण सेवकाच्या संदर्भामध्ये व बांगला माध्यमातून शिक्षकांची माहिती दि. 30.9.2009 तसेच इयत्ता 1 ते 4 व 5 ते 7 करीता एकुण दोन मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही अपीलकर्ता यांनी दि. 3.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 3.12.2009 रोजी देण्यात आला असून अपुरी माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले आहे असे दिसून येते परंतु तत्पुर्वीच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यामुळेच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1129/2009

श्री दिगंबर नत्थु रामटेके
रा. कुंभारे नगर पिंपरोरोड
श्री राजूल देशभ्रतार यांच्या घरासमोर तुमसर
पो. ता. तुमसर जि. भंडारा 441912 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री ग. ब. रबडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ मिलींद कॉलेज समोर
छावणी औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद
2) श्री एम. एस. पाटील
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ मिलींद कॉलेज समोर
छावणी औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.8.2009 रोजी माहिती अधिकारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ औरंगाबाद यांचेकडे दि. 1.10.1999 पासून मंजूर केलेल्या आगावु वेतन वाढीच्या पुर्नविलोकन/पुर्नविचार बाबत सन 1999 पासून झालेल्या कार्यवाहीची माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे घेणार अशी माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 3.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही किंवा निर्णय झालेला नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की अपीलकर्ता यांचा दि.18.8.2009 रोजीचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झालेला नाही. त्यावर अपीलकर्ता यांनी अर्ज साध्या पोष्टानी पाठविलेला आहे असे सांगितले. मात्र प्रथम अपील हे कुरीअरनी पाठविलेला आहे व प्रथम अपील प्राप्त आहे त्यासोबत अर्ज प्राप्त आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. त्यानुसार अपीलकर्ता यांना सुनावणीचे पत्र पाठविलेले होते.
परंतु अपीलकर्ता यांना सदरचे पत्र सुध्दा प्राप्त झाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. व त्यामुळे दि. 9.11.2009 रोजी अधिक्षक अभियंता तथा अधिक्षक परिमंडळ समिती नागपूर

यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की अपीलकर्ता यांना हीच माहिती यापूर्वी दोन वेळा दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना दि.18.8.2009 च्या अर्जामध्ये आगावु वेतन वाढी बाबत पुर्नविचार करुन निर्णय घ्यावा असे मध्यवर्ती कार्यालयाचे पत्र दि. 28.8.2006 प्रमाणे झालेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली आहे. सदरची माहिती उपलब्ध करुन देता येईल असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 18.8.2009 च्या अर्जामध्ये उल्लेख केलेल्या दि. 28.8.2006 च्या पत्रावर झालेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टानी उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 13.1.2010**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1117/2009**

श्री संदीप दयारामजी वरु
एन.एस.बी. रोड भामटीपूरा वर्धा
ता. जि. वर्धा 4421001 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पांडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.विभाग)
जिल्हा परिषद वर्धा
ता. जि. वर्धा
2) श्री एन. एस. निमगडे
जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथ.विभाग)
जिल्हा परिषद वर्धा
ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.) शिक्षण विभाग जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे सर्व शिक्षा अभियान 2005–06 मधील अध्ययन, अध्यापक साहित्य खरेदी करीता 50,000/– रु. अनुदानाबाबत वर्ष 2005–2007 च्या संदर्भात एकुण 5 मुद्याची माहिती संकलीत करुन उपलब्ध करुन द्यावी अशी मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 7.8.2009 रोजी माहितीच्या करीता एकुण 954/– रु. चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. व मुद्या क्र. 2 व 3 च्या संदर्भात सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 11.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 16.9.2009 रोजी वाटप करण्यात आलेल्या अध्ययन अध्यापन साहित्य अनुदान संबंधीचे करारलेख व अटी व नियम पत्राची छायांकीत प्रतीचा माहितीच्या अधिकारांतर्गत मागणी नोंदविली होती. करारलेख व पत्राची एकूण पाने 477 असुन त्याची 2 रुपये प्रति प्रमाणे एकुण 954/– रु. होतात. परंतु आपण प्रत्यक्ष मागितल्याप्रमाणे करारलेखाची छायांकीत प्रत नको असुन अटी व नियमाच्या पत्राची छायांकीत प्रत हवी आहे. त्याप्रमाणे एकुण 14 रुपये जमा करुन पोच पावती सादर करावी व अटी व शर्तीच्या पत्राची छायांकीत प्रत प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मुद्या क्र. 2 व 3 च्या संदर्भात या कार्यालयाचे पत्र दि. 14.2.2009 अन्वये अनुदान देण्यात आलेले शाळांकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर आपणास कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. दि. 3.11.2009 रोजी संदर्भिय पत्रानुसार 180 अनुदान प्राप्त शाळांपैकी 108 शाळांकडुन अहवाल प्राप्त झाला आहे. त्यांनी साहित्याचे बील सादर केले आहे. त्या बीलाची पृष्ठांची संख्या 357 असुन प्रती पृष्ठ 2/– प्रमाणे 714/– रु. कार्यालयात भरणा करावा व माहिती घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी सदरच्या खर्चाचा भरणा न करता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. वास्तविक अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये दि. 7.8. 2009 रोजी सविस्तर त्यांना पत्र दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी माहिती मागून सुध्दा नंतर माहितीचे अवलोकन करुन खर्चाचा भरणा करण्याची टाळाटाळ केलेली आहे. तसेच अपीलकर्ता यांच्या अर्जात मुळात माहिती संकलित करुन उपलब्ध करुन द्यावी असे म्हटलेले आहे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी माहिती संकलित करण्याचे पत्र सर्व शाळांना दिलेले दिसून येते. त्यातूनही 108 शाळांची माहिती उपलब्ध आहे व त्याप्रमाणे खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु त्याही बाबत अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केलेला दिसून येत नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांचेकडे माहिती उपलब्ध असणे आवश्यक होते. असे असून सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी साहीत्याचे बील शाळांच्या स्तरावर उपलब्ध आहे व त्याबाबत संबंधित शाळांकडे अर्ज करावा असे नमूद केलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांना मुद्दा क्र. 3 च्या संदर्भात करारलेखातील अटीनुसार अनुदानातील खरेदी केलेल्या साहित्याच्या छायांकीत प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

c

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना सन 2005–2006 मध्ये वितरीत केलेल्या अध्ययन, अध्यापक साहित्य अनुदानातील संगणकाच्या संचाच्या खरेदीची देयकाच्या छायांकीत प्रती विनामुल्य व्यक्तीशाः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून व्यक्तीशाः छायांकीत प्रती उपलब्ध करुन घ्याव्या.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1115/2009

श्री राजकुमार शामरावजी भोयर
237 लोकमान्य नगर हिंगणा रोड
नागपूर 440016 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव
उच्च व तंत्र शिक्षण विभाग ता.शि2
मंत्रालय विस्तार भवन मुंबई 400032
2) जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
उच्च व तंत्र शिक्षण विभाग ता.शि.2
मंत्रालय विस्तार भवन मुंबई 400032 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 7.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी (कार्यासन अधिकारी) उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचेकडे खाजगी विनाअनुदाणीत अभियंत्रिकी महाविद्यालय सुरु करण्या करीता अस्तित्वात असलेली अधिसूचना सन 1982 ते 2009 संदर्भात एकुण तीन मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती स्पिड पोस्टाने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 18.9.2009 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 12.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरचे प्रथम अपील दि. 27.11.2009 रोजी फेटाळण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान झालेले नाही. त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या विनाअनुदानित महाविद्यालयाच्या संदर्भात आदेशाच्या प्रती मागितलेल्या होत्या. व त्या त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी असे सांगितले की त्यांचेकडे आतापर्यंत एकुण 265 अभियंत्रिकी महाविद्यालयाची माहिती उपलब्ध आहे. तसेच प्रत्येक महाविद्यालयाच्या संदर्भामध्ये स्वतंत्र प्रक्रिया आहे. रीअपीलकर्ता यांनी विशिष्ट महाविद्यालयाची माहिती मागितल्यास त्याबद्यलच्या मान्यतेच्या निर्णयाबद्यलची सर्व माहिती उपलब्ध करुन देता येईल. त्यावर अपीलकर्ता यांनी यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय वानाडोंगरी हिंगणा या

विनाअनुदानित महाविद्यालयात अखिल भारतीय तंत्र शिक्षण परीषद यांनी काढलेल्या जाहिराती किंवा परीपत्रकापासून ते महाराष्ट्र शासनाची मान्यता असलेले आदेश तसेच विद्यापीठाशी संलग्नता असलेले आदेश या सर्व प्रक्रियेतील कागदपत्राच्या प्रमाणित छायांकीत प्रती उपलब्ध करुन दिल्यास तसेच महाराष्ट्र राज्यात विनाअनुदानित महाविद्यालय सुरु करण्याचा शासनाचा सुरुवातीचा निर्णय शासन निर्णयाच्या स्वरुपात किंवा मंत्रीमंडळाच्या निर्णयाच्या स्वरुपात उपलब्ध असल्यास त्याबद्यलचे छायांकीत प्रती अपेक्षित आहे. व ती उपलब्ध झाल्यास सर्व महाविद्यालयाच्या माहितीची आवश्यकता नाही. त्यावर जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी असे सांगितले की सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यास कोणतीही हरकत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना यशवंतराव चव्हाण अभियंत्रिकी महाविद्यालय वानाडोंगरी हिंगणा या विनाअनुदानीत महाविद्यालयाच्या संदर्भामध्ये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परीषद नवी दिल्ली यांच्या प्रक्रियेपासून महाराष्ट्र शासनाची मान्यता असलेले आदेश तसेच महाराष्ट्र राज्य विद्यापीठाशी सलग्नता असलेले आदेशाच्या प्रती विनामुल्य रजिस्टर पोष्टानी उपलब्ध करुन देण्यात याव्या. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1135/2009**

श्री उत्तम इश्वर उमक

दिघोरी नवनााथ आय.टी.आय. रोड
वैभाव नगर प्लॉट नं. 165 रा. नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. एम. आंबाडेकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक
म.रा.मार्ग परिवहन महामंडळ नागपूर विभाग नागपूर
विभागीय कचेरी रेल्वे स्टेशन जवळ
सिव्हील लाईन नागपूर
2) श्री आर. ए. बोरे
जन माहिती अधिकारी तथा म.रा.मार्ग परिवहन महामंडळ
नागपूर विभाग नागपूर विभागीय कचेरी रेल्वे स्टेशन जवळ
सिव्हील लाईन नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 14.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.8.2009 रोजी जन माहिती अधिकारी विभाग नियंत्रक म. रा.मार्ग परिवहन महामंडळ यांचेकडे सुधारीत एकंदर हिशेब रकमेची महिनेवारी (मन्थली) अरीअर्स रकमेची डिटेल परटयुक्युलर सिटची छायांकीत प्रत दि. 21.10.92 ते 23.9.2003 पर्यंतची देण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 14.8.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 11.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 23.9.2009 रोजी देण्यात आलेला दिसून येतो. व माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली परंतु समाधान झाले नाही असे आयोगापुढे सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांना वस्तुस्थिती असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यांची तक्रार ही गुणवत्तेच्या संदर्भात असून व त्याकरीता त्यांनी स्वतंत्रपणे अर्ज दाखल केल्यास त्या अर्जाप्रमाणे विचार होवून त्यांच्या तक्रारीचे निराकरण करण्यात

येईल. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1130/2009, 1131/2009, व 1132/2009**

**<u>1) अपील क्रमांक 1130/2009</u>**
श्री योगेश्वर गोदरुजी कुल्लारकर
रा. खराडा पो. जीवनापूर
ता. कुही जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**<u>2) अपील क्रमांक 1131/2009, व 1132/2009</u>**
श्री आसाराम पितू देशमुख
रा. खराडा पो. जीवनापूर
ता. कुही जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**<u>अपील क्रमांक 1130/2009, 1131/2009, व 1132/2009</u>**
1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
उमरेड
ता. उमरेड जि. नागपूर
2) श्री जी. ए. पाजनकर
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार कुही
ता. कुही जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 14.1.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 1130/2009, 1131/2009 व 1132/2009 मध्ये तीनही अपीलकर्ता यांनी दि. 14.8.2009 रोजी तहसिलदार हयांचे कार्यालयात माहिती अधिकारी यांचेकडे त्यांचे दि. 21.3.2009 रोजी दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अपील क्र. 1131/2009 मध्ये दि. 16.2.2008 रोजी तहसिलदार यांना दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद करुन मागितलेली आहे. व अपील क्र. 1132/2009 मध्ये दि. 15.2.2008 रोजी तहसिलदार यांचेकडे दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद करुन

मागितलेली आहे. सदरच्या अर्जांच्या अनुषंगाने तहसिलदार कुही यांनी दि. 20.8.2009 रोजी तीनही अर्ज हे त.सा.क्र. 65 मौजा रत्नापूर तहसिल कुही यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविले व त्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना अग्रेषित केलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि. 7.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 27.11.2009 रोजी देण्यात आलेला असून माहिती देण्यात आली या कारणास्तव तसेच 7/12 वर अर्जदाराची नोंद घेण्याबाबतची माहिती मागितलेली होती. त्यानुसार तहसिलदार कुही यांनी त्यांचे पत्र दि. 20.8.09 अन्वये अपीलार्थी अर्जावर कार्यवाही करुन माहिती देण्यात आली. त्यावर अपीलार्थीचे समाधान न झाल्यामुळे अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी उमरेड यांचेकडे दि. 8.10.09 अन्वये अपील दाखल केली मौजा खोकरला प.ह. नं.65 येथील सर्व्हे नं. 94/3 आराजी 2.00 हे.आर मध्ये 7/12 वर नोंद घेण्याची कार्यवाही संबंधातील निर्देश देण्याची बाब माहितीच्या अधिकारात बसत नसल्याने कलम 19 (1) अन्वये अपील खारीज करण्यात येत आहे असा निर्णय देवून तीनही अपीले खारीज करण्यात आलेली दिसून येतात. व त्यामुळे तीनही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे तीन द्वितीय अपीले दाखल केलेले आहेत.

3. तीनही द्वितीय अपीलांच्या संदर्भात अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. आर.डी.आजबले उपस्थित झाले व त्यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की तहसिलदार किंवा तलाठी यांनी महाराष्ट्र जमीन महसुल संहिता नियमाप्रमाणे कारवाई करुन माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. व त्या कारणास्तव प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य नाही. त्यावर तहसिलदार कुही यांनी आयोगाकडे लेखी खुलासा दाखल केलेला आहे. तसेच तोंडी युक्तीवाद करतांना अपीलकर्ता यांचे अर्ज पुढिल कार्यवाही करीता त. सा.क्र. 65 मौजा रत्नापूर तहसिल कुही यांचेकडे कार्यालयीन पत्र क्र. 34/2009, 32/09 व 33/09 प्रमाणे पाठविण्यात आले होते. तलाठी यांचेकडून दि. 25.9.2009 रोजी माहिती प्राप्त झाली परंतु विधानसभा निवडणूकीचे कामात व्यस्त असल्यामुळे तलाठी यांनी सादर केलेले अहवाला नुसार प्रकरण सुरु करता आले नाही. सदर अर्जावर तलाठी यांनी दि. 24.9.2009 रोजी अपीलार्थी यांचेकडे शेत जमीनीची मौका पाहणी करुन पंचनामा अर्जदाराचे समक्ष करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर केले. अपीलार्थीचे सदर शेत जमीनीवर ताबा असल्याचे निदर्शनास आले. अतः अपीलार्थी यांचे कब्जात असलेली शेत जमीनीवर त्यांचा कब्जा असल्याची माहिती मौक्यावर देण्यात आलेली आहे. या सोबत मौजा पंचनामा जोडलेला आहे. विधानसभा निवडणूकात व्यस्त असल्याने सदर प्रकरणात लक्ष देता आले नाही. तलाठी यांचेकडून निर्णय घेण्यात आलेले आहे. सबब माहितीसाठी सादर. सहपत्र मौका पंचनामा व इतर दस्ताऐवज. त्या सहपत्रामध्ये गाव नमुना 7 ब अधिकार अभिलेखानुसार जमीन कब्जात असल्याचे मानण्यात येणा–या व्यक्ति व्यतिरीक्त जमीन कब्जात असलेल्या इतर व्यक्तींची नोंदवही. त्या दस्तऐवजाच्या छायांकीत प्रती सुध्दा दाखल केलेल्या आहेत. यावरुन तीनही अपीलकर्ता यांना कार्यवाहीची माहिती व त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून तीनही अपीले खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे तीनही अपीले खारीज करण्यात येतात.
2) तीनही अपीलकर्ता यांना संबंधीत घेतलेल्या नोंदीच्या 7/12 चे उतारे हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावे.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

श्री भुषण सोमेश्वर मुरारकर
60 विश्वास अपार्टमेंट बी 1,
त्रिमुर्ती नगर नागपूर ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) डॉ. डी. जी. बकवाड
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर संचालक(मविब)
वानामती नागपूर
व्ही.आय.पी.रोड धरमपेठ नागपूर 10
2) डॉ. प्रकाश सातपुते
जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ प्रशासकीय व लेखा अधिकारी
वानामती नागपूर
व्ही.आय.पी.रोड धरमपेठ नागपूर 10 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 14.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 28.7.2009 रोजी डॉ.पी.पी.सातपुते यांचेकडे 20.7.07 ते 20.3.09 सेक्शन 1–16 नं. पान क्र. 16 कॉलम 45 टेंडर डॉक्युमेंट असा आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन व तपशिल दिलेला आहे. माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 6.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 9.10.2009 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती हवी असल्यास त्वरीत पहिल्या अर्जासाठी रु. 33 व दुस–या अर्जासाठी रु. 27 त्वरीत या कार्यालयात भरावे. डॉ. प्रकाशा सातपुते वरीष्ठ प्रशाासन नि लेखा अधिकारी व माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दोन्ही अर्जावर सात दिवसाच्या आत किंवा दि. 16.10.2009 च्या आत त्यांना माहिती रजिस्टर पोष्ट पंजीकृत द्वारे देण्यात यावी अशा प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली परंतु समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी त्यांच्या देयकाचा भुगतान का झाले नाही असे विचारले परंतु त्यांना टेंडर डॉक्युमेंट देण्यात आले ते त्यांचेकडे उपलब्ध आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले की अपीलकर्ता यांनी त्यांच्या प्रपत्र अ मध्ये आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णना मध्ये टेंडर डॉक्युमेंटचे वर्णन केले आहे. व त्याप्रमाणे त्यांना त्याप्रकारची माहिती देण्यात आली आहे. त्यावर अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की जी माहिती दिली ती पण विलंबाने प्रथम अपील दाखल केल्या नंतर दिली. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणले की दि. 31.7.2009 रोजी यु.पी.सी.ने अपीलकर्ता यांना खर्चाचा भरणा करावा असे कळविण्यात आले. परंतु हे पत्र अपीलकर्ता यांना मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. व त्यांना खर्चाचा भरणा करावयाची माहिती ते प्रथम

अपीलाच्या आदेशात असल्यामुळे त्यांनी खर्चाचा भरणा केला ती माहिती उपलब्ध झाली परंतु ती त्यांनी मागितलेली नव्हती. त्यावर देयकाचे भुगतान झालेले नाही याबद्दलची माहिती उपलब्ध आहे काय असे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी स्वतंत्र अर्ज केलेला होता व त्या अर्जाच्या संदर्भामध्ये त्यांना संपूर्ण वस्तुस्थिती विषद केलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणले की काही देयकाच्या बाबत पूर्तता केलेली नव्हती ती झालेली आहे व काही देयकाच्या बाबत चौकशी सुरु आहे. चौकशी समिती नेमण्यात आलेली आहे. परंतु चौकशी समितीकडे अपीलकर्ता हजर होत नाही. त्यावर अपीलकर्ता यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणले की चौकशी समितीवर डॉ. सातपुते आहेत व त्यांनी सदरचे देयके प्रलंबीत ठेवलेले असल्यामुळे ते समितीवर असू नये असा त्यांचा प्राथमिक आक्षेप होता. परंतु तो आक्षेप विचारात न घेतल्यामुळे समिती पुढे जाण्यात अर्थ नाही म्हणून ते समिती पुढे हजर झालेले नाहीत. असे असले तरी अपीलकर्ता यांना तपशिलामध्ये त्यांच्या प्रलंबित देयकाच्या संदर्भातील वस्तुस्थिती ही तपशिलात कळविणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या प्रलंबित देयकाच्या संदर्भामध्ये तपशिलात वर्णन किंवा त्याबाबत असलेली टिपणीची छायांकीत प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास त्यांचे विरुध्द शास्ती लादण्यात हयेईल याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1150/2009

श्री डी. के. देशपांडे(पुनर्वसन)
विभागीय आयुक्त कार्यालय
नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डी. एस. चिलमुलवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त(सा.प्र.विभाग)
विभागीय आयुक्त कार्यालय
नागपूर
2) श्री जी. डी. निशानकर
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक(सा.प्र.विभाग)
विभागीय आयुक्त कार्यालय
नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी महसूल विभाग विभागीय आयुक्त कार्यालय यांचेकडे माझा उपायुक्त(महसूल) यांना दि. 30.5.2009 ला च्या वाहन चालकाचे वेतन रोखण्याबाबतच्या अर्जाच्या संदर्भातील सद्यस्थितीची माहिती व्यक्तीशाः मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 29.10.2009 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 31.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 25.11.2009 रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे प्रत्यक्ष हजर न राहता निवेदन सादर केलेले आहे. सदरच्या निवेदनामध्ये अपीलकर्ता यांनी प्रकरणातील गुणवत्तेच्या बाबत विवेचन केलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भामध्ये त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. उपलब्ध झालेल्या





माहितीच्या संदर्भात गुणवत्तेच्या बाबत तपासण्याचा अधिकार आयोगाचा नाही. माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिली आहे किंवा नाही व ती पुर्ण आहे किंवा नाही ही बाब तपासली जाते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे

त्या संदर्भात प्रथम अपील दाखल झाले व त्या प्रथम अपीलाच्या निर्णयात सुध्दा जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात आलेला दिसून येतो. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा आयोगापुढे असे सांगितले की सदरचा विषय हा प्रशासकीय विषय आहे व त्याबाबत अपीलकर्ता हे स्वतः उपायुक्त असल्यामुळे त्यांना योग्य त्या वरीष्ठ अधिका–याकडे तक्रार करुन तक्रारीचे निराकरण करुन घेता आले असते. व त्याही बाबत त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे. व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या संदर्भातील कार्यवाही ही विहित मुदतीत झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे गुणवत्तेच्या बाबत समाधान न झाल्यास अपीलकर्ता यांनी स्वतंत्रपणे पुन्हा विभागीय आयुक्त यांचेकडे तक्रार करणे संयुक्तिक राहिल.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1151/2009 व 1152/2009**

श्री मनोज सत्यनारायणजी शर्मा

तंबाखु ओळी कामठी 441002
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 1151/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 19.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय कामठी तहसिल यांचेकडे एन एल 3 शिट नं.2 ब्लॉक नं. 14 इस मकान की आपके कार्यालयमे जगह की डिमांड से संबंधीत संपूर्ण कागजी कार्यवाही से संबंधीत एकूण तीन मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 23.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 25.11.2009 रोजी देण्यात आलेला दिसून येतो. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी हे वैयक्तीक हजर नसून त्यांनी प्रतिनिधी पाठविलेला आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये स्पष्टपणे कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिली नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना ताकीद देण्यात येते व तीन दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे निर्देश दिलेले दिसून येतात व त्यानंतरही माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात व शास्तीस पात्र आहेत. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 1152/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 15.9.2009 रोजी दि. 25.1.09 को दी गई हमारी अर्ज के संबंध संपुर्ण जानकारी बाबत एकुण दोन मुद्यांवर मागितलेली दिसून येते. सदरची माहिती पोस्टद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 9.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 25.11.2009 रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कोणतीही माहिती पुरविल्याचे दिसून येत नाही. व आज तारखेवर येवून कोणतेही कागदपत्र दाखल केले नाही. सबब जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार कामठी हे शास्ती करण्यास पात्र ठरतात. त्यामुळे त्यांचेवर रु. 250 ची शास्ती लादण्यात येते. अपीलार्थीस 3 दिवसाचे आत त्यांनी दाखल केलेल्या माहिती अधिकारातील अर्ज दि. 15.9.09 चे संबंधीत माहिती रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन दयावी





असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्या संबंधात कोणत्याही प्रकारे माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले. व यावरुन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन

येतात असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्यांमुळे अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे त्यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपील क्र. 1151/2009 हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 19.9.2009 च्या अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती छायांकीत प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपील क्र. 1152/2009 हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 15.9.2009 च्या मागितलेल्या माहितीच्या छायांकीत प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या.

3) वरील दोन्ही अपीलांच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दि. 19.9.2009 व दि. 15.9.2009 च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे प्रत्येकी रु. 5000/- ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत आयोगापुढे करावा अन्यथा प्रत्येक अपीलात रु. 5000/- ची शास्ती कायम करण्यात येईल. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहिन्याचे वेतनातून वसुल करुन लेखाशिर्ष ''0070-इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070-016'1)'' मध्ये जमा करावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

**( विलास पाटील )**<br>**राज्य माहिती आयुक्त,**<br>**राज्य माहिती आयोग,**<br>**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1077/2009

सौ. शिाला अशोक रामटेके

मु. पो. नवखळा
ता. नागभीड जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक
भूमी अभिलेख चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक
भूमी अभिलेख कार्यालय नागभीड
ता. नागभीड जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी दि. 22.12.2009 रोजी हजर होते. परंतु उत्तरवादी यांना दि.15.1.2010 रोजी म्हणजे आज खुलासा सादर करणेकरीता मुदत दिली होती. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय नागभीड यांनी खुलासा सादर केलेला आहे तो खालीलप्रमाणे.

दि.22.12.2009 ला दिलेल्या सुचनेप्रमाणे न्यायालयात जावून चौकशी केली असता दि.मु.क्र.34/2004 कोर्ट कमिश्नर प्रकरणाचा निकाल लागल्याची माहिती मिळाल्याने अर्जदार ला या कार्यालयाचे पत्र दि. 4.1.2010 अन्वये सदर प्रकरणातील मोजणी नकाशाची नक्कल विनामूल्य पुरविण्यात आली आहे.

अर्जदाराने दि. 22.12.2009 ला मोजणी फी भरणेबाबत उपस्थित केलेल्या मुद्यावरुन न्यायालयात चौकशी केली असता त्यांचे पत्र दि. 27.5.2009 अन्वये दिवाणी वाद क्र. 34/2004 मध्ये कोर्ट कमिश्नर रिट प्रमाणे अर्जदार कडून मोजणी फी भरुन घेणे व मोजणी करीता लागणारी कागदपत्रे प्राप्त करुन घेण्याबाबत कळविले आहे. त्याप्रमाणे अर्जदारास यापूर्वी पाठविलेले पत्र दि. 1.7.09 रद्य करण्यात येत असल्याचे कळवून मा. न्यायालयाचे पत्र दि. 27.5.09 प्रमाणे आवश्यक कागदपत्रासह मोजणी फी रु. 3500/- भरणेबाबत या कार्यालयाचे पत्र दि.4.1.2010 अन्वये अर्जदारास कळविण्यात आले आहे.





वरील खुलाशा सोबत जन माहिती अधिकारी यांनी कोर्ट विद्यमान श्री कि.र. देशपांडे दिवाणी न्यायाधिश क.स्तर नागभीड यांचेकडे नियमित दिवाणी वाद क्र. 34/2004 नियमित हकसी क्र.3/2007 वादी/डीक्रीधारी श्रीमती शिलाबाई अशोक रामटेंके व इतर 1 विरुध्द प्रतिवादी नि. ऋणको पुंडलिक अभिमन निमगडे व ईतर 5

कोर्ट कमिश्नर रिटच्या संदर्भातील निर्णय दाखल केलेला आहे. व त्याप्रमाणे दि.4.1.2010 रोजी अपीलकर्ता यांना विषयांकीत मोजणी नकाशाची नक्कल विनामुल्य पुरविण्यात आलेली आहे. त्यावर पत्र व नकाशा पत्र मिळाले अशी पोच सौ. शिलाबाई अशोक रामटेंके यांनी दि. 6.1.2010 दिलेली आहे. व त्यावरुन अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1149/2009

श्रीमती प्रियदर्शीनी मिलींद देवघरे
आनंद मंगल अपार्टमेंट 278 बजाज नगर

लक्ष्मी नगर चौका जवळ
वेस्ट हायकोर्ट रोड नागपूर 440010 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्र. कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
परीक्षा भवन एल आय टी कॅम्पस
अमरावती रोड नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री संजय चिमलवार हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.6.2009 रोजी जन माहिती अधिकारी परीक्षा नियंत्रक यांचेकडे त्यांच्या शिक्षण विभागातील पी.एच.डी.च्या संदर्भातील पत्राच्या संदर्भात माहिती विचारलेली दिसून येते. ती खालीलप्रमाणे –

1. Schedule of the meeting (monthly/Bi- monthly) number of meetings of the committee held for deciding Eligibility for Ph.D. in Education and also the names of the committee members present at each meeding.
2. Proceedings of meetings of the committee for deciding eligibility for Ph.D. in Education during the period 5-12-2008 and 5-6-2009 minutes of meetings and the decisions of the committee (including number of applications on which decisions were taken for/against during the period)
3. Internal notesheet and any other paper work done while processing my application. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 6.6.2009 रोजी मुळ अर्जावर योग्य ती कार्यवाही करण्याकरीता परीक्षा व चौकशी विभागाकडे पाठविण्यात आली आहे. माहिती उपलब्ध झाल्यानेतर आपणास पाटविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर दि. 18.7.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 12.8.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 30.9.2009 रोजी देण्यात आला असून मागितलेली माहितीच्या अनुषंगाने पुरविण्यात आलेली माहिती वगळून न पुरविण्यात आलेली माहिती अर्जदाराचे मुळ माहिती अर्जाचे पुनश्चः अवलोकन करुन कार्यालयीन टिपणी मध्ये कार्यालयीन गोपनियतेसंबंधी बाधा पोहोचत नसेल तर आणि इतर माहिती संदर्भात कलम 8 मधील तरतूदीचे उल्लंघन होत

नसेल तर संपूर्ण वस्तुस्थिती तपासून अर्जदाराने मागितलेली माहितीच्या अनुषंगाने माहिती विनामुल्य पुरविण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे पती यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती मिळालेली नाही व वेळोवेळी ते विद्यापीठात त्यांच्या पत्नीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये निर्णयाची माहिती विचारावयास गेलो असता त्यांनी वेळोवेळी माहिती देण्याची टाळाटाळ केलेली असून त्यांच्या अर्जाच्या संदर्भातील निर्णय सुध्दा कळविण्यात आलेला नव्हता व त्यामुळे त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीचा वापर करावा लागला. परंतु त्यातूनही मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिली नाही व ती गोपनिय आहे व अधिनियमाच्या कलम 8 (छ) (त्र) अंतर्गत देता येणार नाही असे कळविलेले आहे. वास्तविक अर्जदाराने अर्ज केल्या नंतर त्या अर्जाच्या संदर्भामध्ये जो निर्णय कार्यालयात होतो त्या निर्णयाची संपूर्ण माहिती पारदर्शकता राखण्याच्या करीता कार्यालयाने उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. तशी तर ती दिली नाहीच परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे ती नाकारलेली आहे. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा असंदिग्ध आहे व त्यात कोणत्याही प्रकारचा निश्चित असा आदेश दिलेला नाही किंवा कोणत्याही प्रकारचे विश्लेषण सुध्दा केलेले नाही व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सार्वजनिक प्राधिकरणाचे प्रमुख म्हणून कोणताही निर्णय न घेता स्वतःची जबाबदारी टाळलेली आहे व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे शास्ती लादण्यात यावी अशी त्यांनी विनंती केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांचेकडे सर्वच माहिती उपलब्ध नसते. व ती त्या त्या विभागातून उपलब्ध करुन घ्यावी लागते. सदरची माहिती त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे त्याप्रमाणे त्यांनी ती कळविलेली आहे. त्या विभागाने ती माहिती गापनिय आहे असे कळविल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्याप्रमाणे कळविलेले आहे. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की ती माहिती सुध्दा विलंबाने कळविण्यात आलेली आहे व त्यातही ती नाकारलेली आहे. त्यावर प्रथम





अपीलीय अधिकारी यांच्या निर्णया प्रमाणे माहिती दि. 19.10.2009 रोजी उपलब्ध करुन दिली असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. त्यामध्ये 1. समकक्षता समिती शिक्षण विद्या शाखा दि. 30.10.2001 चे कार्यवृत्त. 2. समकक्षता समिती शिक्षण विद्या शाखा दि. 8.6.2009 चे कार्यवृत्त हे उपलब्ध करुन दिलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती मिळालेली नाही व जन माहिती अधिकारी यांना माहिती ही त्यांच्या जावक विभागाकडे पाठविण्यात आली या पलीकडे जावक विभागाने माहिती पाठविली किंवा नाही या बाबतचा कोणत्याही प्रकारचा पुरावा दिसून येत नाही. व त्यामुळे जावक विभागाने

माहिती पाठविली किंवा नाही जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांना माहिती दिसून येत नाही. वास्तविक अर्जदारानी मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. त्यात कोणत्याही प्रकारची गोपनियता असण्याचे कारण नाही. अर्जदार पात्र आहे किंवा नाही त्याबाबत संबंधित कार्यालयाने जी टिपणी केली असेल व समितीने जो निर्णय घेतला असेल त्या संबंधातील माहिती ही उपलब्ध करुन देणे यात कोणत्याही प्रकारची गोपनियता येवू शकत नाही. इतर विद्यार्थ्याच्या बाबत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक नाही. व त्या माहितीची विभागणी करुनच समितीचे इतिवृत्त हे उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. संबंधित विभागाने माहिती अधिकारी यांना तसे कळविले असल्यास संबंधित विभागाने माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय हा कोणत्याही प्रकारे माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भातील निर्णय दिसून येत नाही. सार्वजनिक प्राधिकरणाचे प्रमुख म्हणून त्यांनी निश्चित असे विश्लेषण करुन कोणती माहिती उपलब्ध करुन द्यावी व कोणती माहिती उपलब्ध करुन देवू नये याचा निर्णय करणे आवश्यक असते. व ती त्याच दिवशी उपलब्ध होईल असे पाहणे आवश्यक आहे. माहिती त्यांच्या स्तरावरच उपलब्ध करुन देणे अपेक्षित असल्यानेच प्रथम अपीलीय अधिकारी यांना शास्तीचे अधिकार देण्यात आलेले नाही. प्रथम अपीलीय अधिकारी हे त्यांच सार्वजनिक प्राधिकरणातील असण्याचे प्रमुख कारण हे आहे की सार्वजनिक प्राधिकरणाच्या स्तरावर निश्चित असा निर्णय घेवून माहिती उपलब्ध झाली पाहिजे. परंतू तसे निर्णय दिले जात नाही व त्यामुळेच राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीले दाखल केली जातात. यापुढे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निश्चित असा निर्णय अपीलात देणे आवश्यक आहे. याची नोद प्रथम अपीलीय अधिकारी यांनी घ्यावी. तसेच माहिती पोष्टाने पाठवावयाची संबंधित विभागाकडे पाठविण्यात आलेली असेल आणि त्यांनी ती अपीलकर्ता यांना पाठविली नसेल तर त्याबाबत सुध्दा प्रशासकीय कार्यवाही संबंधित जावक विभागातील कर्मचा–याविरुध्द करणे आवश्यक आहे. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ होते असा निष्कर्ष काढावा लागतो. अधिनियमाचे कलम 5 (4) प्रमाणे माहिती अधिका–यास इतर अधिकारी/कर्मचारी यांचे सहाय घेता येते व असे सहाय घेतले





असल्यास त्या अधिका–यास/कर्मचा–यास कलम 5 (5) प्रमाणे माहिती अधिकारी समजण्यात येते व त्याकरीता संबंधित विभागातील ज्यांनी माहिती अधिकारी यांचेकडे माहिती देता येणार नाही असे कळविले त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या

Ph.D. in Education च्या संदर्भात दाखल झालेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची टिपणी तसेच समितीचा निर्णय व समितीचे कार्यवृत्त यांच्या छायांकीत प्रती विनामुल्य रजिस्टर पोष्टाने हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविण्याकरीता ज्या संबंधित शाखेचे किंवा विभागाचे सहाय घेतले असेल त्या संबंधित शाखेचे अधिकारी किंवा कर्मचारी यांना अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजुन त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1155/2009**

श्री सुधाकर भाऊराव निवते
सोनेगाव(सी) पो. सावरगाव
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री तामगाडगे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी
ता. जि. चंद्रपूर

2) श्री प्रकाश नि. गुरुमुखी
जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.8.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.4.2009 रोजी जन माहिती अधिकारी तालुका कृषी अधिकारी यांचे कार्यालयात सन 2008–2009 मध्ये शेततळे बांधकामात बोडो नुतनीकरण लाभार्थी शेतकरी यांची यादी व त्याचे एस्टीमेट शेततळे पूर्ण झाली त्याची यादी अपुर्ण व चालु असलेली यादी देण्यात यावी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार व दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 22.6.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय मिळालेला नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे परंतु ते माहिती व्यक्तिशः घेण्याकरीता कार्यालयात उपस्थित झाले नाही. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुनावणीकरीता सुध्दा ते उपस्थित झालेले नाही व त्यामुळे दि. 18.8.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला परंतु माहिती घेण्यास त्यांनी नकार दिला. त्यानंतर दि. 20.11.2009 रोजी सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती ही पोष्टाने पाठविण्यात आली. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही. जन





माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही संपूर्ण तालुक्यातील एकुण 869 शेततळयाची कामे आहेत. अपीलकर्ता यांचा अर्ज ज्यावेळेस आला त्या महिन्यामध्ये कोणत्याही प्रकारे शेततळयाची कामे सुरु झालेली नव्हती. तसेच संपूर्ण तालुक्यातील प्रत्येक शेततळयाची माहिती व एस्टीमेटचा छायांकीत प्रतीचा खर्च रु. 15000 पर्यंत येईल व तशी तरतुद कार्यालयात नाही त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती ही उपलब्ध करुन देवून एखाद्या तळयाची एस्टीमेटची प्रत देता येईल. परंतु त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की प्रत्येक तळयाचे मोजमाप वेगळे असेल व पुर्ण झाले किंवा नाही याबद्यलची माहिती उपलब्ध होवू शकणार नाही. परंतु दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे विनामुल्य माहिती देण्याचे बाबत माहिती अधिकारी यांनी

असमर्थता व्यक्त केली. कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध नाही. व दुस–या हेडमधील निधीचा वापर या करीता करता येणार नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यांचे कार्यालयात येवून सर्व कागदपत्रांचे निरीक्षण केल्यास त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध होवू शकेल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांना कामकाजाच्या दिवशीची तारीख व वेळ लेखी कळवून त्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित राहावे. तशा प्रकारे तारीख व वेळ कळविल्यास अपीलकर्ता यांना तालुक्याती सर्व शेततळयाच्या संदर्भातील माहिती व एस्टीमेट अवलोकन करण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात यावी. व त्यातून अपीलकर्ता यांनी माहितीची नोंद विनामुल्य घ्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1162/2009

श्री दिलीप विनायक दोडके
किसान विद्यालय आष्टा
ता. भद्रावती जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.विभाग)
जिल्हा परिषद चंद्रपूर
2) श्री एस. एस. बुरीले
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक

किसान विद्यालय आष्टा
ता. भद्रावती जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 7.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक किसान विद्यालय आष्टा यांचेकडे खालीलप्रमाणे तीन मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

1. आपले कार्या. पत्र दि.4.5.09 मा.लेखाधिकारी शिक्षण विभाग चंद्रपूर यांना व त्याची प्रतिलीपी शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर व 2. मला. च्या अनुषंगाने आपणास लेखाधिकारी यांचेकडून प्राप्त झालेली माहिती मिळण्याबाबत.

2. सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत आपण कोणत्या वर्षी किती निधी आजपर्यंत प्राप्त णला? त्या चेकचे नंबर मिळण्याबाबत. शिक्षा अभियानाअंतर्गत आपण 5 ते 8 साठी खरेदी केलेल्या साहित्याची यादी मिळण्याबाबत.

3. संदर्भ क्र.1 माध्य/ब/6093/08 कार्यालय शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग नागपूर दि. 13.मार्च 2009 अन्वये अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मिळण्याबाबत.

4. पत्र क्र. शिअमा/स्था2/696/08 कार्यालय शिक्षणाधिकारी माध्य. जि.प.चंद्रपूर दि. 8.7.2009 नुसार केलेल्या कार्यवाहीचा व मा. शिक्षणाधिकारी व उपसंचालक यांना सादर केलेल्या अहवालाची प्रत मिळण्याबाबत. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 28.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 27.11.2009 रोजी देण्यात आलेला असून 15 दिवसाचें आंत मागितलेली माहिती अर्जदाराचे देय असलेली फी जमा करुन पुरविण्याचे निर्देश देण्यात येत आहे. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 2.12.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. पुन्हा दि. 10.12.2009 रोजी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दि. 12.10.2009 रोजी पुन्हा अर्ज दाखल केला. व त्याप्रमाणे दि. 29.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी यांनी खर्चाचे पत्र दिले परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांचा दि. 7.2.2009 चा अर्ज जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांना प्राप्त झाला नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु अपीलकर्ता यांनी यु पी सी ने पाठविले होते त्याबाबतचा पुरावा त्यांनी आयोगापुढे दाखविला. पुन्हा दि.

12.10.2009 रोजी अर्ज दाखल केला व त्याप्रमाणे पुढिल कार्यवाही झालेली आहे. दि. 29.10.2009 रोजी खर्चाचा भरणा करण्याकरीता यु पी सी ने पत्र पाठविले व तसे कागदपत्र दाखल केलेले आहे. परंतु अपीलकर्ता हे सुध्दा यु पी सी ने पाठविलेले पत्र त्यांना मिळाले नाही असे म्हणतात यावरुन अपीलकर्ता यांनी यु पी सी ने पाठविलेला अर्ज माहिती अधिकारी यांना मिळत नाही व माहिती अधिकारी यांनी पाठविलेला खर्चाचा भरणा करण्याचे पत्र यु पी सी ने पाठविलेले अपीलकर्ता यांना मिळत नाही व त्यामुळे सदरच्या प्रकरणात माहिती उपलब्ध झालेली आहे या कारणास्तव सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1159/2009 व 1160/2009

श्री एस. झेड. अहमद
प्लॉट नं. 701 जिलानी हाऊस नमकगंज
इतवारी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक
भूमी अभिलेख नागपूर
2) श्री जे. एम. बेंडे
जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.1
सदन नागपूर ..... **उत्तरवादी**

( आदेश पारित दिनांक 16.1.2010 )

निर्णय

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 1159/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 15.4.2009 रोजी जन माहिती अधिकारी नगर भूमापन अधिकारी क्र.1 यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

On 5-2-09 plot no.445 was measured by the City Survey Officer No.1. While doing measurement an area of 28-5 sq.mtr. of the area of the plot no. CTS 445 was illegally added into the area of plot no. CTS 442/1 reasing from 200.4 sq.mtr. to 228.9 sq.mtr.

Against this mischief an appeal No.194/05 Sr.No.1101/04 S.Z.Ahmed vs. City Survey Officer No.1 was preffered to S.L.R.Nagpur

On 30.1.2006 the appeal was allowed and remanded to the City Survey Officer No.1

By this application under RTI the applicant requests the City Survey Officer No.1 Nagpur to inform the order on remand. सदरची माहिती ही नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 8.6.2009 रोजी प्रथम अपील केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 15.6.2009 रोजी देण्यात आलेला दिसून येतो. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की दि.29.5.2009 रोजी विषयांकीत प्रकरणातील अर्ज इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर प्रकरणी माहितीचे अधिकारात आपण मागविलेले अपील प्रकरणाचे माहितीचा इकडील कार्यालयाकडून शोध घेणे सुरु आहे. अधीक माहितीसाठी कार्यालयाशी संपर्क साधावा असे कळविले. त्याकरीता परि–भूमापक क्र.4 यांनी नगर भूमापन अधिकारी क्र.1 यांना पत्र दिलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झालेली नव्हती व दि. 26.6.09 चे पत्रान्वये अपीलकर्ता यांना दि.17.4.09 चे अर्जात मागणी केल्याप्रमाणे आदेशाच्या प्रती पुरविण्यात येत आहे व त्यात मौजा नागपूर शिट क्र. 173 न.भू.क्र.445 व न.भू.क्र.442/1 अपील क्र.194/05 एस आर क्र. 1101/04 ची आदेशाची प्रत व क्र. भू.प्र.सी.टी.एस.दु.प्र.62/93 दि. 2.3.93 चे आदेशाची प्रत उपलब्ध करुन दिली. परंतु सदरची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगापुढे सांगितले. त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी यूपीसी ने माहिती पाठविली व त्याबाबतचा पुरावा आयोगापुढे सादर केला आहे. असे असले तरी

अपीलकर्ता यांना जर माहिती उपलब्ध झालेली नसेल तर पुन्हा माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

3. अपील क्र. 1160/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 29.12.2008 रोजी शासकीय माहिती अधिकारी नगर भूमापन अधिकारी क्र.1 यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

The above nzul plot no.97 was allotted to one party for construction of temporary in shed vide order dt.87/A-6/62-63 on dt. 19-2-64 by the Collector Nagpur. On the western side of the above plot there is a road and to the south is a trust property.

a) How the City survey has given two city survey no. to the nazul plot no.97 the first is CTS No 611 & the other is 609 kindly quote the order

b) How is that the area of both the CTS No 611 & 609 have been increased the area for example 611 has been increased the area just morethatn 10$^{th}$ times i.e.286 sq.mt. whereas the CTS No 609 has been increased to 45.5 sq. mt. from 26.6 sq.mts.

Please quote the orders enchaceing the areas of both the plots.

c) How is that the nazul plot no.97 i.e. CTS No 609 has traveled towards east away from the road what orders

d) who has in the enquiry register regarding CTS No 609 has reported it as open space kindly inform

e) How is nazul plot no.97 is given two different nos. at two diffrrent locations with increase areas i.e. CTS No 611 & 609 what orders.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 29.1.2009 रोजी माहितीबाबत अभिलेखावरुन शोध घेणे सुरु आहे. आपण मागणी



केलेली माहिती सत्वर पुरविण्याची तजविज ठेवण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. दि. 13.2.2009 रोजी नझुल प्लॉट नं. 97 न.भू.क्र.609 व 611 या मिळकतीबाबत निर्णय नगर भूमापनाचे वेळी नगर भूमापन चौकशी अधिकारी यांनी निर्णय दिलेला आहे. आपणास संबंधित अभिलेखाच्या नकला पाहीजे असल्यास आपण कार्यालयास रितसर अर्ज करुन नियमानुसार नकला फी चा भरणा करुन नकला प्राप्त करुन घ्याव्या. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 15.4.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे दि. 26.6.2009 रोजी माहिती पुरविण्यात आलेली आहे. परंतु अधिक्षक भूमि अभिलेख दि. 15.6.2009 च्या आदेशान्वये निर्णयाची प्रत पुनश्च आपणास पुरविण्यात येत आहे. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

4. अपीलकर्ता यांना माहिती पुरविण्यात आली आहे परंतु उपलब्ध झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. असे असल्यास अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती कागदपत्राच्या स्वरुपात व्यक्तीशः पुरविणे संयुक्तिक राहिल.

**आ दे श**

1) अपील क्र. 1159/2009 व अपील क्र. 1160/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीची कागदपत्राच्या छायांकीत प्रती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या. व तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1157/2009**

श्री युवराज सदाशिव रामटेके
राजस्व नगर निखाडे पोली यांच्या घरा जवळ
गणेशपूर भंडारा ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी(गट अ)
जिल्हा परिषद भंडारा
ता. जि. भंडारा
2) श्री प्रकाष विठ्ठलराव भोयर
जन माहिती अधिकारी तथा (समाज कल्याण विभाग)
जिल्हा परिषद कार्यालय भंडारा

ता. जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेष पारित दिनांक 16.1.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.6.2009 रोजी जन माहिती अधिकारी समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद कार्यालय भंडारा यांचेकडे वनमहसुल अनुदानाच्या/तपशिलासंबंधी वन विभाग भंडारा यांचकडून जिल्हा परिषदेला 7 टक्के वन महसुलापोटी मिळालेल्या निधीचा कोणकोणत्या कामावर खर्च केल्याच्या संदर्भात सन 2002 ते 2009 या कालावधीतील एकुण 10 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 10.7.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की माहिती व्यक्तिषः मागितली होती. परंतु माहिती व्यापक प्रमाणात असल्यामुळे देता आलेली नाही. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की ते माहिती घेण्याकरीता माहिती अधिकारी यांचेकडे गेले होते व ही बाब जन माहिती अधिकारी यांनी मान्य केलेली आहे हे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे हे निश्चित. प्रथम अपीलीय
अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे. मात्र दि. 27.8.2009 रोजी माहिती अधिकारी समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद भंडारा यांनी अपीलकर्ता यांना माहिती दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की सोबत कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे दिलेली नाही. त्यांनी आयोगापुढे दोन पृष्ठ व लिफाफा दाखविला. लिफाफ्याच्या आकारावरुन त्यासोबत नमुद केलेले इतर पृष्ठ पाठविले नाही असे दिसून येते. व त्यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे जन माहिती अधिकारी हे स्वतः दोषी आढळुन येतात. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे अशी आयोगाची खात्री झाली आहे. जन माहिती अधिकारी यांना शास्तीच्या बद्यल विचारणा करण्यात आली त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की व्यक्तीशः त्यांनी माहिती मागितली त्यामुळे ती देता आली नाही. परंतु त्यांनी मान्य केले की अपीलकर्ता हे माहिती घेण्याकरीता त्यांचेकडे गेले होते व माहिती उपलब्ध करुन देतांना सुध्दा कोणत्याही प्रकारची यादी जोडलेली नाही हे सिध्द झालेले आहे. एकुण 10 मुद्यांच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिली असती तर सदरचे कागदपत्र ही अपीलकर्ता यांना दिलेल्या लिफाफ्यात येवू

शकत नाही हे निश्चित. त्यामुळे जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आदेष

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना दि. 27.8.2009 ला पाठविलेल्या पत्रामध्ये नमुद केलेले सर्व यादया कागदपत्राच्या सहीत व संबंधित कागदपत्रे विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द रु. 25000/– ची शास्ती लादण्यात येईल.

2) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता व्यक्तीश त्यांचेकडे माहिती घेण्याकरीता आले असता ही बाब मान्य केली असल्यामुळे व तरीही माहिती दिली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द रु. 5000/– ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली त्यांचे दरमहिन्याचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.





3) सदरच्या शास्तीची वसुली ही <u>**मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद भंडारा**</u> यांनी करावयाची आहे व त्याकरीता सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे त्यांचेकडे पोस्टाने पाठविण्यात यावी.

4) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय दिला नव्हता त्यामुळे अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले असून त्यांचेविरुध्द <u>**मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद भंडारा**</u> यांनी प्रशासकीय कार्यवाही करावी.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1167/2009**

श्री ॲड. सतिष महादेवराव उके
1271 पार्वती नगर
नागपूर 27 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री ए. बी. पोटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त
परिमंडळ क्र.2 नागपूर शहर
2) जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
सदर विभाग नागपूर शहर ..... **उत्तरवादी**

**( आदेष पारित दिनांक 18.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.10.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी सहायक पोलीस आयुक्त यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. निवेदन दि. 3.9.09 याच्या त्यातील नमूद संदर्भ क्र.1 व 2 यांच्या व त्यातील सलग्न संपुर्ण कागदपत्रे, बयाने, चौकषी अहवाल व त्यातील नमूद तक्रार अर्ज यांच्या सुस्पष्ट छायांकित सत्यप्रती मिळणेस.

2. माझे निवेदन दि. 3.9.09 यावर झालेली कारवाईच्या सर्व संबंधित कागदपत्रे, ज्ञापन, आदेश, टिपण कारवाईच्या सत्यप्रती मिळणेस विनंती. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 21.10.2009 रोजी मुद्दा क्र. 1 ची माहिती या कार्यालयाचे जावक क्र. 8 सपोआ/सवि/नाग/1584/09 दि.6.10.09 अन्वये आपणास पुरविण्यात आलेली आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 31.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 18.11.2009 रोजी देण्यात आलेला असून अपीलाच्या सोबत कोणतेही कागदपत्रे दाखल केलेले नाही या कारणास्तव पूर्तता करावी असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर सदरच्या प्रथम अपीलाचे हस्तांतर करण्यात आलेले असून माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.



3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना माहिती उपलब्ध झाली परंतु पोलीस आयुक्त यांचे पत्रामध्ये अर्जदार सतिश महादेवराव उके यांच्या अर्जावरुन कार्यवाही करावी असा जो आदेश दिला आहे त्या पत्राची छायांकीत प्रत त्यांना उपलब्ध झाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की पोलीस आयुक्त यांचे पत्र क्र. पोआना/वाचक/क्रि.रि.पि./2009–206 दि.17.7.2009 या पत्रामध्ये उल्लेख केलेले अर्जदाराचा अर्ज या कार्यालयात उपलब्ध नाही. तसेच पोलीस आयुक्त यांचेकडून जे वरील पत्र आलेले आहे त्या अर्जाची प्रत आलेली नाही व त्यामुळे सदरची प्रत उपलब्ध करुन देता आलेली नाही. त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की तशा प्रकारच्या अर्जाच्या संदर्भामध्ये त्यांनी स्वतंत्रपणे माहिती मागितलेली होती व त्या कार्यालयाकडून अशा प्रकारचा अर्ज उपलब्धच झालेला नाही असे कळलेले आहे. व त्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांनी जोडलेली आहे. व त्यावर सदरचे पत्र हे उपलब्ध नाही हे स्पष्ट होते. अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. 16.9.2009 च्या अर्जामध्ये नमुद तक्रार अर्ज (माझा असल्यास) असे नमूद केलेले असल्यामुळे त्या अर्जाच्या संदर्भामध्ये त्यांना स्वतंत्रपणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आदेष

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंषतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 3.9.2009 (प्रत सलग्न) त्यातील नमुद संदर्भ क्र.1 मधील पोलीस आयुक्त यांचे पत्रात नमुद केलेल्या अपीलकर्ता यांच्या अर्जाची प्रत उपलब्ध नसल्यास स्पष्टपणे तसे त्यांना पोस्टाने कळविण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1171/2009**

श्री अनिल किसन गायकवाड
60 कानफाडे नगर वर्धा रोड
नागपूर 15 ..... अपिलकर्ता

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
महा. राज्य विज वितरण कंपनी नागपूर
कॉंग्रेस नगर धंतोली नागपूर
2) श्री बी. वाय. खंडाईत
जन माहिती अधिकारी तथा अभियंता
महा. राज्य विज वितरण कंपनी नागपूर
कॉंग्रेस नगर धंतोली नागपूर 15 ..... उत्तरवादी

**( आदेष पारित दिनांक 18.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा अभियंता महा. राज्य विज वितरण कंपनी नागपूर यांचेकडे विद्युत मिटर क्र. 9000402946 पोल क्र. पी/11 वरील विद्युत प्रवाह दि. 26.10.09 रोजी खंडीत केला आहे. त्या बाबत एकुण चार मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरचा अर्ज हा माहिती अधिका–याचे कार्यालय नसून तक्रार निवारण कार्यालय आहे असे कळवून परत करण्यात आलेले दिसून येते. दि. 9.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानुसार दि. 3.11.2009 माहितीचा अर्ज, दि. 9.11.2009 माहिती अधिकारा अंतर्गत अर्ज व कार्यालयाचे पत्र दि. 30.11.2009 चे संदर्भ देवून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना आतापर्यंत माहिती मिळालेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी शाखा अभियंता यांचेकडे माहितीचा अर्ज दाखल केला. तसेच प्रथम अपील व माहितीचा





अर्ज पुन्हा एकाच तारखेला दाखल केला व त्यात वेगळी माहिती मागितली. त्यामुळे त्यांना दि. 9.11.2009 अपील अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी पुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांचे वडीलोपार्जित घर आहे. एका मिटरवरुन दोघे भाऊ विज घेतात. पण मिटर त्यांचे नावावर आहे त्यांनी अर्ज देवून मिटर शिफ्ट केला आहे. त्यामुळे त्यांचे घरामध्ये विज नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की ग्राहकाचा अर्ज आल्यावर त्याप्रमाणे कार्यवाही होते. परंतु अपिलकर्ता हे ग्राहक नाही व घरमालकही नाही. त्यामुळे त्यांनी जी माहिती मागितली ती माहिती त्यांना देण्यात आलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना विज पाहिजे. त्यावर अपीलकर्ता यांनी स्वतंत्रपणे नियमाप्रमाणे विज जोडणी मागावी. नियमाप्रमाणे उपलब्ध करुन देता आल्यास योग्य राहिल. परंतु या प्रकरणी माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेष

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1165/2009**

श्री जितेंद्र हरीदास जुमडे
39 ओम नगर निवृत्ती पार्क
सक्करदरा चौक नागपूर 9 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री कुकडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उप संचालक
नागपूर विभाग नागपूर
2) श्री बी. एम. सोनटक्के
जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
अद्यापक विद्यालय कोराडी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेष पारित दिनांक 18.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य अध्यापक विद्यालय कोराडी यांचेकडे नियुक्ती व वेतन विषयक माहिती निषा नारायण ठाकरे हिच्या कॉलेजमधील नियुक्ती व एकत्रित वेतनविषयी माहिती सन 2008–2009 कालावधीची मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना यु.पी.सी.ने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 25.8.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. व प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. 1.10.2009 रोजी निषा नारायण ठाकरे ही अध्यापक विद्यालयात कोणत्याही पदावर कार्यरत नाही. मुद्या क्र. 2 ते 4 उपस्थित केलेल्या मुद्याची माहिती निरंक समजण्यात यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करुन अध्यापक विद्यालयातील हजेरीपट (मस्टर) चे निरीक्षण करण्याचे आदेष देण्याची विनंती आयोगाकडे केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती मधील श्रीमती निषा नारायण ठाकरे हया सन 2008–2009 या





कालावधीत त्यांचेकडे कार्यरत त्यांचेकडे कार्यरत नव्हत्या. व त्यामुळे त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रश्नच उदभवत नाही. परंतु अपीलकर्ता यांनी हजेरीपट स्टाफ प्रोफाईलचे निरीक्षण करण्याची विनंती केलेली असल्यामुळे त्यांना अभिलेखे निरीक्षणास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आदेष

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांचेकडे सन 2008–09 या कालावधीतील हजेरीपट व स्टाफ प्रोफाईलचे निरीक्षण करण्याकरीता कार्यालयीन कामकाजाच्या दिवशीची तारीख व वेळ कळवून त्या दिवशी त्या वेळेस उपस्थित राहून अभिलेखाचे निरीक्षण करुन घ्यावे. व माहिती उपलब्ध असल्यास छायांकीत प्रती घ्याव्या.
2) अपीलकर्ता उपस्थित झाल्यावर प्राचार्य यांनी संबंधित अभिलेखे म्हणजे हजेरीपट व स्टाफ प्रोफाईल अपीलकर्ता यांना निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावे व आवश्यक असल्यास छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्या.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1095/2009**

श्री फत्तु टिकारामजी गभने
मु. पो. सराडी
ता. तिरोडा जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
व्ही.आय.पी.कंपनी एम.आय.डी.सी.एरीया हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
व्ही.आय.पी.कंपनी एम.आय.डी.सी.एरीया हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेष पारित दिनांक 20.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.8.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा व्ही.आय.पी. कंपनी एम.आय.डी.सी.एरीया हिंगणा यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 21.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. व उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. व ज्या व्यक्ती बद्यल त्यांनी माहिती मागितलेली आहे ती व्यक्ती कंपनीच्या हजेरीपटावर, नोकरीवर नव्हती. त्यामुळे एप्रिल 08 ते मार्च 09 चे वेतन देयक उपलब्ध नाही अषी माहिती त्यांनी दिलेली आहे. तसेच त्यांनी असे सांगितले की व्ही.आय.पी. ही खाजगी कंपनी असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी त्या कंपनीस लागू नाहीत. व्ही.आय.पी. कंपनीस शासनाकडून आर्थिक सहाय काय याबद्यलची विचारणा केली असता त्यांनी नाही असे सांगितले व तसा त्यांचेकडे पुरावा नाही असेही सांगितले. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.





**आदेष**

1) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 900/2009**

श्री मोहनसिंह प्रेमसिंह चव्हाण
फ्लॅट नं. डि–4 षिवम अपार्टमेंट
रुईकर रोड महाल नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विशेष पोलीस महानिरीक्षक(प्रशासन)
पोलीस महासंचालक कार्यालय मुंबई
शहीद भगत सिंग मार्ग कुलाबा मुंबई 400001
2) श्रीमती वैशाली रमेश बांदीवडे
जन माहिती अधिकारी तथा उपसहाय्यक पोलीस महानिरीक्षक(रा.व.का.)
पोलीस महासंचालक कार्यालय मुंबई
शहीद भगत सिंग मार्ग कुलाबा मुंबई 400001 ..... **उत्तरवादी**

**( आदेष पारित दिनांक 20.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.9.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 19.5.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस महासंचालक यांचे कार्यालया मध्ये एकुण 20 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 20.6.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 18.7.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 20.8.2009 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना दि. 28.10.2009 रोजी निर्णय कळविण्यात आला आहे. परंतु निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांचे पत्नीवर बदलीच्या बाबत अन्याय झालेला आहे. पतीपत्नी नोकरीस असल्यावर त्यांना एकाच ठिकाणी द्यावे असा शासनाचा नियम असतांना त्यांनी बदली केलेली आहे व इतरांना मात्र नागपूर मध्ये त्याच ठिकाणी कायम केलेले आहे. उपलब्ध करुन दिलेल्या माहितीवरुन असे दिसून येते की अपीलकर्ता हे माहे 11/1980 पासून आजतागायत त्यांची संपूर्ण सेवा





नागपूर कार्यालयात झालेली आहे व त्यामुळेच प्रषासकीय कारणास्तव रिक्त पदावर पदामुळे पदोन्नतीवर नागपूर येथील कार्यालयात नेमणूक करणे शक्य झाले नाही असे कळविलेले आहे. वास्तविक अशा प्रकारची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली असतांना अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांचेवर अन्याय झालेला आहे. अपीलकर्ता यांनी 20 मुद्यांमध्ये जी माहिती विचारलेली आहे त्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की त्यामध्ये सुध्दा अपीलकर्ता यांनी आरोप केलेले आहेत व जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय मागितलेले आहेत जे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेष**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**

राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1075/2009**

सौ. सरिता अरुण मंगेशकर
जोशी नगर घर नं. 2595/अ
रामेश्वरी रिंग रोड नागपूर 27 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. डी. पांडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक
नागरी हक्क संरक्षण नागपूर
कोतवाल नगर प्लॉट नं.41 खामला रोड नागपूर
2) श्री व्ही. जी. गायकवाड
जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक
नागरी हक्क संरक्षण नागपूर
कोतवाल नगर प्लॉट नं.41 खामला रोड नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेष पारित दिनांक 18.1.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.6.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक यांचेकडे दि. 6.11.07 ते 16.5.09 समन्स दिलेल्या व्यक्तीचे बयाण अक्ट्रासिटी ॲक्ट अन्वये दि.16 ते 25 तारखेपर्यंत आलेले बयान प्रती देण्याबाबत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने या कार्यालयाचे जावक क्र. 96/09 प्रमाणे रजिष्टर पोष्टाने पत्र पाठवून कार्यालयात दि. 30.6.2009 रोजी हजर राहून मागितलेली माहिती घेवून जाण्याबाबत कळविले. त्याप्रमाणे दि. 30.6.2009 रोजी हजर झाले. त्यांना अर्जात मागितलेली माहिती देण्यात आली. परंतु माहिती घेवून जाण्यास नकार दिला. कार्यालयात प्रत मिळाल्या संबंधी अर्जदाराने सही केली नाही त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 10.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलात अपीलकर्ता यांनी व्यावसायीकाने जातीवाचक शिवीगाळ केली व घर पाडले त्या संबंधीत एकुण 7 व्यक्तीच्या विरुध्द तक्रार होती. त्या संबंधी माहिती होती परंतू ती माहिती न देता वेगळीच माहिती दिली. जाती प्रतिबंधक कायदयान्वये कार्यवाही न होण्याबाबत माहिती त्यांनी मागितली. दि. 18.9.2009 रोजी प्रथम अपीलाची सुनावणी घेतांना अपील अर्जात मागितलेले कागदपत्रे मला नको असे म्हणून पुन्हा लेखी अर्ज दिला व हया अर्जाप्रमाणे माहिती पाहिजे असल्याचे सांगितले व परत निघून गेली. दि. 18.9.2009 च्या अर्जाचा निपटारा करण्यासाठी तिला पुन्हा एच सी–राजू यांचे हस्ते लेखी पत्र दिले व सदरचे पत्र तिने दि. 30.9.09 ला स्विकारुन स्वाक्षरी करुन मी माझ्या वेळेनुसार केव्हाही येईल असे सांगुन पत्र स्विकारले. अर्जदार दि. 6.10.09 रोजी पुन्हा कार्यालयात आली व दि. 18.9.2009 च्या अर्जानुसार माहिती पाहिजे नसुन तिने परत दि. 6.10.09 रोजी दुसरा अर्ज दिला व सदर अर्जानुसार माहिती पाहिजे असे लेखी दिले व नंतर ती कार्यालयात आली नाही. प्रथम अपीलात वेगळीच माहिती मागितलेली असल्यामुळे व निर्णय झालेला नाही व त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.





3. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांनी निश्चित अशी कोणतीही माहिती मागितलेली दिसून येत नाही. जवळ जवळ दीड वर्षा मधील मोघम माहिती मागितलेली दिसून येते. व त्यानंतर प्रथम अपीलात सुध्दा नवीन माहिती मागितलेली आहे व त्यानुसार अर्जामध्ये प्रत्येक वेळेस माहिती वेगवेगळी मागितलेली दिसून येते. तरीही अर्जदाराच्या दि. 18.9.2009 च्या लेखी अर्जावर दिनांक 23.9.2009 गजानन पडाले यांचे बयान व अंतिम चौकशी अहवाल घेवून जाण्यास लेखी कळविले असता ती दि. 6.10.09 रोजी कार्यालयात आली व पुन्हा लेखी अर्ज सादर केला व त्या अर्जामध्ये एकुण 8 व्यक्तीची नावे त्यांचे बयानांची मागणी केली. अर्जदाराने केलेल्या चौकशीत कोणताही दखलपात्र गुन्हा सिध्द होत नसल्याचे निष्पन्न झाल्याने तसेच सदर तक्रार अर्जाच्या चौकशीत ना.ह.से.कायदा व अनु.जाती जमाती अ.प्र. कायद्या अन्वये गुन्हा होत नसल्याने सदरचा अर्ज दप्तरी दाखल करण्यात आला असे आयोगाचे निदर्शनास आणले. त्यामुळेच अपीलकर्ता हे प्रत्येक वेळेस माहितीच्या अर्जातील माहितीचे वर्णन बदलून मागत असतात असे दिसून येते. त्यांना गुन्हा दाखल करुन हवा आहे असे अपेक्षित दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. व पुन्हा आयोगापुढे आणखी त्यांना माहिती हवी असल्यास त्यांच्या नस्तीमधून माहिती मागावी असे सांगितले. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेष

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1201/2009**

श्री अजच विठठलराव भोयर
डॉ. खडसे लेआऊट बॅचलर रोड
आर्वी नाका वर्धा ता. जि. वर्धा 442001 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय पुणे
पुणे 01.
2) श्री सदानंद शिंदे
जन माहिती अधिकारी तथा प्रषासन अधिकारी
षिक्षण संचालक
माध्यमिक व उच्च माध्यमिक षिक्षण संचालनालय पुणे
पुणे 01. ..... **उत्तरवादी**

**( आदेष पारित दिनांक 21.1.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 28.3.2009 रोजी जन माहिती अधिकारी षिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक षिक्षण संचालनालय यांचे कार्यालयात खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. वर्ग 5 ते 7 वर अपदविधर वेतनश्रेणीत नियुक्त प्रषिक्षित पदविधर षिक्षकांच्या सेवाजेष्ठतेबाबत षिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.वर्धा यांनी षिक्षण उपसंचालक नागपूर विभाग नागपूर यांचे मार्फत आपल्या कार्यालयाला पत्र क्र. जिपव/षिवि/माध्य/1414/2008 कार्या. षिक्षणाधिकारी (माध्य) दि.16 मे 2008 नुसार मार्गदर्षन मागितलेले होते. हया पत्रावर आपल्या कार्यालयाकडून झालेल्या कार्यवाहीचा अहवाल मिळण्याबाबत.

2. मुद्या क्र. 1 मध्ये नमुद षिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.वर्धा यांनी दि.16 मे 2008 रोजी लिहीलेल्या पत्राच्या उत्तरात आपल्या कार्यालयाने षिक्षण उपसंचालक नागपूर विभाग नागपूर व षिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.वर्धा यांना लिहीलेल्या पत्राच्या प्रती मिळण्याबाबत. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 15.9. 2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळेच राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना दि. 9.4.2009 रोजी दोन्ही मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याकरीता त्यांनी जावक नोंदवहीतील नोंद सुध्दा दाखविली. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना ती माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे पुन्हा माहिती उपलब्ध असल्यास ती अपीलकर्ता यांना पुरविणे संयुक्तिक राहिल. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांचेकडे आता सदरची कागदपत्रे उपलब्ध आहेत व त्यामुळे ती देण्याचे मान्य केले. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेष

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1179/2009**

1. सौ. कुसुम मधुकर केचे
मु. अंबिकापुर पो. देलवाडी
ता. आष्टी जि. वर्धा
2. श्री नानासाहेब सदाशिवराव जाणे
मु. जोलवाडी पो. देलवाडी
ता. आष्टी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य. विभाग)
जिल्हा परिषद वर्धा
2) श्री प्रल्हाद केशवराव केचे
जन माहिती अधिकारी तथा सचिव
श्री रविंद्र शिक्षण प्रसारक मंडळ देलवाडी
ता. आष्टी जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेष पारित दिनांक 19.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.3.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव श्री रविंद्र शिक्षण प्रसारक मंडळ देलवाडी यांचेकडे यापैकी कोणकोण संस्थेच्या शेडयूल अे वर आहेत याबद्यलची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 23.7.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती ही सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांचेकडे उपलब्ध होईल असा निर्णय दिला. परंतु सदरचा निर्णय हा दाखल केलेला नाही. मात्र जन माहिती अधिकारी तथा सचिव यांनी खालीलप्रमाणे आयोगाकडे खुलासा दाखल केलेला आहे.

1. अर्जदारांनी दि.16.3.09 चे माहितीचे अधिकारात पुढीलप्रमाणे माहिती मागितली होती.
अ. संस्थेच्या कार्यकारीणी मधील पदाधिका–यांची नावे
बहुधा तीन महिन्यातुन एकदा संस्थेच्या कार्यकारीणीची सभा घेण्यात येते. या प्रत्येक सभेचे नोटीस सौ.कु.म.केचे व श्री ना.स.जाने यांना पाठविण्यात येतात व नोटीस मिळाल्याची सही नोटीस बुकावर घेण्यात येते. या नोटीस बुकमध्ये प्रतिलिपीमध्ये प्रत्येकच पदाधिका–यांचा हुद्या लिहील्या जातो. परंतु नोटीस मिळुनही सदर तक्रारकर्ते कधीही संस्थेच्या सभेला हाजर राहत नाही.

तसेच वर्षातून एकदा संस्थेची आमसभा घेण्यात येते. आमसभेचे नोटीस मिळाल्याची पोच घेण्यात येते. परंतु आमसभेला मात्र हाजर राहत नाही. आमसभा नोटीस मध्ये सुध्दा संस्थेच्या पदाधिका–यांची नावे व त्यांची पदे यांचा स्पष्ट उल्लेख असतो.

वरील विवेचनावरुन हे आपले लक्षात येईल की केवळ संस्था सचिवास त्रास देण्याचे उद्येशाने हा सर्व प्रकार मधुकर आत्मारामजी केचे माजी सेवामुक्त मुख्याध्यापक जवाहर स्मृती विद्यालय हे करीत असतात.

माहितीचे अधिकारातील दि.28.9.09 चे अर्जानुसार संस्थेने दि.23.11.09 रोजी श्रीमान ना.स.जाने व सौ.कु.म.केचे यांना पत्र देवून दि.23.11.09 ला जवाहर स्मृती विद्यालयाचे कार्यालयात त्यांचे अर्जानुसार चर्चेनंतर माहिती जाणुन घेण्याकरिता उपस्थित राहण्याबाबत विनंती केली होती. त्यानुसार श्रीमान ना.स.जाने व सौ.कु.म.केचे हया दुपारी 1.00 वा. हजर झालेत. सविस्तर चर्चेनंतर त्यांना संस्थेचे पदाधिकारी कोण हे अवगत करुन देण्यात आले. तसेच शेडुल 1 वर कोणती नावे आहेत हे सुध्दा सांगण्यात आले.

तसेच संस्था सार्वजनिक विश्‍वस्त संस्था असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी Bhaskarrao Shabkarrao Kulkarni vs State Information Commissioner या यांचिकेतील निर्णयाप्रमाणे लागू होत नाही असे आयोगापुढे

सांगितले. परंतु भाष्कर‍राव शंकर‍राव कुळकर्णी यांनी दाखल केलेली याचिका ही धार्मीक मठ या संबंधी होती व त्या मठास शासनाकडून कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत मिळत नाही व त्या कारणास्तव मा. उच्च न्यायालय यांनी याचिका मान्य करुन राज्य माहिती आयोगाचा निर्णय हा रद्द केलेला आहे. परंतु शिक्षण संस्था ही सार्वजनिक विश्वस्त संस्था या कायदयाखाली नोंदणी होत असल्यामुळे आता सर्व शिक्षण संस्था हया सदरच्या निर्णयाचा आधार घेतात. परंतु शैक्षणीक शाळा मंजुर करतांना ती व्यक्तीला शासनाकडून मंजुर होत नाही तर मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम 1957 व Societies Registration Act 1860 प्रमाणे नोंदणी झालेल्या संस्थेच्या शाळा किंवा महाविद्यालय मंजुर करण्यात येते. याचा अर्थ शाळा चालविण्याकरीता संस्थेस अनुदान देण्यात येते. अनुदान जरी शाळेच्या बॅक खात्यात जमा होत असले तरी शाळा व संस्था ही वेगळे होवू शकत नाही. कारण शाळेतील सर्व नियुक्त्या व प्रशासकीय कामकाजाचे





नियंत्रण हे संस्थेकडे असते. ज्या षिक्षकांना शासनाकडून वेतन दिले जाते त्या षिक्षकांची नियुक्ती करण्याचे व काढून टाकण्याचे अधिकार मात्र संस्थेकडे आहे. व सर्व नियुक्त्यांना षिक्षणाधिकारी यांची मान्यता घेणे आवश्यक असते. व त्यामुळे शैक्षणिक संस्था किंवा शाळा किंवा महाविद्यालय हया दोन वेगवेगळे प्राधिकरण आहे असे म्हणता येत नाही. ज्या षिक्षण संस्थेच्या शाळेस किंवा महाविद्यालयास अनुदान मिळते त्या शैक्षणिक संस्थेस सदरचा निर्णय लागू होणार नाही अषी आयोगाची धारणा आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना षिक्षण संस्थेचे सचिव यांनी माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंषतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आदेष

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंषतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 16.3.2009 च्या अर्जातील मुद्या क्र. 1 व 2 ची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत व्यक्तीषः उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1185/2009**

श्री ॲड. धनश्री खुषाल चिलबुले
345 श्रध्दा हाऊस पहिला माळा
किंग्जवे नागपूर 440001 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता
महानगर पालिका नागपूर
2) श्री एस. बी. जयस्वाल
जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेष पारित दिनांक 20.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता महानगर पालिका नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

Certified copy of complete report of special committee which was attached with photos and schedule. The special committee appointed by the standing committee of NMC to check the work of vibrant Info Tech and prepare the report on the said observations which was pointed out by the special

committee. सदरच्या माहितीचा कालावधी सन 2003–2004 आहे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 26.10.2009 रोजी खर्चाचा भरणा करावा असे अपीलकर्ता यांना कळविलेले आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 5.11.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 12.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 2.12.2009 रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध झालेली आहे या कारणास्तव व उर्वरीत माहिती माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध नाही या कारणास्तव सदरचे अपील फेटाळलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना ज्या अहवालाच्या तीन प्रती मिळालेल्या आहेत त्यामध्ये प्रत्येक मुद्यांमध्ये परिषिष्टाचा उल्लेख केला आहे व त्या परिषिष्टाची माहिती असल्याषिवाय तो पूर्ण होवू शकणार नाही. त्याबाबतही जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरचा अहवाल हा त्यांचेकडे छायाकित प्रतीच्या स्वरुपात आलेला आहे. मुळ अहवाल त्यांच्या विभागाचा नाही. standing committee चा अहवाल असल्यास ते कमिटी शाखेमध्ये उपलब्ध होते त्यामुळे त्या शाखेकडून सदरची माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते. त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की standing committee कडून माहिती मागितली होती परंतु ती संबंधित शाखेकडून उपलब्ध होईल असे सांगितले. यावरुन एकच सार्वजनिक प्राधिकरण असतांना सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी टाळाटाळ करण्यात येते. मात्र माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जात नाही. ज्या माहिती अधिका–याकडे माहिती उपलब्ध नसेल त्यांनी ज्या माहिती अधिका–याकडे माहिती उपलब्ध असेल अशा माहिती अधिका–याकडे अर्ज हस्तांतर करणे हे अधिनियमाच्या कलम 6 (3) प्रमाणे बंधनकारक आहे. परंतु अशा प्रकारची कारवाई दुर्दैवाने जन माहिती अधिकारी यांचेकडून केली जात नाही व माहिती उपलब्ध नाही एवढेच कारण देवून अपीलकर्ता यांचे अर्ज हे नस्तीबध्द करण्यात येतात. वास्तविक प्रथम अपीलीय अधिकारी हे त्या प्राधिकरणातील वरीष्ठ अधिकारी असल्यामुळे त्यांनी तरी सर्व माहिती उपलब्ध होईल याबाबतची चौकशी करणे आवश्यक असते. परंतु तसे न करता माहिती अधिका–याकडे काय निर्णय दिला आहे यापलीकडे कोणत्याही प्रकारची छाननी केली जात नाही. व त्यामुळे हया प्रकरणात आयुक्त महानगर पालिका यांनीच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंषतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आदेष

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंषतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत आयुक्त महानगर पालिका यांनी संबंधित प्रथम अपीलीय अधिकारी व माहिती अधिकारी यांना आदेश देवून अपीलकर्ता यांना अहवालाची संपूर्ण प्रत परिशिष्टा सहीत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत **<u>आयुक्त महानगर पालिका नागपूर</u>** यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1197/2009**

श्री हनमंतराव मोनाजी राऊत
टिळकनगर वार्ड क्र.2 (वडसा रोड) ब्रम्हपूरी 441206
ता. ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. डी. मेश्राम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
जिल्हा परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) श्री पी. एच. राठोड
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
(पंचायत विभाग) जिल्हा परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.1.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 31.8.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक (पंचायत विभाग) जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे पंचायत समिती राजूरा ग्रामपंचायत भुरकुंडा खुर्द येथील प्रशासक या पदाच्या दि. 19.6.1994 ते 27.9.1995 पर्यंतचा अतिरिक्त कार्यभार सांभाळल्याबद्यल मिळणा—या विशेष वेतनाची रक्कम मिळण्याबाबतीत करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची प्रमाणीत प्रत मिळण्याबाबत एकुण चार मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 14.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिलेला

दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अर्जदारानी माहितीच्या अधिकारात सादर केलेल्या दि.1.8.2008 च्या अर्जात नमुद तारखेचे दस्तऐवजाचा ताळमेळ साधता आला नसल्याने कार्यालयाचे दि. 7.9.2009 अन्वये कोणती माहिती पाहिजे आहे याबाबत कार्यालयात उपस्थित होणे बाबत कळविले आहे. त्याबाबतची प्रत सुध्दा जोडलेली आहे. परंतु अपीलकर्ता हे हजर झालेले नाहीत. तसेच प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा सुनावणीसाठी दि. 6.9.2009, दि. 3.11.2009, दि. 19.11.2009, दि. 4.12.2009 रोजी त्यांना सुनावणीस उपस्थित राहण्याकरीता पत्रे दिलेली आहेत. परंतु ते सुनावणीस सुध्दा हजर राहिलेले नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. अपीलकर्ता यांनी पूर्वी अनेक अर्ज केलेले आहेत. प्रथम अपीले केलेली आहेंत व त्यांचे निर्णयही झालेले आहेत. आयोगाकडेसुध्दा अपील क्र.743/2008 या अपीलामध्ये दि. 31.3.2008 च्या अर्जाचा निर्णय झालेला आहे व अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचा आदेश झालेला दिसून येतो. अपीलकर्ता यांनी दि. 31.8.2009 रोजी जो अर्ज दिलेला आहे त्या अर्जावर





31.8.2009 ही तारीख खोडून दिलेला आलेला आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे हे महत्वाचे असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना त्याबाबत त्यांना विचारणा केली असता त्यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यापेक्षा त्यांना अतिरिक्त कार्यभार सांभाळण्याबद्यल विशेष वेतनाची रक्कम मिळण्याच्या संदर्भामध्ये कार्यवाही करुन पाहिजे आहे. त्याबाबत त्यांना खंड विकास अधिकारीनी जी डायरी मेनटेन केलेली असते ती त्यांच्या संपूर्ण नस्तीमध्ये नसल्यामुळे त्यांचेकडे उपलब्ध असल्यास त्याची प्रत उपलब्ध झाल्यास त्यांना अपेक्षित कार्यवाही करुन देता येईल. त्याकरीता त्यांचे प्रकरण आयुक्तांकडे सुध्दा सादर करण्यात आलेले होते. परंतु काही तांत्रिक आदेशाकरीता ते परत आलेले आहे. व त्यामुळे त्याबाबतची प्रत उपलब्ध झाल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास कोणतीही अडचण येणार नाही. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कार्यालयात झालेल्या कार्यवाहीची माहिती कागदपत्राच्या स्वरुपात मिळते. कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्याचे आदेश हे आयोगास देता येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे. मात्र त्यांना अपेक्षित कार्यवाही होण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी किंवा संबंधित अधिकारी यांना सहकार्य करणे आवश्यक आहे. व त्याकरीता प्रथम अपीलाच्या सुनावणीस किंवा मागितलेल्या माहितीमध्ये संभ्रम असल्यास उपस्थित राहून स्पष्टिकरण करणे आवश्यक आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1198/2009**

श्री कैन्हयालाला वेडहोमल बालानी
कमल पॅलेस 2 रा माळा 204 रामदासपेठ
नागपूर 10 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अजय रामटेके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. उपायुक्त –1
महानगर पालिका नागपूर
2) श्री महेंश धामेचा
जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त (धंतोली झोन क्र.4)
महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.10.2009 रोजी सहा. आयुक्त तथा माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. मनोज कुमार पटेल का मकान नं.118 भाजीमंडी चौक सीताबर्डी मे कितने रुम तथा किरायेदार है 1984 से 2009 तक किस ने कितना टेक्स मकान का दिया है रसीद क्रमांक ता.और रक्कम किसके द्वारा भरी गई है कारपोरेशन टॅक्स का असेसमेंट कब कब कौन कौन से साल में हुआ है. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 11.11.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 16.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये निर्णयामध्ये माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज

करण्यात आलेले आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांनी मकान नं.118 ची माहिती मागितली व त्यांना मकान नं.188 ची माहिती दिली. अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांचे म्हणणे खरे आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की माहिती ही मकान नं.118 चीच आहे परंतु ती टेपोग्राफीकल चुक आहे. परंतु ही बाब प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा तपासलेली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी कोणत्याही अपीलाबाबत सुनावणीमध्ये कागदपत्रे पाहात नाही असे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली आहे असे सांगितले की अपीले खारीज करण्यात येतात. मात्र अपीलकर्ता यांनी अपील का केले याबद्यल कोणत्याही प्रकारची चौकशी करण्यात येत नाही. व त्यामुळेच प्रथम अपीलीय अधिकारी यांना सुध्दा कोणत्याही प्रकारची माहिती असते असे दिसून येत नाही. आणि म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीले दाखल होत असतात. राज्य माहिती आयोगाकडे येईपर्यंत सुध्दा जन माहिती अधिकारी यांना सुध्दा अशा प्रकारची चुक माहिती उपलब्ध करुन देतांना झालेली आहे





याची जाणीव नव्हती असेच त्यांचे युक्तीवादावरुन दिसून येते. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांनी 2009–10 करीता मालमत्ता कराचा टॅक्स भरलेला आहे. परंतु तरी सुध्दा त्यांचेकडे टॅक्स करीता नोटीस आलेली आहे. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांचेकडे कोणत्याही प्रकारे पावती नसते व एकत्रित माहिती नसते. वास्तविक मालमत्ता कराच्या संदर्भात दरवर्षी टॅक्स भरण्यात आला किंवा नाही याबाबतची एकत्रित माहिती असणे आवश्यक आहे. व त्याबाबत महानगर पालिकांनी सुधारणा करणे आवश्यक आहे. टॅक्स भरलेला असतांना सुध्दा नोटिसेस काढल्या जातात याबाबतच्या आयोगामध्ये 10 ते 12 तक्रारी झाल्या आहेत. यावरुन महानगर पालिकेमध्ये अभिलेखे ठेवण्याबाबतचे काम व्यवस्थित आहे असे दिसून येत नाही याची दखल आयुक्त महानगर पालिका यांनी घेणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांनी आतापर्यंत भरलेल्या टॅक्सची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्यांना 2009–10 या कालावधीत घर टॅक्स भरलेला आहे किंवा नाही ही माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत संबंधित मकान नं.118 च्या संदर्भात दरवर्षीचा टॅक्स भरल्याची माहिती व सन 2009–2010 या कालावधीतील टॅक्स भरल्याची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1042/2009**

श्री चंद्रजीत सुरेश वाघाडे
बाबुपेठ वार्ड नं. 2 बालाजी मंदीर जवळ चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री गिरीष जोशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर
सिव्हील लाईन्स नागपूर
2) श्री एन. व्ही. डेकाटे
जन माहिती अधिकारी तथा जिल्हा गृह निर्माण अधिकारी
विशेष नियोजन प्रा. दाताळा रोड म्हाडा वसाहत
चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी म्हाडा नागपूर यांचेकडे 1. भद्रावती येथील वाम्बी योजने अंतर्गत 2005 ते 2008 या कालावधीत सेस्थेला दिलेल्या घरकूल घर बांधकामाचे करारनामा ची सत्यप्रत.

2. भद्रावती येथील वाम्बी योजने अंतर्गत 2005 ते 2008 या कालावधीत ज्या संस्थेला काम दिले त्या संस्थेनी पूर्ण कर भरणा केल्याची सत्यप्रत. टपालाने स्वतः घेवून शिघ्र डाकेने मागितलेली दिसून येते. सदरचा अर्ज मुख्याधिकारी नागपूर मंडळ नागपूर यांनी दिनांक 30.7.2009 जिल्हा गृह निर्माण अधिकारी विशेष नियोजन प्रा. दाताळा रोड म्हाडा वसाहत चंद्रपूर जि. चंद्रपूर यांचे कार्यालयातील माहिती असल्यामुळे त्यांचेकडे हस्तांतर केला. दि. 10.8.2009 रोजी जिल्हा गृह निर्माण अधिकारी जिल्हा गृह निर्माण समिती चंद्रपूर यांनी मुख्याधिकारी गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर

यांचेकडे अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देवून अपीलकर्ता यांनी सुध्दा माहिती प्राप्त करुन घ्यावी म्हणून कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 26.8.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 22.9.2009 रोजी देण्यात आला असून संपूर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व तरी सुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवादामध्ये असे सांगितले की त्यांनी मागितलेल्या माहितीपेक्षा वेगळी माहिती त्यांना दिली. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी अर्जामध्ये ज्या प्रकारे माहिती मागितलेली आहे त्या प्रकारे ती माहिती त्यांना संकलीत करुन उपलब्ध करुन दिलेले आहे. त्यावर अपीलकर्ता यांनी हे इन्कम टॅक्स भरण्याचे सर्टिफिकेट आहे काय असे





विचारले असता त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांचे कार्यालयाकडून इन्कम टॅक्स भरल्याचे सर्टिफिकेट उपलब्ध करुन देता येत नाही. मात्र संस्थेनी इन्कम टॅक्स भरला असल्यास त्याबाबतच्या पावत्यांची छायांकित प्रत कार्यालयाकडून उपलब्ध करुन देता येईल. परंतू त्या व्यापक प्रमाणात असल्यामुळे छायांकित प्रतीचा खर्च येईल व तो अपीलकर्ता यांना द्यावा लागेल. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती व त्यांना अपेक्षित असलेली माहिती यात तफावत असल्यामुळे त्यांना छायांकित प्रती माहिती उपलब्ध करुन देण्या करीता खर्चाचा भरणा करावा लागेल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 5 दिवसाचे आंत उपलब्ध असलेल्या माहितीच्या संदर्भातील खर्चाचा भरणा व्यक्तीशाः कळविण्यात यावा. व त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे व्यक्तीशाः जावून खर्चाचा भरणा करण्याची माहिती घ्यावी व खर्च भरावा व त्यानंतर अपीलकर्ता यांना माहितीची छायांकित प्रती उपलब्ध करुन द्यावी. अपीलकर्ता यांनी पोच द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1164/2009**

श्री अशाोक सोमाजी मेश्राम
सिरसपेठ बौध्द विहाराजवळ रोड पॅलेस माळा पेठ रा. मु. पो. ता. जि.
सिरसपेठ नागपूर 440009 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्र. कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.1.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.8.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर यांचेकडे 1. बॅरी.एस.के.वानखेडे शिक्षण महाविद्यालयात रा.तु.म.नागपूर विद्यापीठाने संचालक बी.सी.यु.डी. रा.तु.म.नागपूर विद्यापीठास पत्र क्र.युसीई/3030 दि. 18.3.2005 नुसार Acadamic & Administrative Audit 2001-2, 2002-03-4 अहवालाची सत्यप्रत प्राचार्या व कुलसचिव प्रमाणीत करुन 2. ना.वि.ना.यांचे बॅरी.एस.के.वानखेडे शिक्षण महाविद्यालयाचे spot valuation संपुष्टात आल्यामुळे कार्यालयीन वेळा पूर्ववत दि. 7.2.05 पासुन मा.कुलगुरु यांचे मंजुरीचे पत्र क्र. युसीई/एसी/80 दि. 1.12.2005 चे पत्राची सत्यप्रत प्रमाणीत करुन देणे. 3. दि.5.2.2005 रोजी सुचना फलकावर कार्यालय सकाळी दहा वाजेपासून सुरु असल्याची सत्यप्रत प्रमाणीत करुन 4. ना.वि.ना.यांचे बॅरी.एस.के.वानखेडे शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्यानी पत्र क्र. युसीई/एसी/46 दि. 7.2.2005 मध्ये नोंदणी उपज आहे पत्राची प्रत प्रमाणीत करुन 30 दिवसात दयावी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 15.9.2009 रोजी संचालक व माहिती अधिकारी महाविद्यालय विद्यापीठ

विकास मंडळ यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 25.2.2009 रोजी प्रथम अपील केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 21.10.2009 रोजी देण्यात आलेला आहे. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे या कारणास्तव तसेच माहिती उपलब्ध झाली नसल्यास अर्जदाराने प्रत्यक्षरित्या संचालक व माहिती अधिकारी यांचेकडून माहितीची प्रत प्राप्त करुन घ्यावी तसेच संचालक व माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला माहितीसाठी आल्यास त्यांना पाठविलेल्या माहितीची प्रत देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 2.12.2009 रोजी बॅरी.एस.के. वानखेडे शिक्षण महाविद्यालयाकडून मिळालेली माहिती अर्जदाराला देण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

2

2

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की माहिती ही महाविद्यालयाची असल्यामुळे महाविद्यालयाकडून माहिती मागितली व त्यांचेकडे उपलब्ध नसल्यामुळे त्याप्रमाणे त्यांना कळविण्यात आलेले आहे. अपीलकर्ता यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणले की त्यांचेकडे महाविद्यालयाकडून fact profile मागितलेली आहे. व त्यावेळेस कार्यरत होते व जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की सदरची माहिती महाविद्यालयाच्या फाईलमध्ये आढळलेली नाही. तसेच सदर माहिती त्यांनी मागितलेली आहे तेव्हा या महाविद्यालयात कार्यरत होते. तसेच सदर माहिती महाविद्यालय यांचेकडे काढलेली आहे असे निदर्शनास येते. जन माहिती अधिकारी यांनी आणखी पुढे असे सांगितले की महाविद्यालयाकडून fact profile मागितली जातात परंतू त्या कालावधीचे ऑडीट चे कार्यवाही झालेली नाही त्यामुळे अहवाल उपलब्ध नाही. तसेच पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणले की सदरची माहिती ही 2005 मधील असल्यामुळे व त्याबाबत पुढील कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे नष्ट करण्यात आलेली असावी. व त्यामुळे ती महाविद्यालयाकडे उपलब्ध दिसून येत नाही. मात्र 2007–2009 या कालावधीत ऑडीट हे बंधनकारक असल्यामुळे त्याबाबतचा अहवाल आता तयार होत असतो. परंतु अपीलकर्ता यांचे अजुनही म्हणणे असे आहे की त्यांचेकडे त्यावेळेस कार्यरत होते व त्यावेळेस त्यांचेकडे माहिती होती असे असल्यास प्राचार्य यांनी पुन्हा शोध घ्यावा किंवा माहिती गहाळ झाल्याबद्यल पोलीस तक्रार करणे संयुक्तिक राहिल. मात्र अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1181/2009**

श्री सुरेश वडगुजी नरड
वाठोडा रिंग रोड नागपूर
पो. भांडेवाडी ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर
मेडीकल नागपूर
2) श्री दोरबे
जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर
मेडीकल नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.7.2008 रोजी जन माहिती अधिकारी अधिष्ठाता मेडीकल कॉलेज नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

थ्द.18.5.05 रोजी मृतक सौ.विद्या सु. नरड स्वतः गळफास लावुन आत्महत्या केली होती. सक्करदरा पोलीसांनी पी.एम.साठी प्रत मेडीकल कॉलेज येथे पाठविले होते. तेव्हा पोलीसांनी इन्क्वेस्ट पंचनामा व मेमो फार्म सोबत पाठविला होता त्याची सत्यप्रत मिळण्याबाबत. तसेच पी.एम.करणा—या डॉक्टरनी पी एम करतांना प्रेताजवळ मिळालेली सुसाट नोट पोलीसांना दिली त्यावेळी त्यांनी घेतलेल्या नोंदची प्रत मिळण्याबाबत.

1. पोलीसांनी पी एम करण्यासाठी पाठविलेला इन्क्वेस्ट पंचनामा प्रत 2. मेमा फार्म प्रत 3. पी एम करतेवेळी डॉक्टरने पोलीसांना दिलेली सुसाट नोट व रेकॉर्डवर घेतलेली नोंदची प्रत मिळण्याबाबत. सदरची माहिती व्यक्तिशः किंवा टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 22.8.2008 रोजी माहिती एका न्यायवैद्यकीय प्रकरणा संबंधी असल्याने पोलिस विभागाच्या

परवानगी शिवाय देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्या संदर्भामध्ये पुन्हा प्रशाासकीय अधिकारी तथा माहिती अधिकारी यांनी दि. 21.1.2009 रोजी पोलिस स्टेशन इन्चार्ज सक्करदरा पालिस स्टेशन यांना माहिती उपलब्ध करुन देण्या करीता अभिप्राय मागितलेला दिसून येतो. त्यावर दि. 30.3.2009 रोजी पोलिस निरीक्षक पोलिस स्टेशन यांनी आपण आपले कार्यालयीन स्तरावर अधिकार असल्याने आमचे पोलीस स्टेशन कडून परवानगी देण्याची गरज नाही असे त्यांनी कळविलेले दिसून येते. व त्यानंतर अपीलकर्ता यांनी दि. 17.7.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 22.9.2009 रोजी पोलिस स्टेशन सक्करदरा यांचे कडून प्राप्त झालेल्या माहितीची छायांकित प्रत या सोबत जोडून आपणास पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपील व द्वितीय अपील हे मुदतीत दाखल केलेले नाही व त्याबद्यलचा कोणताही खुलासा सादर केलेला नाही.



3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की सदरची माहिती ही दोन इन्क्वेस्ट पंचनामे आहे अशी शंका असल्यामुळे त्यांनी मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरची माहिती ही त्यांचे कार्यालयाची माहिती नाही. त्यांचेकडे पोस्टमार्टमच्या संदर्भामध्ये न्यायीक वैद्यकीय केस म्हणून पोलीसांनी सादर केलेली माहिती असते. ती पोलीस कार्यालयाची मुळ माहिती असते व ती विश्वासानी सादर केलेली असल्यामुळे ती प्रकट करणे योग्य नाही म्हणून त्यांना कळविलेले दिसून येते. व तसे त्यांना कळवून परवानगी मागितलेली होती. पोलीसांनी सदरच्या माहितीच्या परवानगीच्या संदर्भामध्ये निर्णय दिलेला नसल्यामुळे पुन्हा त्यांचेशी पत्रव्यवहार केलेला दिसून येतो. त्यात सदरच्या गुन्हयात मा. 5 वे ॲडव्हाक कोर्ट श्री दे. ना. अरगळे यांचे न्यायालयातून आरोपी क्र. 1,2,4, हे 23.1.2008 ला निर्दोष रिहा झाले आहे व आरोपी क्र. 3 ही मरण पावलेली आहे. अशी वस्तुस्थिती असल्यास अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी पोलीसांकडील माहिती असली तरी उपलब्ध करुन देण्यास हरकत असण्याचे कारण नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून सदरच्या प्रकरणामध्ये असलेल्या गुन्हयाच्या संदर्भात मा. न्यायालयातून अंतीम निर्णय झालेला असल्यामुळे व आरोपी हे निर्दोष झालेले असल्यामुळे सदरची माहिती द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1184/2009**

श्री ॲड. वा. सी. गायकवाड
मु. पो. मनसर
ता. रामटेक जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री प्रदिपकुमार डांगे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
2) श्री संगीतराव
जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.6.2009 रोजी जन माहिती अधिकारी उपविभागीय अधिकारी रामटेक यांचेकडे रे.अपील क्र. 13/आरटीएस–64/1993–94 दि.6.6.94 चे कलेक्टर नागपूरचे रिमांडचे आदेशान्वये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती रजिष्टर टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 1.7.2009 बाबत रे.अपील क्र. 13/आरटीएस–64/1993–94 मधील जिल्हाधिकारी यांचे दि.6.6.94 चे आदेशाची प्रत घेवून दि. 9. 7.2009 रोजी दु. 12.00 वा. कार्यालयात उपस्थित राहावे असे उपविभागीय अधिकारी रामटेक यांनी कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 17.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये सुध्दा अपीलार्थीनी 13/आरटीएस–64/1993–94 मध्ये दि.6.6.94 आदेशाच्या प्रतीसह या आदेशाचे 30 दिवसाचे आत माहिती अधिकारी यांचेकडे हजर राहावे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारचे कागदपत्र सादर करावे हे अपेक्षित नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी कागदपत्रे घेवून उपस्थित राहाण्यास कळविलेले आहे. ते मुळातच अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन करणारे आहे. त्यांनी रे.अपील क्र. 13/आरटीएस–64/1993–94 मधील जिल्हाधिकारी यांचे दि.6.6.94 चे रिमांड आदेशानंतर काय कार्यवाही झाली याबद्यलची माहिती मागितलेली होती. कार्यवाही झालेली असल्यास तशी माहिती देणे आवश्यक होते व कार्यवाही झालेली नसल्यास त्याप्रमाणे कळविणे आवश्यक होते परंतु तसे कळविलेले नाही. सदरच्या निर्णया मध्ये दि.दा.क्र. 300/88 चा निर्णय होईपर्यंत पुढील चौकशी करु नये अशा प्रकारचे आदेश आरटीएस अपीलात देण्यात आलेले होते. परंतु त्यानंतरही पटवारी यांनी सर्व्हे नंबर मध्ये बदल घडवून आणलेला आहे. व





त्याकरीता रिमांड आदेशा नंतर काय कार्यवाही झाली अशी माहिती त्यांनी मागितलेली होती. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे माहिती अधिकारी यांनी खुलासा केला परंतु पुन्हा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा पुन्हा तशाच प्रकारचे आदेश दिलेले दिसून येतात. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की जर पटवारी किंवा नायब तहसिलदार यांनी फेरफार घेतलेला असेल तर तो फेरफार कशा प्रकारे घेण्यात आला. असे असले तरी अपीलकर्ता यांना रिमांड आदेशा नंतर उपविभागीय अधिकारी यांनी कोणत्या प्रकारची कार्यवाही केली किंवा नाही ही माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रकरण समजून घेणे आवश्यक होते. अपीलकर्ता यांचा अर्ज समजून घेणे आवश्यक होते. परंतु या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचे अपीलकर्ता यांच्या अर्जाचे वाचन केलेले दिसून येत नाही. यापुढे जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही अर्जदाराचा अर्ज हा बारकाव्या सहीत वाचन करावे ही नोंद घ्यावी. अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती पुरविणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना रे.अपील क्र. 13/आरटीएस–64/1993–94 मधील जिल्हाधिकारी यांचे दि.6.6.94 चे रिमांड आदेशानंतर उपविभागीय अधिकारी यांनी जर कारवाई केलेली असेल तर त्या कार्यवाहीची प्रत अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत उपलब्ध करुन द्यावी. कारवाई केलेली नसल्यास तशी माहिती उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1210/अम/2009**

श्री इस्माईलखॉ इब्राहीमखॉ
भालदारपूरा वार्ड क्र. 23
मु. पो. ता. अंजनगाव सुर्जी जि. अमरावती ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. जी. ठाकरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. अंजनगाव (सुर्जी)
ता. अंजनगाव सुर्जी जि. अमरावती
2) श्री भागवत
जन माहिती अधिकारी तथा
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. अंजनगाव (सुर्जी)
ता. अंजनगाव सुर्जी जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 27.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. अंजनगाव (सुर्जी) यांचेकडे शेतीमध्ये 1/2005 ते आज रोजी दि. 17.11.08पर्यंत पुर्ण अजंनगाव तालुक्यात शेतीकरिता देण्यात आलेला विद्युत पुरवठाा व अनामत रक्कम भरलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत. विद्युत पुरवठा सुरु केल्याची तारीख व नावे. सविस्तर माहिती देण्यात यावी. सदरची माहिती व्यक्तिशाः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 19.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा देण्यात आलेला असून दिसून येत नाही. परंतु दि. 10.2.2009 रोजी व्यवस्थापन अभियंता यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी माहिती व्यक्तिशाः मागितली परंतु 30 दिवसाचे आत ते व्यक्तिशः माहिती घेण्यास गेले असा पुरावा सादर केला नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की

अपीलकर्ता यांनी दि. 17.11.2008 रोजी अर्ज केल्यानंतर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. 18.11.2008 रोजी सहाय्यक अभियंता यांचेकडे माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून पत्र दिलेले आहे. त्यानंतर दि. 5.12.2008 रोजी स्मरणपत्र दिले. त्यानंतर पुन्हा दि. 1.1.2009 रोजी स्मरणपत्र दिले. व त्यानंतर दि. 10.2.2009 रोजी काही माहिती दिली. पैसे भरल्याची पावतीची झेरॉक्स करीता विलंब लागत असल्यामुळे थोडा कालावधी देण्यात यावा असे पत्र व्यवस्थापन अभियंता यांनी अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांना दिले. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे त्यामुळे त्यांचे नातेवाईक व शेजारी यांना विज जोडली दिली असून सुध्दा त्यांची नावे या यादीत नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांचेकडे जी माहिती व्यवस्थापन अभियंता यांचेकडून आली ती माहिती उपलब्ध करुन दिली आहे. माहितीचा अर्ज





कलम 6 प्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेकडे सादर झाल्यावर त्याबाबतची कार्यवाही कशा प्रकारे करावी याबाबतची कोणतीही माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांना दिसून येत नाही. व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच ज्या अधिका–याकडून माहिती उपलब्ध झाली ते अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. जेणेकरुन पुढे माहितीच्या अर्जा संबंधातील कार्यवाही योग्य प्रकारे होईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना संपूर्ण तालुक्यातील विज जोडणीच्या संदर्भातील सर्व माहिती व कागदपत्रे छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध व्यक्तीश श ाः करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी व्यक्तीशाः जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

2) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी ज्या अधिकारी किंवा कर्मचा–याचे माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता सहाय घेतले (कलम 5(4)) त्या अधिकारी किंवा कर्मचारी यांचा विलंबाबाबत तसेच अपुर्ण व दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिकारी समजून (कलम 5(5)) प्रमाणे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही **सक्षम अधिकारी** यांनी जबाबदारी निश्चित करुन करावयाची आहे.

3) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही व निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे व प्रशासकीय कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येते.

4) अपीलकर्ता, उत्तरवादी व मुख्य अभियंता महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. अमरावती यांना निर्णयाची एक एक प्रत पाठविण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1106/2009**

श्री मारोती भाऊरावजी चंदनखेडे
प्लॉट नं. 1 अशोक कॉलनी पो. खामला
नागपूर 25 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रबंधक (Inspection-I)
उच्च न्यायालय खंडपीठ मुंबई
नागपूर बेंच नागपूर
2) श्री जी. एम. खापरे
जन माहिती अधिकारी तथा उपप्रबंधक
उच्च न्यायालय खंडपीठ मुंबई
नागपूर बेंच नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 24.4.2009 रोजी खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. Your honour has issued to a letter bearing No. N 8689/PIO dt.23.12.2008 contending therein that the interview conducted as per the Guidelines framed by the Registry Bombay vide letter dt. 26-3-2004 for the purpose of promotion from the cadre of A to D

2. But my interview for promotion to the post of Chief Translator and Interpreter was conducted on 16.1.2004 and 17.1.2004

3. The foresaid Guidelines vide letter dt. 26-3-2004 could not be applicable to my interview dt. 16-1-04 and 17.1.2004 because they are after my interview

4. In view of the above let me know on the basis of what guidelines or letter my interview dated 16-1-04 and 17.1.2004 was conducted and supply to me the said letter contending the guidelines immediately within 4 days from the receipt of this letter since I have to enclose the same with my W.P.No.129/07 pending before the High Court at Bombay. अर्जाच्या अनुषंगाने



अपीलकर्ता यांना दि. 7.5.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक यांनी अधिनियमच्या कलम 8 (1) (जे) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे कारणासहीत निर्णय देवून माहिती नाकारलेली आहे. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 3.6.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 12.11.2009 रोजी सक्षम प्राधिकारी तथा मुख्य न्यायाधिश मुंबई उच्च न्यायालय यांनी गोपनियतेच्या कारणास्तव माहिती उपलब्ध करुन देण्यास मान्यता दिलेली नसल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो. व प्रथम अपील फेटाळुन लावण्यात आलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे लेखी युक्तीवाद दाखल केलेला आहे तो येणेप्रमाणे –

1) As to para 1 – The content of this para as regard to filing of application dated 24.4.2009 for seeking information on what guidelines or letter, the interview dated 16.1.2004 and 17.1.2004 was conducted and to supply hm the said letter, is admitted. Rest of the contents as to para 1 in the Memo of Appeal are denied for want of knowledge. It is also incorrect to say that the PIO, Nagpur vide order dated 7.5.09 informed the appellant only one fact that the Hon'ble Registrar (General) is the custodian of the letter/information However, in addition thereto, while rejecting his application the respondent No.2 PIO High Court, Nagpur has passed a reasoned order dated 7.5.09 which is self explanatory and the copy of the same enclosed herewith at Annexure I.

2) As to para 2 – The content of this para no.2 are about facts.

3) As to para 3 – The First Appeal in this case was received on 5.6.2009. At that time, the first Appellate Authority was the Registrar General of High Court of Bombay. The hearing of the appeal was adjourned from time to time for want of certain information from the appellant about the exact nature of the information sought and also about the copies of certain letters, date of guidelines etc. On 16.9.2009, Hon'ble the Chief Justice was pleased

to designate the Registrar (Inspection-I) as Appellate Authority. Accordingly, this appeal was placed before me on 17.9.2009. Notice was given to the appellant and the matter was kept on 24.9.2009. However, on 23.9.2009 appellant appeared before Registrar (Inspection-I) i.e. first Appellate Authority sou motu and requested that appellant is unable to come on 24.9.2009 and the appellant be heard on that day. Accordingly, the

appellat was heard on 23.9.2009 and the matter reserved for orders and posted on 29.9.2009. On 29.9.2009 and onwards, respondent No.1-Appellate Authority have directed to search the original guidelines or copy of the guidelines dated 28.8.2003 in respect of filing up of the post of Chief Translator and Interpreter etc. Accordingly, the intensive search was taken in A-Civil Department, Registrar (Inspection-I) Registrar (Personnel). Accordingly, the copy of the minutes/guidelines dated 28.8.2003 in the form of submission made before the Hon'ble Chief Justice was finally traced out on 39.10.2009 and placed before me on 3.11.2009. In fact, the search as taken only with a view of supply the information to the appellant as sought by him. Since the said minutes/guidelines was in the form of submission made before the Hon'ble Chief Justice of the Bombay High Court, in view of Rule 13 (e) of the Bombay High Court Right to Information Revised Rules, 2009 the respondent No.1 appellate authority had made the submission before the Hon'ble Chief Justice. Who is the competent Authority. Previously, it was not processed in the context of this Rule. Since the delay has been already occurred, the respondent No.1 appellate authority made the submission before the Hon'ble Chief Justice as provided in the said Rule. However, the Competent Authority/ Hon'ble Chief Justice of the High Court of Bombay has declined the request on 11.11.2009. Accordingly on 12.11.2009 respondent No.1 appellate authority have dismissed the appeal.

4) As to para 4 – The appellant failed to demonstrate the grounds on which the second appeal is preferred.

(i) It is denied that the first appellate authority summarily dismissed the appeal but the order of the appellate authority in R.T.I. First Appeal No. 53/09 dt. 12.11.2009 is a reasoned order came to be passed after giving as opportunity of being heard to the appellant. Rest of the contents as mentioned in the ground about information is a valuable and crucial for the appellant is denied. The issue in respect of confidentiality in the letter/ information as sought by the applicant is solely to be decided by the Competent Authority. Accordingly, the Hon'ble Competent Authority declined to accept his request to provide the information.

ii) It is admitted that the appellant has a right to obtain the information under the Right to Information Act, subject to the provisions of Sec. 8 of the Right to Information Act and subject to the Rule 13 made thereon under the Bombay High Court Right to Information (Revised Rules) 2009. Therefore, it is barred from disclosure.



4

iii) The contents of ground (iii) are denied in toto. The Bombay High Court Right to Information (Revised Rules) 2009 are notified in the official gazette in view of Sec.28 of the Right to Information Act 2005. Rule 13 says for exemption for disclosure of information. By virtue of Rule 13(e) it was incumbent upon the respondent No.1 appellate authority to place the question of confidentiality in regard to information sought by the appellant before the competent authority the Hon'ble Chief Justice High Court of Bombay, whose decision would be final in this regard.

iv) Contents as regard to para (iv) are denied except the letter dated 23.12.2009 issud to the appellant which is related to the extent of his application dated 3.12.2008 registration no. 108/2008 and for limited purpose. This information was furnished prior to Bombay High Court Right to Information (Revised) Rules, 2009. However, as per Rule 13(e) the said information is also barred from disclosure.

5) <u>Specific Plea</u> – The appellant in his application dated 3.12.2008 sought the information whether there is any provision prescribed in the Bombay High Court Appellate Side, 2000 to conduct interview for giving promotion the High Court employe, etc. In this regard the appellant was informed by the respondent No.2 vide letter dated 23.12.2008 that the viva-voce ad interview were conducted as per guideline as per letter dated 26.3.2004 for the purpose of promotion from A to D cadre. The information was furnished prior to Bombay High Court Right to Information (Revised) Rules, 2009. However, as per Rule 13(e) the said information is also barred from disclosure. The grievance of the applicant is that his interview has not been governed by the said Rules. Then he is at liberty to adopt appropriate proceeding according to law for redressal of grievance.

6) The appellant vide his application dated 24.4.2009 sought the information on what basis/letter his interview dated 16-1-04 and 17.1.2004 was conducted. And he required the copy of letter/guideline in this regard. The respondent No.2-Public Information Officer on going through the application came to the conclusion that the information is strictly confidential in nature therefore declined to furnish the information to the appellant. The respondent No.2-Public Information Officer has also found

that there is no justicication in his application that the disclosure of said would serve the larger public interest. On the contrary. It was harmful to inter-personal relationship of the organization. Therefore, in view of Sec.8(j) of the Right to Information Act rightly rejected his application. The order of the PIO is the reasoned order and self explanatory.

5

5

7) The above appeal was placed before the respondent No.1- First Appellate Authority, when the Bombay High Court Right to Information (Revised) Rules, 2009 wdre notified in the Gazette. Therefore, the appeal was governed as per the provisions of Right to Information Act 2005 read with the provisions of Bombay High Court Right to Information (Revised) Rules, 2009. The Rule 13 says for exemption for disclosure of the information in the particulars of the category (a) to (h). The Rule 13(e) reads as under –

"13(e) Any information affecting the confidentiality of any examination conducted by the Bombay High Court including for the Maharashtra Judicial Service and Maharashtra Higher Judicial Service. The question of confidentiality shall be decided the the Competent Authority whose decision shall be final".

The information sought by the applicant is in the nature of affecting the confidentiality of the letter/guideline dated 29.8.2003, therefore it was incumbent upon the respondent No.1- First Appellate Authority to place the submission before the Hon'ble Chief Justice, who is competent authority. The competent authority has declined the request as made by the applicant for above stated information. Subsequently, the respondent No.1 has dismissed the appeal. The order of the respondent No.1 is reasoned and self explanatory order.

8) The respondent No.1 and 2 reserve their rights to file additional reply, if it is necessary.

9) There are no cogent grounds raised by the appellant to allow his appeal. Therefore, the appeal deserves to be dismissed.

वरील खुलाशावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी त्यांच्या पदोन्नतीच्या संदर्भात मा. उच्च न्यायालयानी ज्या guidelines द्वारे त्यांची मुलाखत घेण्यात आली त्या guidelines ची प्रत मागितलेली दिसून येते. सार्वजनिक कार्यालयामध्ये नियुक्ती किंवा पदोन्नतीच्या संदर्भामध्ये नियम केलेले असतात. व त्या नियमाच्या अनुषंगाने नियुक्ती किंवा पदोन्नती करणे हे मुलभूत अधिकाराशी सुसंगत असते व त्यामुळे उमेदवारास संपूर्ण नियमांची माहिती ही असणे आवश्यक असते. कोणत्याही शासकीय कार्यालयातील नियुक्तीचे नियम हे गोपनिय असू शकत नाही. मार्गदर्शक तत्वे हे सुध्दा नियमाचाच भाग असतो व त्यामुळे सदरच्या मार्गदर्शक तत्वाची माहिती ही उमेदवारास असणे

आवश्यक असते. तसे नियम 13 मधील Note मध्ये सुध्दा तरतुद आहे. परंतु The Bombay High Court Right to Information (Revised) Rules, 2009 च्या नियम 13(e) प्रमाणे कोणत्याही परीक्षेबद्यलची माहिती ही गोपनिय असते व त्या गोपनियतेच्या संदर्भामध्ये सक्षम प्राधिकाराचा निर्णय हा अंतिम असतो. अशी तरतुद असल्यामुळे व त्या तरतुदीप्रमाणे सक्षम प्राधिकारी म्हणून मा. मुख्य न्यायाधिश मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी सदरचे पत्र क्र. 1510/1990(नागपूर) दि. 29.8.2003 हे गोपनिय आहे व अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येणार नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे जन माहिती अधिकारी किंवा तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमच्या कलम 8 (1) (जे) प्रमाणे सदरची मार्गदर्शक तत्वे (guidelines) किंवा गोपनिय पत्र उपलब्ध करुन देण्याचे नाकारलेले आहे. परंतु अधिनियमच्या कलम 8 (1) (जे) प्रमाणे माहिती ही व्यापक लोक हिताच्या दृष्टीने आवश्यक असल्यास प्रकट करता येईल पण सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नसल्यास व्यक्तीच्या खाजगी बाबत विनाकारण हस्तक्षेप करेल अशी माहिती प्रकट करता येणार नाही अशी तरतुद आहे. गोपनियतेच्या कारणास्तव माहिती नाकारता येईल अशी तरतूद अधिनियमात नाही. सार्वजनिक प्राधिकारणातील अधिका–याची पदोन्नती ही व्यापक लोक हिताच्या दृष्टीने असते व त्याचा संबंध सार्वजनिक कामकाजाशी व हितसंबंधाशी असतो. व त्यासंबंधातील माहिती किंवा कागदपत्रे ही व्यक्तीच्या खाजगी बाबतीत हस्तक्षेप करण्याचा प्रश्नच उत्पन्न होत नाही त्यामुळे ती प्रकट करणे हे आवश्यक आहे. सदरची माहिती गोपनियतेच्या कारणास्तव नाकारणे ही बाब अधिनियमच्या कलम 8 (1) (जे) मध्ये येत नाही. संबंधित पत्रामुळे कोणत्याही व्यक्तीच्या खाजगी बाबत विनाकारण हस्तक्षेप होतो किंवा नाही तसेच सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी संबंधीत आहे किंवा नाही याबाबत आयोगाची खात्री होण्यासाठी सदरची मार्गदशक श तत्वे (guidelines) किंवा पत्र आयोगाने अवलोकन केल्यावरच सदरच्या अपीलात निर्णय देणे संयुक्तिक राहिल. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहितीच्या अधिकाराच्या त्यांच्या दि. 24.4.2009 च्या अर्जाच्या संदर्भात दिलेल्या दि. 7.5.2009 च्या उत्तरातील परिच्छेद 3 मध्ये उल्लेखित ''पत्र क्र. 1510/1990 (नागपूर) दि. 29.8.2003'' ही बंद लिफाफ्यामध्ये आयोगाचे अवलोकनार्थ हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत सादर केल्यास आयोगानी सदरच्या मार्गदर्शक तत्वाचे किंवा पत्राचे अवलोकन केल्यानंतर सदरच्या अपीलामध्ये निर्णय देणे सुलभ होईल.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे तक्रार क्रमांक 66/2009**

श्री श्रीरंग माधवराव वंजारी
96 मुद्रानगर वंजारी किराण स्टोअर्स
मानेवाडा बेसा रोड
नागपूर 440034 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 20.1.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 16.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 18 (1) नुसार तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार गैरहजर आहेत. अपील क्र. 2422/2007 दि. 17.1.2009 च्या अर्जाच्या अनुषंगाने दिलेल्या निर्णयातील आदेशाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही व जी माहिती उपलब्ध करुन दिली ती त्यांनी मागितलेली माहिती नसल्यामुळे तक्रार सादर केलेली आहे. सदरच्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. 16.3.2009 रोजी आयोगाचे कार्यालयाने जन माहिती अधिकारी यांचेकडे खुलासा मागितलेला होता. त्याप्रमाणे दिनांक 7.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडून खुलासा सादर झालेला आहे. सदरच्या खुलाशामध्ये जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या माहितीच्या छायांकित प्रती सुध्दा सादर केलेल्या आहेत. त्यानंतर सुध्दा दि. 30.12.2009 रोजी जन माहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगाकडे सुध्दा सादर केलेला आहे व त्यासोबत वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग यांचे लोक आयुक्त महाराष्ट्र यांना दिलेल्या पत्राची प्रत तसेच डयुटी लिस्ट मधील संबंधित कर्तव्याच्या संबंधातील छायांकित प्रत दिलेल्या आहेत. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी दि. 2.8.1971 रोजी त्यांचेकडून कर्तव्याच्या संदर्भामध्ये जी लिस्ट सही करुन दिली त्याबाबतची प्रत अपेक्षित आहे. परंतु त्याबाबत ती उपलब्ध नाही असे पूर्वीच कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय यांनी दि. 20.8.79 रोजी जी यादी प्रसिध्द केलेली आहे व ती सर्व विभागांना पाठविलेली आहे त्या यादीची प्रमाणित प्रत मिळणे आवश्यक होते. त्या यादीचा क्रमांक

Dental/A-CI-IV/H 789-97 Office of the Dean Govt. Dental & Hospital असा आहे व त्यात 16 आक्टो. 1970 रोजी असलेल्या कर्तव्याची माहिती दिलेली आहे.



त्याचप्रमाणे मुद्या क्र. 4,5,9 या मुद्याची माहिती मिळाली नाही. परंतु 4,5,9 च्या मुद्याच्या संदर्भामध्ये त्यांना पूर्वीच कळविण्यात आलेले दिसून येते. मुद्या क्र. 6 च्या संदर्भामध्ये त्यांनी ज्या अहवालाचा उल्लेख केलेला आहे संचालक (दंत) वैद्यकीय शिक्षण यांचेकडून अधिष्ठाता यांना दिलेली आहे व त्या पत्रामध्ये उल्लेख केलेल्या अहवालाची प्रत त्यांना अपेक्षित होती ती मिळालेली नाही ती मिळणे आवश्यक आहे. आज जन माहिती अधिकारी हे गैरहजर असल्यामुळे या संदर्भात कोणत्याही प्रकारचा खुलासा त्यांचेकडून उपलब्ध होवू शकत नाही परंतू वरील विवेचनाप्रमाणे तक्रारदार यांना हा निर्णय मिळाला नाही. 10 दिवसाच्या आत माहिती कागदपत्राच्य स्वरुपात प्रमाणित करुन उपलब्ध करुन देण्यात यावी. तक्रारदार यांची तक्रार मंजुर करण्यात येत आहे.

1) तक्रारकर्ता व माहिती अधिकारी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1207/2009**

सौ. छाया अनंतरावजी राहाटे
द्वारा श्री अनंत म. राहाटे
मुंशी वाडा मुंशी गल्ली, नटराज टॉकीज जवळ
झेंडा चौक महाल नागपूर 440002 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
नागपूर
2) श्री आर. एस. सायरे
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदे श पारित दिनांक 27.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 11.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार कामठी यांचे कार्यालयात शेतीची फेरफार पंजी नविन 7/12 उतारा शेती भुगाव त.सा.क्र.28 ता. कामठी जि. नागपूर भूमापन क्र. 328 व 381 अ खाते क्र. 268, 218 शेती भुगाव फेरफार पंजी नविन 7/12 उतारा हक्क सोडल्याचा प्रमाणित दाखला शेत कोणाला विकले व केव्हा विकले व किती विकले याचा खसरा 7/12 उतारा फेरफार कागद दि. 9.5.2008 चा मुख्त्यार पत्र. अशी माहिती मागितली. माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 18.2.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने तहसिलदार कामठी यांनी दि.13. 8.2009 रोजी मंडळ अधिकारी वडोदा यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिलेले दिसून येते. व त्याप्रमाणे तलाठी यांनी दि. 17.9.2009 रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिली ती माहिती अपीलकर्ता यांना पुरविण्यात आलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगाकढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की माहिती मिळाली परंतू अपुर्ण मिळाली. त्यामध्ये हक्क सोडल्याचे दस्तऐवजाची प्रत मिळालेली नाही. तसेच अधिकृत मृत्युपत्राचा प्रमाणित दाखला उपलब्ध करुन दिलेला नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना दि. 17.10.2008 रोजीच 7/12 चा व फेरफाराची उतारा नोंदवही माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु तलाठी यांचेकडून रेकॉर्डची पाहणी केली असता हक्क सोडल्याचा प्रमाणित दाखला मिळाला नाही. त्यांना हक्क सोडण्याची लेखाची फेरफार पंजीची नक्कल देण्यात आली. तसेच मृत्युपत्राची कागदपत्रे मिळाली नाही. मात्र मृत्युपत्राची फेरफार पंजीची

नक्कल देण्यात आलेली आहे. विनामोबदला हक्क सोडल्याचे लेखाची फेरफार पंजीची नक्कल अशी नायब तहसिलदार यांनी जी नोंद घेतलेली आहे त्या संदर्भात हक्क सोडल्याचा लेखाची प्रत असणे आवश्यक आहे. व ते नसेल तर दि. 28.8.2000 रोजी ज्या नायब तहसिलदार यांनी आदेश पारीत



केलेले आहे त्यांचेकडे विचारणा करणे आवश्यक राहिल किंवा त्यांनी कागदपत्राचे जतन केले नसल्यास त्यांचेविरुध्द योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक राहिल. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की नोंद घेवून मुळ कागदपत्रे संबंधित इसमाला परत केली जातात व त्यामुळे सदरच्या लेखाचे जतन केलेले असेल असे नाही. अपीलकर्ता यांना त्या संदर्भात तक्रार असेल तर त्यांनी उपविभागीय अधिकारी यांचेकडे झालेल्या फेरफाराच्या दुरुस्तीकरीता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 प्रमाणे अपील दाखल करणे संयुक्तिक राहिल. परंतु जी माहिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत असले तरी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तत्कालीन नायब तहसिलदार कामठी यांचेकडे चौकशी करावी व तसे चौकशीअंती अपीलकर्ता यांना कळविणे संयुक्तिक राहिल.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत असले तरी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तत्कालीन नायब तहसिलदार यांचेकडे हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत सदरच्या कागदपत्राच्या संदर्भात चौकशी करावी व चौकशीअंती अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1217/2009**

श्री मुरलीधर गोविंद मापारी
मु. पो. खैरा
ता. नांदूरा जि. बुलढाणा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री वि. मे. माळे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय नांदूरा
ता. नांदूरा जि. बुलढाणा
2) श्री अनिल तुळशीराम इंगळे
जन माहिती अधिकारी तथा तलाठी खैरा
ता. नांदूरा जि. बुलढाणा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा तलाठी खैरा यांचेकडे सन 1965 ते 2008पर्यंत मौजा खैरा शेत शिवारात लागवडी क्षेत्र किती, पड क्षेत्र किती, इ क्लास व एफ क्लास जमीन त्याचे गट नं.माहिती मिळावी तसेच इ व एफ क्लास जमीनीवर किती लोकांनी अतिक्रमण किती केले. त्याचे नाव व गट सह माहिती मिळावी आतापर्यंत 7 ब मध्ये वहितदार किती त्याची झेरॉक्स प्रत मिळावी. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये अमरावती येथील खंडपीठात दि. 5.1.2010 रोजी सुनावणी झालेली असल्यामुळे व एकच अपील दोन वेळा दाखल केलेले असल्यामुळे सदरच्या अपीलात सुनावणी घेण्याची आवश्यकता नाही व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे. तसेच अपीलकर्ता यांनी सुध्दा त्याप्रमाणे कळविलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1218/अम/2009**

श्री प्रभाकर जयरामजी देऊळकर
वेदधारीनी नगर आनंद नगर जवळ
उमरसा ता. जि. यवतमाळ ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद यवतमाळ
ता. जि. यवतमाळ
2) श्री देडे
जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद यवतमाळ
ता. जि. यवतमाळ ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ यांचे कार्यालयात खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. भांडार विभागाकडून विविध योजने अंतर्गत खरेदी करण्याकरीता माहे मार्च 08 ते सप्टें08 पावेतो सक्षम अधिका-याची मंजुरी मिळालेल्या संपुर्ण नकलाची प्रमाणित प्रत.
2. वाहन विभागाकडून सर्व वाहनाच्या सुटे भाग खरेदी करीता माहे मार्च 08 ते सप्टें08 पावेतो सक्षम अधिका-याची मंजुरी मिळालेल्या संपुर्ण नकलाची प्रमाणित प्रत.
3. वाहन क्र. एमएच 2 एम 9383 या रुग्णवाहीनीची आसन व्यवस्था बदलविण्याच्या नस्तीस सक्षम अधिका-याची मंजुरी मिळालेल्या संपुर्ण नकलाची प्रमाणित प्रत.
4. आकाशवाणी यवतमाळ यांना जे.ई लसीकरण मोहीम राबविण्या करीता देण्यात आलेल्या जाहीरातीच्या कराराची/आदेशाची आकाशवाणी यवतमाळचे एजंटनी दिलेल्या देयकाची व जाहीरात दिलेल्या पत्राची प्रमाणित प्रत.

5. माझे विरुध्द तक्रार सादर केली त्याची प्रमाणित प्रत. 1. श्री पी.जे.जाधव औषधी निर्माता 2. श्री एस.डी.वाकोडे 3. के.पी.लहाने वि.अ. 4. श्री एस.डि.वडूळकर आ.से. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 14.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 8.12.2008 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 17.9.2008 च्या अर्जामध्ये मागितलेली संपूर्ण मुद्याची माहिती तीन दिवसामध्ये देण्याचे तसेच जी माहिती कार्यालयामध्ये उपलब्ध नाही त्याबाबत अपीलकर्त्यास कळविण्यात यावे असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु यानंतरही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांच्या दि. 17.9.2008 च्या अर्जा प्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कोणताही पत्रव्यवहार त्यांचेशी केलेला नाही किंवा माहिती उपलब्ध करुन दिली नाही. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा कागदपत्रे दाखल करतांना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली होती याबाबतचा कोणताही पुरावा किंवा कादपत्रे आयोगाकडे सादर केलेले नाही. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भात दखल सुध्दा घेतलेली नाही व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात व शास्तीस पात्र आहेत अशी आयोगाची खात्री झालेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेशश दिल्यावर सुध्दा माहिती दिलेली नाही व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असे दिसून येते. अपीलकर्ता यांनी आयोगाकढे असे सांगितले की त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. 1 व 2 ची माहिती दि. 25.1.2010 रोजी मिळाली. मात्र मुद्दा क्र. 3,4 व 5 ची माहिती आतापर्यंत त्यांना मिळालेली नाही. मुद्दा क्र. 3 मधील नस्ती उपलब्ध आहे. परंतु देयके उपलब्ध नाही. देयकाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरची देयके जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाडे उपलब्ध असतात व त्याचा शोध घेवून पुरविणे शक्य होईल. मुद्दा क्र. 4 च्या संदर्भातील माहिती मात्र उपलब्ध नाही त्याचा पुन्हा शोध घेणे आवश्यक आहे. तसेच मुद्दा क्र. 5 ची माहिती शोध घेवून उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. सदरची माहिती ज्या ज्या शाखामध्ये उपलब्ध होवू शकेल त्या शाखांना पत्र देवून ती माहिती उपलब्ध करुन घेण्याचा प्रयत्न करणे आवश्यक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या

दि. 17.9.2008 च्या अर्जातील मुद्या क्र. 3 मधील नस्ती सोबत असलेली देयके वित्त विभागाडून शोध घेवून उपलब्ध करुन द्यावी. मुद्या क्र. 4 व 5 च्या संदर्भामध्ये पुन्हा संबंधित अधिका–यांना पत्र देवून माहिती उपलब्ध झाल्यास ती



अपीलकर्ता यांना पुरवावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी किंवा संबंधित अधिकारी कर्मचारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दि. 17.9.2008 च्या आर्जाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची दखल घेतलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ यांनी करावयाची आहे व त्याकरीता सदरच्या निर्णयाची एक प्रत **मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ** यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1220/अम/2009**

श्री गाविंद धर्माप्पा गलांडे
अध्यक्ष म.रा.से.निवृत्त शिक्षक(प्रा.) समिती शाखा महागाव
मु. पो. ता. महागाव जि. यवतमाळ ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद यवतमाळ
ता. जि. यवतमाळ
2) श्री पी. के. पुरोहित
जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी
पंचायत समिती महागाव
ता. महागाव जि. यवतमाळ ..... **उत्तरवादी**

**( आदे श पारित दिनांक 28.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.10.2008 व दि. 3.12.2008 रोजी श्री एस.एल.हेडे से.नि.स.शिक्षक यांच्या वेतनाच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 7.11. 2008 रोजी श्री एस.एल.हेडे से.नि.स.शिक्षक यांना दरमहा अंशराशीकरणाची कपात करुन 4982 इतके निवृत्ती वेतन दिले जाते. पगारात कधी पासुन वाढ केली या बाबत विचारणा केली आहे. परंतु सदर वाढ कशाची आहे याबाबत माहिती दिलेली नाही. त्यामुळे माहिती देता येत नाही असे उत्तर दिलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी दि. 17.11.2008 रोजी माहितीच्या संदर्भात स्पष्टीकरण दिलेले दिसून येते. व त्याप्रमाणे पुन्हा दि. 20.11.2008 रोजी अपीलकर्ता यांना त्यांच्या वेतनाच्या संदर्भात माहिती दिलेली दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 24.11.2008 रोजी पुन्हा माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी दि. 3.12.2008 रोजी त्यांना झेरॉक्स साठी रु. 840 व पोस्टेज खर्च 1120 असे एकुण रक्कम रु. 1960 योग्य त्या लेखाशिर्षकात जमा करावी व या कार्यालयास कळवावे असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांनी दि. 16. 12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकर्ता यांनी दि. 14.11.2008 रोजीसुध्दा प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 1.12.2008 रोजी देण्यात आलेला आहे. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी दि. 16.12.2008 च्या प्रथम अपीलाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे द्वितीय अपीलात नमुद केलेले नाही व त्यांचे द्वितीय अपील हे दि. 20.10.2008 च्या संदर्भात दिसून येते. द्वितीय अपील मेमोमध्ये त्यांना माहिती उपलब्ध करुन देतांना दिशाभूल केलेली आहे असे कारण

दिलेले आहे. तसे असल्यास अपीलकर्ता यांना श्री एस.एल.हेडे यांना अंशराशीकरणाच्या संदर्भामध्ये तसेच त्यांच्या निवृत्ती वेतनाच्या संदर्भात व वेतनाच्या संदर्भात कागदपत्राच्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध असेल त्या कागदपत्राची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. अपीलकर्ता



यांनी दि. 16.12.2008 च्या प्रथम अपीलाच्या संदर्भात द्वितीय अपील दाखल केलेले नाही. तसेच दि. 16.12.2008 च्या प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिलेला दिसून येत नाही. अपीलकर्ता यांचा दि. 16. 12.2008 च्या प्रथम अपीलाचा निर्णय हा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी करणे संयुक्तिक राहिल.व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) जन माहिती अधिकारी हे सुनावणीस हजर न राहता त्यांनी वरीष्ठ सहायकांना सुनावणीस पाठविले त्याकरीता त्यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

2) अपीलकर्ता यांच्या दि. 20.10.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत श्री एस.एल.हेडे यांच्या वेतनाच्या संदर्भामध्ये कागदपत्राच्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध असेल त्यांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**<br>
**राज्य माहिती आयुक्त,**<br>
**राज्य माहिती आयोग,**<br>
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1208/2009**

श्री विजय छगनलाल पारधी
मच्छेरा पो. सिहोरा
ता. तुमसर जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बी. सी. ठाकरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सह. जिल्हा निबंधक वर्ग–1(नि.श्रे.)/मुद्रांक जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय परीसर भंडारा
2) श्री विकास बहिरमवार
जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक वर्ग–2
गोंदिया ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 27.1.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.8.2009 रोजी जन माहिती अधिकारी दुय्यम निबंधक वर्ग–2 गोंदिया यांचे कार्यालयात खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. Whether your office has registered any sale deed in contravention of the Bombay Prevention of Fregmentation & consolidation of Holding Act.
2. Whether your office has registered any sale deed of land below 0.15 HR of land which does not have an independant 7/12 Extract, if yes, please provide me the serial number of such sale deed, consideration name of parties to such sale deed & name of the officer who has registered it.

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 22.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 19.11.2009 रोजी देण्यात आला असून राज्य जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक वर्ग–2 गोंदिया यांनी त्यांचे दि. 29.8.2009 चे अर्जानुसार फी चा भरणा करण्याबाबत अपील कर्त्यास कळवावे अपीलार्थी यांनी विहित फीचा भरणा केल्यानंतर दि.1.4.2007 ते 31.3.2009पर्यंतच्या कालावधीतील 0.15 हे.आर. पेक्षा कमी क्षेत्राच्या खरेदी विक्री व्यवहाराच्या रजिस्ट्रीचे अनुक्रमांक उपलब्ध करुन देण्यात यावे असे निर्देश देण्यात आले. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. व त्यामध्ये निर्णयास जन माहिती अधिकारी यांची संमती आहे असे चुकीचे निर्णयात म्हटले आहे. नोंदणी कायद्याप्रमाणे कलम

57 व 58 प्रमाणे जे फी भरण्याचे आदेश दिलेले आहे त्याकरीता अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारची मान्यता दिलेली नव्हती. व माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे फी भरुन माहिती त्यांना उपलब्ध व्हावी असे द्वितीय अपील मेमोमध्ये त्यांनी म्हटलेले आहे. युक्तीवाद करतांना



सुध्दा अपीलकर्ता यांनी असे सांगितले की जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध आहे असे सांगितल्यावर ती प्रती पृष्ठ 2 रु. प्रमाणे त्यांना उपलब्ध झाली पाहिजे. परंतु जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी दि.1.4.2007 ते 31.3.2009 या कालावधीतील माहिती मागितलेली असल्यामुळे सदरचा माहितीचा शोध घेवूनच ती उपलब्ध करुन देता येईल. व माहितीचा शोध घेण्यासाठी व ती उपलब्ध करुन देण्यासाठी नोंदणी कायद्याप्रमाणे कलम 57 व 58 मध्ये फी चा भरणा आवश्यक आहे अशी तरतुद केलेली आहे. व महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या नियम 4 (1) (A) (a) "When the concerned Department has already fixed the price of some documents, maps etc.

(b) When the information is readily available, either by way of photocopying, or by other way (copy) rupees two for each page." प्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे. व त्यामुळे कलम 57 व 58 प्रमाणे नियम पुर्वीच केलेले असल्यामुळे त्याप्रमाणे त्यांनी शोध फी भरुन माहिती उपलब्ध करुन घेणेबाबत कळविले आहे. हे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे उत्तर बरोबर असल्यामुळे अपीलकर्ता यांनी त्याप्रमाणे फी चा भरणा करुन घेवून माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे फेटाळण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे फेटाळण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १११४/२००९.

कु. तेजस्विनी बाबुराव गिरसावळे,
महादेव मंदीर, उदासी प्लॉट,
बाबुपेठ, ता. जि. चंद्रपूर. .....

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कारागृह उपमहानिरीक्षक,
पुर्व विभाग, नागपूर.

श्री. आर. बी. बोरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
स्वीय सहाय्यक,
कारागृह उपमहानिरीक्षक,
पुर्व विभाग, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १३.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक ३०.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १३.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती हया गैरहजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ८.९.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा कारागृह महानिरिक्षक, पुर्व विभाग, नागपूर यांचे कडे कु. सरोज टेंभुर्णे (म.रक्षक) यांचेबाबत एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती कारागृह उपमहानिरिक्षक, पुर्व विभाग, नागपूर यांनी प्रत्यक्षपणे मला कार्यालयात

.

.

बोलावून मी मागणी केलेली व मला आवश्यक असलेली संपूर्ण माहिती दिनांक ११.१२.२००९ रोजी साक्षांकित करुन दिलेली आहे असे अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगास दिनांक ११.१२.२००९ रोजी निवेदन सादर केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १३.१.२०१०** **खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११२८/२००९.

श्री. सुरेश देवराव वंजारी,
मु. पो. मोहपा, ता. कळमेश्वर,
जि. नागपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. मंगेश एम. कोहाट,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
काटोल बस स्टॅन्ड जवळ, ता. काटोल,
जि. नागपूर.

श्री. ए. डब्ल्यू. केणेकर,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग मोहपा, ता. कळमेश्वर,
जि. नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १३.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १३.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.८.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, मोहपा उपविभाग यांचेकडे दिनांक १०.९.२००८ पासून शेतातील विहिरीवर विज जोडणी न मिळाल्याबाबत एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः

... २

घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ८.९.२००९ रोजी अपीलकर्ता यांना मुद्दे निहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १०.११.२००९ रोजी दिलेला असून पुन्हा अपीलकर्ता यांना तपशीलामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यानंतरही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, शेत सर्व्हे नं. ४५५ मधील विहिरीतील पाण्यावर त्यांचा हक्क आहे व सर्व्हे नं. ४५५ मधील शेत मालक श्री. वानखेडे आहेत. त्यांनी विज घेतली असता अपीलकर्ता यांची संमती घेतली नाही तरी आता वानखेडे यांची संमतीची आवश्यकता काय. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असे त्यांचे म्हणणे आहे. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, विहिर ही शेत सर्व्हे नं. ४५५ मध्ये आहे. मालकी हक्क हा वानखेडे यांचा आहे. त्यामुळे विज मंडळाचे कर्मचाऱ्यांना प्रवेश करण्याकरिता त्यांच्या संमतीची आवश्यकता आहे. त्यामुळे विज मंडळाचे अर्जामध्ये जी अट टाकण्यात आलेली आहे त्या अटीची पुर्तता झाल्या शिवाय विज जोडणी देता येत नाही. विज जोडणी देतांना विज मंडळाचे कर्मचाऱ्यांना किंवा दुरुस्ती करतांना पुढील कोणताही प्रसंग उद्‌भवला तर शेत मालकाची परवानगी आवश्यक असते व त्यांच्या परवानगी शिवाय प्रवेश करता येत नाही. त्यामुळे त्यांनी कागदपत्राची पुर्तता केल्यास त्यांना विज जोडणी करुन देता येईल असा निर्णय देण्यात आलेला आहे. शेत मालक हे नाहरकत प्रमाणपत्र देत नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना ७/१२ वर इतर हक्कामध्ये विहिरीचा हक्क असल्यामुळे तहसीलदार यांनी श्री. अजाबराव वानखेडे यांना विज जोडणीस अडथळा करु नये. तसेच विज कर्मचाऱ्यांना विहिरीजवळ येण्यास मनाई करु नये अशा प्रकारचे आदेश प्राप्त करुन विज मंडळास सादर केल्यास विज मंडळ विज जोडून देण्यास काहीही हरकत नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी कार्यवाही करणे संयुक्तिक राहिल. परंतु सदरच्या प्रकरणी माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११२६/२००९.

श्री. प्रभुलाल छोटेलाल लिल्हारे,
मु. पो. मुरदाडा, ता. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. पी. गोगुलवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, गोंदिया
जि. गोंदिया.

श्री. एल. एस. बाडने,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, मुरदाडा,
ता. जि. गोंदिया. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १३.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १३.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.९.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, मुरदाडा यांचेकडे १२ वा वित्त आयोग अंतर्गत कामाची निवड बाबत ग्रामसभा दिनांक ५.६.२००९ रोजी केलेल्या ठरावाचे संबंधात तसेच कोणत्या नियमाप्रमाणे कामाची निवड केली तसेच एस्टिमेट मागितलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १९.११.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती ७ दिवसांचे आंत देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता यांना दिनांक २६.११.२००९ रोजी ग्रामपंचायत ठरावाची प्रत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना एस्टीमेट व कामाची निवड कोणत्या नियमानुसार करण्यात आली त्या कामाची माहिती मागितलेली होती. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सरपंच यांनी ग्रामसभेमध्ये ठरावानुसार कामाचे एस्टीमेट व कामाची निवड केली होती. त्यास कोणत्याही नियमाचा आधार नाही त्यामुळे नियमाची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. तरीसुध्दा अपीलकर्ता यांचे

म्हणणे असे आहे की, त्यांना नियमाची माहिती पाहिजे. परंतु माहिती जशी आहे तशी उपलब्ध करुन देता येते. त्यामुळे कामाची निवड व एस्टीमेट तयार करण्याची जी माहिती उपलब्ध असेल त्याबाबत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा कामाची निवड ही सरपंच यांनी निवड केली आहे असे अपीलकर्ता यांना कळवावे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय प्राप्त झाल्यापासून अपीलकर्ता यांना १० दिवसांचे आंत नियम उपलब्ध असल्यास किंवा नियमाची प्रत किंवा नियमानुसार कामाची निवड व एस्टीमेट केले नसल्यास सुस्पष्ट अपीलकर्ता यांना कळविण्यात यावे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १३.१.२०१०**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११२५/२००९.

श्री. शामराव रामा बानेवार,
मु. पो. मुरदाडा, ता. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. पी. गोगुलवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, गोंदिया
जि. गोंदिया.

श्री. एल. एस. बाडने,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, मुरदाडा,
ता. जि. गोंदिया. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १३.१.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १३.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.९.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, मुरदाडा यांचेकडे वन हक्क समितीच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती स्वतः घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २४.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १९.११.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना ७ दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो व त्यानंतर दिनांक २६.११.२००९ रोजी ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मुरदाडा यांचेकडे वन हक्क समिती बद्यल कोणतेही रेकॉर्ड उपलब्ध नसल्यामुळे वनहक्क समिती बद्यल कोणतीही माहिती पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, वन हक्क समिती ही ग्रामपंचायतीने गावातील लोकांनी स्थापन केली आहे. त्या समितीचे सदस्य सुध्दा गावातील आहेत व त्यावर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण हे ग्रामपंचायतचे नाही तर महसूल खात्याचे आहेत. वन हक्क समिती ठराव करुन ग्रामपंचायतीकडे पाठवित असते व त्याप्रमाणे वनहक्क समितीने ग्रामपंचायतीकडे कोणत्याही

प्रकारचा ठराव पाठविलेला नाही व त्यांना विचारले असता त्यांचेकडे कोणत्याही प्रकारची इतिवृत्त नाही. यावरुन गावातील नागरिकांना सुध्दा कोणतेही अधिकार दिले तरी त्यांचा वापर ते जबाबदारीने करीत नाही असे दिसून येते. परंतु ग्राम पंचायतीने केलेल्या ठरावाची माहिती उपलब्ध करुन देता येईल त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून ग्रामपंचायत, मुरदाडा यांचे सचिव यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जे ग्रामपंचायतीचे ठराव झाले असतील त्या ठरावाची छायांकित प्रत विनामूल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावीत. त्याकरिता अपीलकर्ता यांना व्यक्तिशः जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी. अन्यथा जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- १३.१.२०१०**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११२४/२००९.

श्री. विजय झुंगरुजी नगराळे,
मालवीय वार्ड, रेल्वे पुलाजवळ,
ता. वरोरा, जि. चंद्रपूर - ४४२ ९०७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. एम. शहा,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, वरोरा,
जि. चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
नगर परिषद कार्यालय (शिक्षण विभाग),
ता. वरोरा, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १३.१.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १३.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. पी. एम. पौनीकर, कनिष्ठ लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.९.२००९ रोजी माहिती अधिकारी नगर परिषद कार्यालय, वरोरा यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. वरोरा नगर परिषदेच्या दिनांक २९.१.१९८६ च्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र. ११ अन्वये नगर विकास विभाग, मुंबई यांचे पत्र क्र. डी.एम. १०८४/सीआर-१२४/४ युडी-१०, दिनांक १७.७.१९८४ चे अधिन राहून शिक्षकांची खंडीत सेवा अखंडीत करण्यात आली. परंतु सेवाखंडाचा जो भाग आहे तो असाधारण रजा करण्यात आला व शासनाचे स्पष्ट आदेश आल्या शिवाय खंडीत कालावधीचा पगार देण्यात येऊ नये. असा ठराव बहुमतांनी मंजूर झाला. सदरील ठरावाचे अधिन राहून नगर परिषदेचे अध्यक्ष/मुख्याधिकारी यांनी दिनांक २९.३.१९८६ पासून ते आज दिनांक २.९.२००९ पावेतो शासनाचे स्पष्ट आदेश प्राप्त करुन घेण्यासाठी कोणते प्रयत्न व पत्र व्यवहार केला त्याच्या प्रती पुरविण्याबाबत. तसेच नगर विकास विभाग यांचे पत्र क्र. डीएम १०८४/सीआर १२४ /४/युडी-१०, दिनांक २७.७.१९८४ ची प्रत पुरविण्याबाबत. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १.१०.२००९ रोजी मुद्या क्रमांक १ चे संदर्भामध्ये शासनाचे आदेश प्राप्त करुन घेण्याबाबत कार्यालयीन पत्रव्यवहार झालेला नाही व मुद्या क्रमांक २ नुसार नगर विकास विभाग यांचे पत्र क्र. डी.एम. १०८४/सीआर/१२४/४/युडी-१०, दिनांक २७.७.१९८४ उपलब्ध नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १६.११.२००९ रोजी घेण्यात आली. अर्जदारानी मागितलेली माहिती ही फारच जुनी असून

नगर विकास विभाग यांचे दिनांक २७.७.१९८४ चे पत्र उपलब्ध नसल्यामुळे ते शोधन करण्याचे काम सुरु आहे. सदर पत्र उपलब्ध होताच त्वरित अर्जदारास उपलब्ध करुन देण्यात येईल. असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही फारच जुनी आहे व नगर परिषदेच्या ठरावावरुन त्या पत्राचा उल्लेख दिसून येते. परंतु नस्ती उपलब्ध होत नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. असे असले तरी नस्तीचा शोध घ्यावा व माहिती उपलब्ध करुन द्यावी त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत नगर विकास विभाग यांचे पत्र दिनांक २७.७.१९८४ चा शोध घेऊन विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १३.१.२०१०**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११२३/२००९.

श्री. विजय झुंगरुजी नगराळे,
मालवीय वार्ड, रेल्वे पुलाजवळ,
ता. वरोरा, जि. चंद्रपूर - ४४२ ९०७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. कुकडे,
जनमाहिती अधिकारी तथा
शास्त्र सल्लागार,
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
नागपूर विभाग, नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १३.१.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १३.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.९.२००९ रोजी माहिती अधिकारी शिक्षण उपसंचालक, नागपूर यांचेकडे महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ च्या नियम ३ पोटनियम १(अ) (दोन) अन्वये २०० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या प्राथमिक शाळेत सहाय्यक शिक्षकाची मुख्याध्यापक म्हणून पदोन्नती झाल्यानंतर त्याला २०० पेक्षा जास्त पटसंख्या असलेल्या शाळेत उच्चश्रेणी मुख्याध्यापक म्हणून पदोन्नती मिळण्यासाठी तसेच निवड श्रेणीची वेतनश्रेणी मिळण्यासाठी कोणती तरतुद आहे. याबाबत कायदयाचे आकलन पूर्णपणे होईल असे सर्व आवश्यक शासन निर्णयाच्या/परिपत्रकाच्या झेरॉक्स प्रती पुरविण्याबाबत. सदर माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.९.२००९ रोजी अपीलकर्ता यांना शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ७.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदर अपील विहित मुदतीच्या आंत नसल्यामुळे आपले अपील ग्राहय धरता येत नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा आयोगाकडे सादर केलेला आहे. श्री. विजय झंगरुजी नगराळे, वरोरा यांनी या कार्यालयास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार दिनांक ४.९.२००९ चा माहितीचा अर्ज या कार्यालयास

दिनांक ४.९.२००९ ला प्राप्त झाला त्यात नमुद असलेली उपलब्ध माहिती संबंधितास या कार्यालयाचे दिनांक १७.९.२००९ च्या पत्राने देण्यांत आलेली आहे. संबंधितास माहिती ही विहित कालमर्यादेत देण्यांत आलेली आहे. पुरावा म्हणून या कार्यालयाने दिलेल्या माहितीच्या सत्यप्रती संलग्न करण्यांत येत आहे. (सहपत्र-१) श्री. विजय झुंगरुजी नगराळे, वरोरा यांनी या कार्यालयाने दिनांक १७.९.२००९ च्या पत्राने पुरविलेल्या माहितीवर समाधान न झाल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(१) अन्वये अपील सादर केली. या कार्यालयास प्राप्त अपील ही विहीत कालमर्यादेत करण्यात आलेली नसल्याने त्यांची अपील दिनांक १९.११.२००९ च्या पत्राने परत करण्यांत येत असल्याचे संबंधितास कळविलेले आहे. (सहपत्र-२) श्री. विजय झुंगरुजी नगराळे, वरोरा यांनी दिनांक ४.९.२००९ च्या माहिती अर्जात मुख्याध्यापकाच्या पदोन्नतीच्या अनुषंगाने तसेच निवडश्रेणी मिळण्याबाबतच्या तरतुदी बाबतचे आवश्यक ते शासन निर्णय मागितलेले होते. त्या अनुषंगाने मुख्याध्यापकाच्या पदोन्नतीच्या अनुषंगाने शासन निर्णय व वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी बाबत शासन निर्णय दिनांक १३ जुलै, १९९५ ची प्रत संबंधितास पुरविण्यात आलेली आहे. श्री. विजय झुंगरुजी नगराळे यांच्या माहिती अर्जातील उपलब्ध माहिती पुरविण्यांत आलेली आहे. तसेच त्यांची अपील विहित कालमर्यादेत प्राप्त न झाल्याने परत केलेली आहे. संबंधितास योग्य प्रकारे माहिती पुरविलेली असल्यामुळे त्यांनी मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचेकडे दिनांक २.१२.२००९ ची अपील कृपया खारीज करावी अशी विनंती केली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. अपीलकर्ता यांची अपेक्षा ही वरिष्ठ पदोन्नतीची वेतनश्रेणी अथवा निवड श्रेणीची वेतनश्रेणी मिळावी अशी दिसून येते. अधिनियमाचे तरतुदी प्रमाणे तसे अपेक्षित नाही.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १३.१.२०१०**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११३३/२००९.

श्री. प्रकाश उध्दवराव ताकसांडे,
आश्रय कॅम्प एरिया-७,
ता. जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बी. एम. कौसल,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नागपूर/अमरावती विभाग, नागपूर.

श्री. रामचंद्र जंगलूजी गोटा,
जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा माहिती अधिकारी,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
जि. गडचिरोली. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे उशिरा हजर झालेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१०.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा माहिती व जनसंपर्क अधिकारी, गडचिरोली यांचेकडे श्री. नंदु काथवटे, तरुण भारत जिल्हा प्रतिनिधी यांना विभागीय स्तरावर मिळालेल्या पुरस्काराबाबत संपूर्ण माहिती व प्रस्तावाची प्रत मिळण्याबाबत. पुरस्कार प्रदान करण्याचे निकष, वृत्तपत्राची कात्रणे, पुरस्कार प्रदान नियमावलीच्या आधारे करण्यात आलेले आहे का याबाबत माहिती. सदरची माहिती टपालाने हवी असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १.११.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही व त्यामुळे त्यांनी दिनांक १४.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १५.१.२००९ रोजी देण्यात आला असून जिल्हा माहिती अधिकारी अपीलकर्ता यांना पत्राद्वारे माहिती दिली असल्यामुळे तसेच अर्जदाराच्या प्रवेशिकेबाबतची माहिती आणि त्यासोबत जोडलेल्या कात्रणासंबंधीची माहिती या कार्यालयाकडून ती तातडीने उपलब्ध करुन देण्यात येईल असे आश्वासन देण्यात आल्यानुसार कार्यवाही झाली असल्याने सदरचे अपील हे खारीज केलेले दिसून येते. परंतु सदरची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.	श्री. प्रकाश ताकसांडे यांना त्यांच्या अर्जातील मुद्याप्रमाणे सर्व माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. मात्र कात्रणाचे फाईल राज्य स्तरावरील पुरस्कारासाठी पाठविण्यात आली असल्यामुळे त्या कार्यालयाकडे उपलब्ध नाहीत. तसेच विभागीय स्तरावरील महात्मा गांधी तंटामुक्त विभागीय समिती, नागपूर यांच्या इतिवृत्ताची तसेच समितीने दिलेल्या गुणतालीकेची झेरॉक्स प्रत अपीलकर्ता यांना दिनांक ९.१.२००९ रोजी देण्यात आलेली आहे. तसेच श्री. नंदकिशोर काथवटे यांची प्रवेशिका दिनांक १३.६.२००८ व त्यासोबत असलेल्या प्रमाणपत्रांच्या झेरॉक्स प्रतीही दिनांक ३१.३.२००९ च्या पत्रानुसार अपीलकर्ता यांना देण्यात आलेल्या आहेत. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास असेही आणले की, अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई नवीन प्रशासन भवन, १३ वा मजला मंत्रालयासमोर, मुंबई यांचेकडेही अपील दाखल केले होते. या अपील प्रकरण ३९९८/२००९ ची सुनावणी दिनांक २१.१२.२००९ रोजी सुध्दा झालेली आहे. निर्णय अद्याप प्रलंबित आहे. यावरुन अपीलकर्ता हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीचा गैरवापर करीत आहेत असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. एकाच अर्जाचे संबंधात एकाच माहितीच्या संदर्भामध्ये एकाच आयोगाकडे दोन प्रथम अपील दाखल करणे हे निश्चितच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीचा गैरवापर आहे व त्यामुळे अपीलांची संख्या विनाकारण वाढलेले दिसून येते व ज्या प्रामाणिक अपीलकर्त्याची अपील जे सुनावणीकरिता लवकर घेण्यात आले पाहिजे ते घेण्यात येत नाही याची नोंद माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कार्यकर्त्यांनी घेणे आवश्यक आहे. माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १४.१.२०१०**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११३४/२००९.

श्री. प्रकाश उध्दवराव ताकसांडे,
आश्रय कॅम्प एरिया-७,
ता. जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बी. एम. राजनहिरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, गडचिरोली.

जनमाहिती अधिकारी तथा
अध्यक्ष,
दंडकारण्य शैक्षणिक व सांस्कृतीक विकास संशोधन संस्था,
ता. जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे उशिरा हजर झालेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. पी. आर. वाघ, वकील हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.२.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, दंडकारण्य शैक्षणिक व सांस्कृतिक विकास संशोधन संस्था, गडचिरोली यांचेकडे माधूरी रमेश रामटेके (मडावी) या शिक्षिकेचे नियुक्ती आदेशाचे संदर्भामध्ये एकूण १५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १६.६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २०.७.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना ४ मुद्यांचे बाबत माहिती उपलब्ध करुन दिली व दिनांक २३.७.२००९ रोजी दुपारी १:०० वाजता अध्यक्ष/सचिव यांनी समक्ष उपस्थित राहून माहिती देण्याचे आदेश करण्यात आले. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता दिलेल्या वेळेस सुनावणीस हजर नव्हते. प्रथम अपीलीय अधिकारी सुनावणीस हजर होते व त्यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणले की, अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाचे सुनावणीचे वेळेस माहिती दिलेली आहे व उर्वरित माहिती दिनांक २३.७.२००९ रोजी सुध्दा दिलेली आहे. त्याबद्यलची कागदपत्रे आयोगाचे निदर्शनास आणण्यात आली आहेत. परंतु अपीलकर्ता यांचेकडून पोच उपलब्ध नाही. त्यानंतर जनमाहिती अधिकारी व त्यांचे तर्फे श्री. पी. आर. वाघ हे व श्री. नितीन खांबेकर, वकील उपस्थित झाले व त्यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना दिनांक २३.७.२००९ रोजी माहिती पोस्टाने पाठविली आहे. परंतु

तरीसुध्दा त्यांना माहिती उपलब्ध झाली नसेल तर रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यास त्यांची कोणतीही हरकत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना रजिस्टर पोस्टाने उर्वरित माहितीची कागदपत्रे विनामुल्य पुरविण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १४.१.२०१०**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११३६/२००९.

श्री. चंद्रहास राऊत,
शॉप नं. १०१, पहिला माळा,
श्रीदेवी रतन कॉम्प्लेक्स, आग्याराम मंदीर,
गणेशपेठ, नागपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. महेंद्र वा. जनबंधु,
जनमाहिती अधिकारी तथा
प्र. बाजार अधिक्षक,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा प्र. बाजार अधिक्षक श्री. महेंद्र वा. जनबंधु यांनी रोजनामावर सही केली परंतु सुनावणी हजर झाले नाही.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा आयुक्त कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे महाजन प्रायवेट स्कूटर पार्किंग (सिताबर्डी, नागपूर) संदर्भात एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २०.१२.२००७ रोजी अर्ज दिनांक ३.१२.२००८ चा संदर्भ देऊन जा.क्र. मनपाना/नरवि/मा.अ.अ./१५१० नुसार महाजन प्रायव्हेट स्कुटर व कार पार्किंग या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे प्रथम अपील अपीलकर्ता यांनी सादर केलेले दिसून येत नाही. मात्र राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे व त्यामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलाचे उत्तर दिले नसल्याचे नमुद केले आहे. परंतु प्रथम अपीलाची प्रत दाखल केलेली नाही. अपीलकर्ता हे सरचिटणीस, स्थानिक लोकाधिकार समिती, नागपूर हे असे नमुद करतात. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ तरतुदीप्रमाणे गंभीरपणे माहितीचा अर्ज सादर करीत नाही. प्रथम अपीलाचे संदर्भात कोणत्याही प्रकारची कागदपत्रे सादर केलेली नाहीत व आयोगाकडे सुध्दा दाखल करतांना आवश्यक ती कागदपत्रे सुरुवातीला त्यांनी दाखल केलेले नाही. अपीलकर्ता यांच्या दिनांक १.१.२००८ च्या अर्जामध्ये अर्ज हा आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना संबोधित केलेला आहे. अधिनियमाचे कलम ६(१) प्रमाणे अर्ज हा माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचा असतो. अपीलकर्ता यांनी अर्जात नांव व पत्ता चंद्रहास सदाशिवराव राऊत, प्लॉट नं. २४, आदर्श शाळेजवळ, जुना सुभेदार, नागपूर-२४ असा पत्ता दिलेला आहे. मात्र अर्ज

सादर करण्याचे ठिकाण खापरखेडा हा दिलेला आहे. आयुक्त (अपीलीय अधिकारी) नागपूर महानगरपालिका, नागपूर यांच्याकडे १७ मुद्यांमध्ये पत्र व्यवहाराचा संदर्भ दिलेला आहे. परंतु त्यातही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत व अपील सुध्दा विहित नमुन्यात नाही. प्रथम अपीलाचे संदर्भात कोणत्याही प्रकारची तारीख दिलेली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ६.६.२००९ रोजी सुध्दा उत्तर दिलेले आहे व अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, दिलेली दोन उत्तरे ही विसंगत आहेत व त्याबाबत शास्ती करण्यात यावी. परंतु अपीलकर्ता हे स्वतः माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीचे पालन करीत आहेत असे दिसून येत नाही व आज हजर न राहिल्यामुळे ते गंभीर आहेत असे ही दिसून येत नाही. बाजार अधिक्षक, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांनी दिलेले उत्तर संदर्भ पत्र क्र. ५९६/टी.आर. दिनांक ११.५.२००६ असा दिलेला आहे. यावरुन अपीलकर्ता यांचे कोणते अर्ज होते याबद्यलचा कोणताही उल्लेख नाही. अपीलकर्ता/अर्जदार हे स्वतः गंभीर नसल्याने त्यांच्या अर्जावर किंवा अपीलावर विचार करणे आवश्यक वाटत नाही. परंतु बाजार अधिक्षक हे आयोगाचे कार्यालयात उपस्थित होऊन सुनावणीस बाजार अधिक्षक हे उपस्थित राहिले नाही व कोणत्याही प्रकारचा खुलासा त्यांनी सादर केलेला नाही. त्याकारणास्तव मात्र त्यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे.

## आ दे श

१) जनमाहिती अधिकारी, नागपूर महानगरपालिका, नागपूर श्री. महेंद्र वा. जनबंधु, प्र. बाजार अधिक्षक हे आयोगाचे कार्यालयात उपस्थित झाले. रोजनामावर सही केली. परंतु आयोगापुढे सुनावणीस हजर झाले नाही व कोणत्याही प्रकारचा खुलासा सादर केलेला नाही. यावरुन जनमाहिती अधिकारी हे माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये आयोगास सहकार्य करीत नाही. त्या कारणास्तव त्यांचे विरुध्द रुपये २५०००/- शास्ती कां लादण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा हा निर्णय मिळाल्या पासून १० दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करण्यात यावा. अन्यथा रुपये २५०००/- शास्ती कायम होईल याची नोंद घ्यावी व ती जनमाहिती अधिकारी तथा बाजार अधिक्षक यांचे दरमहिन्याचे वेतनातून वसूल करण्याचे आदेश देण्यात येतात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११३९/२००९.

श्री. मधुकर नारायण चोपडे,
द्वारा - विभागीय व्यवस्थापक,
एफ.डी.सी.एम.लि., वन प्रकल्प विभाग,
रमाबाई आंबेडकर वार्ड,
ता. जि. भंडारा - ४४१ ९०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सर्जन भगत,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
महाव्यवस्थापक,
एफ.डी.सी.एम.लि., रॉवेल प्लाझा,
प्लॉट नं. १२, कडबी चौक, कामठी रोड,
नागपूर - ४४० ००४.

श्री. विनयकुमार सिन्हा,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रादेशिक व्यवस्थापक (मुख्यालय),
एफ.डी.सी.एम.लि. रॉवेल प्लाझा,
प्लॉट नं. १२, कडबी चौक, कामठी रोड,
नागपूर - ४४० ००४. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक (मुख्यालय) एफ.डी.सी.एम.लि., नागपूर यांचेकडे श्री. जी. एस. देवपुजारी व श्री. एम. बी. पाटील आणि इतर यांनी सन १९७७ वर्षात लिपिकांचे पदासाठी निवड समितीसमोर दिलेल्या मुलाखतीचा निकाल व इतर ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना जा.क्र. प्रशा/आस्था/ ३३७८/२२६३, दिनांक १८.८.२००९ च्या पत्रान्वये माहिती ३२ वर्षापुर्वीची आहे. शोध घेतला असता उक्त माहिती सध्या उपलब्ध नसल्याचे आढळून येत असल्याने ती तूर्त पुरविता येणे शक्य नाही असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २८.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १७.९.२००९ रोजी देण्यात आला असून अपील मंजूर करण्यात येत असून मागितलेल्या माहितीपैकी सध्या उपलब्ध असलेल्या ४ पत्रांच्या प्रती (अग्र क्रमांक १, २, ४ व ५) लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्यात याव्यात असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी खालील प्रमाणे लेखी खुलासा दाखल केलेला आहे. मा. व्यवस्थापकीय संचालक, एफ.डी.सी.एम.लि., नागपूर यांचे स्तरावर सन १९७७ साली लिपीकांचे पदासाठी निवड समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर निवड समितीचा निकाल मा. व्यवस्थापकीय संचालक, एफ.डी.सी.एम.लि., नागपूर यांचे कार्यालयात उपलब्ध आहे. सदर निवड समितीच्या निकालानुसारच श्री. एम. बी. पाटील, श्री. जी. एस. देवपुजारी आणि इतर यांना दिनांक १.११.१९७७ रोजी लिपिक पदावर नेमणूक आदेश दिलेले आहेत. श्री. जी. एस. देवपुजारी आणि श्री. एम. बी. पाटील यांना मा. व्यवस्थापकीय संचालक, एम.डी.सी.एम.लि., नागपूर यांनी आदेश क्रमांक प्रशा/आस्था/१६१३, दिनांक २९.९.१९८२ अन्वये लेखासहाय्यक पदावर पदोन्नती दिली आहे. दिनांक १.१.२००८ च्या सेवा जेष्ठता यादीमध्ये सदर आदेश क्रमांक नमुद केलेले आहे. त्यामुळे सदर पदोन्नतीचे आदेश मा.व्यवस्थापकीय संचालक, एफ.डी.सी.एम.लि., नागपूर यांचे कार्यालयात उपलब्ध आहे. दिनांक १.१.२००८ ची सेवाजेष्ठता यादी मा.व्यवस्थापकीय संचालक, एफ.डी.सी.एम.लि., नागपूर यांनी पत्र क्रमांक प्रशा/आस्था/८०८, दिनांक २५.५.२००९ अन्वये प्रसिध्द केली आहे. माहिती अपूर्ण दिल्याबाबतचे १००/- रुपये स्टॅम्प पेपरवर केलेले प्रतिज्ञापत्र. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही ३२ वर्षा पुर्वीची आहे जी माहिती उपलब्ध आहे ती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. जी माहिती उपलब्ध नाही ती माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. उपलब्ध असती तर कोणत्याही प्रकारची अडचण आली नसती. त्याकरिता त्यांनी A LIST OF DOCUMENTS CLASSIFIED FOR PRESERVATION AND DESTRUCTION अधिनियमाचे नियम आयोगापुढे सादर केले व त्यामध्ये अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही क वर्गात येत असल्यामुळे ती नष्ट केली असली पाहिजे व त्यामुळे ती उपलब्ध होऊ शकत नाही असे आयोगाचे निदर्शनास आणले. अपीलकर्ता यांनी ॲटम नं. १२१ आयोगाचे निदर्शनास आणले व ते अ वर्गात आहे व त्यातील सिलेक्शन कमेटी अखिल भारतीय सेवेत घेण्याकरिता जी कमेटी असते ती वर्ग ३ च्या पदांना लागू होत नाही व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध होऊ शकत नाही असे त्यांनी सांगितले व त्याकरिता सदरची लिस्ट दाखल केलेली आहे. ७६ व ७७ ॲटम त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणले व त्यामुळे सदरची माहिती ही क वर्गात असल्यामुळे ती उपलब्ध करुन देता येत नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तो योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तो योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११३८/२००९.

श्री. डॉ. अरुण ज. कुळकर्णी,
संजीवनी हॉस्पीटल, तुकुम,
चंद्रपूर - ४४२ ४०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, चंद्रपूर.

श्री. ज. म. वेलंकीवार,
जनमाहिती अधिकारी तथा
नगर रचनाकार,
नगर परिषद, चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे श्री. एम. डी. उमाठे, प्रशासकीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.७.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, चंद्रपूर यांचेकडे नगर परिषदेने मंजूर केलेल्या बांधकामास उपलब्ध असलेल्या रस्त्यासंबंधी माहिती लाल पेनने सोबतच्या नकाशावर रेखांकीत करावी अशा प्रकारची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३०.९.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती अधिकारांतर्गत अभिलेखामध्ये उपलब्ध असलेली माहिती छायांप्रतीच्या स्वरुपात पुरविण्याची तरतुद अधिनियमात असून नकाशावर रेखांकित करुन माहिती पुरविणे अपेक्षित नाही. तसेच त्याकरिता आपण पुरविलेला मोजणी नकाशा तथा जमीनी व रस्त्या बाबतचा अभिलेख हा तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, चंद्रपूर यांचे कार्यालयाकडील असल्याने आपला सदर अर्ज यापुर्वीच त्यांचेकडे वर संदर्भ क्र. १ मध्ये पत्रान्वये हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. या व्यतिरिक्त माहिती पाहिजे असल्यास माहिती अधिकारी यांची पुर्व नियोजित वेळ ठरवून घेऊन तथा कार्यालयात उपस्थित झाल्यास विषयासंबंधी नस्ती आपले अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात येईल अशी माहिती माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर परिषद, चंद्रपूर यांनी कळविलेली दिसून येते. तत्पुर्वी दिनांक २९.८.२००९ रोजी जमिनी व रस्त्याबाबतचा अभिलेख हा तालुका निरिक्षक, भुमि अभिलेख, चंद्रपूर यांचे कार्यालयाकडे असल्याने सदर माहिती करिता आपण त्यांचे विभागाशी संपर्क साधण्याचे करावे असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १५.९.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलार्थी यांचा अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. दिनांक ३०.९.२००९ रोजी अपीलकर्ता यांना सविस्तर

माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांचा अर्ज तालुका निरिक्षक, भुमि अभिलेख, चंद्रपूर यांच्याकडे हस्तांतर केल्यावर तालुका निरिक्षक, भुमि अभिलेख तथा शासकीय माहिती अधिकारी यांनी नगर परिषदेने मंजूर केलेल्या बांधकामास उपलब्ध असलेल्या रस्त्यासंबंधी माहिती मागितली आहे. बांधकामाचा नकाशा इकडून मंजूर करण्यात येत नाही, तसेच मंजूरी मिळालेला नकाशा देखील या कार्यालयास उपलब्ध नाही. त्यामुळे मागणी केलेली माहिती आपणास पुरवता येत नाही असे अपीलकर्ता यांना दिनांक १५.९.२००९ रोजी कळविलेले दिसून येते व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्या घराचे बांधकाम मंजूर झालेले आहे. बांधकाम पूर्ण झालेले आहे. तसेच घराचे बांधकामाकरिता कर्ज घेतले ते पूर्ण भरुन दिलेले आहे. त्यामुळे घरास रस्ता नसल्यामुळे त्यांनी माहिती मागितलेली आहे. रस्त्याबाबत तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, चंद्रपूर यांचे कार्यालयातून कोणत्याही प्रकारे त्यांना माहिती उपलब्ध होत नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्या ठिकाणी संपूर्ण अतिक्रमण झालेले आहे. परंतु त्या अतिक्रमणाचे संदर्भात सुध्दा अपीलकर्ता यांनी तक्रार केली व त्याबाबत सुध्दा कोणत्याही प्रकारची कार्यवाही नगरपालिकेकडून झाली नाही व त्यामुळेच त्यांनी कोणत्या प्राधिकरणाकडे दाद मागावी हे कळून येत नसल्यामुळे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीचा आधार घेतला होता. ही बाब सत्य असलीतरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २(च) प्रमाणे "माहिती" या संज्ञेची व्याख्या केलेली आहे. व्याख्येप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याच्या स्वरुपात माहिती जशी उपलब्ध असेल तशी उदा.:- कागदपत्रे, अभिलेख, निविदा, शासन निर्णय, परिपत्रके इत्यादी यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. परंतु अपीलकर्ता यांच्या अर्जामध्ये लाल पेनने सोबतच्या नकाशावर रेखांकित करावी अशी कार्यवाही करुन मागितलेली असल्यामुळे व ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११४५/२००९, अपील क्रमांक ११४६/२००९ व अपील क्रमांक ११४७/२००९.

कु. नलिनी दामोधरराव देशमुख,
रा. शिवगंगा कॉम्प्लेक्स, कोहळे ले आऊट,
प्लॉट नं. ६ व ७, खडगांव रोड, वाडी,
नागपूर. .....

**अपीलकर्ती**

श्री. पुरुषोत्तम रामभाऊ कामडी,
रा. शिवगंगा कॉम्प्लेक्स, कोहळे ले आऊट,
प्लॉट नं. ६ व ७, खडगांव रोड, वाडी,
नागपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्रीमती हेमलता गो. सावरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
स्वामी विविकानंद हायस्कूल,
वडधामणा, ता. हिंगणा, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ती/अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १५.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती/अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे श्री. भगवान सिंह, कक्ष अधिकारी हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक ११४५/२००९ मध्ये दिनांक १३.८.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, स्वामी विवेकानंद हायस्कूल, वडधामना यांच्याकडे सेवा पुस्तिकेची दुय्यम प्रत व अपीलार्थीच्या मुळ सेवापुस्तिकेंच्या झेरॉक्स प्रती साक्षांकित करुन देण्यात याव्यात. १९९३ पासून आजपर्यंत. सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने मिळण्यात यावी असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १.९.२००८ रोजी आपल्या सेवापुस्तिकेची दुय्यम प्रत पाहिजे की मुळ सेवापुस्तिकेच्या झेरॉक्स प्रती पाहिजे तसे कळवावे. जर आपणास सेवापुस्तिकेची दुय्यम प्रत पाहिजे असल्यास आपण दुय्यम सेवापुस्तिकेसाठी सेवापुस्तक शाळेला उपलब्ध करुन द्यावे. आपण दुय्यम सेवापुस्तिकेसाठी शाळेला सेवापुस्तिका उपलब्ध करुन

दिल्यास आपणास दुय्यम सेवापुस्तक तयार करुन देण्यात येईल. त्याचप्रमाणे आपणास पोस्टाचा खर्च आणि झेरॉक्स प्रतीचा खर्च शाळेत जमा करावा. त्यानुसार आपण मागितलेली माहिती आपणास उपलब्ध करुन देण्यांत येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु खर्चाची रक्कम नमुद न केल्यामुळे रुपये ६०/- ची मनिऑर्डर पाठविली. परंतु माहिती दिली नाही त्यामुळे दिनांक ३.११.२००८ रोजी श्री. अ. बी. उमरेडकर, प्रशासक, स्वामी विवेकानंद हायस्कूल, वडधामणा यांच्याकडे सेवापुस्तिकेची दुय्यम प्रत व अपीलार्थीच्या मुळ सेवापुस्तिकेच्या झेरॉक्स प्रती साक्षांकित करुन पुन्हा मागण्यात आल्या. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १७.१२.२००८ रोजी घेण्यात आली त्यात श्रीमती देशमुख यांचे दुय्यम सेवापुस्तकातील दिनांक १.१.१९९६ पासून फिक्सेशन करुन द्यावी, मुळ सेवापुस्तकाची झेरॉक्स प्रती ८ दिवसात उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदेश देण्यात आले. सदरचे आदेश हे अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी दिनांक ८.१२.२००९ रोजी दिलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ती यांना सेवापुस्तिका मिळाली परंतु वेतन फिक्सेशन करुन न दिल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले व त्यामध्ये कु. हेमलता सावरकर जनमाहिती अधिकारी यांच्यावर प्रती दिवस २५०/- रुपये दंड आकारावा व मुळ सेवापुस्तिकेची छायांकित प्रत साक्षांकित करुन उपलब्ध करुन देण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

३. अपीलकर्ती यांना मुळ सेवापुस्तिकाची दुय्यम प्रत मिळाली हे मान्य केलेले आहे. परंतु त्या सेवापुस्तिकेमध्ये वेतन फिक्सेशन केलेले नाही. त्यामुळे सदरची माहिती अपूर्ण आहे असे त्यांचे म्हणणे आहे. सदरची माहिती त्यांना दिनांक ५.१२.२००५ रोजी उपलब्ध झाली आहे. परंतु अपीलकर्ती यांचा मुळ अर्ज अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांना सेवापुस्तिकेची छायांकित प्रत व मुळ सेवा पुस्तिकेची झेरॉक्स प्रती साक्षांकित करुन मागितलेली आहे. त्यात वेतन फिक्सेशन करुन मागितले नाही व तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती ही ज्या साहित्याचे स्वरुपात माहिती ज्याप्रमाणे उपलब्ध आहे त्या प्रमाणे उपलब्ध होते. कोणत्याही प्रकारची कार्यवाही करुन मिळत नाही व त्यामुळे अपीलकर्ती यांची मागणी हे मान्य करता येत नाही. तरीसुध्दा त्यांची तक्रार दुर करण्याचे दृष्टिने जनमाहिती अधिकारी यांना विचारले असता जनमाहिती अधिकारी यांनी सेवापुस्तिका अद्यावत कां करुन दिली नाही असे विचारले असता त्यांनी त्या कालावधीत मान्यता नसल्यामुळे त्यांची वेतन निश्चिती करता आली नाही. परंतु त्याबाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे दिनांक २९.८.२००८ च्या आदेश दिनांक २.९.१९९८ रोजी पारित केलेल्या आदेशाची प्रत सादर केलेली आहे असे असले तरी एखाद्या प्रकरणात कार्यवाही करुन द्यावी हे अपेक्षित नसल्यामुळे याबाबतचा निर्णय हा प्रथम अपीलीय अधिकारी हे शिक्षणाधिकारी असल्यामुळे त्यांनी करणे आवश्यक आहे. कारण मान्यता देणे हे अधिकार शिक्षणाधिकारी यांचे आहे व त्याबाबत त्यांनी तपासून पाहणे आवश्यक आहे. त्याकरिता सदरचे अपील हे पुन्हा प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे पुन्हा सुनावणीकरिता व निर्णयाकरिता परत पाठविणे आवश्यक आहे.

४. अपील क्रमांक ११४६/२००९ मध्ये अपीलकर्ती यांनी दिनांक २२.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, स्वामी विवेकानंद हायस्कूल, वडधामना यांचेकडे एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या माहितीचा कालावधी दिनांक १९.१०.१९९५ ते दिनांक ३०.१२.१९९७ पर्यंतच्या वेतनपथक, रविनगर येथे सादर केलेल्या पगार बिल शिक्षणाधिकारी साहेबांची सही शिक्का असलेल्या पगार बिलाची झेरॉक्स प्रत साक्षांकित करुन देण्यात यावी. तसेच दिनांक १.१.१९९६ ते दिनांक ३०.१२.१९९७ पर्यंतच्या पाचव्या वेतन आयोगानुसार मिळणाऱ्या पगार बिलाची मंजूर केलेल्या प्रतीची झेरॉक्स प्रत त्यांच्या सही व शिक्यासह देण्यात याव्यात. तसेच दिनांक ५.४.१९९६ ते दिनांक २३.६.१९९६ च्या पगार बिलाच्या प्रत

साक्षांकित करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३१.१.२००९ रोजी तिनही मुद्यांवर अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असून माहितीच्या झेरॉक्स प्रतीचा खर्च रुपये २८/- व पोस्टाचा खर्च रुपये ४०/- एकूण रुपये ६८/- पाठवावा असे कळविलेले दिसून येते. परंतु झेरॉक्स प्रती व पोस्टाचा खर्च पाठविलेला नाही व दिनांक ७.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १६.२.२००९ रोजी अपील खारीज केले. कारण अपीलकर्ती यांची नियुक्ती अनुशेषाचे राखीव पदावर असल्यामुळे त्यांची मान्यता नाकारली व त्यांना पदावरुन कमी करण्यात आले व त्यामुळे त्यांना वेतन देयकाची प्रत उपलब्ध करुन देण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही असे सांगितले. तसेच अपीलकर्ती यांनी तत्कालीन अधिकारी व शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना हाताशी घेऊन दिनांक २४.६.१९९६ ते ३०.१२.१९९७ पर्यंतची चुकीची मान्यता मिळविली त्यासंबंधी शिक्षणाधिकारी यांचेशी शाळेने पत्रव्यवहार केलेला आहे. शाळेवर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या व शिक्षक आमदार श्री. डायगव्हाने यांच्या माध्यमातून प्रशासकाची नियुक्ती करवून घेतली व प्रशासकांचे माध्यमातून चुकीचे ठराव घेतल्या गेले. अपीलकर्ती यांची अपील, अपीलीय अधिकारी यांनी खारीज केल्यामुळे अपीलकर्ती यांनी पुन्हा दिनांक ९.३.२००९ ला शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर केला व त्याप्रमाणे दिनांक २०.४.२००९ नुसार सविस्तर खुलासा केल्याचे शिक्षणाधिकारी यांचेकडे साभार पाठविण्यात आलेले आहे. यावरुन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे माहितीची आवश्यकता दिसून येत नाही. परंतु सदर प्रकरणात कार्यवाही करुन घ्यावयाची अपेक्षा दिसून येते व ज्याप्रमाणे अपील क्रमांक ११४५/२००९ मध्ये शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेच उलटसुलट दोन निर्णय असल्यामुळे त्याबाबतचा निर्णय हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांनी करणे आवश्यक असल्यामुळे सदरचे अपील सुध्दा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे परत पाठविणे आवश्यक आहे.

५. अपील क्रमांक ११४७/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १५.५.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, स्वामी विवेकानंद हायस्कूल, वडधामना यांचेकडे दिनांक १३.३.२००९ ला प्रशासक, (श्री. अ. बा. उमरेडकर, उपशिक्षणाधिकारी) व सल्लागार समितीची बैठक घेण्यात आली. दिनांक १३.३.२००९ च्या प्रशासकानी घेतलेल्या सभेचे संपूर्ण ठराव प्रशासकाच्या शेवटच्या सहीसहीत छायांकित प्रत साक्षांकित करुन देण्यांत यावी. सदरची प्रत नोंदणीकृत डाकेने उपलब्ध करुन देण्यात यावी असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ९.६.२००९ रोजी माहितीचा खर्च रुपये ५०/- शाळेचे लिपिक यांचेकडे जमा करण्यात यावे असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक ७.७.२००९ रोजी अपीलकर्ता यांनी रुपये ५०/- जमा केलेले दिसून येते. त्यानुसार दिनांक १३.७.२००९ रोजी अपीलकर्ता यांना रुपये ५०/- जमा केले नाही व नंतर आपण दिनांक ७.७.२००९ ला शाळेत पत्र देऊन मी शाळेत हजर असल्यामुळे माहिती शाळेत व्यक्तिशः देण्यात यावी असे कळविले. तसेच आपण पत्रामध्ये शाळेत रजिस्टर मध्ये माहिती उपलब्ध आहे असे खोटे लिहिले आहे. आपण मागितलेली माहिती ही तत्कालीन शाळेचे प्रशासक व सल्लागार समितीशी संबंधित आहे त्यामुळे ती शाळेत उपलब्ध नाही. आपल्या दिनांक १५.५.२००९ च्या अर्जात माहिती आपण नोंदणी डाकेने मागितल्यामुळे आपल्या अर्जातील पत्त्यावर आपणास कळविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक १८.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २.९.२००९ रोजी आपण तत्कालीन प्रशासकाकडून ठरावाची प्रत उपलब्ध करुन ताबडतोब कार्यालयाला पाठवावी असे मुख्याध्यापिका यांना पत्र दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

६.	सदरच्या प्रकरणात सुध्दा प्रशासकाचे कालावधीतील ठराव असला तरी सदरची माहिती ही शाळेमध्ये उपलब्ध असणे आवश्यक आहे. परंतु आदेश त्यात उपलब्ध नसल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी असल्यामुळे त्याबाबत प्रशासकीय अधिकारी यांचेकडून अभिलेख्याचे संदर्भात विचारणा करुन माहितीची निश्चिती करुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्यामुळे सदरचे अपील हे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे परत पाठविणे आवश्यक आहे.

## आ दे श

१) अपील क्रमांक ११४५/२००९, अपील क्रमांक ११४६/२००९ व अपील क्रमांक ११४७/२००९ मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांनी पुन्हा सुनावणी घेऊन योग्य तो निर्णय देऊन अपीलकर्ती/अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ती/अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११४८/२००९.

श्री. राजेश नवलकिशोर ठाकूर,
विशाखा निवास, अजय नगर,
अंबाझरी हिल टॉप, नागपूर - ४४० ०३३. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य अधिकारी,
रायसोनी ग्रुप,
३४५, श्रध्दा हाऊस, किंग्जवे,
नागपूर - ४४० ००१.

जनमाहिती अधिकारी तथा
चेअरमॅन,
रायसोनी ग्रुप,
३४५, श्रध्दा हाऊस, किंग्जवे,
नागपूर - ४४० ००१. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.६.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा श्री. सुनील रायसोनी, चेअरमॅन रायसोनी ग्रुप, नागपूर यांचेकडे आपल्या रायसोनी ग्रुपच्या SGR Publication Pvt. Ltd., विभागात त्यांची पत्नी सौ. सिमा राजेश ठाकूर, आपल्या कार्यालयात कॉम्प्युटर ऑपरेटर म्हणून नोकरीवर आहे, ती आपल्या कार्यालयात केंव्हापासून नोकरीवर आहे व तिला आपल्या कार्यालयामार्फत मासिक पगार किती मिळतो. करिता तात्काळ लेखी स्वरुपात माहिती द्यावी. अशी विनंती केलेली दिसून येते. सदरची माहिती त्वरित घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १२.११.२००९ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी श्री. पंकज सिंग, मुख्य अधिकारी, यांचेकडे प्रथम अपील दाखल केले व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचा अर्ज व अपीलाचे संदर्भामध्ये SGR Publications Pvt.Ltd. यानी SGR Publications Pvt.Ltd यास Right to Information Act हा लागू नाही असे त्यांना कळविलेले आहे व त्या पत्राची प्रत ही अपीलकर्ता यांनी आयोगाकडे दाखल केलेली आहे. मात्र रायसोनी ग्रुप हे उत्तरवादी म्हणून आयोगा पुढे हजर झाले नाही. परंतु

रायसोनी ग्रुप SGR Publications Pvt.Ltd यास शासकीय अनुदान मिळते याबाबतची माहिती अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सादर केलेली नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता  व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११५६/२००९.

श्री. राकेश श्रावणजी आंबटकर,
रा. बाबूपेठ, पाण्याचे टाकीजवळ,
ता. जि. चंद्रपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. ए. आर. शेख,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मंडळ अधिकारी, भद्रावती सर्कल,
ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
तलाठी,
प. ह. नं. ३३,
तलाठी कार्यालय घोटनिंबाळा,
ता. भद्रावती, जि. चंद्रपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.७.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा तलाठी, घोटनिंबाळा, ता. भद्रावती जि. चंद्रपूर यांचेकडे स.नं. ३० आराजी ५.२८ मौजा घोटनिंबाळाचे विक्रीपत्र दिनांक २६.६.२००९ नुसार फेरफार न घेण्याबाबत एकूण ३ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे संदर्भात अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगास निवेदन दिलेले आहे. सदर शेताची फेरफार संबंधी सर्व माहिती संबंधितांकडून प्राप्त झाल्यामुळे वरील शेतीचे फेरफार संबंधी दाखल केलेला अपील अर्ज मागे घेण्यात येत आहे असे लेखी निवेदन दिले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११५८/२००९.

श्री. इंदरसिंह हि. परिहार,
१८२, हनुमाननगर, सरकारी गोडाऊनच्या समोर,
पुलगांव, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अजित देशमुख,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसंचालक, (उच्च शिक्षण),
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. बी. आर. पनपालिया,
जनमाहिती अधिकारी तथा
प्राचार्य,
सुवालाल पाटनी कला व वाणिज्य महाविद्यालय,
पुलगांव, जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.१.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी सुवालाल पाटनी कला व वाणिज्य महाविद्यालय, पुलगांव यांचेकडे बी.ए. भाग १, २ व ३ ला हिंदी, इंग्रजी, मराठी वाड्.मय व अर्थशास्त्र हे विषय सत्र २००९-१० च्या वेळापत्रकात दर्शविले नाही ते कोणत्या आधारावर दर्शविले नाही त्या पत्राची साक्षांकित प्रत देण्यात यावी. तसेच दिनांक १२.८.२००९ च्या वेळापत्रकाची साक्षांकित प्रत देण्यात यावी. अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२०१० रोजी, मुझे पुर्ण माहिती प्राचार्य, सुवालाल पाटनी कॉलेज द्वारा मिल गई है. इस बाबत मेरी कोई तक्रार दिनांक २४.८.२००९ की माहिती बारे मे नही है. सबब मै मेरा अपील अर्ज वापस लेता हु व अपील क्रमांक ११५८/२००९ बंद करने मे आवे ऐसी मेरी स्वेच्छा से नम्र प्रार्थना है, असे निवेदन राज्य माहिती आयोगाकडे केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७८५/२००९, अपील क्रमांक ७८६/२००९, अपील क्रमांक ७८७/२००९, अपील क्रमांक ७८८/२००९, अपील क्रमांक ७९०/२००९, अपील क्रमांक ७९२/२००९ व अपील क्रमांक ७९३/२००९.**

श्री. संतोष गणपतराव इंगळे
ह. मु. इंगळे-ले-आऊट, न्यु एस.टी.कॉलनी,
सिंदी मेघे, ता. जि. वर्धा.

श्री. रविंद्र जानरावजी येंगडे,
द्वारा - माहेश्वरी कृषी मशीनरी केंद्र,
ता. जि. वर्धा.

श्री. मारोतराव दशरथ रोडे,
द्वारा - माहेश्वरी कृषी मशीनरी केंद्र,
भामटीपूरा रोड, ता. जि. वर्धा.

श्री. कृष्णराव नारायणराव डफरे,
सोहम सेवा आश्रम, बरबडी रोड,
एम. आय. डी. सी. वर्धा.

श्री. सुरेंद्र आनंदराव गौतम,
वार्ड नं. १, ता. सेलू, जि. वर्धा.

श्री. राधेश्याम जवाहरलाल राठी,
द्वारा - माहेश्वरी कृषी मशीनरी केंद्र,
ता. जिं. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक धर्मदाय आयुक्त,
एल.आय.सी. इमारतीच्या बाजूला,
जुना आर्वी स्टॅन्ड, ता. जि. वर्धा.

श्री. पी. आर. थुल,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी,
सहाय्यक धर्मदाय आयुक्त कार्यालय,
एल. आय. सी. इमारतीच्या बाजुला,
जुना आर्वी स्टॅन्ड, ता. जि. वर्धा.

श्री. कुबडे,
जनमाहिती अधिकारी तथा
अध्यक्ष,
साई सेवा मंडळ,
मगनवाडी रोड, ता.जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.१.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक ७८५/२००९, अपील क्रमांक ७९२/२००९ व अपील क्रमांक ७९३/२००९ दिनांक ७.९.२००९ रोजी अपील क्रमांक ७८६/२००९, अपील क्रमांक ७८७/२००९, अपील क्रमांक ७८८/२००९ व अपील क्रमांक ७९०/२००९ दिनांक ८.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये एकूण ७ द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या सातही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १६.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. सु. य. निमजे, प्रभारी निरीक्षक हे हजर आहेत. अपील क्रमांक ७८५/२००९ मध्ये श्री. संतोष गणपतराव इंगळे, अपील क्रमांक ७८६/२००९ मध्ये श्री. रविंद्र जानरावजी येंगडे व अपील क्रमांक ७९०/२००९ मध्ये श्री. सुरेंद्र आनंदराव गौतम हे अपीलकर्ता गैरहजर आहेत.

२. वरील सर्व अपीलामध्ये सर्व अपीलकर्तांनी जनमाहिती अधिकारी तथा सार्वजनिक न्यास नोंदणी /सहाय्यक धर्मदाय आयुक्त, वर्धा यांचेकडे माहिती मागितलेली आहे.

३. **अपील क्रमांक ७८५/२००९** मध्ये दिनांक ९.२.२००९ रोजी साईमंदीर, वर्धा येथील घटनेप्रमाणे आज कार्यकारणी कोणती आहे ? त्यातील सदस्यांची नांवे, साई मदीरात आजीवन सभासद किती आहेत. त्यांच्या नावाचे बोर्ड लावले कां नाही ? किंवा अद्यावत केलेली यादी द्यावी. दिनांक ९.१२.२००८ पासून आजीवन सभासदच्या दिलेल्या अर्जाचे उत्तर कां देण्यात आले नाही अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २६.२.२००९ रोजी अतिरिक्त खर्चाकरिता व पोस्टाचे खर्चाकरिता रुपये ३०/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते व त्यानंतर दिनांक २.३.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १८.५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अपीलाचा निर्णय हा दिनांक २०.८.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील फेटाळण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती व त्यांना पुरविण्यात आलेली माहिती याबाबतचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी योग्य ती माहिती दिलेली आहे. प्रथम अपीलाचा निर्णयामध्ये भास्करराव कुलकर्णी विरुध्द राज्य माहिती आयुक्त, नागपूर या याचिकेमध्ये २००९(४) एमएच.एल.जे.८०२ या याचिकेतील निर्णयाचा आधार घेतलेला दिसून येतो. परंतु अर्जदाराने सार्वजनिक न्यास नोंदणीकडे माहिती मागितलेली असेल व त्या सार्वजनिक न्यासास शासनाचे अनुदान मिळत नसेल तर सदरचा निर्णय हा लागू होतो. परंतु सदरच्या न्यासाची नोंद ही धर्मदाय आयुक्त यांचेकडे होत असल्यामुळे व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० प्रमाणे धर्मदाय आयुक्त यांच्या कार्यालयाचे नियंत्रण हे सार्वजनिक न्यासाच्या कामकाजाबाबत असल्यामुळे सार्वजनिक न्यासाकडून जी माहिती उपलब्ध होते किंवा उपलब्ध करुन घेता येते ती माहिती माहितीचा

अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) मधील "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. "माहिती" याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असे असून त्यामधील अभिलेख, दस्तऐवज, टिपणी .......... आणि त्या त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती यांचा समावेश होतो."  त्यामुळे मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० च्या तरतुदीप्रमाणे सार्वजनिक न्यासाकडून माहिती मिळवून अर्जदारास उपलब्ध करुन देणे हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीमध्ये येते.  परंतु सदरच्या प्रकरणी माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

५. **अपील क्रमांक ७८६/२००९** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ११.२.२००९ रोजी चालू वर्षाचे हिशोब तैयार नसतांना आमसभा घेता येते काय ?  मागील ५ वर्षाचे अंदाजपत्रक, टाळेबंद पत्रक व प्रोसीडींगची प्रत द्यावी.  घटनेप्रमाणे कार्यकारणी ही सिलेक्टेड असावी काय ?  त्याला मंजूरी देण्यात येईल काय ?  आजपर्यंत ३५ वर्षापासून साईसेवा मंडळाची कार्यकारणी शेडूल-१ प्रमाणे आहे तर बँकेचे व्यवहार, पत्राचार नवीन कार्यकारणी कशी करत आहे.  त्यांच्यावर कार्यवाही कां करण्यात आली नाही ?  केली असल्यास पुरावा देण्याचे करावे.  सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २.३.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.  उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.  प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २०.८.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती दिल्याचे कारणास्तव सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते.  त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

६. प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

७. **अपील क्रमांक ७८७/२००९** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१.२००९ रोजी साईमंदीरमध्ये आजीवन सभासद किती आहेत ?  त्यांची यादी द्यावी.  मी केलेला आजीवन सभासदचा अर्ज आमसभेत मंजूरीसाठी कां ठेवण्यात आले नाही ?  तसेच दिनांक १०.१.२००९ ला मंदीरमध्ये कार्यकारणी सभासद कोण आहेत ज्यांच्याशी आम्ही संपर्क करु शकतो.  तसेच मंदीरात शेवटचा सभासद केंव्हा आलेला आहे.  सभासद रजिस्टर आहे काय ? सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे.  अर्जाचे अनुषंगाने दिनांक ६.२.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.  उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १३.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले.  प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २०.८.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील हे फेटाळण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

८. प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

९. **अपील क्रमांक ७८८/२००९** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१.२००९ रोजी साई सेवा मंडळाचे संदर्भात एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.  सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ६.२.२००९ रोजी माहिती देण्यात आलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १८.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.  प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २०.८.२००९ रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध करुन दिली या कारणास्तव अपील

हे खारीज करण्यात आलेलें दिसून येते. प्रथम अपीलाचे निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

१०. प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

११. **अपील क्रमांक ७९०/२००९** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१.२००९ रोजी साईमंदीरची घटनेच्या प्रमाणे कार्यकारणी कोणती आहे. साईमंदीर मध्ये आजीवन सभासद करीता १ महिन्यापूर्वी दिलेल्या अर्जाचे काय झाले. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ६.२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २०.८.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन दिली या कारणास्तव अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

१२. प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

१३. **अपील क्रमांक ७९२/२००९** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१.२००९ रोजी साई सेवा मंडळाचे संदर्भामध्ये एकूण ६ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ६.२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १८.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २०.८.२००९ रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध करुन दिली या कारणास्तव सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

१४. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्या अर्जामध्ये त्यांना दिनांक २८.१२.२००८ ला आमसभेचे प्रोसीडींगची प्रत मागितली होती. परंतु त्यांना दिनांक १६.१.२००८ च्या ठरावाची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांच्याकडे साई सेवा मंडळाकडून जी माहिती उपलब्ध झाली ती माहिती अपीलकर्ता यांना दिलेली आहे. साई सेवा मंडळाचे पदाधिकारी यांनी असे सांगितले की, दिनांक २८.१२.२००८ च्या आमसभेचे प्रोसीडींगचा ठरावाची प्रत देण्यास कोणत्याही प्रकारची हरकत नाही. परंतु त्या आमसभेच्या ठरावाची प्रत ही दिनांक १६.१.२००८ ची उपलब्ध नसल्यामुळे गैरसमजातून दिनांक १६.१.२००९ ची प्रत दिलेली आहे. परंतु दिनांक २८.१२.२००८ च्या आमसभेच्या ठरावाची प्रत ही जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांनी साईसेवा मंडळाकडून प्राप्त करुन अपीलकर्ता यांना पुरविण्यात येईल. इतर माहितीच्या संदर्भामध्ये योग्य ती माहिती दिलेली आहे. त्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

१५. **अपील क्रमांक ७९३/२००९** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १०.२.२००९ रोजी साई सेवा मंडळाचे संदर्भामध्ये एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २.३.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १८.३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २०.८.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती अपीलकर्ता यांना पुरविण्यात

आली या कारणास्तव सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

१६. प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

१७ वरील सर्व मागितलेल्या माहितीचे स्वरुप यांचा विचार केल्यास सर्व अपीलकर्ता यांना साई सेवा मंडळाचे संदर्भात तक्रार आहे असे दिसून येते व तक्रारीच्या स्वरुपात त्यांनी माहिती मागण्याचा प्रयत्न केलेला आहे. या सर्व मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील हया सर्व तक्रारी त्यांना मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० च्या तरतुदीप्रमाणे सहाय्यक धर्मदाय आयुक्त, वर्धा यांचेकडे करणे आवश्यक राहिल. वर नमुद केल्याप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जनमाहिती अधिकारी यांचेकडे ज्या साहित्याचे स्वरुपात अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने इत्यादी स्वरुपात जी माहिती उपलब्ध असते त्याची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. कोणत्याही तक्रारीचे निराकरण हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे अर्ज करुन करता येत नाही.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ७८५/२००९, अपील क्रमांक ७८६/२००९, अपील क्रमांक ७८७/२००९, अपील क्रमांक ७८८/२००९, अपील क्रमांक ७९०/२००९ व अपील क्रमांक ७९३/२००९ हे खारीज करण्यात येते.

२) अपील क्रमांक ७९२/२००९ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १३.१.२००९ च्या अर्जात साई सेवा मंडळ, वर्धा येथील दिनांक २८.१२.२००८ ला झालेल्या आमसभेच्या इतिवृत्ताची प्रत साई सेवामंडळ, वर्धा यांचेकडून उपलब्ध करुन घेऊन विनामुल्य टपालद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १६.१.२०१०** **खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११७०/२००९.

श्री. सुधाकर पांडुरंग महालकर,
गुरुकुल नगर, एस. टी स्टँड जवळ,
रिंग रोड, पोस्ट के. के. नगर,
ता. रामटेक, जि. नागपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. एन. रामबाबू,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
वन संरक्षक,
शासकीय मुद्रणालयाजवळ,
नागपूर वन विभाग, नागपूर.

श्री. एस. बी. भलावी,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय वन अधिकारी,
शासकीय मुद्रणालयाजवळ,
नागपूर वन विभाग, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.६.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी, नागपूर वन विभाग, नागपूर यांचेकडे नागपूर वन विभागातील देवलापार रेंज मधील राखीव कक्ष क्रमांक ५२१ मध्ये सन १९८८ मध्ये आदिवासी संस्थेने साफतोड करुन तयार केलेले जळावू भर व त्याचे विल्हेवाट संबंधी सन १९८८ ते २००२ पर्यंत आवश्यक माहितीची यादी सोबत जोडली आहे. त्यात ३ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १.७.२००९ अन्वये माहिती फार जुनी असून शोधण्यास उशिर लागेल तरी माहिती प्राप्त होताच आपणास कळविण्यांत येईल. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही या कारणास्तव अपीलकर्ता यांनी दिनांक १३.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १५.९.२००९ रोजी देण्यात आला असून माहितीचा शोध घेऊन उर्वरित माहिती अपीलकर्ता यांना दिनांक १९.९.२००९ पर्यंत विनामुल्य पुरवावी. आवश्यकतेनुसार अपीलकर्ता अर्जदार श्री. एस.पी. महालकर, यांनी शासकीय माहिती अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी, नागपूर यांचे कार्यालयात पुर्व सुचना देऊन अभिलेख पडताळणी करण्याकरिता त्यांना परवानगी देण्यात येत आहे. त्याप्रमाणे शासकीय माहिती अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी, नागपूर यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या दस्तावेजाच्या सर्व नस्ती अपीलकर्ता यांना दाखविण्यात याव्या

असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांनी अभिलेखाचे निरिक्षण न करता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे असे सांगितले की, त्यांना मुद्या क्रमांक २ व ३ ची माहिती मिळाली. परंतु मुद्या १ मधील ८ मुद्यांची माहिती मिळाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांच्या कार्यालयामध्ये माहितीचा शोध घेण्यात आला परंतु त्यात नस्ती आढळून आली नाही. त्यात मुद्या क्रमांक ६ व ७ ही माहिती त्यांना उपलब्ध झाल्यास पुरविता येईल. इतर मुद्यांवरील माहिती त्यांच्या विभागीय चौकशीचे संबंधात तशी उपयुक्त नाही. विभागीय चौकशीचे सर्व कागदपत्रे उपलब्ध आहेत व त्यातूनच अपीलकर्ता यांची रिकव्हरी काढली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, नाला डेपोमध्ये फार जुन्या नस्त्या आहेत व त्या नस्तीमधून कदाचित सदरची माहिती उपलब्ध होऊ शकेल. त्याकरिता अपीलकर्ता यांनी अभिलेखाचे निरिक्षण केल्यास त्यांना माहिती उपलब्ध होऊ शकेल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित राहण्यास कळवावे. अपीलकर्ता उपस्थित झाल्यावर अपीलकर्ता यांना नाला डेपो मधील नस्त्या निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्याव्या व त्यात नस्ती उपलब्ध झाल्यास १ ते ८ मुद्यांची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १८.१.२०१०**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११६६/२००९.

श्रीमती ज्योती जीवन ढाकणे,
डब्ल्यु.सी.एल., क्वा. नं. एम/क्यू २१३,
ता. उमरेड, जि. नागपूर. .....

**अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी,
नागपूर.

श्री. संजय धिवरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. उमरेड, जि. नागपूर.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. संजय धिवरे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. उमरेड, जि. नागपूर.

श्री. सी. एन. सलामपुरे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक १७.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ८.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, ता. उमरेड यांचेकडे आचार संहितेत लोकप्रतिनिधी यांनी कोणते कृत्य करु नये याबाबत नियमानुसार ग्राम पंचायतीत आचार संहिता असतांना ग्राम पंचायत पदाधिकारी यांना कोणकोणते कार्य करण्यास चुनाव आयोगाने निर्बंध केलेले आहेत त्याची सत्यप्रतिलिपी मिळण्याबाबत. दिनांक १५.४.२००९ रोजी केलेल्या तक्रारीनुसार सरपंच, वायगांव यांच्यावर केलेल्या कारवाईची सत्यप्रत मिळणेबाबत. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २३.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक

१७.१०.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलार्थीची अपील अंशतः मंजूर करण्यात आले असून अपीलार्थीनी दाखल केलेल्या माहितीच्या अर्जातील मुद्या क्र. २ बाबतची माहिती आदेश दिनांकापासून ३० दिवसाचे आंत पुरवावी असा आदेश दिलेला दिसून येतो व तसे अपीलकर्ती यांना खंड विकास अधिकारी, उमरेड यांना प्रस्तुत प्रकरणी योग्य ती चौकशी करुन नियमानुसार कार्यवाही करण्यास यापुर्वीच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिनांक १५.४.२००९ रोजीचे पत्रान्वये कळविल्यानुसार आपणास प्रकरणी मुद्या क्रमांक २ ची माहिती खंड विकास अधिकारी, उमरेड यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अद्याप पर्यंत अपीलकर्ती यांना कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ती यांनी निवडणूक काळातील आचार संहितेची माहिती उपलब्ध झाली आहे. परंतु मुद्या क्रमांक २ ची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही असे त्यांनी सांगितले. जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, खंड विकास अधिकारी, उमरेड यांचेकडे सदरच्या बाबत निर्णय घेण्यास कळविले असल्यामुळे त्यांचेकडून निर्णय आल्यावर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल. परंतु आचार संहिता भंग झाली असल्यास व तसे खंड विकास अधिकारी यांचा निर्णय असल्यास निवडणूक आयोगास त्याबाबत निर्णय देणे आवश्यक असून उपविभागीय अधिकारी यांनी निर्णय देणे आवश्यक आहे किंवा जिल्हाधिकारी हे निवडणुकीचे कामकाज निवडणूक आयोगाचे अधिकारी म्हणून पाहत असल्यामुळे त्यांनी त्याबाबत निर्णय देणे ही बाब आवश्यक आहें. परंतु ही बाब उपविभागीय अधिकारी यांनी तपासून पाहता हा निर्णय घेणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## **<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना महाराष्ट्र राज्य निवडणूक आचारसंहिता किंवा खंड विकास अधिकारी यांचे अधिकाराची तपासणी करुन योग्य तो निर्णय घेऊन अपीलकर्ता यांना विनामुल्य पोस्टाने माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११६८/२००९.

श्री. हेमंत रमेशराव अडसुळे,
श्री संत मारोतीभाऊ समाधीच्या बाजूला,
सुयोग लॉन्सच्या मागे, जुनी म्हाडा कॉलनीजवळ,
सिंदी (मेघे), ता. जि. वर्धा. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. डी. बनसोडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. जि. वर्धा.

श्री. व्ही. एच. नागोसे,
जनमाहिती अधिकारी तथा
शिरस्तेदार,
उपविभागीय अधिकारी कार्यालय,
ता. जि. वर्धा. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.९.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वर्धा यांचेकडे श्री. सी. डी. पिंपळे, तलाठी, बोरगांव (मेघे) यांचा अहवाल दिनांक ७.३.२००८ ज्या अहवालाच्या आधारे उपविभागीय अधिकारी, वर्धा हयांनी सी. डी. पिंपळे हयांना ०.१४ आर. अकृषक जागेचा ७/१२ देण्याचे आदेश दिले. सत्यप्रत प्रमाणित कॉपी सी. डी. पिंपळेंचा अहवाल दिनांक ७.३.२००८. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७.११.२००९ रोजी देण्यात आला असून सदर माहितीचा अर्ज हा विधानसभा निवडणूकीचे दरम्यान या कार्यालयाला प्राप्त झाला. त्यानंतर दिनांक २२.१०.२००९ ला मतमोजणी होईपर्यंत निवडणूकीचे अतिमहत्वाचे कामामध्ये अर्जदाराचे अर्जावर कार्यवाही होऊ शकती नाही. अपीलार्थी समक्ष तलाठी श्री. पिंपळे यांना सदर अहवालाबाबत चौकशी कली असता त्यांचे जवळ सुध्दा सदर अहवालाची प्रत आढळून आली नसल्याने उपलब्ध करुन देता आली नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज केलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३.    अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तलाठी, श्री. सी. डी. पिंपळे यांनी उपविभागीय अधिकारी यांना मौजा सिंदी (मेघे) येथील शेत सर्वे क्र. २०९ ची आराजी २.७५ हे.आर. पैकी अकृषक शिल्लक जागेचा ०.१४ हे.आर. चा ७/१२ मिळावा म्हणून तलाठी श्री. पिंपळे यांचा दिनांक ७.३.२००८ चा संदर्भ देऊन उपविभागीय अधिकारी यांनी आदेश दिला त्यात श्री. पिंपळे यांचे अहवालाची प्रत मागितलेली आहे. परंतु ती त्यांना उपलब्ध करुन दिली नाही. सदरची नस्ती उपलब्ध आहे. परंतु तलाठी यांचा अहवाल नाही व तलाठी यांचेकडे सुध्दा त्याबाबतचा अहवाल नाही. परंतु त्या आधारावर उपविभागीय अधिकारी यांनी सदरच्या जागेच्या संदर्भामध्ये ०.१४ हे.आर. ही जमीन फेरफार केलेली आहे. असे असल्यास सदरच्या अहवालाची कसून शोध घेणे आवश्यक राहिल व अहवाल मिळत नसल्यास त्याबाबत पोलीस स्टेशनला जनमाहिती अधिकारी यांनी तक्रार करणे संयुक्तिक राहिल. तसेच अपीलकर्ता यांनी सुध्दा महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ प्रमाणे उपविभागीय अधिकारी यांचेकडे फेरफार संदर्भाचे दृष्टिने अपील करणे संयुक्तिक राहील. परंतु सदरचे प्रकरणात माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून तलाठी, श्री. सी. डी. पिंपळे यांनी उपविभागीय अधिकारी यांचेकडे दिलेल्या अहवालाचा प्रतीचा कसून शोध घ्यावा. अन्यथा पोलीस स्टेशनला तक्रार दाखल करावी व त्याबाबतची माहिती अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिष्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११६९/२००९.

श्री. सादिक अली व. रमजान अली,
नई बस्ती आजाद नगर, टेका,
सलाम भाई मिठाईवाला समोर,
नागपूर - ४४० ०१७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. मनीष रामराव केदार,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
फिरोज गांधी विद्यालय,
रिंग रोड जवळ, धम्मदिपनगर,
नागपूर. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री. चौधरी, उपशिक्षणाधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.७.२००९ रोजी मुख्याध्यापक तथा माहिती अधिकारी, फिरोज गांधी विद्यालय, नागपूर यांना शाळा मान्यता आदेश पत्र (उच्च माध्यमिक व माध्यमिक). शाळा अनुदान आदेश पत्र हायस्कूल विभाग. सादिक अली करमजान अली यांचे नियुक्ती आदेश पत्र २००६ वगैरे एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २०.८.२००९ रोजी शाळा क्निा अनुदान तत्वावर कार्यरत असल्यामुळे आपण माहिती अधिकारात मागितलेली माहिती शाळेस आपणास पुरविणे बंधनकारक नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक १४.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे अनुषंगाने दिनांक २९.१०.२००९ रोजी आपली शाळा सरकार मान्य अनुदानित असल्यामुळे माहितीचा अधिकार हा कायदा लागू आहे असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.	द्वितीय अपीलाचे सुनावणीत अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना मिळाली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू नाही असे कळविले असले तरी विना अनुदानित शाळा असल्यामुळे अपीलकर्ता यांना कळविले नसल्यामुळे माहितीच्या अधिकारांतर्गत मागितलेल्या माहितीचे संबंधित कागदपत्राच्या झेरॉक्सच्या एकूण प्रती १०० आहेत. त्यासाठी प्रती प्रत रुपये २/- प्रमाणे रुपये २००/- व रजिस्टरी खर्च रुपये अंदाजे २००/- असा एकूण खर्च अंदाजे रुपये ४००/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते व त्यानंतर दिनांक ९.१२.२००९ रोजी खर्चाचा भरणा न करता माहिती रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. यावरुन जनमाहती अधिकारी यांनी विना अनुदानित तत्वावर शाळा असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ला लागू होत नाही हा मुद्या उपस्थित केलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देणे हे जनमाहिती अधिकारी यांना बंधनकारक आहे. आयोगापुढे सुध्दा खुलासा करतांना अपीलकर्ता यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असाच खुलासा त्यांनी केलेला आहे. परंतु अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक ३ ची माहिती जर संस्थेनी उपलब्ध करुन दिली नाही तर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी संस्थेकडून उपलब्ध करुन घेऊन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी व इतर मुद्यांची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या अर्जात मागितलेल्या माहितीन्वये माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) त्यांच्या नियुक्ती आदेशाची माहिती संस्थेने उपलब्ध करुन न दिल्यास प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांनी संस्थेकडून उपलब्ध करुन अपीलकर्ता यांना पुरवावी. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घेण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११६३/२००९.

श्री. रमेशकुमार मनोहरलाल बाली,
फुटाना ओली, ता. कामठी,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, कामठी,
जि. नागपूर.

श्री. बोरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
नगर परिषद, कामठी,
जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.९.२००९ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद, कामठी यांचेकडे एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २४.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २६.११.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती १० दिवसांचे आंत देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यास माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना आता पर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती तयार आहे. परंतु त्यावेळेस उपलब्ध करुन देता आली नाही. जनमाहिती अधिकारी श्री. बोरकर हे विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन देत नाही असा वारंवार आयोगास अनुभव आलेला आहे व त्यांना ३-४ वेळा शास्ती झाली आहे. सदरच्या प्रकरणात सुध्दा त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही व प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे त्यांची विभागीय चौकशी करणे आवश्यक आहे. तसेच सक्षम असे जनमाहिती अधिकारी नियुक्त करणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २३.९.२००९ च्या अर्जात मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, श्री. बोरकर यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही ही मुख्याधिकारी, नगरपरिषद, कामठी यांनी करावयाची आहे.

३) मुख्याधिकारी, नगर परिषद, कामठी यांनी. श्री. बोरकर, कनिष्ठ अभियंता यांचे ऐवजी सक्षम जनमाहिती अधिकारी यांची नियुक्ती करावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११७२/२००९.

श्री. बाबुराव मोतीरामजी खोब्रागडे,
बजरंगनगर, रोड नं. ७, पो. भगवाननगर,
नागपूर - ४४० ०२७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
मौदा, जि. नागपूर.

श्री. जिभकाटे,
जनमाहिती अधिकारी तथा
तलाठी, प.ह.नं. ६४,
पो. बाबदेव, ता. मौदा,
जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. चलफे, वरिष्ठ लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.८.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तलाठी, प.ह.नं. ६४, बाबदेव, ता.मौदा यांना शेतीचा ७/१२ पाहिजे. गट नं. २८४, २८५ ज्यांचे फेरफार झाले त्यांचे रजिस्ट्रीचे झेरॉक्स. माहितीचा कालावधी १९८९ पासून २००९ पर्यंत. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना सदर माहिती ६ महिने उशिरा उपलब्ध करुन दिली असे अपीलकर्ता यांनी लेखी निवेदन दिले आहे व माहिती मिळाल्यामुळे केस बंद करण्यात यावी अशी विनंती केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११८०/२००९ व अपील क्रमांक १२०९/२००९.

श्री. अमरनाथसिंह बलरामसिंह गहेरवार,
३५, अशोक कॉलोनी,
ता. जि. गोंदिया. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. ए. बी. कवचाळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कृषी सहसंचालक (आस्थापना)
कृषी आयुक्तालय, साखर संकूल,
पुणे - ४११ ००१.

श्री. ए. बी. देसाई,
जनमाहिती अधिकारी तथा
कृषि उपसंचालक (क.क.)
कृषी आयुक्तालय, साखर संकूल,
पुणे - ४११ ००१. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. अपील क्रमांक १२०९/२००९ ही राज्य माहिती आयुक्त, पुणे यांचेकडून प्राप्त झाली असून दोनही अपील एकच आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कृषि आयुक्त, पुणे यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. आपले कार्यालयीन पथकाने दिनांक ३० जुलै, २००८ ला

.

.. २

केलेल्या चौकशीचा अहवाल. उपरोक्त चौकशी अहवाला संदर्भात संबंधित अधिकाऱ्यानी दिलेल्या सूचनांचे पत्र, नोटशिट व त्यांचे शेरे व त्यांचे अभिप्राय यांच्या प्रती. जर एखादे राजकीय नेते किंवा वरिष्ठ कार्यालयात हया प्रकरणा संदर्भात प्रकरण दाबण्याचे प्रकरणी जर काही पत्र व्यवहार व कागदपत्रे प्राप्त झाली असल्यास त्यांच्या प्रती. मी चौकशी अधिकाऱ्यांना दिनांक ३० जुलै २००८ रोजी गोंदिया येथे दिलेले बयानाची प्रमाणित प्रत. चौकशी अधिकाऱ्यांनी संबंधित लोकांकडून नोंदविलेल्या बयानाची प्रत. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १९.३.२००९ रोजी शासन स्तरावरुन विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु असल्याने केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८ (ड) व (ज) नुसार चौकशी सुरु असतांना मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. मुद्या क्रमांक ३ मध्ये मागणी केलेनुसार पत्रव्यवहार हा विभागास प्राप्त झालेला नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २२.७.२००९ रोजी कृषि सहसंचालक (आस्थापना), पुणे यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भात दिनांक १३.८.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती पाठविण्यात आली असून आपले मागणीनुसार आपणांस पुनश्च प्रमाणित प्रत पाठविण्यात येत आहे असे कळविले. सदर प्रकरणी दिनांक ३१.८.२००९ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसुन येतो व अपील अमान्य करुन खारीज करण्यात आलेले दिसून येते. परंतु सदरचे बयान हे अपीलकर्ता यांचे असल्यामुळे त्यांचे समाधान झाले नाही व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्या शेतामध्ये अवैधरीतीने नाला बांधकामाचे प्रस्ताव आमचे जमीनीवर अतिक्रमण करुन करण्यात आले जे नियमबाहय आहे व नाला बांधकामाचे प्रस्ताव दुसरे क्षेत्रात दाखवून व खोटी कागदपत्रे तयार करुन शासनाची फसवणूक करुन व हया कामात भ्रष्टाचार करुन आमचे शेतात बांध टाकून पाणीसाठयाकरिता आमचे शेताचे अंदाजे दिड एकर जमीनीत खड्डे खोदण्यात आले व बळजबरीने आमचे शेतावर अतिक्रमण केले व त्यामुळे सदरच्या तक्रारीचे पुढे काय झाले याबद्यलची माहिती त्यांनी मागितलेली दिसून येते. परंतु सदरची माहिती उपलब्ध करुन न देता ती नाकारण्यात आलेली आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, संबंधित कर्मचाऱ्यास निलंबित करण्यात आलेले आहे. विभागीय चौकशी पूर्ण झ ाालेली आहे. त्यांचेकडून रिकव्हरी सुध्दा करण्यात आलेली आहे. परंतु चौकशी अहवाल हा शासनाच्या मान्यतेस सादर केलेला आहे व शासनाकडून अद्याप मान्यता झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती कलम ८ (ड) (ज) नुसार नाकारली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, तक्रार दाखल केली त्या संदर्भामध्ये पुढील कार्यवाही काय झाली ही माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे हे आवश्यक आहे. त्यांच्या शेतातील नाल्याचे बांधकाम अजूनही काढण्यात आले नाही. त्यामुळे त्यांनी ही माहिती मागितली. अपीलकर्ता यांचा युक्तिवाद योग्य असल्यामुळे संबंधित कामाचे संदर्भामध्ये कोणती कार्यवाही करण्यात आली ही माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे. प्रथम अपील हे मुदतबाहय असल्यामुळे खारीज करण्यात आले हा निर्णय योग्य आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक ३०.७.२००८ रोजी केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती व रिकव्हरी आदेशाच्या प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११८२/२००९ व अपील क्रमांक ११८३/२००९.

श्री. ओमप्रकाश शिवधन्यरामजी खोजरे,
मु. पांढरी (गायमुख) पो. बेलोना,
ता. नरखेड, जि. नागपूर.

श्री. सुरेश गिरधरलाल सुर्यवंशी,
मु. पांढरी (गायमुख) पो. बेलोना,
ता. नरखेड, जि. नागपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. के. एल. मोरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, नरखेड,
जि. नागपूर.

श्री. ए. एस. कुंभारे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत, गोधनी (गायमुख),
पो. बेलोना, ता. नरखेड, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.३.२००९ रोजी व दिनांक २४.६.२००९ रोजी माहिती मागितलेली दिसुन येते. सदरच्या माहितीचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १८.१.२०१० व दिनांक २७.७.२००९ ला माहिती उपलब्ध झाल्याबाबत अपीलकर्ता यांची पोच पावतीवर स्वाक्षरी असल्याचे दिसून येते. तसेच सदर प्रकरणात वाद उद्‌भवल्यास आम्ही जबाबदार राहू असे प्रथम अपीलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९.१.२०१० रोजी लेखी निवेदन दिले असल्यामुळे सदरची अपीले ही खारीज करण्यात येत आहेत.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११९०/२००९.

श्री. महेंद्र सदाशिव पांडेय,
चुडी मोहल्ला, वार्ड नं. १०,
पुलगांव, ता. देवळी, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
पुलगांव, ता. देवळी, जि. वर्धा.

जनमाहिती अधिकारी तथा
पोलीस निरिक्षक,
पोलीस स्टेशन, पुलगांव,
ता. देवळी, जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. परंतु उत्तरवादी यांनी दिनांक २०.१.२०१० रोजी सर्वपक्षीय विदर्भ बंद बदोबस्त कामी व्यस्त असल्यामुळे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी सुनावणीस हजर राहू शकत नाही असा खुलासा व कागदपत्रे पाठविली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.९.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा ठाणेदार, पोलीस ठाणे, पुलगांव यांचेकडे दिनांक ४.७.२००९ रोजीच्या अर्जाचे अनुषंगाने नोंदविण्यात आलेल्या गुन्हयाचा क्रमांक व तपशील. सेवापुस्तिकेमध्ये एकाच आरोपाकरिता दोन वेगवेगळे आदेश पारित असल्याच्या नोंदी घेऊन फसवणूकीने आर्थिकदृष्टया अडचणीत आणून आत्महत्येस प्रवृत्त करणारी बाब असल्याने गुन्हा नोंदविणेबाबत व आत्महत्येस प्रवृत्त करण्याबाबतच्या गुन्हयाची नोंद ही आत्महत्या झाल्यापूर्वी करण्यात येते की, आत्महत्या झाल्यानंतर हयाची माहिती मिळविणेबाबत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १९.१०.२००९ रोजी माहितीचे अतिरिक्त खर्चाकरिता रुपये २/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते व त्यानंतर दिनांक १.१०.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झ ाल्यामुळे त्यांनी दिनांक २६.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकर्ता यांना पुन्हा दिनांक १४.९.२००९ रोजी पोलीस निरिक्षक, पुलगांव यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरची माहिती ही मुख्याधिकारी, नगर परिषद, पुलगांव यांचे बयान घेतल्याचे दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २६.११.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना विहित मुदतीत योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या माहितीचे अवलोकन केले असता ती योग्य आहे असे दिसून येते. अपीलकर्ता यांनी मुळातच जी माहिती मागितलेली आहे व जो अर्ज केलेला आहे तो अर्ज हा गुन्हा नोंदविण्याचा असल्यामुळे त्याबाबत निर्णय उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी घेतला आहे. त्याची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. तो गुन्हा होतो की नाही, तसेच जनमाहिती अधिकारी यांचे अभिप्राय हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे तपासण्याचे अपेक्षित नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झाली आहे ती योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११८६/२००९.

श्री. रामकृष्ण जगन्नाथ जाजोदिया,
वार्ड नं. १५, महादेव मंदीर जवळ,
महादेवपूरा, ता. जि. वर्धा. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
भूमी अभिलेख,
जि. वर्धा.

श्री. एम. एम. फुलपगारे,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका निरिक्षक,
भूमी अभिलेख, जि. वर्धा. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. डी. बी. बावनकर, प्रमुख लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख, वर्धा यांचेकडे दिनांक २.५.१९९१ चा हक्क सोडण्याचा रजिस्टर्ड लेख (श्री. जगन्नाथ गोविंदराम जाजोदिया यांनी लिहून दिलेला) सन १९९१ ब्लॉक नं. ११ प्लॉट नं. १३/२ चा संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती रजिस्टर्ड टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १७.४.२००९ रोजी अतिरिक्त खर्चाचा भरणा रुपये ६/- चा भरणा करुन नक्कल घेऊन जावे असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.११.२००९ रोजी सदरची माहिती मागितली व त्यासंदर्भात अपीलकर्ता यांना दिनांक १६.१२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तत्पुर्वी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील सुध्दा दाखल केले. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.	द्वितीय अपील मेमोमध्ये अपीलकर्ता यांनी हक्क सोडण्याचा लेख जर अनरजिस्टर्ड असेल तर फेरफार कशी केली. आखीव पत्रिकेवर बक्षीसपत्र कां व कसे लिहिले आणि तारीख २३.१२.२००३ ला चुकीची नोंद घेतल्यामुळे व शेवटी ती तारीख २८.४.२००७ ला रद्द झाल्यामुळे या खोटारडया कारभाराविषयी चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर व चुकीचे काम करुन घेणाऱ्या अर्जदारावर आवश्यक कारवाई होणे बाबत. वरील प्रमाणे भुखंड १३/१(अ) महादेवपूरा, वर्धा येथील शिट क्रमांक ११ च्या खोटया दस्ताऐवजावरुन फेरफार करुन अपीलकर्त्यास शारीरिक, मानसिक व आर्थिक हानी पोहचविल्यामुळे संबंधित अधिकारी व कर्मचारी आणि खोटा दस्तऐवज सादर करणाऱ्या अर्जदारावर आवश्यक ती कायदेशीर कारवाई करणेबाबत माहिती मागितलेली आहे.

४.	जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना जी माहिती जशी आहे तशी उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यांचे म्हणणे असे आहे की, त्यामध्ये खोटे दस्ताऐवज दिले वगैरे या कारणासाठी दुरुस्ती करुन मिळावी. परंतु तशा प्रकारची दुरुस्ती करुन मिळणार नाही व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे जशी माहिती उपलब्ध असते तशी उपलब्ध करुन देता येते व तशी त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य आहे व अपीलकर्ता यांच्या द्वितीय अपील मेमोमधील विषय हा कार्यवाही करावयाची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्या संदर्भात कार्यवाही करण्याचे आदेश देणे अपेक्षित नसल्यामुळे त्यांची विनंती मान्य करता येत नाही त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे व त्यांची विनंती मान्य करण्यात येत नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२००/२००९.

श्री. योगेश्वर पांडुरंग नंदनवार,
मु. पो. अडयाळ, वार्ड नं. २,
ता. पवनी, जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. नरेश क्षिरसागर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,
ता. जि. भंडारा.

जनमाहिती अधिकारी तथा
उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,
ता. जि. भंडारा. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. माहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. जितेंद्र किसन गंगभोज हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा विभागीय प्रादेशिक परिवहन अधिकारी, भंडारा यांचेकडे प्रादेशिक परिवहन मोटार वाहतूक नियमानुसार पोलीस पब्लीक गाडी माणसे वाहून नेणारी बिना बॅजबिल्ला शिवाय चालविता येते काय याची सविस्तर माहिती देण्यात यावी. आपण गाडी चालविण्याची टेस्ट घेतली असता ज्याला गाडी चालविता येते तो पास व ज्याला चालविता येत नाही तो नापास होतो. परंतु आपण कोणत्या स्तरावर नियमानी मार्क देता येते काय याची सविस्तर माहिती देण्यात यावी. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २५.९.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे दिनांक २६.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १६.१२.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती अधिकाऱ्यास मागितलेली माहिती कार्यालयाच्या अभिलेखावर नाही. तसेच माहितीच्या अधिकारात मत देणे अपेक्षित नाही. तसेच अपीलकर्ता माहिती अधिकाऱ्या विरुध्दचा केलेला आरोप किंवा माहिती अधिकाऱ्यांना माहिती पुरवण्यास नकार दिला किंवा त्यांनी मागितलेली माहिती कार्यालयाच्या अभिलेखावर उपलब्ध आहे. परंतु जाणीवपूर्वक माहिती देण्यात येत नाही याबाबत कुठलाही पुरावा सादर करु शकला नाही. म्हणून

सदर अपील अस्विकार करुन नस्तीबध्द करण्यात येत आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलाचे सुनावणीस अपीलकर्ता यांनी त्यांच्याकडे परीक्षेमध्ये दिलेल्या गुणांचा तक्ता दाखविला आहे व त्यामध्ये त्यांच्या दोनही मुलांना नापास केलेले आहे व त्याबाबतची त्यांनी माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती ही पोलीस भरतीची आहे. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हे या कार्यालयातून परिवहन निरिक्षक हे वाहन चालकाची टेस्ट घेण्याकरिता जात असतात ती परिक्षा दिल्यानंतर दिलेले गुण हे मुळ कार्यालयाकडे उपलब्ध असतात व त्यामुळे त्याबाबतची माहिती ही त्याच कार्यालयास उपलब्ध होऊ शकते व ती अपीलकर्ता यांचेकडे उपलब्ध आहे. परंतु अपीलकर्ता यांनी जे प्रश्न विचारले आहेत त्याबाबतची माहिती ही उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात नसल्यामुळे व त्याबाबतचा कोणताही संदर्भ दिला नसल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना तसे कळविण्यात आलेले असून प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा त्याप्रमाणे दिलेला आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२०६/२००९.

श्री. मिलींद शिवाजी भगत,
४०, शिवराज नगर, रोड क्रमांक ६,
विश्वकर्मा नगर, पो. भगवाननगर,
नागपूर - ४४० ०२७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. श्रावण राऊत,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.६.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. आपले कार्यालयीन पत्र क्र. जिपना/शिअ/माध्य/अधि/३०२६/०५, दिनांक १४.६.२००५ महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, द्वितीय/प्रथम अपीलाचे संदर्भात तात्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्री. राजेंद्र गोधने यांनी दिनांक २१.६.२००५ ला सुनावणी आयोजित केली होती. सदर सुनावणी संबंधात १) संस्था अध्यक्ष, कै. रामचंद्रराव कामडी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, वर्धा रोड, डोंगरगांव, ता.जि. नागपूर व २) आपल्या कार्यालयांनी ज्यांना माझ्या शाळेचा मुख्याध्यापक म्हणून संबोधित केले होते ते श्री. एस. बी. देशमुख, तात्कालीन तोतया मुख्याध्यापक आणि ३) अपीलकार तथा मुख्याध्यापक (नियम ३) श्री. मिलींद शिवाजी भगत ज्याला आपल्या कार्यालयांनी सहाय्यक शिक्षक म्हणून संबोधित केले होते. येणे प्रमाणे वर्णनाचे आपल्या कार्यालयात सादर केलेल्या लेखी बयान पत्र म्हणजेच १) संस्था अध्यक्ष, २) तोतया मुख्याध्यापक (तात्कालीन) व ३) अपीलकार तथा मुख्याध्यापक यांचे लेखी बयान पत्राच्या सत्यप्रतीलिपी मिळण्याबाबत. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ७.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले व त्यानंतर प्रथम अपीलाचा निर्णय झाला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.	जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.७.२००९ रोजी माहितीच्या अधिकारात मागितलेली माहिती संदर्भात नस्तीचा शोध घेतले असता नस्ती प्राप्त झाली नाही. प्राप्त झाल्यास आपणास माहिती पुरविण्यात येईल नस्तीचा शोध घेणे सुरु आहे. असे उत्तर यु.पी.सी.ने दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलामध्ये सदरचे पत्र मिळाल्याचा उल्लेख केलेला दिसून येत नाही. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये सुनावणी दिनांक ७.९.२००९ रोजी ठेवण्यात आली होती व त्याबाबत पत्र दिनांक २.९.२००९ रोजी देण्यात आले होते व अपीलकर्ता हे सुनावणीस हजर राहिले नाही याकारणास्तव प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आलेला नाही. अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे सदरचे पत्र त्यांना मिळाले किंवा नाही याबद्यलची कोणतीही माहिती मिळू शकत नाही. मात्र माहिती उपलब्ध करुन न देण्याचा प्रयत्न आहे असे दिसून येते. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, आता नस्ती उपलब्ध झाली आहे व त्यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक २४.६.२००९ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास व अर्जदाराने तक्रार केल्यास जनमाहिती अधिकारी हे रुपये २५०००/- शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२०३/२००९.

श्री. भुषण महादेवराव पाटील,
२५, करीम ले आऊट, गोपाल नगर,
नागपूर - ४४० ०२२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. राजेश कुळकर्णी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. सलामपुरे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक, (पंचायत)
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.१.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.९.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा शिवकालीन पाणी साठवण योजना, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे ग्राम पंचायत मार्फत गावात विकासाची कामे केल्यास त्या निधीतून ग्रामपंचायत मधल्या सामान्य फंडात ५% रक्कम घेण्यात येते. ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार पंचायत राजच्या लोकसभातून राबविलेल्या मागणी आधारीत शिवकालीन पाणी साठवण योजनाच्या निधीतून ग्रामसचिव ग्रामपंचायतच्या सामान्य फंडात ५% निधी कापू शकतो का ? उत्तर होय किंवा नाही असल्यास त्याचे कारण अपेक्षित आहे. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी ही दिनांक ३०.११.२००९ रोजी घेण्यात आलेली दिसून येते. त्यामध्ये चर्चा झाल्याप्रमाणे ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे शासन आदेश क्र. झेड्पीए-२०००/प्र.क्र.१८/३३, दिनांक १९.१.२००९ तसेच पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे शासन परिपत्रक ग्रापापु-१००४/प्र.क्र.२४/पापु-०७, दिनांक २५.५.२००४ अन्वये शिवकालीन साठवण योजना, भारत निर्माण योजना, ग्रामपंचायतीमध्ये राबवितांनी ग्रामपंचायतने उपरोक्त शासन निर्णयान्वये ५% कपात करावी किंवा कसे याबाबत मार्गदर्शन करण्याकरिता शासनाला कळवावे असे ठरले. तसेच चर्चेनुसार शासन आदेश दिनांक १९.१.२००९ चे अनुषंगाने श्री. पाटील यांना कळविण्यात येणारे पत्र स्वाक्षरीस सादर. तसेच शासनास मार्गदर्शन मागविण्यात टिप्पणी मान्यतेस सादर. अशा प्रकारची टिप्पणी व

आदेश केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, त्यांना दिनांक १५.१०.२००९ रोजी माहिती व शासन निर्णय उपलब्ध करुन दिलेले आहेत. त्यानंतर पुन्हा दिनांक २०.११.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना दिनांक १५.१०.२००९ ची माहिती उपलब्ध झाली नाही. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी जावक वहीतील माहिती पाठविल्याची नोंद आयोगाचे निदर्शनास आणले. तसेच सदरचा अर्ज त्यांच्या कार्यालयामध्ये दिनांक १६.९.२००९ रोजी प्राप्त झाला असल्यामुळे मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे सांगितले. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना ती माहिती उपलब्ध झाली नाही. परंतु कोणत्याही प्राधिकरणाने त्यांच्या कार्यालयातील योग्य ती कार्यवाही करुन माहिती ही पोस्टाने पाठविली असल्यामुळे त्यांची कार्यवाही पूर्ण झालेली आहे असे समजण्यात येते. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. त्याप्रमाणे त्यांना माहिती दिली नाही व प्रथम अपीलाची नोटिस रजिस्टर पोस्टाने पाठविली आहे. त्यामुळे माहिती सुध्दा त्यांनी रजिस्टर पोस्टाने पाठविणे आवश्यक होते. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १५.१०.२००९ रोजी जी माहिती पाठविली आहे त्यामध्ये माहिती ही दस्तऐवज, अभिलेख, टिप्पणी, उतारे इत्यादी प्रमाणित प्रती घेणे अशा स्वरुपात माहिती उपलब्ध करुन द्यावयाची असते व त्यामुळे त्यांना शासन परिपत्रकाची प्रत दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही जनमाहिती अधिकारी यांचे मत मागितलेले आहे व ते अधिनियमाचे तरतुदी प्रमाणे अपेक्षित नाही. अधिनियमाचे कलम २(च) प्रमाणे "माहिती" या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये सार्वजनिक प्राधिकरणात साहित्याचे स्वरुपात उदा.:- अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश इत्यादी स्वरुपात जी माहिती उपलब्ध असेल त्याची छायांकित प्रत उपलब्ध करुन घेणे असा माहितीचा अधिकार आहे व त्यामुळे मुळातच अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही वरील व्याख्येप्रमाणे नाही. ती जनमाहिती अधिकारी यांना नाकारता आली असती. परंतु तरीसुध्दा त्यांनी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे शासन परिपत्रक त्यांना पाठविले आहे. तसेच दिनांक २०.११.२००९ रोजी पुन्हा शासन निर्णय त्यांना पाठविल्याचा उल्लेख आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, आम्ही त्यांना माहिती नाकारण्याचा प्रश्न नव्हता. उलट त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीची माहिती आहे असे दिसून येत नाही. त्यांनी प्रथम अपीलाची सुनावणी सुध्दा योग्यरितीने घेतली नाही. सुनावणी घेऊन कारणमिमांसा देणारा निर्णय द्यावयाचा असतो जेणे करुन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावयाचे असते त्याबद्यलची त्यांना कोणतीही माहिती आहे असे दिसून येत नाही. अर्धन्यायिक अधिकारामध्ये टिप्पणी करुन निर्णय देता येत नाही याची माहिती प्रथम अपीलीय अधिकारी यांनी करुन घेणे आवश्यक आहे व अर्धन्यायीक तत्वाप्रमाणे चर्चा करुन ठरविता येत नाही. स्पष्टपणे निर्णय देणे आवश्यक असते. असे असले तरी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी शासनाचे मार्गदर्शन मागितलेले आहे ते मार्गदर्शन उपलब्ध झाल्यावर अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. जनमाहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अर्ज आल्यानंतर कशा प्रकारे माहिती उपलब्ध करुन द्यावयाची असते ही प्रक्रिया जाणून घेणे आवश्यक आहे. मात्र अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांना शासनाचे मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर रजिस्टर पोस्टाने विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता  व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११९९/२००९.

श्री. सतिश रामकृष्ण धाबेकर,
क्वा. नं. ५/८४, छोटा ताजबाग जवळ,
रघुजीनगर, नागपूर - ४४० ०२४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. ए. भूरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कं. मर्या.
(सं. व सु. विभाग), ता. आलापल्ली,
जि. गडचिरोली.

श्री. डब्ल्यू. यु. नगराळे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कं. मर्या.
(सं. व सु. विभाग), ता. आलापल्ली,
जि. गडचिरोली. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.६.२००९ रोजी माहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य यिज वितरण कं. मर्या. (सं. व सु. विभाग) आलापल्ली यांचेकडे एकूण ६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांना उपरोक्त अपील अर्जात मागितलेली

.

.. २

माहिती दिनांक २७.१.२०१० किंवा दिनांक २८.१.२०१० रोजी उपलब्ध करुन देण्याबाबत आश्वासन दिले असल्यामुळे माझी याबाबत कसलीही तक्रार नाही. त्यामुळे मी अपील मागे घेत आहे असे लेखी निवेदन सादर केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२१६/अम/२००९.

श्री. रियाजोद्दीन जहिरोद्दीन,
अगर बेस, जुना शहर,
ता. जि. अकोला. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिक्रमण विभाग,
महानगरपालिका, अकोला.

जनमाहिती अधिकारी तथा
अतिक्रमण विभाग,
महानगरपालिका, अकोला. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २७.१.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २७.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे विना अनुमती गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१०.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी अतिक्रमण कार्यालय, महानगरपालिका, अकोला यांचेकडे लोकशाही दिवसमध्ये अनेकदा तक्रार दिल्यानंतर कार्यवाही कुठ पर्यंत आली. दिनांक ४.९.२००६ व दिनांक ४.१२.२००६ जिल्हाधिकारी कार्यालय. दिनांक ३.३.२००८ व दिनांक ७.४.२००८ महानगरपालिका यांचेकडील लोकशाही दिन. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय झाला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी अपील मेमोमध्ये ४ वेळा लोकशाहीदिनात तक्रार दिली असता कार्यवाही कां झाली नाही याबाबतची अद्याप पर्यंत त्यांना माहिती मिळाली नाही असे त्यांनी नमुद केले आहे. अपीलाचे सुनावणीची नोटीस दिनांक ८.१.२०१० रोजी आयोगाचे कार्यालयातून निर्गमित करण्यात आली असून सुध्दा आज अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर नाहीत. असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही असा निष्कर्ष त्यांचे अपील मुद्यांवरुन काढावा लागतो व त्यात ज्या जनमाहिती अधिकारी यांचेकडे अर्ज केलेला आहे ते दोषी आढळून येतात. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची कोणतीही दखल घेतली नसल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमांच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र. १५४/०७/०६, दिनांक ३१ मार्च,

२००८ तसेच दिनांक १२.१२.२००७ चे परिपत्रकाचे उल्लंघन केलेले दिसून येते व त्यामुळे त्यांचे विरुध्द सुध्दा प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक झाले आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक १६.१०.२००८ च्या अर्जात मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक १६.१०.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे संबंधित जनमाहिती अधिकारी, महानगरपालिका, अकोला हे दोषी आढळून येतात व अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे त्यांचे विरुध्द रुपये २५०००/- शास्ती कां लादण्यात येऊ नये याचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत आयोगाचे कार्यालयास करावा. अन्यथा रुपये २५०००/- शास्ती कायम होईल व त्या शास्तीची वसूली आयुक्त, महानगरपालिका, अकोला यांनी वसुल करुन ००७०- इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावे. सदरची शास्ती ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करण्यात यावी.

३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला नसल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द आयुक्त, महानगरपालिका, अकोला यांनी योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत आयुक्त, महानगरपालिका, अकोला यांचेकडे स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पोस्टाने पाठविण्यात यावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२१२/अम/२००९.

कु. भाग्यश्री अरविंदराव देशपांडे,
अधिव्याख्याता,
डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय,
मोर्शी रोड, ता. जि. अमरावती. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,
श्री शिवाजी शिक्षण संस्था,
डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय,
मोर्शी रोड, ता. जि. अमरावती.

जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
श्री शिवाजी शिक्षण संस्था,
डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय,
मोर्शी रोड, ता. जि. अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २७.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक १२.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २७.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे विना अनुमती गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक २१.८.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा सचिव, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांचेकडे आपले पत्र जा. क्र. शि. उच्च शिक्षण/८/२३०३/२००७, दिनांक ५.१०.२००७ मध्ये नमुद केल्यानुसार मी स्वतः इतर प्राध्यापकांना सारखे निर्देश देत असल्याबाबत आपणाकडे उपलब्ध असलेले पुरावे, पुराव्यांबाबत तपशीलवार माहिती संबंधित दस्तऐवजांच्या साक्षांकित प्रती इत्यादी. मा. प्राचार्य, डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती यांनी आपणाकडे पाठविलेला अहवाल जावक क्र. ५१४/२००७, दिनांक ६.८.२००७ नमुद केल्यानुसार मी इतर प्राध्यापकांना दमदाटी करुन निर्देश देत असल्याबाबत प्राचार्यांनी आपणाकडे सादर केलेले पुरावे, पुराव्याबाबत तपशीलवार माहिती. संबंधित दस्तऐवजांच्या साक्षांकित प्रती इत्यादी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केले आहे. परंतु सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ती यांनी अध्यक्ष तथा अपीलीय अधिकारी मार्फत प्राचार्य, डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती यांचेकडे दिनांक १४.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ती व उत्तरवादी गैरहजर आहेत. आयोगाचे कार्यालयातून दिनांक ८.१.२०१० रोजी सुनावणीची नोटीस काढण्यात आली आहे. मात्र अपीलकर्ती यांनी त्यांच्या द्वितीय अपील मेमोमध्ये मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही. आदेश प्राप्त झाला नाही असे अपील करण्याचे कारण दिलेले आहे. त्यामुळे सदरचे अपील हे सुनावणीस घेण्यात आले. उत्तरवादी यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा दाखल केलेला नाही. अपीलकर्ती यांना दिनांक २१.८.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे संस्थेचे सचिव हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही व त्यामुळे त्यांनी शासनाचे परिपत्रकाचे व अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे. सदरची संस्था ही शासकीय संस्था आहे असे दिसून येते. शासनाचे अनुदान असल्यामुळे संस्थेने माहिती उपलब्ध करुन दिली नाही या कारणासाठी सहसंचालक (उच्च शिक्षण), अमरावती विभाग, अमरावती यांनी प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक ठरते. त्याकरिता अपीलकर्ती यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक २१.८.२००८ च्या अर्जात मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी तथा सचिव, श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती हे रुपये २५०००/- शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२१४/अम/२००९.

श्री. संजय गोविंदराव इंगळे,
मंगरुळपीर, मेनरोड,
जि. वाशिम. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. असनारे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपअधिक्षक अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,
ता. जि. अकोला.

श्री. चौधरी,
जनमाहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग,
मंगरुळपीर, जि. वाशिम. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २७.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २७.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१०.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जीवन प्राधिकरण अधिकारी, मंगरुळपीर यांचेकडे जीवन प्राधिकरण विभाग ता. मंगरुळपीर, कारंजा, मानोरा अंतर्गत एकूण ८ मुद्यांची माहितीचे निरिक्षण व आवश्यक नक्कल मिळणेबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ११.५.२००९ रोजी अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग, मंगरुळपीर यांना माझ्या अर्जानुसार आपल्या कार्यालयामार्फत मला वरील सर्व माहिती निरिक्षणास उपलब्ध करुन दिली असून ती माहिती मी पाहिली व त्याबाबत माझे संपूर्ण समाधान झाले आहे असे लेखी निवेदन दिलेले आहे. तसेच जनमाहिती अधिकारी खुलाशामध्ये यानंतर सदर प्रकरणात काही अडचण उद्‌भवल्यास आम्ही जबाबदार आहोत असे लेखी निवेदन दिले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२१५/अम/२००९.

श्री. विलास बळवंत कुऱ्हेकर,
जुने शहर, डाबकी रोड,
श्रीवास्तव बिल्डींग, ता. जि. अकोला. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, वाशिम.

श्री. डॉ. एस. व्ही. मेहकरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, वाशिम. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २७.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २७.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.७.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडे श्री. कुऱ्हेकर, परिचर, प्राथमिक आरोग्य केंद्र, अनसिंग, पंचायत समिती, वाशिम हे कार्यालयीन कामावरुन गैरहजर असल्याबाबतचा कालावधी व कारण आणि पुर्ववत कामावर रुजू होणेबाबत, अशी माहिती मागितलेली दिसते. अर्जदारावर अनधिकृत गैरहजर असल्याबाबत झालेल्या कार्यालयीन कार्यवाहीबाबतचा तपशील. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३०.७.२००८ रोजी एकूण १४ प्रतीमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ९.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे अनुषंगाने प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ४.९.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते व त्यानंतर अपीलकर्ता यांना दिनांक ५.९.२००८ रोजी पत्र दिलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपील मेमोमध्ये माहिती उपलब्ध झाली नाही असेही कारण दिलेले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. "श्री. विलास बळवंत कुऱ्हेकर, रा. अकोला हे दिनांक ४.६.२००८ व दिनांक ४.७.२००८ नुसार माहितीच्या अधिकाराखाली मागितलेली माहिती दिनांक ३०.७.२००८ ला जावक क्रमांक ११२ नुसार व दिनांक

८.८.२००८ ला जावक क्रमांक १२१ नुसार मागितलेली माहिती पोस्टाद्वारे (रजिस्टर्ड) पाठविण्यात आली असून सदर माहिती पाठविल्याची पोस्टाची पावती व त्यांना मिळालेली पोच पावती सोबत जोडलेली आहे. सदर्हु कर्मचारी दिनांक २१.९.१९९१ ला प्राथमिक आरोग्य केंद्र, अनसिंग, ता. जि. वाशिम येथे परिचर या पदावर रुजू झाला. त्यावेळी अकोला जिल्हा कार्यान्वित होता. त्यानंतर सदर्हु कर्मचारी सुरुवातीपासूनच गैरहजर रहात होते. रुजू झाल्यानंतर केवळ ७५ दिवस उपस्थिती होती. वरील ७५ दिवसांची उपस्थिती सुध्दा सलग नसून दिनांक २१.९.१९९१ ते २८.२.१९९३ या दिड वर्षाच्या कालावधीमध्ये पूर्ण केली. यावरुन यांची सेवा अनियमित होती हे दिसते. त्यानंतर आजपर्यंत ते कोणत्याही प्रकारचा अर्ज न देता किंवा पुर्व परवानगी न घेता सतत १६ वर्षापासून गैरहजर आहेत. त्यांची सर्व रजा बिनपगारी केल्याची नोंदी हया त्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात आलेल्या आहेत. सदर्हु कर्मचारी हा २००५ पासून प्रत्यक्ष न भेटता पोस्टाद्वारे प्रत्येकवेळी वारंवार हीच हीच माहिती माहितीच्या अधिकाराखाली मागतात. याकरिता कोणत्याही प्रकारची शासकीय फी न भरता ही मागणी करत असतात. आता पर्यंत त्यांना हीच माहिती ८ वेळा पुरविली आहे. ती सहपत्रामध्ये सोबत जोडलेली आहे. सदर्हु कर्मचारी सतत १६ वर्षापासून गैरहजर असल्यामुळे आतापर्यंत केवळ सहानुभूती म्हणून व स्वातंत्र सैनिकाचा मुलगा या नात्याने विभागाने त्यांच्यावरील कार्यवाही विचाराधीन ठेवलेली आहे. यात या कर्मचाऱ्यांचा अधिकारी व कर्मचाऱ्यांना फक्त मानसिक त्रास देण्याचाच हेतु दिसत आहे. करिता मा. महोदय यांनी वरील तक्रार खारीज करावी ही विनंती." यावरुन अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे व्यापक जनहित दिसून येत नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२२३/अम/२००९.

श्री. बाळाभाऊ शंकरराव देशमुख,
रा. रंभापूर, पो. वाई (माना),
ता. मुर्तीजापूर, जि. अकोला. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
लघुसिंचन विभाग,
जिल्हा परिषद, अकोला.

जनमाहिती अधिकारी तथा
उपअभियंता,
लघुसिंचन उपविभाग,
जिल्हा परिषद, अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २८.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व माहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. एम. बी. काळे, शाखा अभियंता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. एस. पी. चक्रनारायण हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.८.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघु सिंचन विभाग, जिल्हा परिषद, अकोला यांचेकडे गांव तळयासाठी जे.सी.पी. व टॅक्टरने माझे शेत गट नं. ९४ रंभापूर मधून काळीमाती खोदून नेल्याबाबत. सन १९९८-९९ पासून आजपर्यंत. वरील खोदकामा संबंधात जे.सी.पी.ने केलेली कामे ज्या मापन पुस्तकांत एम.बी. नोंदलेली आहेत त्या पृष्ठांच्या प्रतिलिपी एफ. व एफ.बील व पेमेंट शिट इत्यादीच्या प्रतिलिपी प्रमाणित करुन द्याव्यात व जबाबदार अधिकाऱ्यांची नांवे द्यावीत. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे दिनांक ११.१२.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झ ाालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही व प्रथम अपीलानंतर जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे ती माहिती त्यांनी मागितली नव्हती. तसेच अपीलकर्ता यांनी सांगितले की, सन १९९८-९९ मध्ये संपूर्ण तलावाचे काम पूर्ण झाले आहे. याबाबत विभागीय आयुक्त, अमरावती यांचे कार्यालयातूनच माहिती त्यांनी

मागितलेली आहे असे असुन सुध्दा त्यांनी मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली जात नाही. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, तलावाच्या व अपीलकर्ता यांच्या शेतीचा काहीही संबंध नाही. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देता येत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा आपली जबाबदारी पारपाडली नाही व अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे. त्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांनी काय माहिती मागितली व त्यांना ती उपलब्ध होऊ शकते किंवा नाही याबद्यलची कोणतीही चौकशी केली जात नाही व माहिती ३ दिवसात देऊन टाकावे अशा प्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश दिले जातात व अपीलकर्ता यांना विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांनी गावतलावाचे काम सन १९९८-९९ मध्ये पूर्ण झाले आहे असे जे कळविण्यात आलेले आहे ते गाव तलावाचे संबंधाने उपलब्ध झालेली नाही. अपीलकर्ता यांना सन १९९८-९९ पासूनची पूर्वी पासूनची माहिती तसेच संबंधित अधिकाऱ्यांचे नांव व टॅक्टर ट्रॉलीने वाहतूक केली असल्यास त्याबद्यल ही संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना गाव तलावाचे काम केल्याची (सन १९९८-९९ व तत्पुर्वीचे) अधिकाऱ्यांची नांवे, तसेच एम.बी. व इतर देयके, टॅक्टर किंवा ट्रॉलीची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२२५/अम/२००९ व अपील क्रमांक १२२६/अम/२००९.

श्री. रविंद्र दुर्योधन मेश्राम,
रा. नारगावंडी, पो. वाढोणा (गा.)
ता. धामनगांव रेल्वे, जि. अमरावती.

श्री. हरीदास चंद्रभान कुमरे,
रा. नारगावंडी, पो. वाढोणा (गा.)
ता. धामनगांव रेल्वे, जि. अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. ए. तट्टे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, धामणगांव रेल्वे,
जि. अमरावती.

श्रीमती एल. आर. ढोक,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत, नारगावंडी (भिल्ली),
ता. धामणगांव रेल्वे, जि. अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.१.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २८.१.२०१० रोजी घेण्यात आली. दोन्ही अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. दोनही अपीलकर्ता यांनी शासकीय माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, नारगावंडी (भिल्ली) यांचेकडे दिनांक ३.११.२००८ रोजी नारगावंडी ग्रामपंचायत यशवंत लोकवर्गणी कडून कोणते काम केले ती माहिती. तसेच सन १९९६-१९९७ व सन १९९७-१९९८ मध्ये नारगावंडी येथे किती इंदिरा आवास मंजूर झाले त्या संबंधातील संपूर्ण माहिती मागितलेली दिसून येते. दोनही अर्जाचे अनुषंगाने दिनांक १२.११.२००८ व दिनांक १३.११.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला. ग्रामपंचायत शिपाई माहिती देण्यास गेले परंतु दोनही अपीलकर्ता यांनी माहिती घेतली नाही. परंतु दिनांक ८.१२.२००८ रोजी व दिनांक २२.१२.२००८ रोजी दोन प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ६.१.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यात अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली असून त्याबाबत पाहणी करुन आमचे समाधान झाले असे लेखी दिलेले आहे असे असले तरी राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

३.  अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये खोटी माहिती दिली.  प्रश्न क्र. २ प्रमाणे माहिती दिली नाही.  प्रश्न क्र. ४ प्रमाणे खोटी माहिती दिली अशा प्रकारचे कारण दिलेले आहे.  परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दोनही अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती आम्हास प्राप्त झाली असून पाहणी करुन समाधान झाले आहे असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरची दोनही अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना दोनही अपीलात माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरची दोनही अपीले खारीज करण्यात येतात.

२) अपीलकर्ता  व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२१९/अम/२००९.

श्री. गजेंद्र गुलाबराव सपकाळ,
रा. पळसखेड (सप.), पो. डोंगरशेवली,
ता. चिखली, जि. बुलढाणा. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
चिखली, जि. बुलढाणा.

श्री. सचिन ल. शेनाळ,
जनमाहिती अधिकारी तथा
निरीक्षण अधिकारी तथा नायब तहसीलदार,
ता. चिखली, जि. बुलढाणा. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.१.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २८.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.९.२००८ रोजी माहिती अधिकारी, अन्न पुरवठा विभाग, तहसील कार्यालय, चिखली यांचेकडे धोडप येथील रास्तभाव दुकानदार व केरोसीन विक्रेता यांची २००५, २००६ व २००७ या ३ वर्षाची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१.२००९ रोजी मी मागितलेली सर्व माहिती मिळाली. मला तीन वर्षाच्या स्टॉक बुक, विक्री रजिस्टर, पावत्या यांच्या झेरॉक्स प्रती मिळाल्या आहेत. त्यामुळे मला आणखी माहितीची आवश्यकता नाही. मी दिनांक२५.९.२००९ रोजी आपणाकडे दाखल केलेला अपील अर्ज खारीज करण्यात यावा ही विनंती असे निवेदन माहिती आयुक्त यांना सादर केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२२४/अम/२००९.

श्री. सचिन मारोतराव सराड तर्फे मारोतराव सराड,
यशोदानगर नं. २, पहिली गल्ली,
ता. जि. अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी,
महानगरपालिका, अमरावती.

सौ. सविता चक्रपाणी,
जनमाहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी,
महानगरपालिका, अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.१.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २८.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१२.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, अमरावती यांचेकडे प्राथमिक शिक्षण सेवकांच्या दिलेल्या जाहिरातीनुसार एकूण ५ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयुक्त, नागपूर यांचेकडे निवेदन सादर केलेले आहे. त्यात विलंबाने दिनांक १६.१२.२००९ ला शिक्षण सेवक पदाचा नियुक्ती आदेश मिळाल्याने केलेले वरील अपील खारीज करण्याची विनंती असल्यामुळे व जनमाहिती

अधिकारी यांनी अपीलाबाबत काही आक्षेप असल्यास त्याअनुषंगाने संबंधित माहिती देण्यास (पुरविण्यास)

कार्यालय जबादार राहिल. असा लेखी खुलासा आयुक्तांना सादर केला असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२३१/अम/२००९, अपील क्रमांक १२३२/अम/२००९, अपील क्रमांक १२३३/अम/२००९, अपील क्रमांक १२३४/अम/२००९ व अपील क्रमांक १२३५/अम/२००९.**

श्री. गजानन किसनराव भडके,
साईश्रध्दा, गजानननगर, पिंपळगांव,
ता. जि. यवतमाळ. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, यवतमाळ,
जि. यवतमाळ.

श्री. विनोद बी. मोरे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्रामपंचायत, पिंपळगांव,
ता. जि. यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.१.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये पाच द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या पाचही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २९.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी वरील सर्व अपीलामध्ये दिनांक १३.८.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, पिंपळगांव, पंचायत समिती, यवतमाळ यांना १) ग्राम पंचायत, पिंपळगांव, वार्ड क्रमांक ३ मधील शेंद्रे यांचे घरापासून नाल्यातील बेकाम विहिरीपर्यंत जे नालीचे बांधकाम चालू आहे त्याचे इस्टीमेट, तांत्रिक

.. २

मंजूरी आदेश, कोणत्या फंडातून काम मंजूर आहे त्याबाबत मंजूरी आदेश/ ठरावाची सत्यप्रत व आतापर्यंत एकूण किती खर्च करण्यात आला त्याबाबत चेक क्र. दिनांक, व्हाऊचरच्या प्रती. २) आर्थिक वर्ष २००८-०९ चे अंदाजपत्रक मंजूर आहे काय ? मंजूर असल्यास/नसल्यास त्याची प्रमाणित प्रत. ग्रामसभेच्या ठरावाची प्रत. तसेच या आर्थिक वर्षात ग्रामपंचायतला विविध खातेनिहाय मिळालेल्या अनुदानाबाबतची माहिती चेक क्र., रक्कम, दिनांक, सदर चेक कोणत्या खात्यात जमा केला त्याची खाते उताऱ्याची प्रत, सामान्य फंडाचे खाते उताऱ्याची उपरोक्त कालावधीची सत्यप्रत. ३) संबंधित कालावधीत ग्रामपंचायत, पिंपळगांव मध्ये नमुना ७, नमुना १०, पाणीकर, बांधकाम परवानगी फी इत्यादी माध्यमातून तसेच विविध शासकीय अनुदानाचे मार्गाने एकूण किती रक्कम जमा झ ाली ? त्याचे सविस्तर विवरण तसेच ग्रामपंचायतने केलेला खर्च, त्याची बिले, व्हाऊचरच्या प्रमाणित प्रती, खर्चासाठी मंजूरीच्या ठरावाच्या प्रती व संबंधित कालावधीतील कॅशबुकच्या प्रमाणित प्रती. ४) दिनांक १३.६.२००८ च्या राजीनामा सभेनंतर ग्रामपंचायतची रचना पूर्ण आहे काय ? जर पूर्ण होत नसेल तर अल्पमतातील सरपंच/सचिवास काम करण्याचा अधिकार आहे काय ? व कोणत्या नियमानुसार त्या विभागाची प्रमाणित सत्यप्रत सध्या जी विकास कामे चालू आहेत त्याबाबत कोणी मंजूरी दिली त्या मंजूरी आदेशाची सत्यप्रत. सदस्य संख्या ५०% च्या खाली गेल्यामुळे पाठविलेल्या सचिवाच्या अहवालाची सत्यप्रत व कोणकोणती कामे व कुठे चालू आहेत त्याचे विवरण. ५) सप्टेंबर २००५ ते आजपर्यंत ग्रामपंचायत मधील निरुपयोगी (भंगार) मालमत्ता जमा झाली होती त्याची स्टॉक रजिस्टरची झेरॉक्स. आतापर्यंत एकूण किती रुपयांची भंगार मालमत्ता विकली त्याबाबत ठरावाच्या सत्यप्रती. भंगार विक्रीबाबत कोणत्या वृत्तपत्रात जाहिरात दिली त्याच्या बिलप्रती. किती जणानी निविदा भरल्या होत्या त्याच्या प्रती व किती व कोणता माल विकला त्याच्या प्रती. अशी माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद करुन मागितलेली आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २९.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २२.१०.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना ३ दिवसांचे आंत माहिती पुरविण्याबाबत आदेश देण्यात आले असे दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती मिळाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १२.१०.२००९ रोजी माहिती देण्याचे पत्र दिलेले दिसून येते. परंतु त्यांना आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती दिलेली नाही. व्यक्तिशः माहिती मागितली व त्याकरिता प्रत्येक वेळेस कार्यालयात माहिती घेण्याकरिता गेलो असता तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा सचिव हे केंव्हाही कार्यालयात उपलब्ध नव्हते. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २२.१०.२००८ रोजी विस्तार अधिकारी, पंचायत समिती, यवतमाळ यांचे कार्यालयात ठेवण्यात आली होती. परंतु त्या दिवशी जनमाहिती अधिकारी हे सुनावणीस हजर झाले नाही. त्यामुळे सुनावणी झाली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २२.१०.२००८ रोजी सुनावणी ठेवली परंतु तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे सुनावणीस हजर झाले नाही व प्रत्यक्ष ग्रामपंचायत पिंपळगांव येथील कर्मचारी यांना माहिती घेऊन अर्जदाराकडे पाठविले असल्यास अर्जदारानी माहिती घेण्यास नकार दिला अशा प्रकारचा खुलासा हा आयोगाकडे दिशाभूल करणारा दिलेला आहे. प्रथम अपीलाचे सुनावणीस जनमाहिती अधिकारी यांनी हजर राहावयाचे नाही व विस्तार अधिकारी यांचे आदेश पाळावयाचे नाही व त्याच दिवशी माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करावा हे अनाकलनीय आहे व त्यामुळे या सर्व अपीलाचे माध्यमातून अपीलकर्ता यांना सर्व अर्जाचे माध्यमातून कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही. आयोगाचे समोर आज विद्यमान माहिती अधिकारी तथा सचिव हे हजर आहेत. परंतु ते एक महिन्याचे पूर्वीच सचिव म्हणून त्या कार्यालयात रुजू झाले आहेत. विस्तार अधिकारी यांनी सांगितले की, तत्कालीन सचिव श्री. विजय मोरे हे निलंबित झालेले आहेत व यावरुन तत्कालीन सचिव तथा माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे हे निर्विवाद सिध्द होते व त्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, पिंपळगांव हे दोषी आढळून येतात व अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शास्तीस पात्र आहेत अशी आयोगाची खात्री झालेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांची सर्व अपीले ही मंजूर करण्यास पात्र आहेत.

# **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १२३१/अम/२००९, अपील क्रमांक १२३२/अम/२००९, अपील क्रमांक १२३३/अम/२००९, अपील क्रमांक १२३४/अम/२००९ व अपील क्रमांक १२३५/अम/२००९ ही मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, पिंपळगांव यांनी १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक १३.८.२००८ च्या ५ अर्जाप्रमाणे संपूर्ण माहिती विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) सदर माहिती उपलब्ध करुन देण्याचा खर्च हा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, यवतमाळ यांनी तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री. विजय मोरे यांचेकडून वसूल करावा व विद्यमान सचिव यांचेकडे भरणा करावा.

३) अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, पिंपळगांव यांचेशी संपर्क साधून सदरची माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

४) तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक १३.८.२००८ च्या ५ अर्जाचे अनुसार विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही. तसेच प्रथम अपीलाचे निर्णयानंतर माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून ते दोषी आढळून येतात. त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

५) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांनी करावयाची असल्यामुळे त्यांचेकडे स्वतंत्रपणे निर्णयाची एक प्रत पुढील कार्यवाहीसाठी पोस्टाने पाठविण्यात यावी.

६) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२३६/अम/२००९.

श्री. विठ्ठल शामराव जाधव,
स्वामी रामानंद शिक्षक कॉलनी,
घर नं. ४२, मु. शेलूद, पो. सवणा,
ता. चिखली, जि. बुलढाणा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
चिखली, जि. बुलढाणा.

जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
ता. चिखली, जि. बुलढाणा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २८.१.२०१० रोजी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार,चिखली यांचेकडे श्री रामदेव इण्डेन गॅस एजन्सी,चिखलीचे कामकाजासंबंधी सन २००२ ते २००८ या कालावधीतील एकूण २२ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. मुद्या क्रमांक २१ मध्ये तक्रार पुस्तकामध्ये नोंदलेल्या तक्रारी व त्यांचा निपटारा केल्याचा अहवाल अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती शिघ्र नोंदणीकृत टपालद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २५.१०.२००८ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसीलदार यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना गॅस कनेक्शन मिळत नाही व त्याकरिता त्यांनी अनेक तक्रारी केलेल्या होत्या व त्यामुळेच त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये माहिती मागितलेली आहे. जनमाहिती अधिकारी हे आज हजर नाहीत. परंतु दिनांक २८.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांनी खुलासा दाखल केलेला आहे. सदरच्या खुलाश्यामध्ये अर्जदाराचा अर्ज प्राप्त झाल्या नंतर सदरची माहिती ही इंडियन ऑईल कार्पोरेशन अंतर्गत श्री रामदेव इण्डेन गॅस एजन्सीच्या स्वतंत्र प्राधिकरणाशी संबंधित असल्यामुळे सदरची माहिती देण्याबाबत दिनांक १७.९.२००८ रोजी व्यवस्थापक, श्री रामदेव इण्डेन गॅस एजन्सी यांना माहिती देण्याबाबत पत्र देण्यात आले. परंतु श्री रामदेव इण्डेन गॅस एजन्सी, चिखली यांनी सदरची माहिती

दिली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी पुन्हा प्रथम अपील अर्ज दाखल केला. यानंतर अपीलीय अधिकारी, चिखली यांनी दिनांक ५.११.२००८ रोजी श्री. रामदेव इण्डेन गॅस एजन्सी यांना पत्र दिले. परंतु व्यवस्थापक, श्री रामदेव इण्डेन गॅस एजन्सी, चिखली यांनी माहितीचा अधिकार गॅस एजन्सीला लागू होत नाही असे कळविले व ही माहिती अपीलकर्ता यांना दिनांक १७.११.२००८ रोजी उपलब्ध करुन देण्यात आली होती. प्रथम अपीलीय अधिकारी यांना सुध्दा माहितीकरिता कंपनीशी संपर्क करावा असे श्री रामदेव इण्डेन गॅस एजन्सीनी कळविले होते. अपीलकर्ता यांनी संबंधित कंपनीचे मुख्यअधिकारी यांचे पत्र सुध्दा सादर केले व त्यापत्रात माहितीचा अधिकार हा लागू होत नाही असे दिलेले आहे. त्यामुळे अर्ज खारीज करावा. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, गॅस एजन्सीवर पुरवठा अधिकाऱ्यांचे नियंत्रण असते व गॅस एजन्सीच्या संदर्भामध्ये ज्या तक्रारी पुरवठा अधिकाऱ्याकडे दाखल केल्या जातात त्यामुळे गॅस एजन्सीकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन अपीलकर्ता यांना पुरविणे आवश्यक होते. "माहिती" या संज्ञेची व्याख्या अधिनियमाचे कलम २(च) मध्ये केलेली आहे. त्यामध्ये माहिती याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून ................आणि त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती यांचा समावेश होतो अशी तरतुद आहे. आज तहसीलदार हजर नाहीत व पुरवठा अधिकारी सुध्दा हजर नाही. परंतु वरील "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे पुरवठा अधिकारी यांनी जरी श्री रामदेव इण्डेन गॅस एजन्सी जर खाजगी प्राधिकरण असले तरी नियंत्रण असल्यास माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. तसेच पुरवठा अधिकारी यांचेकडे गॅस जोडणीच्या संदर्भामध्ये ज्या तक्रारी येतात त्या तक्रारीचे निपटाऱ्याबद्यलची माहिती सुध्दा अपीलकर्ता यांना २१(१) प्रमाणे उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी तथा पुरवठा अधिकारी, चिखली किंवा तहसीलदार, चिखली यांचेकडे गॅस एजन्सी संदर्भात शासनाचे नियमाप्रमाणे नियंत्रण असल्यास श्री रामदेव इण्डेन गॅस एजन्सी कडून मागितलेली माहिती उपलब्ध करुन घेऊन विनामुल्य पुरविण्यात यावी.

२) तसेच पुरवठा अधिकारी, चिखली यांचेकडे गॅस जोडणीच्या संदर्भामध्ये तक्रारी असल्यास त्या तक्रारीच्या निपटाऱ्याची माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२३७/अम/२००९.

श्री. श्रीराम बळीराम शिंदे,
श्री. पुंडलिक बळीराम शिंदे,
रा. शिवाजी वार्ड, वाशिम रोड,
ता. पुसद, जि. यवतमाळ - ४४५ २०४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. प्रकाश इंगोले,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद, बांधकाम विभाग क्र. १,
ता. जि. यवतमाळ.

श्री. सी. पी. कार्या,
जनमाहिती अधिकारी तथा
उपअभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्र. १,
ता. जि. यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.९.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्रमांक १, यवतमाळ यांचेकडे प्रधानमंत्री सडक योजने अंतर्गत दिनांक १.४.२००४ ते १.९.२००८ पर्यंत झालेल्या पूर्ण कामाची नामावली व इतर ७ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जदार दोन आहेत व दारिद्रय रेषेखालील आहेत असे नमुद केलेले दिसून येते. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे मागितलेली आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १५.९.२००८ रोजी अर्जा सोबत आपण दारीद्रय रेषेचे प्रमाणपत्र सन २००२ या वर्षाचे जोडलेले आहे. परंतु सन २००७-२००८ या वर्षामधील अद्ययावत दारिद्रय रेषेची पत्रिका जोडलेली नाही. आपणास निशुल्क माहिती पाहिजे असल्यास सन २००७-२००८ या वर्षामधील अद्ययावत दारिद्रय रेषेची पत्रिका जोडलेला अर्ज या कार्यालयास देण्यात यावा. आपण मागितलेली माहिती नागरिकांच्या माहिती फलकावर, प्रत्येक कामावर दर्शनी ठिकाणी लावलेली आहे व अद्ययावत माहिती प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या w.w.w.pmgsy.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक ७.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भात दिनांक २०.११.२००८ रोजी पुन्हा कार्यकारी अभियंता यांनी दोन्ही अर्जदारांना दारिद्रय रेषेखालील दाखल्याच्या

संदर्भामध्ये माहिती नागरिकांच्या माहिती फलकावर, प्रत्येक कामावर, दर्शनी ठिकाणी लावलेली आहे व वेबसाईटवर दाखविली आहे याबाबत कळविलेली दिसून येते. असे असले तरी दिनांक २६.१२.२००८ रोजी अपीलकर्ता यांना एकूण ४२० पानांची माहिती पोस्टाने उपलब्ध करुन दिलेली आहे. वास्तविक दारिद्रय रेषेखालील अद्यावत प्रमाणपत्र जोडल्याशिवाय माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नव्हती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा जसा जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना लागू आहे तसाच अर्जदारास अर्जाची पुर्तता करण्यासाठी अर्जदारास बंधनकारक आहे व जो पर्यंत अर्जदार अर्जाची पुर्तता करीत नाही तो पर्यंत माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. नोडल कार्यकारी अभियंता (प्रग्रासयो) जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्र.१, यवतमाळ यांनी आयोगाकडे खुलासा दाखल केला व त्या खुलाश्यामध्ये अपीलकर्ता यांना सदर माहिती कार्यालयामध्ये निरिक्षण करण्याचा पर्याय उपलब्ध करुन आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती देणेबाबत निर्देश आहेत. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागिलेली आहे ती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ करण्यात आलेली नाही. परंतु निशुल्क माहिती अंदाजे १८००० पानांची असल्याने यामध्ये शासकीय साधन संपत्तीचा मोठया प्रमाणात अपव्यय होऊ न देण्याच्या कारणांमुळेच अर्जदारास त्यांनी मुळ अर्जात मागितलेल्या संपूर्ण माहितीच्या संक्षिप्त गोषवारा माहितीसह ४२०
पृष्ठे देण्यात आलेली आहेत. यावरुन अपीलकर्ता यांना निरिक्षण करण्याचा पर्याय उपलब्ध करुन दिला होता.

तसेच माहिती ही वेबसाईटवर आहे व त्यांना दोनही पर्यायामधून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२४५/अम/२००९.

श्री. पुरुषोत्तम रामकिसन सारडा,
हनुमान वार्ड, मु. पो. ता. उमरखेडा,
जि. यवतमाळ - ४४५ २०६. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. पुसद, जि. यवतमाळ.

श्री. आर. एस. जाधव
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
ता. उमरखेड, जि. यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.१.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे नायब तहसीलदार श्री. मस्के हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.८.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, उमरखेड यांचेकडे उमरखेड खंड १ मधील शेत स.नं. २ चे ले आऊट ऑर्डर व नकाशा प्रमाणे काम न केलेबद्यल. माहितीचा कालावधी दिनांक १५.२.२००७ ते दिनांक ३.८.२००७ त्या अर्जात व सोबत ले आऊट व नकाशाची प्रत दिली. त्यात रेसीडेन्सियल ऑर्डर असताना जिनींग व ऑईल मिलसाठी ऑर्डर कशी व कोणी दिली ते व ती चुकीचे असल्यास ते बंद व्हावी व नकाशाप्रमाणे रस्ते खुले करुन मिळणेबाबत काय कारवाई केली. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सोबत दिनांक १५.२.२००७ च्या अर्जाची प्रत जोडण्यात आलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २७.८.२००७ रोजी अपीलकर्ता यांना जिनिंग फॅक्टरी व ऑईल मिलकरिता वापरात असलेली जागा निवासी प्रयोजनातून औद्योगिक/वाणिज्य वापराकरिता सक्षम अधिकारी यांची परवानगी घेऊन वापरात बदल करुन घेतलेला नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्याचा प्रस्ताव या कार्यालयाकडून निवासी उपविभागीय अधिकारी, पुसद यांना सादर करण्यात येईल. त्यानंतर आपणास केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती अवगत करुन देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. पुन्हा अपीलकर्ता यांनी दिनांक २०.९.२००७ रोजी दिनांक २७.८.२००७ चे उत्तराप्रमाणे शेत सर्वे नं. २, ५ एकरचे एन.ए. रहिवासी ऑर्डर व नकाशा आपणास दिला. त्यातील श्री. कोकडवारचे खरीदी खताची प्रमाणित प्रत मिळणेसाठी अर्ज केला ते अज्ञाप मिळाले नाही. माहितीचा कालावधी मागील २ वर्षापासून. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केले आहे. प्रथम अपील हे मुदती पुर्वीच दाखल केले

होते. त्याबाबत कोणताही निर्णय झालेला दिसून येत नाही. दिनांक १५.१.२००९ रोजी अर्ज दिला होता. त्या अर्जाचे अनुषंगाने पुराव्याखातर जी नकाशाची कॉपी सादर केली त्या ऐवजी नगर रचना विभागाने मंजूर केलेल्या व उपविभागीय अधिकारी, पुसद यांनी अकृषक केलेल्या मंजूर नकाशाची प्रमाणित प्रत सादर करावी. मंजूर नकाशाची प्रमाणित प्रत प्राप्त झाल्यानंतर त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल. खोटे दस्ताऐवज सादर करुन कार्यालयाची दिशाभूल करु नये. याबाबत आपणास यापूर्वी सुध्दा लेखी पत्र दिलेले आहे. त्यापूर्वी दिनांक १३.१.२००९ रोजी मौजे उमरखेड येथील शेत सर्वे नं. २ मधील ५ एकर रहिवासी ले आऊट मधील रस्ते जिनिंगवाले श्री. कोकडवार यांनी बंद करुन वापरत आहे ते खुले करुन देणेसाठी दिनांक २३.११.२००६ आपणास कळवून त्यांचे रहिवासी ले आऊटची ऑर्डर व सर्टिफाईड नकाशाची प्रत आपणास दिली. त्याप्रमाणे ते रस्ते खुले अद्याप झाले नाही. तरी आपण काय कारवाई केली त्याची माहितीबाबत आपण मागितलेली माहिती व रेकॉर्ड नगरपरिषद कार्यालयात उपलब्ध नाही. याबाबत आपणास जा.क्र. २०१९, दिनांक २८.११.२००६ अन्वये कळविले आहे. त्यामुळे माहिती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३.१०.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्त्यास माहिती पुर्वीच उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येते असा निर्णय दिलेला आहे व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता हे गैरहजर असून घरी लग्न कार्य असल्यामुळे उपस्थित राहू शकत नाही. अपीलकर्ता यांना दिनांक १५.२.२००७ रोजी तक्रार अर्ज दिला व त्या तक्रार अर्जावर काय कार्यवाही झाली त्याबद्यलची माहिती मागितलेली दिसुन येते. परंतु अपीलकर्ता यांना दिनांक ३.८.२००७ रोजी अद्याप पर्यंत तक्रार अर्जावर कोणतीही कार्यवाही झाली नाही म्हणून माहिती मागितली. परंतु त्यावेळेस सुध्दा त्यांच्या तक्रार अर्जावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही ही दिनांक २७.८.२००७ च्या तहसीलदार, उमरखेड यांचे उत्तरावरुन दिसून येते. कार्यवाही करण्याचा प्रस्ताव हा निवासी उपविभागीय अधिकारी, पुसद यांना सादर करण्यात येईल असे मात्र कळविण्यात आलेले आहे. प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये सुध्दा योग्य ती आवश्यक चौकशी केलेली नाही व माहिती उपलब्ध करुन दिली या कारणास्तव सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले आहे. आतापर्यंत त्या दिनांक १५.२.२००७ च्या अर्जावर काय कार्यवाही केली याबद्यलची माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक १५.२.२००७ च्या दिलेल्या तक्रारीवर काय कार्यवाही झाली त्याबद्यलची जी जी कागदपत्रे व पत्र व्यवहार असेल किंवा प्रस्ताव सादर झाला असेल त्या सर्वांच्या छायांकित प्रती अपीलकर्ता यांना रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२४४/अम/२००९.

श्री. रामचंद्र होतचंद हरवाणी,
रा. छत्रीतलाव रोड, नाशिककर प्लॉट,
सरस्वती विद्यालयासमोर,
ता. जि. अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक धर्मदाय आयुक्त,
ता. जि. अमरावती.

जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ता. जि. अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी यांच्या तर्फे श्री. आर. एम. वाघ, निरिक्षक हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.८.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडे श्री. पुज्य पंचायत कंवरनगर, अमरावती रजिस्ट्रेशन नं. एफ १२६४३ यांनी दिनांक ६.१.२००८ रोजी अर्जदाराची सदस्यता रद्य करण्याचे कारण व त्यासंबंधी माहिती एकूण ५ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. परंतु दिनांक ८.९.२००८ च्या पत्राप्रमाणे कारण विचारले असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) मध्ये कारण विचारण्याची तरतुद
नसल्यामुळे माहिती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १४.११.२००८ रोजी देण्यात आला असून उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी सदस्यत्व रद्य कां केले याचे कारण विचारले असल्यामुळे व अधिनियमाचे तरतुदीमध्ये एखाद्या प्रकरणात कारण विचारता येत नसल्यामुळे त्याप्रमाणे त्यांना कळवून प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा त्यांनी दिलेला आहे. जनमाहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय हा तांत्रिकदृष्टया योग्य असला तरी एखाद्या

व्यक्तिचे सदस्यत्व रद्य करतांना त्याबाबत ठराव घेतला जातो व त्या ठरावामध्ये कारणमिमांसा दिलेली असते व त्यामुळे त्या ठरावाची प्रत उपलब्ध करुन दिल्यास त्या व्यक्तिचे सदस्यत्व रद्य करणे आवश्यक असते व त्यामुळे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे योग्य दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना श्री. पुज्य पंचायत कंवरनगर, अमरावती यांनी अपीलकर्ता यांचे सदस्यत्व रद्य करतांना जे ठराव केले असल्यास त्या ठरावाच्या छायांकित प्रती रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२४१/अम/२००९ व अपील क्रमांक १२४२/अम/२००९.

श्री. भिमरावजी शिवरामजी कांडलकर,
मु. पो. गुरुकुंज आश्रम, ता. तिवसा,
जि. अमरावती. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अजय इंगळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रभारी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
ता. जि. अमरावती.

श्री. आशिश विनयप्रकाश तिवारी,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
श्री. संत सत्यदेव बाबा माध्यमिक वि. जा. भ. ज. आश्राम शाळा,
भारवाडी, ता. तिवसा, जि. अमरावती.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय समाज कल्याण अधिकारी,
ता. जि. अमरावती.

श्री. अजय इंगळे,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रभारी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
ता. जि. अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.१.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक ९.२.२००९ व दिनांक १३.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ३०.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी यांच्या वतीने श्री. इसोकार, सहाय्यक लेखाधिकारी हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक १२४१/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१०.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. संत सत्यदेव बाबा माध्यमिक वि. जा. भ. ज. आश्रम शाळा, भारवाडी यांचेकडे दिनांक २१ जून २००४ पासून ते आजपर्यंत या कालावधीतील त्यांचे संस्थेचे नियुक्ती आदेश, रुजू अहवाल, जाहिरात, आरक्षण बिंदू नामावली, संस्थेचा ठराव, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची यादी, शिक्षक हजेरी पत्रक, विद्यार्थी हजेरी पत्रक, वसतीगृह हजेरी पत्रक, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, अमरावती यांचे मान्यतेचे आदेश, शाळेतून इत्यादी सर्व कागद पत्राचा समावेश असते आवश्यक आहे तसेच सर्व प्रमाणित

प्रती मिळण्याबाबत अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३.११.२००७ रोजी समक्ष माहिती देण्यात आली व पोच घेण्यात आली. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक २१.२.२००८ रोजी निर्णय दिलेला असून श्री. कांडलकर यांचे दिनांक १७.६.२००४ चा आदेश दिनांक २१.६.२००४ चा रुजू अहवाल व दिनांक १७.६.२००४ चा ठराव संस्थेकडील शिक्षकांची यादी ही माहिती संस्थेकडून तात्काळ प्राप्त करुन घेऊन हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत अपीलार्थीस लेखी स्वरुपात कळवून प्रत्यक्ष बोलावून माहिती हस्तांतरीत करावी असे न केल्यास संबंधित संस्था प्रमुख व माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती उपलब्ध न करुन दिल्यामुळे कायद्यातील तरतुदीप्रमाणे दंडनीय कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यानंतर सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही व त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांची दिनांक १७.६.२००४ च्या नियुक्ती आदेशाची प्रत अद्यापपर्यंत दिली नाही. तसेच रुजू आदेश दिला नाही. संस्थेचा ठराव दिला नाही व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. संस्थेनी त्यांना अनुसूचित जमाती या कारणावर नियुक्ती दिली नसल्यामुळे सुध्दा तसे कारण देऊन त्यांना काढून टाकण्यात आले होते. तसेच विद्यमान मुख्याध्यापक यांना जेष्ठ दाखविण्याकरिता त्यांनी माहिती लपविण्यात येत आहे. मा. शाळा न्यायाधिकरण, अमरावती मध्ये त्यांना न्याय मळाला नाही. त्यामुळे त्या निर्णयाच्या विरुध्द मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचेकडे दाखल केलेल्या याचिके संदर्भात त्यांना दिनांक १७.६.२००४ चा नियुक्ती आदेश व दिनांक २१.६.२००४ चा रुजू अहवाल व त्याबाबतच्या ठरावाची आवश्यकता आहे. प्रथम अपीलात सुध्दा निर्णय देऊन सुध्दा ती माहिती उपलब्ध करुन दिली नाही त्यामुळे सदरची माहिती त्यांना विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे कार्यालयास मागितली होती व त्यांचे कार्यालयातून त्यांना दिनांक १७.६.२००४ चा नियुक्ती आदेश हा उपलब्ध झाला आहे. यावरुन सदरची माहिती ही मुख्याध्यापक तसेच संस्था लपविण्याचा प्रयत्न करीत आहे व आज पर्यंत त्यांना संपूर्ण अपूर्ण माहिती दिली त्याकारणास्तव त्यांनी शास्ती लादण्याची विनंती केली आहे. विभागीय समाज कल्याण अधिकारी यांनी सदरची माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध करुन दिली असे त्यांनी मान्य केले. त्यामुळेच जनमाहिती अधिकारी तसेच संस्था यांनी खोटी माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे त्यांचे विरुध्द योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच सदरची माहिती संस्थेकडून उपलब्ध होणे गरजेचे असल्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक १२४२/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, अमरावती यांचेकडे दिनांक २१.६.२००४ पासून सुरु नव्याने झालेल्या आश्रम शाळेत प्रत्यक्षात दिनांक २१.६.२००४ पासून प्रत्यक्षात कार्यरत असलेल्या शिक्षकांची नावे व शिक्षक भरतीसाठी आपल्या कार्यालयाकडून देण्यात आलेल्या पदमान्यता प्रवर्गानुसार कशा व केंव्हा दिल्या, किती पदे भरली आहेत, किती पदे शिल्लक आहे, कोणत्या शिक्षकांची मान्यता दिली, कोणत्या प्रवर्गासाठी दिली इत्यादी माहिती अपीलकर्ता यांनी मागितलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक६.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २३.१.२००९ रोजी देण्यात आला असून त्यांना १८ पृष्ठाची माहिती समक्ष देण्यात आली. तथापी अपीलार्थीने सदर माहिती अपूर्ण असल्याचे सुनावणीच्या वेळी सांगितले. त्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मा. आश्रमशाळा, भारवाडी यांचेकडे विहित नमुन्यात अर्ज करावा. जनमाहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्यास प्रथम अपीलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण

अधिकारी यांचेकडे प्रथम अपील करावे असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यानंतर दिनांक ३०.१.२००९ रोजी पुन्हा अपीलकर्ता यांना विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, अमरावती यांनी पुरक माहितीच्या प्रती उपलब्ध आहेत त्या घेऊन जाव्यात अशा प्रकारे अपीलकर्ता यांना कळवून माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १२४१/अम/२००९ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी संस्थेकडून अपीलकर्ता यांच्या दिनांक १७.६.२००४ चा नियुक्ती आदेश, दिनांक २१.६.२००४ चा रुजू अहवाल व या संदर्भातील संस्थेच्या ठरावाची छायांकित प्रती रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसेच संस्थेने किंवा मुख्याध्यापक यांनी सदरच्या प्रती उपलब्ध करुन न दिल्यास विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, अमरावती यांनी संस्थेच्या विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करुन संस्थेचे अनुदान कमी करण्याचे संदर्भामध्ये शिफारस करावी.

२) अपील क्रमांक १२४२/अम/२००९ हे खारीज करण्यात येत आहे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२३९/अम/२००९.**

श्री. श्रीराम बळीराम शिंदे,
श्री. पुंडलिक बळीराम शिंदे,
रा. शिवाजी वार्ड, वाशिम रोड,
ता. पुसद, जि. यवतमाळ - ४४५ २०४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
पुसद, जि. यवतमाळ.

श्री. एस. एम. सराफ,
जनमाहिती अधिकारी तथा
पुरवठा निरिक्षक,
तहसील कार्यालय, पुसद,
जि. यवतमाळ. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.१.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. बी. यु. नंदनवार, निरिक्षण अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.९.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा तहसीलदार, यवतमाळ यांचेकडे पुसद तहसील अंतर्गत ग्रामीण व शहरी भागात रास्तभाव व किरकोळ केरोसीन परवाना धारकांची एकूण ७ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी मागणी केलेली माहिती मला यापुर्वीच दिनांक २१.४.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी, तहसील कार्यालय, पुसद यांचेकडून मिळाली आहे. म्हणून आज रोजी मला काहीही सांगावयाचे नाही. माझे दिनांक ९.२.२००९ चा अपील अर्ज खारीज करण्यात यावा असे लेखी निवेदन दिनांक १८.१.२०१० रोजी आयोगास सादर केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ११२२/२००९

१) श्री मधुकर मारोतराव मासुरकर,
गणेशवार्ड, मु.पो.ता.साकोली,
ता.साकोली, जिल्हा भंडारा-४४१८०२. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक),
जिल्हा परिषद, भंडारा. ता.जि. भंडारा. — उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,
प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, भंडारा
ता.जिल्हा भंडारा. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १३.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक १३.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.८.२००९ रोजी त्रिस्तरीय वेतनश्रेणी नुसार त्यांना वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी मंजूर कां करण्यात आली नाही. या शासकिय आदेशाची प्रत व खुलासा मिळण्याबाबत, अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १२.८.२००९ रोजी निवड श्रेणी मंजूरी आदेशाची प्रत पाठविण्यात आली आहे. परंतु सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ११.९.२००९ रोजी देण्यात आला असून पुन्हा माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक १७ जून, २००९ च्या निवड श्रेणी मंजूरी आदेशामध्ये सविस्तर आदेश देण्यात आलेले आहेत व त्यामध्ये कोणते शिक्षक हे पात्र आहेत, याबध्दलचे विवेचन केलेले आहे. तसेच अपीलकर्ता यांना दिनांक १.२.२००९ च्या शासन निर्णयाची प्रत सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आली व त्यामध्ये संपूर्ण कार्यपध्दती देण्यात आलेली आहे. व त्यामुळे संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु दिनांक १.२.१९९० च्या निर्णयाच्या अनुषंगाने निवड श्रेणी आदेश तयार करताना ज्या ज्या शिक्षकांचा पात्रतेकरीता विचार करण्यात आलेला असेल व ज्या शिक्षकांना वगळण्यात आलेले असेल त्यांच्या संदर्भामध्ये कार्यालयीन टिपणी उपलब्ध असल्यास त्याची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना, निवड श्रेणीच्या आदेशाच्या पुर्वी झालेल्या टिपणीची छायांकित प्रत उपलब्ध असल्यास, हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ११२०/२००९

१) श्री शामदेव काशिरामजी तितरमारे,
प्लॉट नं. २७०, चंदननगर, पो.हनुमान नगर,
नागपूर-४४०००९. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
रामटेक, ता. रामटेक, जिल्हा नागपूर. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, पारशिवनी,
ता. पारशिवनी, जिल्हा नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १३.१.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक १३.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, पारशिवनी यांचे कार्यालयात, मा.जिल्हाधिकारी, नागपूर यांचे पत्र दिनांक २२.७.२००९ चे संदर्भात गैरअर्जदारावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या संदर्भात माहिती पाहिजे, अशी माहिती टपालाने घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १४.९.२००९ रोजी, माहिती मागवून अर्जदारास विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात आली. परंतु, उपलब्ध झालेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २६.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १३.११.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु, त्या निर्णयामुळेही समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, तहसिलदार, पारशिवनी यांना पोलीस अधिकारी, पारशिवनी यांनी, दिनांक १७.८.२००९ च्या पत्राप्रमाणे गुन्हा दाखल केला किंवा नाही याबद्दलची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती पोलीस स्टेशन कडून मागविण्यात आलेली आहे. तसेच पोलीस अधिकारी यांना सुध्दा प्रकरणातील संपूर्ण माहिती पुरविण्यात आलेली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी, पोलीस अधिकारी, पारशिवनी यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत, तहसिलदार पारशिवनी यांनी पोलीस अधिकारी, पारशिवनी यांचेकडून संबंधीत गैरअर्जदारावर गुन्हा दाखल झाला किंवा नाही याबद्दलची माहिती उपलब्ध करुन घेवून ती अपीलकर्ता यांना विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १११८/२००९

१) श्री प्रशांत शामकांत बागडदेव,
भुखंड क्रमांक ५३, दि पोस्टल ऑडीट कॅालनी,
राणाप्रताप नगर, नागपूर-२२. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ क्रं.१, सोनेगांव विभाग, नागपूर. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
सोनेगांव विभाग, नागपूर, ता.जि. नागपूर. उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक १३.१.२०१०)

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २६.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक १३.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१०.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सोनेगांव यांचेकडे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीमती मनीषा रावखंडे यांची दिरंगाई प्रकरणी चौकशीचे आदेश मा. संयुक्त पोलीस आयुक्त श्री बाबासाहेब कंगाले यांनी दिनांक २८ सप्टेंबर, २००७ रोजी पोलीस उपआयुक्त परिमंडळ-१ कार्यालयास दिलेले होते. त्या संदर्भात चौकशी अहवालाची प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी मुदतीपुर्वीच दिनांक २.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १८.११.२००९ रोजी सोनेगांव विभाग यांना, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे अंतर्गत अर्ज करुन माहिती प्राप्त करावी. त्या माहितीमुळे समाधान न झाल्यास आपण अपील अर्ज या कार्यालयास सादर करावा, असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ३०.११.०९ रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी हेड क्लर्क, पोलीस निरीक्षण प्रशासन यांचेकडे सदरचा अर्ज हस्तांतर केलेला दिसून येतो. दिनांक ३.१२.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर दिनांक ८.१२.०९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु, अपीलकर्ता यांनी पुन्हा मुदतीपुर्वी द्वितीय अपील सुध्दा दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही उपलब्ध होण्यापुर्वीच व अर्ज किंवा अपीलाची मुदत संपण्यापुर्वीच प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल केलेले असल्यामुळे त्यांना सदरची माहिती उपलब्ध होऊ शकली नाही असे दिसून येते. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर कोणत्या शाखेमध्ये सदरची माहिती आहे हा शोध घेण्याकरीता पत्र देण्यात आले. अंतिमतः अशा प्रकारची कोणतीही चौकशी प्रस्तावित झालेली नाही किंवा चौकशी झालेली नाही असे निष्पन्न झालेले आहे. व त्यामुळे सदरची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीमती मनीषा रावखंडे यांचे विरुध्द दिनांक २८.९.२००७ रोजी दिलेल्या चौकशी आदेशाच्या संदर्भात, चौकशी झालेली असल्यास, त्यासंबंधीची कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात यावी. व चौकशी झाली नसल्यास तसे स्पष्टपणे कळविण्यात यावे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ११४४/२००९

१) श्री दिगंबर पुंडलिकराव ठाकरे,
वेंकटगीरी, १७ गणेश कॅालनी,
प्रतापनगर चौक, रिंग रोड, नागपूर-४४००२२. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट प्रमुख,
जिल्हा सुविधा गट, जलस्वराज प्रकल्प,
जिल्हा परिषद, नागपूर. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पडताळणी व संनियंत्रण गट,
जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १४.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक १४.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हा पडताळणी व संनियंत्रण गट, जलस्वराज प्रकल्प यांचेकडे सन २००३ पासून ते अर्जाच्या तारखेपर्यंतची (१) चिमनाझरी-आपले पत्र क्रं.२७२ दिनांक १७.११.०८ नुसार पुरवठा विहिरीची तपासणी करण्याकरीता विहिरी सभोवती १ मिटर रुंद व १ मिटर खोल खडडा खोदण्यास समितीस कळविले. ते खोदकाम केल्यानंतर व आपले तपासणीनंतर समितीस कुठल्या पत्राद्वारे ते खोदकाम बुजविण्यास कळविले, आदेश दिला त्या पत्राची प्रत उपलब्ध करावी. (२) जलस्वराज कार्यक्रमांतर्गत किती ता.से. पुरवठादारांनी समितीस Bank Guarantee दिली आहे त्या ता.से. पुरवठादारांची व पा.पु.योजनांची नांवे (३) आपणास माझे पत्र दि. १७.७.०८ नुसार जलस्वराज समिती इसापूर नवे ता. कुही द्वारे मला एक मोजमाप पुस्तीका सादर करण्यांत आली ती हया पत्राद्वारे आपणांस आपले स्तरावर पुढील कार्यवाहीकरीता सादर करण्यांत आली आपण त्यावर (बनावट मोजमाप पुस्तीकेंसंबंधी) काय कार्यवाही केली त्याचा अहवाल कृपया उपलब्ध करुन देण्यात यावा. (संबंधीत पत्राची प्रत जोडण्यात आली आहे.) अशी माहिती टपालाने घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते.**

**३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ४.९.२००९ रोजी तीनही मुद्यांच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २५.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये, माहितीच्या अधिकारातील मुद्या क्रं. ३ प्रमाणे माहिती अपूर्ण प्राप्त झाली ही बाब सिध्द झाली नाही व मुद्या क्रं. ३ मध्ये मागणी केल्याप्रमाणे माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचे स्पष्ट होते, या कारणास्तव प्रथम अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**४. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले की, मुद्या क्रं. १ च्या संदर्भात आदेशच केलेले नसल्यामुळे ती देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. मुद्या क्रं. २ ची माहिती ही ग्राम पंचायतीच्या पाणी पुरवठा व स्वच्छता समितीशी संपर्क साधून उपलब्ध करुन घेता येईल व मुद्या क्रं. ३ च्या संदर्भात संपूर्ण चौकशी केली. त्यावरुन अशा प्रकारे कोणत्याही प्रकारची बनावट एम.बी. कार्यालयाकडे उपलब्ध नाही, असे चौकशी अंती निष्पन्न झालेले असल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय त्याप्रमाणे देण्यात आलेला आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा मुद्या क्रमांक ३ च्या संदर्भात केलेल्या अर्जदाराची कागदपत्रे निदर्शनास आणली. व त्यावरुन जी माहिती कार्यालयात उपलब्ध नाही व अर्जदाराने दाखल करुन त्याबाबत चौकशी करा अशी जी मागणी केलेली आहे त्याबाबत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही. त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ११४२/२००९

१) श्री दिपक हरिश्चंद्र पंचभाई,
६४५, आनंद नगर, बिनाखी ले-आऊट,
नागपूर-४४००१७. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संस्था सचिव,
इंदिरा अध्यापक विद्यालय, खापरखेडा, कामाक्षीनगर, मिलन चौक,
चनकापूर, पो. खापरखेडा, ता. सावनेर, जिल्हा नागपूर-४४११०२. — उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,
इंदिरा अध्यापक विद्यालय, खापरखेडा, कामाक्षीनगर, मिलन चौक,
चनकापूर, पो. खापरखेडा, ता. सावनेर, जिल्हा नागपूर-४४११०२. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १४.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक १४.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.८.२००९ रोजी माहिती अधिकारी (प्राचार्य) इंदिरा अध्यापक विद्यालय, खापरखेडा, कामाक्षीनगर, मिलन चौक, चनकापूर, पो. खापरखेडा, ता. सावनेर, जिल्हा नागपूर यांचेकडे (१)कु. प्रज्ञा कठाळे व कु. जया चनापे यांचे नियुक्ती दिनांक व नियुक्ती आदेश क्रमांक व इतर माहिती मागितलेली दिसून येते. माहिती टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.८.२००९ चे दोन अर्ज आयोगाकडे सादर केले आहेत. त्यात कु. शिल्पा मधुकर वाशीमकर यांचे बद्दल माहिती मागितलेली दिसून येते. दोनही अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २२.९.२००९ रोजी अपीलकर्ता यांना प्राचार्य तथा माहिती अधिकारी यांनी विद्यालयास दिनांक ७.८.२००९ ला एक कोरा कागद व पोचपावती लावलेले पत्र पाठविले. यावरुन आपणास काय सिध्द करावयाचे आहे या विषयाचे पत्र देवून आपणास विचारणा केली असता आपण आतापर्यंत त्याचा खुलासा केलेला नाही. याशिवाय आपण माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांना वेळोवेळी माहिती मागवून एकप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या आदेशाची अवहेलना करताना दिसून येते. आपण मागितलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(ज) व २ (घ) एक व दोन अन्वये पुरविता येत नाही. याशिवाय सदर अध्यापक विद्यालय विना अनुदानित असून शासनाद्वारे कोणत्याही प्रकारचे आर्थिक सहाय्य घेत नसल्यामुळे सदर विद्यालय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही, असे मा. मुंबई उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठाचे एकलपीठाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने अर्जात मागितलेली माहिती पुरविता येत नाही, असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २६.९.२००९ रोजी पुन्हा अपीलकर्ता यांना त्यांच्या अपील अर्जाचे संदर्भात कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना प्राचार्य यांचेकडून कोणत्याही प्रकारचे पत्र मिळालेले नाही. परंतु, प्राचार्य यांनी पत्र पाठविल्याचा पुरावा सादर केला आहे. माहिती अधिकारी यांनी पुन्हा अपीलकर्ता यांच्या पोस्टाची तिकिटाच्या छायांकित प्रतीमध्ये विसंगती आहे असे दाखवून दिलेले आहे. त्यांचेकडे आलेल्या पाकीटावरील पोस्टाच्या तिकिटावर इंदिरा गांधी यांचे चित्र व अपीलकर्ता यांनी आयोगाकडे जोडलेल्या पोस्टाच्या तिकिटावर राजीव गांधी यांचे चित्र आहे, असे आयोगाचे निदर्शनास आणले. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडील जोडपत्र ब वरील तिकिटावर तारीख नाही व अर्जदाराची स्वाक्षरी नाही हेही आयोगाचे निदर्शनास आणले. तसेच अर्ज सादर करताना कोरा कागद सादर केला आहे व त्याबद्दलचे सुध्दा स्पष्टीकरण दिलेले नाही. यावरुन अपीलकर्ता हे आयोगाची दिशाभूल करीत आहे व त्यांनी मागितलेल्या माहितीबद्दल ते गंभीर नाही असे दिसून येते. त्यातही विना अनुदानित अध्यापक विद्यालय असल्यामुळे मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा लागू होत नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ११४३/२००९

१) श्री राजेश नवलकिशोर ठाकूर,
विशाखा निवास, अजय नगर, अंबाझरी हिल टॉप,
नागपूर-४४००३३. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती हिंगणा, ता. हिंगणा, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, हिंगणा, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १४.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक १४.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, हिंगणा यांचेकडे, पंचायत समिती अंतर्गत हिंगणा तालुक्याच्या हद्यीत येणा-या प्रत्येक गावातील वार्डात मागील पाच वर्षात म्हणजेच सन २००४ ते २००९ पर्यंतची प्रत्येक वर्षाप्रमाणे झालेल्या विकास कामांचा आढावा किंवा वार्षिक अहवाल पत्रकाद्वारे माहिती द्यावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती हिंगणा यांनी सदरची माहिती ही ग्राम पंचायत स्तरावरील असल्यामुळे माहिती अधिकारी तथा ग्राम सेवक सर्व ग्राम पंचायत, पंचायत समिती हिंगणा यांचेकडे अपीलकर्ता यांचा अर्ज हस्तांतरीत केलेला आहे. परंतु, अपूर्ण माहिती उपलब्ध झाली म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ७.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २२.१२.२००९ रोजी देण्यात आला असून अपील अंशतः मंजूर करण्यात आले असून, निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी कामकाजाचे दिवशी ग्राम विकास अधिकारी/ग्राम सेवक यांना तारीख व वेळ कळवून व व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून व उपस्थित राहून आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्या. तसेच जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी/ग्रामसेवक, ग्राम पंचायत यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीच्या अधिन राहून अपीलकर्ता यांना माहिती द्यावी व निर्णयाची एक प्रत प्रत्येक जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी यांना देण्यात आलेली दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी मागितलेल्या माहितीकरीता काही ग्राम पंचायतीकडे ते उपस्थित झाले होते. परंतु त्या वेळेस ग्राम सेवक असेलच असे नाही. काहीनी माहिती दिली होती. काहींनी माहिती दिलीच नाही. व त्यांच्याशी संपर्क सुध्दा साधता आला नाही. त्यामुळे त्यांचा वेळ व खर्च झाला आहे. परंतु, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही संपूर्ण हिंगणा तालुक्यातील पंचायत समितीच्या अखत्यारीतील प्रत्येक ग्राम पंचायतीची ५ वर्षांची माहिती आहे. व ती मोघम स्वरुपात मागितलेली आहे. सदरची माहिती अतिशय व्यापक प्रमाणात आहे व ती पंचायत समितीकडे उपलब्ध नसते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी ग्राम पंचायतीकडूनच ही माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असे सूचविण्यात आले की, सदरची माहिती घेण्याकरीता अपीलकर्ता यांनी पंचायत समितीचे माहिती अधिकारी यांचेकडे कामकाजाच्या दिवशीची तारीख व वेळ कळवून उपस्थित होऊन माहिती उपलब्ध करुन घेणार असे कळविल्यास सर्व ग्राम सेवक यांना त्या दिवशी माहिती घेवून पंचायत समिती कार्यालयात उपस्थित होण्यास सांगता येईल. परंतु त्यात पुन्हा संपूर्ण माहितीचा खर्च हा प्रत्येक ग्राम पंचायतीचा वेगवेगळा असल्यामुळे त्याप्रमाणे ग्राम पंचायतीकडून खर्चाची माहिती सुध्दा उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे व तसे अपीलकर्ता यांना कळवून अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्यानंतर माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. ही सर्व प्रक्रिया ३० दिवसांत पुर्ण करण्याच्या दृष्टीने अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून पुढील प्रक्रियेची आखणी करणे आवश्यक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी, पंचायत समिती, हिंगणा यांचेकडे कामकाजाच्या दिवशीची तारीख व वेळ कळवून(३० दिवसाचा अवधी देवून) माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता लागणा-या खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ११४०/२००९
अपील क्रं. ११४१/२००९

१) श्री लस्मय्या राजम नागुला,
वन परिक्षेत्र कार्यालय नागभिड,
मु.पो.ता.नागभिड, जिल्हा चंद्रपूर-४४१२०५. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संशोधन अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.२, नागपूर विभाग,
कार्यालय चंद्रपूर, ता.जि. चंद्रपूर-४४२४०१. — उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.२, नागपूर विभाग,
कार्यालय चंद्रपूर, ता.जि. चंद्रपूर-४४२४०१. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १४.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन व्दितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या व्दितीय अपीलांची सुनावणी दिनांक १४.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपील क्रमांक ११४०/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.२, चंद्रपूर यांचेकडे श्री मातय्या लक्ष्मय्या पेद्दापल्ली, श्री किष्टय्या पोचम पेद्दापल्ली, श्री क्रिष्णदास सम्मय्या बद्देला यांच्या बद्दलची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २७.८.२००९ रोजी अपीलकर्ता यांना, उमेदवार गडचिरोली जिल्हयाचे असल्याने त्यांचे प्रकरण आपल्या कार्यकक्षेत येत असल्यामुळे मुळ अर्ज यासोबत पाठविण्यात येत आहे. आपणाकडून सदर उमेदवारांचा रेकार्ड उपलब्ध नसल्यास माहितगार कर्मचा-यांची नियुक्ती करुन रेकार्ड उपलब्ध करुन घेण्यात यावा, असे चंद्रपूर कार्यालयाने कळवून अपीलकर्ता यांना सुध्दा कळविलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील केलेले दिसून येत नाही. व त्यानंतर त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.२ यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.**

**खुलासा: "जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे जाती प्रमाणपत्र पडताळणी करीता स्वतःची बेस्ती व वडीलांची बेस्ता शाळा सोडल्याचा दाखले जाती विषयक पुरावे सादर केलेले असून सदर जात इतर मागास वर्गात येत असून त्यांच्या मुलांचे व भावाचे वैधता प्रमाणपत्राच्या आधारे जाती वैधता देण्याकरीता दबाव तंत्राचा वापर करीता जाणिव पुर्वक खालीलप्रमाणे माहिती अधिकारी अन्वये माहिती मागितलेली आहे.**

**दिनांक २१.३.२००९ जाती प्रमाणपत्र पडताळणी लोकप्रतिनिधी यांच्या मार्फत सबळ पुराव्या अभावी जाती प्रमाणपत्र निर्गमित करावे नसता मला न्यायनिवाडया करीता प्रकरण न्याय प्रविष्ठ करावे लागेल त्याच्या प्रती विविध ठिकाणी पाठविण्यांत आल्या. दिनांक ६.४.२००९ अन्वये या कार्यालयाकडे उपलब्ध माहिती देण्यांत येऊनही माहिती अपूर्ण दिली असे नमूद केले. श्री नागूला यांनीच अपूर्ण माहिती दिलेली आहे. अपू-या माहितीच्या आधारे, माहिती अपूरी दिली हे म्हणणे योग्य नाही. या कार्यालयाने संपूर्ण अभिलेखाची पडताळणी करुनच माहिती दिलेली आहे. दिनांक ३०.३.२००९ अन्वये विविध शासन निर्णयाच्या प्रती मागविण्यात आल्या या संदर्भात या कार्यालयाने पत्र क्रं. २२६६ दिनांक २९.६.२००९ अन्वये शासनाने जनहित लक्षात घेऊन वेबसाइट तयार करुन त्यावर सर्व शासन निर्णय उपलब्ध आहेत ते संकेत स्थळावरुन प्राप्त करुन घ्यावे असे कळविलेले आहे. अर्जदार हे शासन सेवेत असून त्यांचेकडे सर्व शासन निर्णय उपलब्ध असूनही जाणिवपुर्वक या कार्यालयास शासन निर्णयाची मागणी केलेली आहे. सदर समिती दिनांक ३.१०.२००७ पासून कार्यरत झ ालेली असून त्यांच्या मुलांची व भावाची जाती वैधता प्रमाणपत्र नागपूर व पुणे समितीने निर्गमित केलेले आहेत हे माहित असूनही संबंधीत समितीस अर्ज न करता समितीस त्रास देण्यांच्या हेतूनेच माहिती अधिकार अधिनियमाचा वापर करीत आहे. दिनांक १३.५.२००९ अन्वये पुन्हा शासन निर्णयाच्या प्रती मागविण्यांत आल्या आहेत. दिनांक २०.५.२००९ व २९.५.२००९, ३०.५.२००९ अन्वये पुन्हा शासन निर्णयाच्या प्रती मागविण्यांत आल्या आहेत. दिनांक २८.५.२००९ अन्वये १० उमेदवारांची माहिती मागविण्यांत आली त्यामध्ये त्यांनी सदर प्रकरणांची सविस्तर माहिती दिलेली नसून या कार्यालयाने पत्र क्रं.२२६६ दिनांक २९.६.२००९ अन्वये, आपणांस कोणत्या स्वरुपाची माहिती हवी त्यासंबंधीचे वर्ष व प्रकरण क्रमांक देण्याचे सुचवूनही माहिती दिलेली नाही. दिनांक ४.८.२००९ अन्वये माहिती मागविण्यात आली.**

**ही समिती दिनांक ३.१०.२००७ पासून अस्तित्वात आली असून त्यापुर्वीचा रेकॅार्ड या समितीकडे नाही. तत्पुर्वीचे शासन निर्णयही उपलब्ध असणे शक्य नाही. सदरची माहिती शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

**श्री नागूला याची जात इतर मागासवर्गात येत असून समितीस भोई या जातीचे वैधता प्रमाणपत्र मिळण्यांकरीता जाणिवपुर्वक त्रास देत आहेत. ते माहितीचा अधिकार वापरुन दबावतंत्र निर्माण करीत आहेत. ते शासकिय कर्मचारी असून समितीस जाणिवपुर्वक त्रास देणे ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे. करिता सदर माहिती आपणांस सविनय माहितीस्तव सादर करण्यांत येत आहे."**

**यावरुन अपीलकर्ता हे स्वहिताकरीता माहिती मागत आहे असे दिसून येते व त्यात कोणत्याही प्रकारचे व्यापक जन हित दिसून येत नाही. जर माहिती उपलब्ध असेल तर उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.**

**४. अपील क्रमांक ११४१/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ७.८.२००९ रोजी संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.१, नागपूर यांचेकडे श्री लक्ष्मण नागुला व श्री महेश नागुला यांची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २४.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १९.११.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. तरी सुध्दा माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**५. प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१)** अपील क्रमांक ११४०/२००९ **अंशतः मंजूर करण्यात येत असून माहिती उपलब्ध असल्यास ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२)** अपील क्रमांक ११४१/२००९ **अंशतः मंजूर करण्यात येत असून प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना, हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी अन्यथा जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील, याची नोंद घ्यावी.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ११५३/२००९

१) श्री गुलजार उस्मान कुरेसी, अध्यक्ष,
कब्रस्थान व लाल दिवान शाह दर्गा, डोंगरताल,
पो.देवलापार, ता.रामटेक, जिल्हा नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
रामटेक, ता.रामटेक, जिल्हा नागपूर. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय,
रामटेक, ता. रामटेक, जिल्हा नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १५.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक १५.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.९.२००९ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक यांचेकडे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगाबाद यांचे आदेश पत्र दिनांक ७ जुलै, ०९ व पत्र दिनांक १० ऑगष्ट, २००९ पत्राप्रमाणे पोलीस यंत्रणेची मदत ताबा घेण्याकरीता आर.टी.मिर्झा, प्रादेशिक वक्फ अधिकारी नागपूर यांना का दिली नाही, अशी माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २५.१०.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक ४.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दिनांक २.१२.२००९ व दिनांक १४.१२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.**

**खुलासा :"पो.स्टे. देवलापार अंतर्गत मौजा डोंगरताल या गावांत वन विभागाचे जमीनीवर सर्व्हे नंबर ५३ मध्ये अंदाजे सन १६०० पासून राणी दुर्गावतीचा किल्ला आहे. हा संपूर्ण परिसर अडीच एकराचा आहे हया ठिकाणी आदिवासी(गोंड) समाजाचे लोक रिती रिवाजाप्रमाणे पूजा अर्चना करीत आहेत. त्यालगतच मजार होती त्या ठिकाणाला लाल दिवाणशहा दर्गा असे नांव देवून सर्व धर्माचे लोकांनी मिळून बांधकाम करुन सर्व धर्माचे लोक पूजा अर्चना करीत होते. त्या ठिकाणी काशीनाथ बिनेकर हे पुजारी म्हणून काम करीत होता. त्यांनी आपले नांव बदलवून जनाब फकीर मोहम्मद लाल मोहम्मद मुजावर हया नावाने पुजा करीत होता. सदर पुजारी व अर्जदार गुलजार कुरेशी हयांच्या हुकुमशाही धोरणामुळे हया ठिकाणाची प्रगती विस्कळीत झाली होती. मध्यप्रदेश व महाराष्ट्रातील भाविकांची वाढती संख्या व त्यामुळे भाविकांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी गांवातील लोकांनी वन विभागाची परवानगी घेवून री सुंदरलाल प्रेमलाल ताकोत अध्यक्ष व मुस्ताक सलीम खान उपाध्यक्ष आणि इतर ९ सदस्यांचे विश्वस्त मंडळ ग्राम सभेत ठरवून दिनांक २४.४.२००८ रोजी ठराव पास करुन धर्मदाय उपायुक्त नागपूर हयांचे कार्यालयात आला हजरत अली बक्श बाबा लाल दिवाणशहा दर्गाह सेवा ट्रस्ट डोंगरताल रजि.नं. E २१५० दिनांक ७.७.२००८ अन्वये नोंदणी करुन उपरोक्त विश्वस्त मंडळ आणि दिनांक ११.७.२००८ रोजी दर्गाह ताब्यात घेवून दान पेटीतील रक्कम ३,४४,०००/- रुपये बँक ऑफ इंडीया देवलापार मध्ये भरण्यात आले.**

**तक्रार कर्ते गुलजार कुरेशी हयांनी मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगाबाद कडून दिनांक १७.११.२००८ रोजी कब्रस्थान आणि लाल दिवाणशहा दर्गाह हया नावाचे नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक MSBW/NGP/४५/०८ दिनांक १७.११.२००८ पत्र प्राप्त करुन वक्फ कमेटीने डिस्ट्रीक जज ट्रिब्युनल अंडर वक्फ ऍक्ट समोर इंजंक्शन मिळविण्या करीता दिनांक २६.११.२००८ रोजी रिट सुट अन्वये विनंती केली होती. परंतु दिनांक ६.३.२००९ रोजी कोर्टानी ती फेटाळून लावली आहे.**

**या आदेशा विरुध्द अर्जदार गुलजार कुरेशी हयांनी सिव्हील रिव्हीजन अप्लीकेशन नंबर १८/०९ दिनांक ५.५.२००९ अन्वये उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे दाद मागीतली होती. परंतु उच्च न्यायालयाने देखील हे प्रकरण पुर्वीच्याच कोर्टात परत केले व १ महिन्यात निर्णय लावण्याचे आदेश दिले. परंतु वक्फ सुट क्रमांक ४/०८ डिस्ट्रीक जज ट्रिब्युनल अंडर वक्फ ॲक्ट समोर अर्जदाराने दिनांक ३१.८.२००९ रोजी केस मागे घेतली.**

**दिनांक १९.१.२००९ रोजी सुंदरलाल प्रेमलाल ताकोत अध्यक्ष आला हजरत अली बक्श बाबा लाल दिवाणशहा सेवा ट्रस्ट डोंगरताल हयांनी डिस्ट्रीक जज ट्रिब्युनल अंडर वक्फ ऍक्ट समोर मिस्लॅनियस सिव्हील अप्लीकेशन नंबर ६४/०९ अन्वये अर्जदार गुलजार कुरेशी व मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड औरंगाबाद विरुध्द वक्फ बोर्डानी दिलेले रजिस्ट्रेशन रद्द करणे बाबत विनंती केली आहे. प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.**

**मुद्या क्रमांक १ :- अर्जदार श्री गुलजार उस्मान कुरेशी अध्यक्ष कब्रस्थान लाल दिवाणशहा दर्गाह हयांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळणे बाबतचा अर्ज दिनांक २६.९.२००९ चा दिनांक २९.९.२००९ रोजी मा. पोलीस अधीक्षक कार्यालय ना.ग्रा.**

**येथे दिलेला असून सदरचा अर्ज दिनांक ५.१०.२००९ रोजी आमचे कार्यालयात प्राप्त झाला असून अर्जदारास सदर अर्जा नुसार दिनांक २९.१०.२००९ रोजी माहिती पुरविण्यात आली असून त्यात हजरत अली बक्श बाबा दिवाणशहा दर्गाह डोंगरताल येथे आपण प्रादेशिक अधिकारी वक्फ यांचे कडून नोंदणी केलेली आहे. तसेच सुंदरलाल प्रेमलाल ताकोत रा. डोंगरताल हयाने सुध्दा लाल दिवाणशहा दर्गाह डोंगरताल ट्रस्ट तयार करुन धर्मदाय आयुक्त यांचे कडून नोंदणी केलेली आहे. सदर ठिकाणी दोन ट्रस्टचे रजिस्ट्रेशन असल्याने हयासंबंधाने ठाणेदार देवलापार यांनी पोलीस यंत्रणेची मदत बाबत धर्मदाय आयुक्त नागपूर हयांना दिनांक ५.१०.२००९ अन्वये पत्र व्यवहार केलेला आहे. त्यांचे कडून माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल व आपणास तशी माहिती पुरविण्यात येईल असे ठाणेदार देवलापार हयांनी पत्रात नमुद केले आहे. त्याची छायांकित प्रत सोबत जोडण्यात आली आहे.**

**अर्जदार गुलजार कुरेशी हयांनी सदर वक्फ बोर्डाचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राचे आधारे व वक्फ बोर्डाचे आदेशानुसार पोलीस मदत घेवून दर्गाहचा ताबा घेण्याचा प्रयत्न करीत आहे.**

**त्यामुळे उपरोक्त वक्फ बोर्डाचे प्रमाणपत्र रद्द करण्याचे प्रकरण कोर्टात सुरु असल्याने त्यांना ताबा घेण्यासाठी कोर्टाच्या आदेशा शिवाय पोलीस मदत देणे योग्य होणार नाही.**

**मुद्या क्रमांक २ :- अर्जदार श्री गुलजार उस्मान कुरेशी अध्यक्ष कब्रस्थान लाल दिवाणशहा दर्गाह हयांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळणे बाबतचा अर्ज दिनांक ४.११.२००९ रोजी आमचे कार्यालयास सादर केला असून सदर अर्जात अर्जदार हयांनी मौजा डोंगरताल येथील दर्गाह व कब्रस्थान आहे त्या कब्रस्थान व दर्गाह तयार करण्यात आलेला आहे. सुंदरलाल ताकोत व इतर ११ लोकांची समीती स्थापन करुन नोंदणी क्रं. E२१५० अन्वये तयार करण्यात आलेली आहे. त्यांच्या या समिती मध्ये कब्रस्थान व दर्गाहची नोंदणी केलेली आहे का व त्याचा समीती मध्ये उल्लेख आहे का, दाखविण्यात यावे अशा आशयाचा अर्ज सादर केलेला होता.**

**सदर अर्जासंबंधाने सुंदरलाल ताकोत व इतर ११ लोकांची समिती तयार करुन नोंदणी क्रमांक E२१५० चे रजिस्ट्रेशन व त्यासंबंधी इतर कागदपत्रे घेण्याकरीता दिनांक ३.१२.२००९ रोजी अर्जदार श्री गुलजार उस्मान कुरेशी अध्यक्ष कब्रस्थान लाल दिवाणशहा दर्गाह हयास आमचे कार्यालयात बोलाविले असता ते हजर झाल्यावरुन त्यांना सदरची माहिती व कागदपत्रे घेवून जाणेस म्हटले असता त्यांनी सदर कागदपत्राची आवश्यकता नाही. E२१५० रजिस्ट्रेशन केले आहे. त्यांचे जवळ दर्गाह व कब्रस्थान हयाचे रजिस्ट्रेशन आहे का हयाबाबत माहिती देण्यात यावी. इतर कागदपत्रांची आवश्यकता नाही असे लिहून दिलेले आहे. त्यानुसार अर्जदारास कार्यालयीन पत्र क्रं.आरडी/एनआर:३७४८/०९ दिनांक १४.१२.२००९ अन्वये दिनांक १५.१२.२००९ रोजी माहिती पुरविण्यात आली आहे. त्याची छायांकित प्रत सोबत जोडण्यात आली आहे." सदरच्या खुलाशावरुन न्यायालयीन वाद असल्यामुळे त्याप्रमाणे माहिती ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ११५४/२००९

१) श्री भजोरेमना मारोती मून,
डॉ.आंबेडकर चौक, वार्ड नं.५, अहेरी,
मु.पो.ता.अहेरी, जिल्हा गडचिरोली. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा.धर्मदाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, गडचिरोली
कोषागार कार्यालयाजवळ, ता.जि.गडचिरोली. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,
वनवैभव शिक्षण मंडळ, आलापल्ली,
ता.अहेरी जिल्हा गडचिरोली. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १५.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक १५.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.८.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा सचिव, वनवैभव शिक्षण मंडळ, आलापल्ली यांचेकडे एकोणवीस शाळा इमारतींची व तसेच सर्व शाळांच्या शैक्षणिक साहित्याची माहिती पुरवावी. ( शाळा इमारतींची यादी जोडली आहे) याही पेक्षा इमारती जास्त असल्यास त्यांचीही माहिती पुरवावी, अशी माहिती टपालाने घेणार असे नमुद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने सदरची माहिती ही मुख्याध्यापकांनी द्यावयाची असल्यामुळे मागणी केलेली माहिती ते शाळेत आल्यास त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी असे दिनांक १५.९.२००९ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ७.९.२००९ रोजी प्रथम अपील हे अपीलीय अधिकारी तथा सहा.धर्मदाय आयुक्त, गडचिरोली यांचेकडे दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १२.११.२००९ रोजी देण्यात आला असून तो अतिशय स्वयंस्पष्ट असा आहे. तरी सुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना ७ शाळांच्या इमारतीची माहिती मिळाली आहे. त्यानंतर १९ इमारतीची सुध्दा माहिती मिळाली आहे. परंतु उर्वरित शाळांची माहिती मिळाली नाही. त्याकरीता त्यांनी प्रथम अपीलामध्ये अपीलीय अधिकारी म्हणून सहा. धर्मदाय आयुक्त यांचेकडे, सर्व शाळांचा शोध घेवून माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश द्यावे असा आग्रह धरला होता. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे अपील फेटाळून लावलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये धर्मदाय आयुक्त हे प्रथम अपीलीय अधिकारी नाही. ते त्यांच्या कार्यालयातील माहिती अधिकारी यांचे संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी आहे. जन माहिती अधिकारी तथा संस्था सचिव यांचे प्रतिनिधी सुनावणीस उपस्थित झाले व त्यांनी एकुण ४० शाळा त्यांचेकडे आहेत असे मान्य केले. त्यामुळे त्यांनी इतर शाळांची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.**

**४. सचिव, वनवैभव शिक्षण मंडळ, आलापल्ली यांनी आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.**

खुलासा **:"सविनय आपल्या निदर्शनास आणुन देवू इच्छितो की, अपीलकर्ते श्री भजोरेमना मारुती मून हा संस्थेद्वारा संचलित भगवंतराव हायस्कुल, अहेरी येथे महाराष्ट्र खाजगी कर्मचारी सेवेच्या शर्ती नियम १९८१ नुसार कधीच शाळेचे कर्मचारी नव्हती. कारण ते संस्थेद्वारा किंवा शाळाच्या शाळा समितीद्वारा नियुक्त केलेला कर्मचारी नव्हता तो तत्कालीन मुख्याध्यापक यांनी आपल्या स्वत:च्या मर्जीने तक्रारकर्ते श्री भजोरेमना मारोती मून यांच्याशी संगनमत करुन संस्थेच्या किंवा शाळा समितीचे कोणतेही ठराव न घेता ठेवल्याचे संस्थेला आढळले. मुख्याध्यापकांनी सदरचे तक्रारकर्ते यांना कामावर ठेवतांना मा.शिक्षणाधिकारी(माध्य.) जिल्हा परिषद, गडचिरोली तथा सचिव, वन वैभव शिक्षण मंडळ, आलापल्ली यांची कोणतीच पूर्व परवानगी घेतलेली नव्हती.**

**महोदय, दरम्यानच्या काळात अपीलकर्ते श्री भजोरेमणा मारोती मून हयांनी सन १९९४ मध्ये अतिरिक्त शाळा न्यायधिकरण (चंद्रपूर), नागपूर यांच्या न्यायालयात अर्ज सादर केला होता. ज्यांचे अपील क्रमांक एसटीएन/३४१/९४ होते. ज्यांचे निकाल दिनांक २९ मार्च, २००५ ला लागलेले आहे.(सोबत आदेशाची प्रत जोडण्यांत येत आहे).**

**दरम्यानच्या काळात अतिरिक्त शाळा न्यायाधिकरण चंद्रपूर येथे हे प्रकरण सुरु असतांना अपीलकर्ते भजोरेमना मारोती मून हे दिनांक १.७.२००३ पासून वन वैभव शिक्षण मंडळाचे सचिव अब्दुल हकिम अ.रहिम यांच्या घरा समोर उपोषणाला बसले. हे उपोषण पुर्णत: बेकायदेशिर होते. तसेच श्री मून यांनी माझ्या विरुध्द विविध दैनिक समाचार पत्रामध्ये बदनामी कारक व खोटी व बनावट माहिती प्रकाशनास दिली. त्यामुळे मी जिल्हा व सत्र न्यायालय, गडचिरोली येथे अपीलकर्ते श्री मून यांचा विरुध्द माझ्या संवैधानिक अधिकाराचा वापर करुन अब्रुनुकसानीचा दावा टाकला. ज्यांचे क्रमांक-स्पेशल सिव्हील सुट क्रमांक-२६/२००३ हे होते.**

तसेच अपीलकर्ता श्री भजोरेमना मारोती मून यांनी अतिरिक्त शाळा न्यायधिकरण, चंद्रपूर(नागपूर)येथील निकाल त्यांच्या विरुध्द गेल्यामुळे मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट पिटीशन क्रमांक-३४९९/२००५ अन्वये अपील दाखल केलेले आहे.

त्याचे सर्व अस्त्राचा वापर केल्यानंतर कोठेच त्यांचा थारा न लागल्यामुळे तो आता जाणुन बुजून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये कोणतेही उलट-सुलट माहितीची मागणी करीत आहे. श्री मुन यांना त्यांनी दाखल केलेले शाळांच्या यादीनुसार इमारती विषयी व शैक्षणिक साहित्याची संपुर्ण माहिती दिल्यानंतर सुध्दा मला माहिती मिळालेली नाही माझे समाधान झालेले नाही अशी कारणे समोर करुन आपल्या न्यायालयात अपील दाखल केले आहे.

तसेच वन वैभव शिक्षण मंडळाचे सचिव श्री अब्दुल हकिम म. रहिम यांना श्री भजोरेमणा मोरोती मुन हे जाणुनबुजून त्रास देण्यांच्या हेतूने असे निव्वळ खोटा, बनावट तसेच ट्रिबुनल कोर्टात केस हारल्यामुळे सुड घेण्यांच्या दुष्ट हेतूने हे अपील दाखल केल्याचे दिसते.

तसेच श्री मुन हे प्रश्न करुन माहिती मागतात. तसेच ते वस्तुनिष्ठ माहिती मागितलेली नाही. तसेच त्यांनी अर्जावर कोर्ट फी स्टॅम्प लावलेले नव्हते. तरी पण संस्थेनी माहिती पुरविलेली आहे. तसेच अपील सुध्दा वेळेच्या आत मा. कोर्ट विद्यमान सहायक धर्मदाय आयुक्त, सार्वजनिक न्यास कार्यालय, गडचिरोली यांच्या कार्यालयात दाखल केलेले नाही. त्यामुळे त्यांचा अपील अर्ज खारीज करण्यांत यावे ही विनंती.

श्री भजोरेमना मारोती मुन यांचे प्रकरण मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथे सुरु असल्यामुळे ते या पार्श्वभूमीवर त्यांनी माहितीच्या अधिकाराचे माध्यमातून संस्थेचे सचिव (जन माहिती अधिकारी) व मा. सहायक धर्मदाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, गडचिरोली यांना वेळोवेळी माहिती मागण्यास अर्ज करण्याचा सपाटा लावला आहे. श्री भजोरेमना मारोती मून यांनी वेगवेगळी असंबंध माहिती वेळोवेळी मागण्यासाठी अर्ज दाखल केले आहे.

महोदय, आपण दिनांक ३१.०८.२००७ ला दिलेल्या निकालात म्हटलेले आहे की, वास्तविक पाहता हा माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींचा गैरवापर आहे. कोणत्याही प्रकारच्या आकसातून त्रास देण्याच्या उद्देशाने अधिनियमांच्या तरतुदींचा वापर करणे हे अतिशय गैर आहे व त्याकरीता माहितीचा अधिकार अधिनियम हे माध्यम होऊ शकत नाही.

महोदय, श्री भजोरेमना मारोती मून यांच्या समजुतीनुसार त्यांच्यावर अन्याय झाला असेल तर त्या निर्णयाच्या संदर्भात माहिती मागणे रास्त आहे आणि त्या बाबतची सर्व माहिती संस्थेने तथा शाळेने त्यांना माहितीच्या अधिकारान्वये प्राप्त करुन दिलेली आहे. आपल्या निर्णयात म्हटलेले आहे की, अन्याय ज्या प्रमाणात असेल, कोणत्याही स्वरुपाचे असेल तरी एवढया प्रचंड प्रमाणात असंबंध माहितीचा सर्व अन्याय निवारणार्थ उपयोग होऊ शकत नाही. त्यामुळे श्री भजोरेमना मारोती मून हे अशा प्रकारची माहिती गैरसमजुतीने मागत आहेत हा निष्कर्ष काढता येत नाही. तर मुद्दाम त्रास देण्याच्या उद्देशाने मागत आहेत असे दिसून येते. हा माहिती अधिकार अधिनियमांचा तरतुदींचा व मिळालेल्या अधिकाराचा गैरवापर आहे.

तसेच संस्थेने अधिनियमाच्या कलम ४ प्रमाणे स्वत:हून माहिती प्रसिध्द केलेली आहे. संस्थेने संस्थेची संपूर्ण माहिती, शाळा कॅालेजेसची संपूर्ण माहिती जसे मालमत्ता, शाळांची माहिती, शाळेतील कर्मचारी यांचे नियुक्ती पत्र, त्यांचे रुजू प्रतिवेदन, त्यांचे शैक्षणिक कागदपत्र, सेवा जेष्ठता यादी, शाळेच्या जागेबाबतची माहिती इत्यादी संस्थेने गावोगावी असलेल्या ग्राम पंचायतीच्या पटलावर तसेच दर्शनी भागावर प्रसिध्द करुन सर्व जनतेसाठी न मागता उपलब्ध करुन दिलेली आहे.

महोदय, फक्त तो स्वत:च्या स्वार्थासाठी हा माहितीच्या अधिकाराचा अधिनियमांचा गैर फायदा घेवून उपयोग करीत आहे व नाहक त्रास देण्याच्या उद्देशाने पत्रव्यवहारा द्वारे माहितीची मागणी करीत असतात. कृपया प्रकरणाचा विचार करुन न्याय द्यावा ही विनंती.

**Special Pleading: -**

**Sir, The Management and the School, colleges and other institutions running under this management are very concerned over the filing of large number of frivolous cases under the Right to information Act by Shri Bhojeramanna Maroti Moon. He is using it as a tool to pursue personal agenda. He has no bonafide motive to file such a large number of applications, but only to harass the Management and The Institutions running under it.**

**Sir, we request that Shri Bhojeramanna Maroti Moon should be strictly dealt with and be punished for pursuing frivolous cases and applications against the Management and The school, Colleges and other institutions running under this management, otherwise the Acts well defined purposes will be defeated.**

**Sir, we humbly plead for justice in the above matter. "**

सुनावणीच्या वेळेस सचिव, वनवैभव शिक्षण मंडळ, आलापल्ली यांनी दाखल केलेला खुलासा आयोगाचे निदर्शनास आणला नाही व त्याप्रमाणे युक्तीवाद केला नाही. परंतु, आता संपूर्ण खुलाशाचे अवलोकन केले असता अपीलकर्ता हे विनाकारण माहिती मागत आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. ४९/२००९

१) श्री नरेश गंगाराम नवखरे,
मु.पो.पिंपळगांव सडक, ता.लाखनी, जि. भंडारा. — तक्रारकर्ता

विरुध्द

२)जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,
श्री तुकाराम विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय,
कढोली, ता. कुरखेडा, जिल्हा गडचिरोली. — गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक १५.१.२०१० )

नि र्ण य

**तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक ५४६/२००७ मधील दिनांक ४.१२.२००७ च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ९.२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दिनांक १५.१.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.**

**२. वास्तविक, तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु, मुद्या क्रमांक ९ ची माहिती उपलब्ध झाली नाही अशी त्यांची तक्रार आहे. त्यावर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचे म्हणणे असे आहे की, सदरची माहिती ही संस्थेचे सचिव यांचेकडे आहे व संस्थेचे सचिव यांना त्यांनी आतापर्यंत तीन पत्रे दिलेली आहेत. परंतु, संस्थेचे सचिव माहिती उपलब्ध करुन देत नाही. त्यामुळे माहिती अधिकारी म्हणून ते दोषी होत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. असे असल्यास शिक्षणाधिकारी यांचे शैक्षणिक संस्थेवर प्रशासकिय नियंत्रण असल्यामुळे त्यांनी शैक्षणिक संस्थेकडून अधिनियमाचे कलम २(च) अन्वये माहिती उपलब्ध करुन घेवून ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. तरीही संस्थेने माहिती उपलब्ध करुन न दिल्यास संस्थेच्या विरुध्द प्रशासकिय कार्यवाही ही प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी श्री तुकाराम विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, कढोली या संस्थेचे सचिव यांचेकडून तक्रारदार यांनी मागितलेली मुद्या क्रं. ९ ची माहिती उपलब्ध करुन घेवून ती तक्रारदार यांना विनामुल्य हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत पुरवावी. अन्यथा संस्थेच्या विरुध्द योग्य ती प्रशासकिय कार्यवाही करावी.**

**२) सदरच्या निर्णयाची एक प्रत शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद गडचिरोली यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.**

**३) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

दिनांक १५.१.२०१०

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. १८०/२००९

१) कु. पुष्पा पुजारामजी चांभारे,
मु.पो.ता. गोंडपिपरी, वार्ड नं.२, जिल्हा चंद्रपूर. तक्रारकर्ता

विरुध्द

३)जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,
दलितमित्र वि.तु.नागपुरे अध्यापक विद्यालय, गोंडपिपरी,
ता. गोंडपिपरी, जिल्हा चंद्रपूर. गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक १५.१.२०१० )

नि र्ण य

**तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक ६६३/२००८ मधील दिनांक १५.५.२००९ च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ६.७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दिनांक १५.१.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.**

**२. सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये दिनांक २७.७.२००९ रोजी प्राचार्य, दलीतमित्र वि.तु. नागपूरे अध्यापक विद्यालय यांचेकडून खुलासा मागविण्यात आला होता व त्याप्रमाणे प्राचार्य यांनी खुलासा पाठविलेला आहे. त्यामध्ये आदेशान्वीत माहिती अपीलकर्ता यांना दिनांक २६.७.२००९ रोजी रजिस्टर पोस्टाने पाठविलेली आहे. राज्य माहिती आयोगाच्या आदेशाचे तंतोतंत पालन केलेले आहे, असे नमुद केलेले आहे. परंतु, तरी सुध्दा खुलासा समाधानकारक न वाटल्यामुळे तक्रार सुनावणीस लावण्यात आली. जन माहिती अधिकारी यांचे तर्फे ॲड. विरेंद्र धवस हजर होते व त्यांनी युक्तीवाद केला. त्यांच्या युक्तीवादाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच अपीलकर्ता यांनी जी काही माहिती मागितली ती त्यांच्याच काळातील प्राचार्य असतानाची माहिती आहे व ती कार्यालयात उपलब्ध नाही. त्याकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी दलितमित्र वि.तु. नागपूरे अध्यापक विद्यालयातील अभिलेख्यांची तपासणी करुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत दलितमित्र वि.तु.नागपूरे अध्यापक विद्यालयातील अभिलेख्यांची तपासणी करुन अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध असल्यास ती अपीलकर्ता यांना छायांकित प्रतीचे स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) सदरच्या निर्णयाची एक प्रत शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.**

**३) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. १६३/२००९

१) श्री सचिन सुरेशराव धोटे,
द्वारा-प्रबोध देशपांडे, प्लॅाट नं.३, लक्ष्मी अपार्टमेंट,
दिनदयाल नगर, प्रतापनगर, रिंगरोड, नागपूर-४४००२२. तक्रारकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी,
नागपूर. गैरतक्रारदार

३)जन माहिती अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,
नागपूर (शहर), नागपूर. गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक १५.१.२०१० )

नि र्ण य

**तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक २५६/२००८ मधील दिनांक २५.३.२००९ च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ११.६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दिनांक १५.१.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.**

**२. तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक १८.५.२००९ रोजी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी तथा माहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती अपूर्ण आहे. व त्यामध्ये त्यांनी मागितलेली मोटार वाहन क्रमांक एमएच-१२ सीटी-०१९२ या वाहनावर दिनांक ७.१२.२००७ रोजी मोटार वाहन निरीक्षक यांनी ओव्हर लोडींगचे चालान केले. त्या संदर्भात जी कार्यवाही करण्यात आली, त्याबद्दलची संपूर्ण माहिती पाठविलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, जी माहिती कार्यालयात उपलब्ध होती ती संपूर्ण माहिती दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता हे पोच देत नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की. त्यांना जी जी माहिती उपलब्ध होते, त्याबद्दल आतापर्यंत पोच दिलेली आहे. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता यांना जी अपेक्षित माहिती आहे ती त्यांच्या कार्यालयाच्या अभिलेख्यामध्ये उपलब्ध नाही. असे असल्यास तक्रारदार यांना तसे स्पष्ट कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांना अपेक्षित असलेली जी माहिती कार्यालयाचे अभिलेख्यावर उपलब्ध नाही, त्याबध्दल स्पष्टपणे कळविण्यात यावे व तक्रारदार यांची पोच घ्यावी.**

**२) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. २६६/२००९

१) जगन गणपतरावजी टाकळीकर,
जूनी मंगळवारी, मठ्ठीपूरा रोड,
नागेश्वर प्रायमरी शाळे जवळ, नागपूर-४४०००८. तक्रारकर्ता

विरुध्द

२)जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी श्री आर.जे.फुले,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक १५.१.२०१० )

नि र्ण य

**तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक ७५४/२००८ मधील दिनांक २०.५.२००९ च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १२.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दिनांक १५.१.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.**

**२. सदरच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ३०.१०.२००९ रोजी आयोगाचे कार्यालयातून खुलासा मागविण्यात आला होता. परंतु, शिक्षणाधिकारी, महानगरपालिका यांनी दिनांक १६.११.२००९ रोजी तक्रारदार यांना कोणत्या प्रकारची माहिती अपेक्षित आहे याबद्दलचा खुलासा मागविलेला दिसून येतो. म्हणजे अपीलकर्ता यांना निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता कोणत्याही प्रकारचे प्रयत्न त्यावेळेस केलेले दिसून येत नाही. गैरतक्रारदार यांनी आज आयोगापुढे हजर होऊन त्यांना कोणत्या प्रकारची माहिती अपेक्षित आहे हे त्यांना अवगत नाही कारण त्यांनी आताच शिक्षणाधिकारी या पदाचा प्रभार घेतला असे सांगितले. यावरुन पुर्वीच्या शिक्षणाधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते दोषी आढळून येतात. परंतु ते सेवा निवृत्त झालेले आहे असे आयोगास सांगितले. असे असले तरी त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. नवीन शिक्षणाधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या अर्जातील मुद्या क्रं. २ च्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध असल्यास त्याप्रमाणे कळविणे संयुक्तिक राहील. मात्र त्याबाबत गैर तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, ही माहिती ३८ वर्षा पुर्वीची आहे व त्यामुळे ती आता उपलब्ध होईलच असे नाही. कारण नोंद घेतल्यानंतर त्याबाबतची कागदपत्रे उपलब्ध होत नाही. असे असेल तर गैर तक्रारदार यांनी पुन्हा माहितीचा शोध घेवून माहिती उपलब्ध असल्यास ती पुरविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांच्या दिनांक २४.४.२००८ च्या अर्जातील मुद्दा क्रं.२ ची माहिती, हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत, उपलब्ध असल्यास पुरविण्यात यावी.**

**२) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपील क्रमांक ७५४/२००८ मधील आयोगाच्या आदेशाचे पालन केलेले नसल्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येत आहे. सदरची कारवाई ही आयुक्त, महानगरपालिका किंवा सक्षम प्राधिकारी यांनी करावयाची आहे. त्याकरीता सदरच्या निर्णयाची एक प्रत आयुक्त, महानगरपालिका यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.**

**३) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ११६१/२००९

१) श्री सतिश धानजीभाई मेहता,
२२१, नंदनवन सिमेंट रोड, शाकंभरी सभागृहाजवळ,
बालाजी किराणा, नंदनवन, नागपूर-४४०००९. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित, नागपूर
उद्योग भवन, ३ रा माळा, सिव्हील लाईन्स, नागपूर. — उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित, नागपूर
उद्योग भवन, ३ रा माळा, सिव्हील लाईन्स, नागपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १६.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक १६.१.२०१० रोजी घेण्यात आली. उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता सुनावणी झाल्यानंतर हजर झाले.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा लेखा अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"Office space required kindly supply information regarding (i) whether office required on lease or outsight (ii) How many office required in response to notice. Names, amounts, & description of property. (iii) what is the present status, whether the tenders are finalized?, property acquired?, name of successful party and amount." सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३०.९.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २९.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये निर्णय झालेला दिसून येत नाही. परंतु, दिनांक ३०.११.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. तसेच त्यानंतर सुध्दा त्यांना तीच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता सुनावणी नंतर हजर झाले व त्यांनी असे सांगितले की, दिनांक ३०.११.२००९ रोजी पाठविलेली माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. असे असल्यास अपीलकर्ता यांना पुन्हा माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना पुन्हा दिनांक ३०.११.२००९ रोजी पुरविण्यात आलेली माहिती व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेशी व्यक्तीशः संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

# मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ७८९/२००९
अपील क्रं. ७९१/२००९

१) श्री सुरेंद्र आनंदराव गौतम,
वार्ड नं.१, सेलू, ता. सेलू ,जिल्हा वर्धा. अपीलकर्ता

२) श्री राजकुमार राधेशाम राठी,
रामनगर, रानडे प्लॅाट, वर्धा, ता.जि. वर्धा. अपीलकर्ता

विरुध्द

१) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मदाय आयुक्त, वर्धा
एल.आय.सी.इमारतीच्या बाजुला, जूना आर्वी स्टॅान्ड, वर्धा,
ता.जि. वर्धा. उत्तरवादी

२) जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष
साई सेवा मंडळ, वर्धा
मगनवाडी रोड, वर्धा, ता.जि. वर्धा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १६.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक ८.९.२००९ व दिनांक ७.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी दिनांक १६.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता श्री राजकुमार राठी हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दोनही अपीलांमध्ये अनुक्रमे दिनांक १८.३.२००९ व दिनांक २९.१२.२००८ रोजी, अध्यक्ष, साई सेवा मंडळ यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी उपधर्मदाय आयुक्त यांचेकडे दोन प्रथम अपीले दाखल केलेली आहेत. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २०.८.२००९ रोजी देण्यात आला असून, मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथील याचिका क्रमांक ५२९४/०८ मधील निर्णयाप्रमाणे सार्वजनिक विश्वस्थ संस्थेस शासनाचे भरीव आर्थिक सहाय्य मिळत नसेल तर त्या संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, या निर्णयाचे आधारे साई सेवा मंडळ ही संस्था नोंदणीकृत सार्वजनिक न्यास असली तरी शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान संस्थेस मिळत नाही या कारणास्तव माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी संस्थेस लागू होत नाही असा निर्णय देवून दोनही प्रथम अपीले खारीज करण्यात आलेली दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीले दाखल केलेली दिसून येतात.**

**३. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगापुढे युक्तीवाद करताना साई सेवा मंडळ यास जिल्हा परिषदेकडून जमीन दान मिळालेली आहे याबद्दलचा पुरावा आयोगापुढे सादर केला. व त्यामुळे अधिनियमाच्या तरतुदी लागू होतात असे प्रतिपादन केले. परंतु, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २(ज) मधील सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येमध्ये शासनाकडून भरीव सहाय्य अशी तरतुद असल्यामुळे व जिल्हा परिषद हे शासन नसल्यामुळे जिल्हा परिषदेनी जरी जमीन दान दिलेली असली तरी अधिनियमामधील सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येमध्ये साई सेवा मंडळ येत नाही. त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय योग्य आहे व दोनही अपीले खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ७८९/२००९ व ७९१/२००९ खारीज करण्यात येत आहेत.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ११७३/२००९
अपील क्रं. ११७४/२००९
अपील क्रं. ११७५/२००९

१) श्री हेमंद दादुरामजी टेटे
प्लॅाट क्रं.३५, स्वराज नगर, मानेवाडा रिंग रोड,
पोस्ट-पार्वतीनगर, नागपूर-४४००२७. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
विभाग क्रं.२, महावितरण, म.रा.विद्युत वितरण कं.मर्या.,
गणेश भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,उपविभाग, हिंगणा,
ता. हिंगणा, जिल्हा नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १९.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी दिनांक १९.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे तर्फे अडॅ. श्रीमती एस.ए. झिंजार्डे हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी तीनही अपीलांमध्ये दिनांक १.९.२००९ रोजी खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"(१) जानेवारी २००९ पर्यंत वानाडोंगरी वितरण केंद्रात किती टेस्ट रिपोर्ट पेंडीग होत्या. (२) फेब्रुवारी २००९ मध्ये किती टेस्ट रिपोर्ट प्राप्त झाल्या. (३) जानेवारी २००९ व फेब्रुवारी २००९ मध्ये उपविभागातर्फे किती मिटर देण्यात आले. (४) जानेवारी ०९ व फेब्रुवारी, ०९ मध्ये किती कनेक्शन देण्यात आले व किती मिटर बदलविण्यात आले. (५) उपविभागातर्फे प्राप्त झालेल्या मिटरपैकी दिनांक २५.२.०९ रोजी वानाडोंगरी वितरण केंद्रात मिटर शिल्लक होते काय. (६) दिनांक १.१०.०८ ते ३१.३.२००९ पर्यंत वानाडोंगरी वितरण केंद्राअंतर्गत किती लोकांनी घरगुती व व्यावसायिक कनेक्शन करिता डिमान्डचे पैसे भरले, त्याची यादी व डिमान्डची झेरॅाक्स प्रत देण्यात यावी."**

**"(१) दिनांक १.१०.२००८ ते दिनांक ३१.३.२००९ पर्यंत हिंगणा उपविभागातून वानाडोंगरी वितरण केंद्राअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या आर्डरची माहिती खालील फॅारमेटमध्ये देण्यात यावी.**

| **अ.क्रं.** | **अर्जदाराचे नांव व पत्ता** | **वर्कऑर्डर प्राप्त झाल्याचा दिनांक** | **वर्क ऑर्डर मंजूर झाल्याचा क्रमांक व दिनांक** | **डिमांड दिल्याचा दिनांक** | **डिमांड देणा-या अधिका-याचे नांव व हुद्या** | **कनेक्शन झाले त्याचा दिनांक** |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** |

**(२) मि (श्री टेटे) जुलाई ०८ ते १३.१०.०९ पर्यंत सुटीवर असतांना ज्या कनिष्ठ अभियंत्याला चार्ज देण्यात आला त्यांचे पूर्ण नांव व आपण त्यासंबंधी दिलेल्या पत्राची झेरॅाक्स प्रत."**

**"दिनांक १.१०.२००८ ते ३१.३.२००९ पर्यंत वानाडोंगरी वितरण केंद्रातून घरगुती व व्यावसायिक विज कनेक्शन करीता पाठविलेल्या वर्क ऑर्डरच्या कव्हरींग लेटरच्या झेरॅाक्स प्रत देण्यात याव्या. (२) त्याचप्रमाणे हिंगणा उपविभागांत वर्क ऑर्डर मिळाल्यासंदर्भात आवक क्रमांक व दिनांक देण्यात यावा. तसेच आवक रजिस्टरच्या त्या त्या पानाची झेरॅाक्स प्रत देण्यात यावी. "सदरची माहिती टपालाने घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते.**

**३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २९.९.२००९ रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २.१०.२००९ रोजी तीन प्रथम अपीले दाखल केलेली दिसून येते. तीनही प्रथम अपीलांची सुनावणी दिनांक २१.११.२००९ रोजी घेण्यात आली असून अपीलकर्ता यांना त्यांच्या मागितलेल्या माहितीच्या संदर्भात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे, जी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही ती माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु, सदरच्या आदेशामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे तीन द्वितीय अपीले दाखल केलेली दिसून येते.**

**४. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. श्रीमती झिंजार्डे यांनी युक्तीवाद केला. युक्तीवाद करताना त्यांनी अपील क्रमांक ११७३/२००९ मध्ये माहितीच्या अर्जातील मुद्या क्रमांक ५ व ६ ची माहिती मिळाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे**

सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती अपेक्षित केलेली आहे त्याबद्दलची नोंदवही त्यांनी तयार केलेली नाही. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. तसेच मुद्या क्रं. ६ च्या संदर्भात डिमान्डची झेरॉक्स प्रत सुध्दा उपलब्ध नाही. परंतु, अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी नोंदवही तयार केली होती. तसेच बँकेकडून ज्यावेळेस पैसे भरणा करुन कागद परत येतात त्यावेळेस त्यास डिमान्डची प्रत लावण्यात आलेली असते, त्या डिमान्डची झेरॉक्स प्रत दिनांक १.१०.०८ ते ३१.३.०९ या कालावधीमधील पाहिजे आहे. जन माहिती अधिकारी यांनी जो निष्कर्ष काढलेला आहे त्यापेक्षा जर दिनांक २५.२.२००९ रोजी किंवा त्यानंतर त्या कार्यालयात जर नोंद वहीच उपलब्ध नाही तर त्याबद्दल पोलीस तक्रार करणे आवश्यक आहे. तसेच डिमान्ड नोटच्या संदर्भात बँकेकडून आलेल्या कागदपत्रामधून वर नमुद केलेल्या कालावधीमधील डिमान्ड नोटची छायांकित प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

५. अपील क्रमांक ११७४/२००९ मधील माहितीच्या अर्जातील माहिती ही अपूर्ण दिलेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्यात अपीलकर्ता यांच्या रजेच्या कालावधीमध्ये ज्या कनिष्ठ अभियंता यांना चार्ज देण्यात आला होता, त्याबद्दच्या पत्राची प्रत (दिनांक २५.८.२००९ची) उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. तसेच वर्क ऑर्डरची माहिती सुध्दा ज्या नमुन्यात उपलब्ध असेल त्या नमुन्यात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

६. अपील क्रमांक ११७५/२००९ मधील माहितीच्या अर्जातील मुद्या क्रमांक १ मधील वर्क ऑर्डरच्या कव्हरिंग लेटरची छायांकित प्रत देण्यात यावी, अशी माहिती मागितलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, कोणतेही कनिष्ठ अभियंता वर्क ऑर्डरसोबत कव्हरिंग लेटर पाठवित नाही, ही पध्दत (प्रॅक्टीस) आहे. परंतु, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी पाठविली आहे. व ती उपलब्ध असल्यास त्याचा शोध घेवून मुद्या क्रमांक १ ची माहिती पुन्हा त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

त्याकरीता अपीलकर्ता यांची तीनही अपीले अंशतः मंजूर करण्यास पात्र आहेत.

आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ११७३/२००९, अपील क्रमांक ११७४/२००९ व अपील क्रमांक ११७५/२००९ अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना, वर विवेचनात नमुद केलेली माहिती, हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत टपालाद्वारे उपलब्ध करुन देण्यात यावी. नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावयाची असल्यास अपीलकर्ता यांना टपाल खर्च कळविण्यात यावा. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहील, याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ११७८/२००९

१) श्री गुलाब रामदास डोंगरे,
२६६, कुकडे ले-आऊट, रामेश्वरी रोड,
पो. भगवान नगर, नागपूर-४४००२७. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, नागपूर.
धनवटे चेंबर अनेक्स, सिताबर्डी, नागपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक,
सहकारी संस्था, नागपूर,
धनवटे चेंबर अनेक्स, सिताबर्डी, नागपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १९.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक १९.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून विभागीय सहनिबंधक यांचे कार्यालयात खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"(१) उपायुक्त महसुल तथा सदस्य सचिव भ्रष्टाचार निर्मुलन समिती, आयुक्त कार्यालय यांनी आपल्या कार्यालयाला दिलेले पत्र क्रमशा ७(४)/निभ्रमनि/तक्रार/प्र.क्र.-१७२/२००२ आयुक्त, कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर दिनांक ४.२.२००२ नुसार. (२) राष्ट्रीय मानवाधिकार परिषदेचे अध्यक्ष भिक्षू नागोशोक यांनी दिनांक १०.१२.२००२ ला आपल्या कार्यालयाला दिलेल्या पत्रानुसार आपल्या कार्यालयाने जिल्हा उपनिबंधकांना पाठविलेले पत्र अशा पत्र क्रं.विकास/ठवरे गृ.नि.स.तक्रार/२०९९/०३ कार्यालय विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था धनवटे चेंबर्स सिताबर्डी, नागपूर दिनांक १०.२.२००३ अन्वये. (३) श्री रामदास डोंगरे यांनी विषयांकित संदर्भात आपल्या कार्यालयाला दिनांक ६.५.२००२ ला दिलेल्या तक्रार अर्जानुसार." अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १८.८.२००९ रोजी उत्तर देण्यात आलेले आहे. परंतु सदरच्या उत्तरामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २९.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २९.९.२००९ रोजी देण्यात आला असून अर्जदारास दिलेले उत्तर योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जामध्ये ज्या पत्राचा व तक्रारीचा उल्लेख केलेला आहे ते आज या कार्यालयात आढळून येत नाही. व त्यामुळे त्यावर झालेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. सदरच्या पत्राच्या संदर्भामध्ये आवक नोंदवही मधून संदर्भ घेवून त्यावेळेस जे अधिकारी/कर्मचारी त्याबद्दल जबाबदार असतील त्यांच्या विरुध्द जबाबदारी निश्चित करुन प्रशासकिय कार्यवाही करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक १८.७.२००९ च्या माहितीच्या अर्जामध्ये उल्लेख केलेले पत्र व तक्रारीची आवक नोंदवहीमधून माहिती घेवून त्यावेळेस जे अधिकारी/कर्मचारी पत्र व तक्रार गहाळ झाल्याबध्दल जबाबदार असतील त्यांचे विरुध्द जबाबदारी निश्चित करुन त्यांचेवर प्रशासकिय कारवाई करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ११७७/२००९

१) श्री शामराव रामाजी चौधरी,
मु.पो. चुल्हाड, ता. तुमसर, जिल्हा भंडारा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, तुमसर, ता. तुमसर, जिल्हा भंडारा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद हायस्कुल, चुल्हाड, ता. तुमसर, जि. भंडारा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १९.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक १९.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी(उ.श्रे.) यांचे कार्यालयामध्ये, जिल्हा परिषद हायस्कुल चुल्हाड ता. तुमसर, जिल्हा भंडारा वर्ष २६.८.१९५९ ते २८.०२.१९९५ या कालावधीची सेवा पुस्तकाची छायांकित प्रत देण्यात यावी, अशी माहिती व्यक्तीशः मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २२.८.२००९ रोजी मुख्याध्यापक यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ३.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३०.९.२००९ रोजी देण्यात आला असून, अपीलकर्ता यांच्या प्रथम नियुक्ती आदेशाची मुळ प्रत मा. शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडून प्रत्यक्ष जावून उपलब्ध करुन घ्यावी व संबंधीतांचे नव्याने सेवा पुस्तक तयार करुन सेवापुस्तकाची सत्यप्रत अपीलकर्ता यांना पुरविण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना निर्देशित करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु, त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना यापुर्वी सुध्दा दिनांक १७.३.२००९ रोजी त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात पूर्ण कल्पना दिलेली आहे. अर्ज आल्यानंतर दिनांक २३.७.२००९ रोजी मुख्याध्यापक, जिल्हा परिषद हायस्कुल, चुल्हाड यांना माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात पत्र दिलेले होते. परंतु, त्याप्रमाणे मुख्याध्यापक यांनी दिनांक ८.८.२००९ रोजी जिल्हा परिषद हायस्कुल, चुल्हाड येथील कनिष्ठ लिपिक यांचेकडे पत्र दिले. व त्यानंतर दिनांक २२.८.२००९ रोजी अपीलकर्ता यांचे पत्रानुसार सेवा निवृत्त शिक्षक यांचे नवीन सेवा पुस्तक तयार करण्याकरीता त्यांचेशी संपर्क साधण्यासाठी दिनांक ८.८.२००९ ला श्री ए.जी. बोपचे, कनिष्ठ सहाय्यक, जिल्हा परिषद हायस्कुल, चुल्हाड यांना कामावरुन मोकळे करण्यात आले होते. त्यांनी आपल्या कार्यालयाला भेट दिली असता, रेकार्ड पाहाणी केली त्यावेळेस शिक्षक हजेरी पटावर दिनांक २६.७.१९५९ रोजी ते रुजू झाल्याची नोंद आहे. परंतु, नियुक्ती आदेशाची नोंद नाही. नियुक्ती आदेश आपल्या वैयक्तिक नस्तीला असतील तर किंवा आपल्या वरिष्ठ अधिका-यांना नियुक्ती आदेशाची प्रत मागवून सेवा पुस्तक तयार करण्यात येईल असे आदेश आहे, असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे सदर प्रकरणात संपूर्ण चौकशी करण्यात आली असून त्यानंतर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानंतर सदर प्रकरणात दिनांक २०.११.२००९, १८.१.२०१० व दिनांक १६.१.२०१० असा पत्रव्यवहार, शिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक व अपीलकर्ता यांच्यामध्ये**

**झालेला आहे. परंतु, जोपर्यंत नियुक्ती आदेश उपलब्ध होत नाही तोपर्यंत सेवा पुस्तक तयार करुन देता येणार नाही असे आयोगापुढे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांची अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ११७६/२००९

१)श्री फैजान अख्तर व अब्दुल खालीक
हन्डी ओली, गुजरी बाजार, कामठी, ता.कामठी
जिल्हा नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, कामठी, ता.कामठी, जिल्हा नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी ,
पंचायत समिती कार्यालय, कामठी, ता.कामठी,
जिल्हा नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १९.१.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक १९.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१०.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कामठी यांचेकडे, पटसंख्या तपासणी अहवाल, शाळा तपासणी अहवाल तथा वार्षिक तपासणी अहवाल, राष्ट्रीय उर्दू उच्च प्राथमिक शाळा, कामठी, कालावधी २००० ते २००९ या कालावधीतील माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १६.११.२००९ रोजी माहितीच्या अतिरिक्त खर्चाकरीता रुपये ४८/- चा भरणा करण्यात यावा असे पत्र दिलेले दिसून येते. व त्यानंतर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेली माहिती ही अपूर्ण आहे या कारणास्तव दिनांक १९.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १८.१२.२००९ रोजी देण्यात आला असून, कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती विहित मुदतीत दिलेली असल्यामुळे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, पटसंख्या तपासणी अहवाल, शाळा तपासणी अहवाल तथा वार्षिक तपासणी अहवाल हे आवश्यक अभिलेखे असल्यामुळे ती माहिती उपलब्ध असायलाच हवी होती. परंतु, ती माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, सदरची माहिती ही वेगवेगळया तीन शिक्षण विस्तार अधिकारी यांचेकडे उपलब्ध असल्यामुळे त्यांना पत्र देवून त्यांनी जी माहिती पुरविली आहे तीच माहिती अपीलकर्ता यांना पुरविलेली आहे. असे असले तरी, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, दरवर्षी वार्षिक तपासणी ही करावीच लागते व त्यामुळे त्याबाबतचे अहवाल हे उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा तीनही शिक्षण विस्तार अधिकारी यांना पत्र देवून व माहितीचा शोध घेवून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व वार्षिक तपासणी केलेली नसल्यास तसे वर्षनिहाय कळविणे आवश्यक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांची अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना, हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आत तीनही शिक्षण विस्तार अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घेवून पुरविण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ११८९/२००९
अपील क्रं. ३/२०१०

१) श्री रमेश रामजी राठोड,
२०, विज्ञान नगर, मानेवाडा, नागपूर-४४००३४. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव,
महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग,
९, हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनस(व्हीटी)समोर,
मुंबई-४०००१. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक,
महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग,
९, हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनस(व्हीटी)समोर,
मुंबई-४०००१. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २०.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१२.२००९ व दिनांक १.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही अपीलांची सुनावणी दिनांक २०.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहे.**

**२. अपील क्रमांक ११८९/०९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १९.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग यांचे कार्यालयात, दिनांक ७.८.२००९ रोजीचे आपले पत्र क्रं. TS/case २०४५/२००९-१०/२३८४ मिळाले. त्यावर कोणती कार्यवाही झाली हयाची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३०.१२.२००९ रोजी देण्यात आला असून, जन माहिती अधिकारी यांनी प्रत्येक केसमध्ये स्वतंत्र माहिती द्यावी असे आदेश देवून अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपील क्रमांक ३/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १९.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी महाराष्ट राज्य मानवी हक्क आयोग यांचे कार्यालयाकडे, कार्यालयीन दिनांक ६.६.०९ चे पत्र TS/case ११५८/०९-१०/२०३२ चे मिळाले. त्यावर कोणती कार्यवाही झाली याबद्दलची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**वरील दोनही अपीलांच्या सुनावणीच्या संदर्भात राज्य मानवी हक्क आयोग यांचे तर्फे जन माहिती अधिकारी हजर झाले. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु, अपीलकर्ता यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात पोलीसांकडून आयोगाकडे अहवाल सादर झालेला आहे व त्या अहवालाच्या अनुषंगाने सुनावणी ठेवण्यात आली. त्या सुनावणीचा समन्स अपीलकर्ता यांना पाठविण्यात आला.**

**वरील दोनही अपीलांच्या संदर्भात सुनावणी ही मानवी हक्क आयोगाकडून घेण्यात येईल असे त्यांनी आयोगापुढे सांगितले व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने झालेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना उपलब्ध झालेली असल्यामुळे दोनही अपीले खारीज करण्यास पात्र आहेत.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांची अपील क्रमांक ११८९/२००९ व अपील क्रमांक ३/२०१० खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ११८८/२००९

१) श्री रमेश रामजी राठोड,
२०, विज्ञान नगर, मानेवाडा, नागपूर-४४००३४. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग,
बद्रुद्दीन तय्यबजी मार्ग, सी.एस.टी.रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई-४००००१. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग,
बद्रुद्दीन तय्यबजी मार्ग, सी.एस.टी.रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई-४००००१. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २०.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक २०.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी यांनी हजर राहू शकत नसल्याबाबत फॅक्सद्वारे कळविले आहे.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.९.२००९ रोजी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग यांचे कार्यालयाचे माहिती अधिकारी यांना, आपल्याकडे दिनांक १६.७.२००९ रोजी तक्रार अर्ज दिला होता. सदरच्या तक्रार अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १४.१०.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७.११.२००९ रोजी झालेला असून, अपीलकर्ता यांना अपीलाच्या सुनावणी आदेशासोबत विनामुल्य माहिती निर्गमित करण्यात यावी असे आदेश देण्यात आलेले आहे. तसेच दिनांक १४.१०.२००९ रोजी यापूर्वी विहित मुदतीत अर्जदारास माहिती पाठविलेली असल्यामुळे सदर अपील निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे प्रथम अपीलाच्या निर्णयासोबत श्री के.ए.जाधव, अप्पर पोलीस आयुक्त(गुन्हे), नागपूर शहर यांनी अध्यक्ष, अल्पसंख्यांक आयोग यांचेकडे पाठविलेल्या अहवालाची प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे.**

**यावरुन अपीलकर्ता यांना त्यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ११८७/२००९

१) श्री रमेश रामजी राठोड,
२०, विज्ञान नगर, मानेवाडा, नागपूर-४४००३४. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव, ता.जि.जळगांव. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
पाचोरा, ता.पाचोरा, जिल्हा जळगांव. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २०.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक २०.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.६.२००९ रोजी, जन माहिती अधिकारी तथा पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव यांचेकडे दिनांक २२.५.२००९ रोजी मा. पोलीस अधीक्षक यांचेकडे, साईनदास वंजारी व इतर यांचे विरुध्द तक्रार अर्ज दिला आहे. त्याबाबत झालेल्या कार्यवाहीची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २०.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७.९.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलार्थी श्री रमेश रामजी राठोड यांचे ५ अपील प्रकरणे या आदेशाद्वारे दप्तरी दाखल करण्यात यावेत, असे आदेश दिलेले दिसून येते.**

**३. प्रथम अपीलाच्या विवेचनामध्ये माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, मुक्ताईनगर उपविभाग, मुक्ताईनगर यांचे सांगणे की अर्जदाराने दिनांक १५.६.०९ रोजी केलेल्या अर्जावर दिनांक २९.६.२००९ रोजी उपलब्ध माहिती पुरविली आहे, असे विवेचन केलेले दिसून येते. त्यावरुन प्रथम अपीलाच्या निर्णयामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**४. द्वितीय अपीलाच्या सुनावणीत आयोगापुढे युक्तीवाद करताना अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना त्यांच्या दिनांक १.६.२००९ च्या अर्जाच्या अनुषंगाने आतापर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. आज आयोगापुढे हजर असलेले जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरचा तक्रार अर्ज त्यांचेकडे प्राप्त झालेला नाही. परंतु, तसेही जन माहिती अधिकारी हे पोलीस अधीक्षक, जळगांव कार्यालयाचे जन माहिती अधिकारी नाही. व अपीलकर्ता यांनी तक्रार अर्ज हा पोलीस अधीक्षक, जळगांव यांचे कार्यालयात दिलेला दिसून येतो. व त्यामुळे माहिती सुध्दा त्यांनी पोलीस अधीक्षक, जळगांव यांचे कार्यालयात मागितली आहे. त्यामुळे माहिती अधिकारी, पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव यांनी आयोगापुढे हजर होणे अपेक्षित होते. परंतु, आज जे माहिती अधिकारी आयोगापुढे हजर झालेले आहे, त्यांचा या प्रकरणाशी जरी संबध येत असला तरी दिलेल्या अर्जाशी संबंध नाही ही बाब प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या विवेचनात जरी घेतलेली असली तरी त्याच कार्यालयाने दिनांक २२.५.२००९ च्या तक्रार अर्जाविषयी काय कार्यवाही केली याबद्दलची माहिती त्यांना दिलेली दिसून येत नाही. व त्यामुळे विवेचनात जरी उपविभागीय अधिकारी, मुक्ताईनगर यांनी अपीलकर्ता यांना दिनांक २९.६.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली आहे असे सांगितले तरी ती कोणत्या तक्रार अर्जाच्या संदर्भात आहे, याबद्दलचा खुलासा केलेला नाही. व दिनांक २९.६.२००९ ची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पुन्हा प्रथम अपीलाची सुनावणी घेवून अपीलकर्ता यांनी दिनांक २२.५.२००९ रोजी पोलीस अधीक्षक, जळगांव यांचे कार्यालयात दिलेल्या तक्रारीच्या संदर्भात कोणत्या पोलीस स्टेशनने कार्यवाही केलेली नाही याचा शोध घेवून त्या पोलीस स्टेशन मधील जन माहिती अधिकारी यांचेकडून अपीलकर्ता यांना झालेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध होईल, अशा प्रकारची चौकशी करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत प्रथम अपीलीय अधिकारी, पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव यांनी प्रथम अपीलाची पुन्हा सुनावणी दोनही पक्षकारांच्या उपस्थित घेवून अपीलकर्ता यांनी दिनांक २२.५.२००९ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिति आयुक्त,**
**राज्य माहिति आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १२०२/२००९

१) सौ. प्रमिला राजेश मेश्राम,
C/o श्री दामोधर खोब्रागडे, प्लॅाट नं.५६,
उंटखाना, नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ क्रमांक-४, अजनी विभाग, नागपूर. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
अजनी विभाग, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २१.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक २१.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांचेकडे, "दिनांक १.३.०८ ते ३१.३.०८ पर्यंतची हजेरी पटाची सत्यप्रत कृपया देण्यात यावी. मी दिनांक १२.२.०८ रोजी आपले पोलीस स्टेशनला केलेल्या तक्रारीचे (भा.द.वि. कलम ४९८-अ-३४) रजिस्टरमध्ये नोंद केल्याची व (ii) नोंदवहीमध्ये नोंद घेतल्याची सत्यप्रत कृपया देण्यात यावी," अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २५.७.२००९ रोजी १.३.२००८ ते ३१.३.२००८ पर्यंतची हजेरी पटाची सत्यप्रती नमुद माहिती सोबत सत्यप्रतीत जोडलेली आहे. (२) दिनांक १२.२.०८ रोजी इमामवाडा पोलीस स्टेशनला केलेल्या तक्रारीचे क्राईम रजिस्टरला नोंद केल्याची व नोंदवही मध्ये नोंद केल्याची सत्यप्रती यांची माहिती मागितलेली होती. सदर माहिती सत्यप्रती सोबत जोडलेली आहे, असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २३.९.२००९ रोजी देण्यात आला असून, माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयात अपीलकर्ता यांना क्राईम रजिस्टरचा उतारा, स्टेशन डायरीची झेरॅाक्स प्रत पुन्हा पुरविण्यात यावी, असे नमुद केलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झ ाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, हजेरी पटाची छायांकित प्रत देण्यात आलेली आहे. संबंधीत अधिकारी हे त्या दिवशी हजर होते. परंतु, हजेरी पटावर त्यांची हजेरी दिसून येत नाही. त्यामुळे त्यांनी खोटी माहिती दिली आहे. तसेच क्राईम रजिस्टरचा उतारा व स्टेशन डायरीच्या उता-यामध्ये तफावत आहे. त्यांना जी सत्यप्रत दिलेली आहे त्यात ७ आरोपी आहेत. याचा अर्थ जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खोटी माहिती दिली, असे त्यांचे म्हणणे आहे.**

**४. सार्वजनिक प्राधिकरणात ज्या साहित्याच्या स्वरुपात माहिती उपलब्ध असते त्या कागदपत्राच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात जशी आहे तशी माहिती उपलब्ध होत असते. व त्याप्रमाणे त्या दिवशीचा हजेरी पट जसा असेल त्याची छायांकित प्रत उपलब्ध झालेली आहे व त्यात कोणत्याही प्रकारची खोडतोड दिसून येत नाही. त्यामुळे खोटी माहिती दिली आहे असे म्हणता येत नाही. संबंधीत अधिकारी हजर होते किंवा नाही ही बाब हजेरी पटावरुन पडताळणी करता येत नाही. व ती अपीलकर्ता यांची वैयक्तिक माहिती आहे व त्याकरीता त्यांनी स्वतंत्रपणे वरिष्ठांकडे तक्रार करणे संयुक्तिक राहील. क्राईम डायरीच्या संदर्भात मात्र जन माहिती अधिकारी यांनी माहिती देताना नक्कल तयार करुन दिलेली आहे व नक्कल तयार करताना क्राईम रजिस्टर मधील ६ आरोपी ऐवजी ७ आरोपी हातानी लिहून दिलेले आहे.**

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारची माहिती तयार करुन देणे आवश्यक नाही. उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे हे अधिनियमाचे कलम २(च) व २ (त्र) नुसार अपेक्षित आहे. व त्यामुळे क्राईम रजिस्टरची छायांकित प्रत हा दिलेला उतारा अधिकृत माहिती होते. जन माहिती अधिकारी व त्यांचे कार्यालयाने यापुढे कोणत्याही प्रकारे माहिती तयार करुन देऊ नये व तसे केल्यास व चुक झाल्यास त्याची जबाबदारी संबंधीत माहिती तयार करणा-यांची असते, याची नोंद घ्यावी. त्यामुळे या प्रकरणात सुध्दा प्रशासकिय कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे.**

**तथापि, माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१)	अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १२०४/२००९

१) सौ.संगिता गंभिर मेश्राम तर्फे श्री गंभिर पांडूरंग मेश्राम,
मु. अशोकनगर(फुलगोगरा) पो. शहापूर, ता.जि. भंडारा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
भंडारा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा तलाठी, प.ह.नं.९ मुजबी,
ता.जि. भंडारा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २१.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक २१.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.९.२००९ रोजी तलाठी यांचेकडे, सन १९९० ते २००९ या कालावधीतील लाकडू गणपत रंगारी अशोकनगर (फुलमोगरा) ता.जि. भंडारा गट क्रं. ५३/३ फेर फार घेण्यात आली आहे. कोणत्या वर्षी व कोणत्या अर्जानुसार याची माहिती देण्यात यावी. तसेच त्या अर्जाची नक्कल (झेरॅाक्स) देण्यात यावी. (२) ५३/३ च्या जागेवर श्री लाकडू रंगारी यांनी बांधलेल्या घराचा सात-बारा (७/१२) पुरवावे, अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ८.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ९.११.२००९ रोजी देण्यात आला असून त्यात, अपीलार्थीला माहिती उपलब्ध करुन देण्यात आली, परंतु त्यांनी माहिती घेण्यास नकार दिलेला आहे या कारणास्तव अपील खारीज करण्यात आलेली दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. द्वितीय अपील मेमो मध्ये, माहिती उपलब्ध झाली नाही असे नमुद केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांना दिनांक ७.१०.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला होता, त्यांनी माहिती घेण्यास नकार दिला आहे. तसेच तहसिलदार यांनी आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.**

**खुलासा : "अर्जदार सौ. संगिता गंभिर मेश्राम राह. अशोकनगर यांनी तलाठी मुजबी साजा क्रं.९ यांचेकडे दिनांक २३.९.२००८ ला माहितीचा अधिकाराअंतर्गत मौजा अशोकनगर येथील गट नं. ५३/३ मधील श्री लाकडू रंगारी यांचे घराचा ७/१२ मिळण्याबाबत अर्ज सादर केलेला होता. परंतु तलाठी मुजबी यांनी अर्जदारास सदरहू गट नं. चा ७/१२ न दिल्यामुळे त्यांनी आपले कार्यालयात अपील दाखल केली. त्या अनुषंगाने तलाठी मुजबी साजा क्रं.९ यांना या कार्यालयामार्फत पत्र देवून सदरहू गट नं. चा ७/१२ अर्जदारास तात्काळ पुरवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करण्याबाबत कळविण्यात आले. त्या अनुषंगाने तलाठी मुजबी साजा क्रं. ९ यांनी दिनांक १४.१०.२००९ ला गट नं. ५३/३ व ५३/४ चा ७/१२ या कार्यालयास सादर केलेला असून सदर ७/१२ चे अवलोकन केले असता गट नं. ५३/३ च्या ७/१२ मध्ये लाकडू रंगारी यांचे नांव नसून भिमराव धोंडूजी खोब्रागडे व सौ. संगिता गंभिर मेश्राम यांचे नावाने ७/१२ असल्याचे दिसून येते. तसेच गट नं. ५३/४ मध्ये सौ. शिलाबाई लाकडू रंगारी यांचे नांव असून त्यांनी श्री वातु खुशाल बागडे राह. उमरी यांना सदर जमीन विक्री केलेली असून सौ. शिला लाकडू रंगारी यांचे नांव कमी करुन श्री वातु खुशाल बागडे यांचे नांवाने गट नं. ५३/४ चा ७/१२ असल्याचे रेकार्डवरुन दिसून येते.**

**अर्जदारानी दिनांक २३.९.२००८ ला गट नं.५३/३ च्या ७/१२ मध्ये श्री लाकडू रंगारी यांचे नांव नसल्यामुळे अर्जदारांनी गट नं. ५३/३ व ५३/४ चा ७/१२ घेण्यास नकार दिला असे तलाठयांनी आपले प्रतिवेदनात नमुद केलेले आहे. तरी सुध्दा तलाठी मुजबी साजा क्रं.९ यांचेकडून प्राप्त झालेले गट नं. ५३/३ व ५३/४ चा ७/१२ अर्जदारास या कार्यालयाचे पत्र क्रं.प्रस्तु-१/तहभं/कावि/११४०/०९ दिनांक ५.११.२००९ अन्वये पाठविण्यात आलेले आहे.**

**तरी अर्जदारांना दिनांक २३.९.२००८ ला मागितलेल्या माहितीनुसार सदरहू गट नं.चे ७/१२ पुरविण्यात आल्यामुळे अर्जदारांनी केलेली अपील नस्तीबध्द करण्याबाबत विनंती करण्यात येत आहे."**

**वरील खुलाशावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

१) **अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

२) **अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १०५०/२००९
अपील क्रं. १०५१/२००९

१) श्री डॅा.एच.एस.कनोजे,
३७-बी, गांधी ले आऊट, जाफार नगर, नागपूर-१३. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,
वसंत प्रकाश उर्दू कनिष्ठ महाविद्यालय, ताजबाद, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २२.१.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक १६.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी दिनांक २२.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी सदरच्या दोनही अपीलांमध्ये दिनांक १०.९.०९ व दिनांक १४.९.०९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, वसंत प्रकाश उर्दू कनिष्ठ महाविद्यालय ताजबाद, नागपूर चे १९८५ ते १९९० या कालावधीतील वार्षिक अहवाल तसेच स्थानांतर करीता परमिशनसाठी केलेल्या अर्जाप्रमाणे शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी परमिशन मंजूर केलेल्या पत्राची प्रत नोंदणीकृत डाकेने घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१०.०९ व दिनांक १४.१०.०९ रोजी दोन प्रथम अपीले दाखल केलेली दिसून येतात.**

**३. दोनही अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३.११.२००९ रोजी मागितलेली माहिती ही वसंत प्रकाश उर्दू कनिष्ठ महाविद्यालय स्थानांतर संबंधाने मागितलेली माहिती असून सन १९८५ मध्ये त्यावेळेस नियुक्त केलेल्या प्राचार्याकडे प्रशासनाचा कार्यालयीन रेकार्डस् होता व ते आज नोकरीत नसल्याने त्यावेळेच्या काही फाईल्स व रेकार्डस् कार्यालयांत उपलब्ध नाही. त्यामुळे रेकार्डस् व फाईल्स अभावी माहिती सादर करता येत नाही, असा खुलासा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी सादर केलेला दिसून येतो. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.**

**४. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता हे विनाकारण त्रास देण्याच्या उद्देशाने माहिती मागत आहेत. त्यांनी यापुर्वी सुध्दा मा. उच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल केलेल्या होत्या व त्या सर्व याचिका खारीज झालेल्या आहेत. त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, ते त्या संस्थेचे सचिव होते. परंतु त्यांना सचिव पदावरुन काढून संस्थेच्या अध्यक्षांनी त्यांच्या पत्नीला सचिव नेमले आहे. यावरुन हा संस्थेच्या संदर्भातील वाद असून अपीलकर्ता त्या वादातून माहिती मागत आहेत असे दिसून येते. परंतु, जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, ज्या कालावधीची माहिती अपीलकर्ता यांनी मागितली आहे, त्या कालावधीत अपीलकर्ता हे स्वतः मुख्याध्यापक होते. व त्यावेळच्या अभिलेख्यासंबंधी त्यांना माहिती असल्यामुळे ते माहिती मागत असल्याचे दिसून येते जेणेकरुन संस्थेचे मुख्याध्यापक हे अडचणीत येतील. यावरुन अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही कोणत्याही व्यापक सार्वजनिक हिताकरीता मागीतलेली आहे असे दिसून येत नाही. तरीही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या कनिष्ठ अधिका-यांच्या माध्यमातून अभिलेख्यांची तपासणी करावी व माहिती उपलब्ध असल्यास ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. नसल्यास तसे स्पष्टपणे अपीलकर्ता यांना कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांची दोनही अपीले अंशतः मंजूर करण्यास पात्र आहेत.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांची दोनही अपीले अंशतः मंजूर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या कनिष्ठ अधिका-यांच्या माध्यमातून वर नमुद केल्याप्रमाणे संस्थेच्या अभिलेख्यांची चौकशी करावी व उपलब्ध असल्यास माहिती द्यावी, नसल्यास तसे स्पष्टपणे अपीलकर्ता यांना कळविण्यात यावे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १०२३/२००,
अपील क्रं. १०२४/२००९,
अपील क्रं. १०२५/२००९,
अपील क्रं. १०२६/२००९,
अपील क्रं. १०२७/२००९,
अपील क्रं. १०२८/२००९,
अपील क्रं. १०४६/२००९,
अपील क्रं. १०४७/२००९,
अपील क्रं. १०४८/२००९ व
अपील क्रं. १०४९/२००९.

१) श्री डॉ.एच.एस.कनोजे,
३७-बी, गांधी ले आऊट, जाफार नगर, नागपूर-१३. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
मलीक उर्दू हायस्कुल, वसंतु प्रकाश कनिष्ठ महाविद्यालय,
ताजबाद, नागपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २२.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १३.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दहा द्वितीय अपीले दाखल केली आहेत. सदरच्या दहाही द्वितीय अपीलांची सुनावणी दिनांक २२.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी सुनावणीस गैरहजर आहेत. (अपीलांची सुनावणी झाल्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर झाले व सहा अपीलांमध्ये त्यांनी खुलासा दाखल केला).**

**२. अपीलकर्ता यांनी सदरच्या अपीलांमध्ये अनुक्रमे दिनांक २१.९.०९, ७.९.०९, ५.९.०९, ३.९.०९, १.९.०९, ४.९.०९, १६.९.०९, १५.९.०९,११.९.०९, व दिनांक १२.९.०९ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मलीक उर्दू हायस्कुल यांचेकडे, साधारणतः २० वर्षाच्या कालावधीतील मलीक उर्दू हायस्कुल मधील पुर्वीचे मुख्याध्यापक, शिक्षक व इतर कर्मचारी यांच्या संबंधाने माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक ३.१०.०९,८. १०.०९, ७.१०.०९ ५.१०.०९,१.१०.०९, ६.१०.०९, १६.१०.०९, १५.१०.०९, १२.१०.०९ व १२.१०.०९ रोजी प्रथम अपीले शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे दाखल केलेली दिसून येतात. परंतु, प्रथम अपीलांच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा निर्णय झालेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे वर नमुद केल्याप्रमाणे दहा द्वितीय अपीले दाखल केलेली दिसून येतात.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, वरील सर्व अर्जाच्या संदर्भात त्यांना आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही. व प्रथम अपीलांचा निर्णय सुध्दा झालेला नाही. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांचे दहाही अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाले नाहीत. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, दहाही अर्ज त्यांनी यु.पी.ने. पाठविले आहेत व त्याबध्दलचा पुरावा त्यांनी आयोगास दाखविला. मात्र अपीलकर्ता यांनी रुपये ५००/- चा मनीऑर्डर जो पाठविला होता तो मात्र मिळालेला आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे मान्य केले आहे. प्रथम अपीलाच्या सुनावणीसाठी सुध्दा जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हजर राहीले नाही, असे अपीलकर्ता यांनी सांगितले.**

**४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी करीता काढलेल्या नोटीस मध्ये कोणत्याही प्रकारची अपीलाच्या संदर्भात सुनावणीची तारीख, वेळ इ.चा काहीही उल्लेख केलेला दिसून येत नाही. व त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सही मात्र केलेली दिसून येते. यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयात कशा प्रकारचे कामकाज होते हे स्पष्टपणे दिसून येते. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी संबंधीत प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची वरील संदर्भात चौकशी करुन योग्य ती प्रशासकिय कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याकरीता सदरच्या निर्णयासोबत शिक्षणाधिकारी(माध्यमिक) यांचे दिनांक ५.१०.०९ चे पत्र क्रं.जिपना/शिअ/माध्य./माअ/५४८८/०९, कार्यालय शिक्षणाधिकारी(माध्यमिक) ची छायांकित प्रत जोडून पाठविणे आवश्यक राहील.**

**६. सदरच्या अपीलाची सुनावणी झाल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगापुढे हजर झाले. त्यांनी सहा द्वितीय अपीलांमध्ये खुलासा दाखल केला. दाखल केलेल्या खुलाशाचे अवलोकन केले असता पुन्हा दिनांक ५.११.२००९ रोजी पत्र पाठवून**

सुनावणी ठेवण्यात आलेली दिसून येते. परंतु जन माहिती अधिकारी सुनावणी करीता उपस्थित झाले नसल्याने अपीलकर्ता यांना माहिती देता आली नाही, असे दिसून येते. तसेच शिक्षणाधिकारी(माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांनी त्यांचे दिनांक २४.११.२००९ रोजीचे पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे आदेश दिलेले दिसून येते.

७. जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा आयोगाकडे खुलासा दाखल करताना डॉ. श्री हबीब कनोजे हे शाळेची माहिती द्वेषभावनेतून मागवित असून शाळेच्या कामात अडथळा करीत आहे. डॉ.श्री हबीब कनोजे यांनी मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर येथे अनेक प्रकरणे या शाळेच्या संस्थेच्या बाबत दाखल केलेली होती. त्यात त्यांच्या प्रत्येक केसेस खारीज झालेल्या आहेत. त्याची प्रत सोबत जोडलेली आहेत. ते आता द्वेषापोटी माहिती मागवित आहे. सबब, विनंती करण्यात येते की, त्यांना माहिती मागण्यासाठी प्रतिबंधीत करण्यात यावे, अशी विनंती केली आहे.

८. अपीलकर्ता यांनी तोंडी युक्तीवाद करताना असे सांगितले की, संस्थेच्या अध्यक्षांनी त्यांना सचिव पदावरुन काढून टाकले व स्वत:च्या पत्नीला त्यांनी सचिव नेमले. यावरुन अपीलकर्ता सुध्दा जी माहिती मागत आहे व मागत असलेल्या माहितीचे अवलोकन केले असता ती अतिशय जूनी व कर्मचा-यांशी निगडीत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे खरे आहे असे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या मा. उच्च न्यायालयाच्या अनेक निकालावरुन तसे दिसून येते व त्याप्रमाणे अपीलकर्ता हे विनाकारण त्रास देण्याच्या हेतूने व त्यात कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक व्यापक हित नसताना माहिती मागवित आहे असे दिसून येते. त्यांनी व्यापक जनहिताच्या बाबत आयोगापुढे कोणत्याही प्रकारचे समर्थन केलेले नाही. परंतु, अपीलकर्ता यांचे अर्ज उपलब्ध झाले नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितल्यामुळे त्यावर विश्वास ठेवता येत नाही. व त्यामुळे या सर्व अर्जांच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना, जी माहिती उपलब्ध असेल ती पुरविणे संयुक्तिक राहील. तसेच जी माहिती उपलब्ध नसेल त्याबाबत स्पष्टपणे अपीलकर्ता यांना कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांची सर्व अपीले ही अंशत: मंजूर करण्यास पात्र आहेत.

आदेश

१)अपीलकर्ता यांचे अपील क्रं.१०२३/२००, अपील क्रं.१०२४/२००९,अपील क्रं.१०२५/२००९, अपील क्रं.१०२६/२००९, अपील क्रं.१०२७/२००९, अपील क्रं.१०२८/२००९, अपील क्रं.१०४६/२००९,अपील क्रं.१०४७/२००९, अपील क्रं.१०४८/२००९ व अपील क्रं.१०४९/२००९ अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना १५ दिवसांच्या आंत माहिती ही जूनी असल्यामुळे व त्यात कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक व्यापक हित नसल्यामुळे जी माहिती उपलब्ध असेल ती माहिती छायांकित प्रतीचे स्वरुपात अपीलकर्ता यांना व्यक्तीश: उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी व्यक्तीश: कार्यालयीन कामकाजाचे दिवशी जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून उपस्थित होऊन उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२)सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर
यांचेकडे,शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे दिनांक ५.१०.०९चे पत्रक्रं. जिपना /शिअ/ माध्य./ माअ/५४८८/०९, कार्यालय शिक्षणाधिकारी(माध्यमिक) ची छायांकित प्रत जोडून स्वतंत्रपणे पोस्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत अपील-

अपील क्रं.१२०९/अम/२००९

१) श्री रमेश बाळकृष्ण तुमडे,
हरदासपेठ, नवी वस्ती, बडनेरा, ता.जि.अमरावती. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त(प्रशा)
महानगरपालिका, अमरावती, ता.जि.अमरावती. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी,
प्रभाग क्रं.४, अमरावती महानगर पालिका, विभाग-बडनेरा,
ता.जिल्हा अमरावती. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २७.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक २७.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहे.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, प्रभाग क्रं.४, म.न.पा.विभाग बडनेरा यांचेकडे दिनांक ११.१.२००८ ला अवैध बांधकामांच्या संदर्भात दिलेल्या तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीची माहिती तसेच एकुण ७ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नियमानुसार टपालाने घेणार असे नमुद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १३.१.२००९ रोजी देण्यात आला असून त्यात, विविध विभागाशी संबंधीत मुद्दे एकाच अर्जात नमुद करुन अर्जदाराने सहा.संचालक, नगर रचना यांचेकडे अर्ज दिलेला आहे. पत्र क्रं. १६८०/०८ दिनांक १८.११.२००८ अन्वये सहा. संचालक, नगर रचना याने अर्जदाराला कार्यकारी अभियंता यांचेकडे अर्ज करण्याचे कळविले आहे. सहा. आयुक्त यांचे पत्र क्रं.-८५७ दिनांक ११.११.०८ अन्वये पण माहिती पुरविली आहे. परत सहा. आयुक्त बडनेरा यांनी दिनांक २८ नोव्हेंबर, ०८ चे पत्र क्रं.९२२ अन्वये अर्जदाराला माहिती पूरविलेली आहे. एवढयावरही अर्जदाराचे समाधान झालेले नाही. सहा.संचालक, नगर रचना यांनी इतर विभागाकडून माहिती एकत्रित करुन बघणे अभिप्रेत नव्हते. त्या त्या मुद्दयांबाबत संबंधीत विभागाला माहिती देण्याचे कळवून त्याची प्रत अर्जदाराला दयावयास पाहिजे होते. शिवाय अर्जदाराने पण स्वयंस्पष्टपणे अर्ज दयावयास पाहिजे होता पण तसे झाले नाही. सहा.संचालक, नगर रचना यांनी माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. सहाय्यक आयुक्त यांनी माहिती दिलेली आहे. त्यामुळे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अर्जदाराचा अर्ज संबंधीत त्या त्या विभागाकडे पाठवावा व त्यांनी ती माहिती अर्जदाराला पूरवावी किंवा अर्जदाराने प्रत्यक्ष त्या त्या विभागाकडे उपस्थित राहिल्यास त्यांना आवश्यक ती माहिती तात्काळ पूरवावी, असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु सदरच्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अंतर्गत पत्रव्यवहार झालेला दिसून येतो. परंतु, दिनांक १८.११.०८ रोजी सदरचा अर्ज हा प्रत्येक विभागाकडून माहिती घेण्याकरीता पाठविण्यात आलेला असून त्या विभागाकडून माहिती घ्यावी लागणार असे त्यांना कळविण्यात आलेले दिसून येते. तसेच दिनांक १६.१.२००९ रोजी अपीलकर्ता यांना विचारलेल्या कार्यवाहीची माहिती पान क्रं. १ ते ५ पर्यंत जोडलेली आहे, असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २६.२.२००९ रोजी सुध्दा माहितीच्या संदर्भात पत्र दिलेले दिसून येते. पुन्हा दिनांक ७.३.२००९ रोजी त्यांना प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे पुन्हा मुद्या क्रं. १ ते ४ ची माहिती देण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. असे असल्यावर सुध्दा अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, घरा शेजारी जे अतिक्रमण आहे, त्याबाबत तक्रार करुन सुध्दा सहा. संचालक, नगर विकास यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली दिसून येत नाही. व अवैध बांधकाम सुरुच आहे व ते आता पुर्णत्वास आलेले आहे.**

**४. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता हजर झाले व त्यांनी असे सांगीतले की अपीलकर्ता यांनी एकाच अर्जात वेगवेगळया विषयाची माहिती मागीतलेली असल्यामुळे प्रत्येक विभागाची नस्ती ही त्या त्या कार्यालयात पाहावी लागते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. सहा. संचालक, नगर विकास यांनी त्यांच्या अर्जाप्रमाणे अतिक्रमण धारकास महानगरपालिकेच्या कायदयाप्रमाणे नोटीस दिलेली आहेत. परंतु, पुढील कार्यवाही केलेली नाही व त्यामुळे अतिक्रमण विभागाची माहिती जरी मागितली तरी त्याबाबत कोणत्याही प्रकारची सकारात्मक कार्यवाही झालेली दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना त्या संदर्भात जी नस्ती उपलब्ध आहे त्या नस्तीची सर्व माहिती उपलब्ध करुन देता येईल. परंतु, अपीलकर्ता यांची तक्रार कार्यवाहीची आहे, असेही आयोगाचे निदर्शनास आणण्यात आले.**

**असे असले तरी अपीलकर्ता यांना संपूर्ण नस्तीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व उपलब्ध झाल्यानंतर अपीलकर्ता यांनी माहीतीवरुन स्वतंत्रपणे आयुक्त, महानगरपालिका यांचेकडे महानगरपालिका कायदयानुसार तक्रार करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांची अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिका-यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने संपूर्ण नस्तीच्या छायांकित प्रती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात याव्यात. व आजच त्या उपलब्ध करुन दिलेल्या असल्यास पोच घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत अपील-

अपील क्रं.१२११/अम/२००९

१)श्री गेन्दु मुकिन्दाजी गावंडे,
मु. कांडली(श्रीराम गॅस गोडावून जवळ)
पो. परतवाडा, ता. अचलपूर, जि. अमरावती. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पं.),
जिल्हा परिषद, अमरावती, ता.जि. अमरावती. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती अचलपूर, ता.अचलपूर, जि. अमरावती. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २७.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक २७.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती अचलपूर यांचेकडे, (१) महिला सभेला कोरमची आवश्यकता आहे? सोबत पत्र दिले आहे. (२) संयुक्त ग्रामसभा, नियमात तरतुद नसताना संयुक्त ग्राम सभा घेण्यात येते. ग्रा.वि.अ. यांची कृती नियमाधिन की नियमबाहय? पत्रात सविस्तर उल्लेख आहे. (३) २ जुलै, ०८ च्या पत्राबाबत कार्यवाही अहवालाची प्रत मिळण्याबाबत, अशी माहिती मागितलेली दिसून येते. तसेच माहिती तयार असल्याचे कळविल्यास कार्यालयात येवून स्वत: पैसे भरुन माहिती घेईल, असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ४.९.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु, समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ७.११.२००८ रोजी देण्यात आला असून, अपीलकर्ता यांनी मागणी केलेली जी माहिती, माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध होती ती अर्जदारास पुरविलेली असून प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती पुरविणे बंधनकारक नसल्याचे अर्जदारास कळविल्याने माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे व त्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे, असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांना दिनांक ४.९.२००८ रोजी, प्रश्न विचारुन मत/अभिप्राय विचारलेले असल्यास माहिती व माहितीचा अधिकार या संज्ञेच्या व्याख्येत अपेक्षित नाही. कां व कसे अशा प्रकारची उत्तरे देणे तरतुदीप्रमाणे नाही. दिनांक २.७.२००८ ला लेखा आक्षेपाबाबत कार्यवाहीची प्रत या कार्यालयाचे पत्र क्रं.पंसअ/पंचा/३७१७ दिनांक २०.८.२००८ अन्वये उपलब्ध करुन देण्यात आली आहे, असे कळविलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांनी सुध्दा जी माहिती मागितलेली आहे, त्या माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांनी मुद्या क्रमांक १ ते २ मध्ये जन माहिती अधिकारी यांचे मत विचारलेले दिसून येते व ती, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) अन्वये जन माहिती अधिकारी यांचे प्रकरणातील निर्णयाचे संदर्भात मत अपेक्षित नाही. मात्र विचारलेल्या प्रश्नामधून जर अभिलेख्याचे स्वरुप किंवा टिपणीचे स्वरुपात माहिती उपलब्ध असतील तर त्या माहितीच्या छायांकित प्रती देणे अपेक्षित असते. त्यात महिला सभेला कोरम आवश्यक आहे किंवा नाही, संयुक्त ग्रामसभा नियमात तरतुद नसताना घेण्यात येते किंवा नाही, अशा प्रकारची उत्तरे ग्राम सभेच्या नियमावलीतून छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व दिनांक २.७.२००८ च्या तक्रार वजा पत्राच्या संदर्भात आतापर्यंत झालेल्या कार्यवाहीची माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांची अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या तीनही प्रश्नांच्या संदर्भात संबंधीत नियमांच्या छायांकित प्रती व त्यांच्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची टिपणी किंवा आदेशाच्या छायांकित प्रती विना मुल्य रजिस्टर पोस्टाने अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात याव्या.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १२१३/अम/२००९

१) श्री चंपालाल रामलालजी खत्री,
टेलीफोन कार्यालयासमोर, कॅम्प, अमरावती.
ता.जिल्हा अमरावती. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय, अमरावती, जि. अमरावती. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, अमरावती, जिल्हा अमरावती. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २७.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक २७.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, १ जानेवारी, १९९५ ते ३० डिसेंबर, १९९६ पर्यंत वारस दाखला-रेव्हेन्यू केस नं.५००/एमआरसी-८१/९५-९६, दिनांक १०.२.९६ व रेव्हेन्यू केस नं.१७/एमआरसी ८१/१९९६, दिनांक २१.६.१९९६ या दोन्ही प्रकरणातील कागदपत्रांची तपासणी मिळण्याबाबत, अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे संदर्भात नस्ती उपलब्ध नाही, असे कळविलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, अमरावती यांच्या युक्तीवादावरुन, सदर प्रकरणाचा शोध घेतला असता ते मिळून आले नाही, ही बाब सिध्द होते. तरीही रेकार्ड उपलब्ध नाही असे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले आहे. तर माहिती पुरविणे शक्य नसल्याचे सुध्दा सिध्द होते, त्यामुळे अर्जदार यांचा अर्ज नामंजूर करण्यात येऊन निकाली काढण्यात आलेला दिसून येतो. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. ज्या अर्थी, नस्ती उपलब्ध नाही, त्या अर्थी, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्या नस्तीचा शोध घेणे आवश्यक आहे. संबंधीत नस्ती ज्या आदेशान्वये कार्यान्वीत झालेली असेल तेव्हापासून त्या नस्तीची वाटचाल तपासून पाहाणे आवश्यक असते. व ती मिळून येत नसल्यास, ती नस्ती जतन करण्याची जबाबदारी ज्या अधिकारी/कर्मचारी यांची असेल त्यांचे विरुध्द नस्ती गहाळ**

**झाली या कारणास्तव पोलीस स्टेशन मध्ये एफ.आय.आर.दाखल करणे आवश्यक आहे. व त्यामुळे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी ज्या नस्तीचे निरीक्षण मागितले आहे त्या नस्तीच्या वाटचालीचा शोध घेवून ज्या अधिका-याची नस्ती जतन करण्याची जबाबदारी आहे त्या अधिका-यांविरुध्द नस्ती गहाळ झाली या कारणास्तव पोलीस स्टेशन मध्ये एफ.आय.आर. दाखल करावा. व पोलीस तपासात नस्ती मिळून आल्यास नस्ती निरीक्षणासाठी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिाियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

अपील क्रमांक १०५६/२००९

१) श्री प्रा.प्रेमचंद राघोजी बोंदाडे,
२०१, कामगार कॅालोनी, नागपूर-२२ — अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता,
महानगर पालिका, नागपूर. — उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प संचालक(स्लम विभाग)
महानगर पालिका, नागपूर. — उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक २७.१.२०१०)

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १९.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प संचालक(स्लम) यांचेकडे, कामगार कॅालोनी व तुकडोजी नगर या वसाहतीचे मालकी हक्काचे पट्टे वाटप जेव्हापासून ते वास्तव्य करीत आहेत त्या वेळेच्या बाजार भावाने पैसे वसुल करुन तसेच एकुण किंमतीच्या १० टक्के मागासवर्गीयांना सुट ही योजना शासनाच्या ज्या आदेशानुसार किंवा अन्य मार्गाने त्या अध्यादेशाची सत्य प्रतिलीपी मिळणेबाबत, अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ४.९.२००९ रोजी अतिरिक्त खर्चासाठी रुपये १४/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर अपीलकर्ता यांना मात्र शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान नझाल्यामुळे त्यांनी दिनांक १६.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयात जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात आलेला असल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहिती मागण्याच्या समर्थनार्थ लोकमत या दैनिकातील बातमीच्या आधारे माहिती मागितली आहे व त्याची प्रत आयोगापुढे सादर केली. त्याबद्दल जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, १० टक्के सवलतीचा असा जी.आर. त्यांचे कार्यालयात आज उपलब्ध नाही. परंतु, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, तशा प्रकारचा जी.आर. उपलब्ध आहे व जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खोटी माहिती दिल्याबद्दल त्यांचे विरुध्द योग्य ती कार्यवाही करावी असे आयोगास सांगितले. परंतु, अपीलकर्ता यांनी सुध्दा सदरच्या जी.आर.ची छायांकित प्रत आयोगापुढे सादर केली नाही. परंतु, पुढील तारखेस जी.आर. घेवून येतो, असे आयोगास सांगितल्यामुळे दिनांक २१.१२.२००९ रोजी आयोगाने तशा प्रकारचा आदेश पारित करुन अपीलकर्ता यांना सदरच्या जी.आर.ची प्रत सादर करण्यास परवानगी दिली. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१.२०१० रोजी, शासकिय जमीनीवर झ ाालेली झोपडपट्टीची अतिक्रमणे नियमानुकूल करणे व ते करताना बाजारमुल्य/भूईभाडे व त्यावरील व्याज आकारणे (मुंबई व मुंबई उपनगर वगळून) या संदर्भातील महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन निर्णयः क्रमांक एलईएन-१०/२००१/प्र.क्र.२२५/ज-१, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक ४ एप्रिल, २००२ चा जी.आर. आयोगापुढे सादर केला. सदरच्या जी.आर. मध्ये मात्र, लोकमत या दैनिक वृत्तपत्रात दिलेल्या बातमी प्रमाणे कोणत्याही १० टक्के सवलतीची तरतुद दिसून येत नाही. मात्र सदरच्या शासन निर्णयातील कलम ५ मध्ये, निवासी प्रयोजनासाठी अतिक्रमण करणारा मागासवर्गीय असेल तर नियम ४५ प्रमाणे ती जमीन विना मुल्य प्रदान करण्यात यावी, अशी तरतुद आहे. व त्यामुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी १० टक्के सवलतीचा जी.आर उपलब्ध नाही, अशी जी माहिती दिलेली आहे त्यावरुन अपीलकर्ता यांची दिशाभूल केलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. अपीलकर्ता यांना सुनावणीच्या वेळेसच निदर्शनास आणले होते की, वर्तमान पत्रातील बातमीच्या आधारे माहिती उपलब्ध होईलच असे नाही. व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे उपलब्ध झालेली माहिती हीच अधिकृत माहिती असते याची नोंद घेणे आवश्यक आहे. व त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना मिळालेली माहिति योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत अपील-

अपील क्रं.१२२१/अम/२००९
अपील क्रं.१२२२/अम/२००९

१) श्री गुणवंत माधवराव एकुणकर,सहा.शिक्षक,
श्री महावीर हायस्कुल, कामठवाडा, ता.कळंब,
जिल्हा यवतमाळ. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव,
श्री महावीर शिक्षण प्रसारक संस्था,
श्री महावीर हायस्कुल, कामठवाडा, ता.कळंब, जि. यवतमाळ. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
श्री महावीर शिक्षण प्रसारक संस्था,
श्री महावीर हायस्कुल, कामठवाडा, ता.कळंब, जि. यवतमाळ. उत्तरवादी

४) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
श्री महावीर शिक्षण प्रसारक संस्था,
श्री महावीर हायस्कुल, कात्री, ता.कळंब, जि. यवतमाळ. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २८.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक २८.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दोनही अपीलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री महावीर हायस्कुल, कामठवाडा/कात्री यांचेकडे दिनांक १६.१२.२००८ रोजी, त्यांच्या स्वत:च्या गोपनिय अहवालाची माहिती, संस्थेच्या व शाळेला स्विकृतीच्या ठरावाची माहिती, बदली केल्या संबंधाने संस्थेच्या ठरावाच्या प्रती, संस्थेने विना अनुदान काळातील सेवा जेष्ठता डावलून दिपक दोंदल व ज्ञानेश्वर पाटील यांची मुख्याध्यापक पदावर नियुक्ती केल्याचे ठराव, संस्थेची नोंदणी प्रमाणपत्र व घटनेची प्रत, अपीलार्थीच्या गैरवर्तणुकीबाबत असलेल्या तक्रारी.. वगैरे एकुण १९ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ९.१.२००९ रोजी माहितीच्या संदर्भामध्ये उत्तर दिलेले दिसून येते. परंतु, सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२००९ रोजी एक प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाची सुनावणी झालेली दिसून येत नाही. त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक ३.१.२००९ रोजी खुलासा मागविण्यात आला व दिनांक ८.५.२००९ रोजी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा करताना माहिती प्रत्यक्ष सादर करा, असा खुलासा केलेला आहे. परंतु, सदरची माहिती ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना सर्व कागदपत्रासहित माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.**

**जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा केला आहे.**

**खुलासा: "वरील संदर्भांकित विषयान्वये सविनय सादर करतो की, श्री गु.मा. एकुणकर यांनी संस्थेच्या दोन्ही शाळा अनुक्रमे १) श्री महावीर हायस्कुल कामठवाडा, ता. कळंब जि. यवतमाळ २) श्री महावीर हायस्कुल कात्री ता.कळंब जि. यवतमाळ तथा श्री महावीर शिक्षण प्रसारक संस्था कामठवाडा ता.कळंब जि. यवतमाळ यांचेकडे वेळोवेळी अनेक अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत सादर केले होते. त्यातील नियमाला अनुसरुन असलेली माहिती वेळोवेळी पुरविण्यात आलेली होती. तरीही त्यांनी मा. राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र नागपूर यांच्याकडे अपील क्रमांक २२३८/२००७ दाखल केले होते. त्यावेळी त्या तारखेपर्यंत आलेल्या सर्व अर्जाचा अपीलाशी संबंधीत खालील तिनही उत्तरवादी यांनी विस्तृत खुलासेवार माहिती सादर केलेली होती. एकंदरीत जन माहिती अधिकारी, कात्री व जन माहिती अधिकारी कामठवाडा तथा अपीलीय अधिकारी श्री महावीर शिक्षण प्रसारक संस्था, कामठवाडा ता. कळंब, जि. यवतमाळ यांनी नियमांचे पालन करुन आपआपल्या जबाबदा-या पार पाडलेल्या आहेत. त्यांच्या कार्यात कुठलाही दोष आढळलेला नाही. त्यामुळे आदरणीय राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र नागपूर यांनी अतिशय व्यवस्थित निकाल देवून तोंडीही मार्गदर्शन करुन अपीलाचा लेखी आदेश दिनांक २७.११.२००८ ला पारीत केला होता. तरीपण एका अर्जाच्या संदर्भात त्याच त्या मुद्दयाच्या बाबतीत अपीलकर्त्याने**

**विनाकारण अपील दाखल केल्याचे दिसून येते. त्यामुळे मुख्याध्यापक तथा संस्थाचालक यांना विनाकारण त्रास देण्याच्या उद्देशाने अपीलकर्ता कुठलेही जनहीत नसणारी माहिती मागवून शाळेचा, संस्थेचा व आपल्या कार्यालयास विनाकारण वेळ खर्च करुन ज्या विद्यार्थ्यांना केंद्र बिंदू मानून शैक्षणिक कार्यासाठी काम करणा-या चांगल्या संस्थेच्या गुणवत्ता दर्शक उद्देशाला गालबोट लावून बाधा आणित आहे असे वाटते. गेल्या अनेक वर्षापासून संस्थेच्या विरोधात खोटया तक्रारी करुन विनाकारण कोर्टामध्ये केसेस दाखल करुन अनावश्यक उपद्व्याप सदर्हु शिक्षक श्री गु. मा. एकुणकर यांनी सुरु केलेला आहे. त्यांनी केलेल्या विविध तक्रारी संदर्भात मा. शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प. यवतमाळ यांनी चौकशी करुन शाळा व संस्था कुठेही दोषी नसल्याचा अहवाल मा. शिक्षण उपसंचालक अमरावती विभाग, अमरावती यांच्याकडे दिनांक २२.५.२००६ ला सादर केलेला आहे. तो अहवाल आपल्या अवलोकनार्थ सोबत जोडलेला आहे.**

**करीता आपणास नम्र विनंती की, सर्व बाबींचा आपण विचार करुन अपीलकर्त्यांच्या विषयावर यापूर्वी दिनांक २७.११.२००८ ला निर्णय झाला असल्यामुळे ही अपील खारीज करावी, ही नम्र विनंती."**

**असे असले तरी अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन देण्यासाठी अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांनी, आयोगाचे निदर्शनास आणलेल्या माहितीच्या छायांकित प्रती अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत अपील-

अपील क्रं.१२२७/अम/२००९

१) श्री जिब्राईल इब्राहीम दिवान, भागीदार आय.सी.पी.मिशन
१५,१६,१७ कृषि उत्पन्न बाजार समिती, अकोला,
ता.जिल्हा अकोला. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा.धर्मदाय आयुक्त,
अमरावती. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग,
मुर्तीजापूर रोड, अकोला, ता.जि. अकोला. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २९.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक २९.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी, धर्मदाय आयुक्त कार्यालय, अमरावती यांचेकडे अकोला येथील धर्मदाय आयुक्त कार्यालयात नोंद असलेल्या F-५२० दि जनरल बोर्ड ऑफ नाजरीन या संस्थेने मालमत्ता नोंदी संदर्भात माहिती देण्याबाबत कागदपत्र मागितले होते. परंतु, दिनांक १८.११.२००८ च्या पत्रान्वये अकोला येथील कार्यालयाने नोंदीसंबंधीचे कागदपत्रे ही धर्मदाय आयुक्त अमरावती यांनी त्यांचे पत्र क्रं.१२९२/२००६ अन्वये मागवून घेतले. व त्यामुळे सदरची माहिती ही अमरावती कार्यालयात येते, असे नमूद करुन मागितलेली माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झ ाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३०.३.२००९ रोजी देण्यात आला असून पत्र क्रमांक १७४७/०८, दिनांक १८.११.२००८ अन्वये संबंधीत अभिलेखे मा. धर्मदाय आयुक्त कार्यालय, अमरावती यांचेकडे पाठविले असल्याचे अर्जदारास कळविण्यात आले. व त्यामुळे सदरची प्रत देता येणे शक्य नाही. तसेच अपील हे सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती यांचेकडे दाखल केले होते. मुळ अभिलेखे त्या कार्यालयात प्राप्त झाले नाही. तथापि, अपीलकर्ता यांनी मागितलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती त्यांना देण्यात आलेली आहे. व त्यामुळे सदरचे अपील रद्य करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अमरावती धर्मदाय आयुक्त कार्यायातील जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दिनांक ४.१२.२००८ चा अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नाही. अपील प्राप्त झाल्यावर माहिती ही अकोला कार्यालयातील असल्यामुळे अपील हे अकोला कार्यालयाकडे हस्तांतर करण्यात आले होते. परंतु, प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांनी मुळ अर्ज नाही, तसेच कागदपत्रे कार्यालयात उपलब्ध नाही, तसेच पुर्वीही त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे, या कारणास्तव सदरचे अपील खारीज करण्यात आले होते. आजही, मागितलेल्या माहितीची संपूर्ण कागदपत्रे ही अमरावती कार्यालयातच उपलब्ध आहे व त्यामुळे सदरची माहिती ही अमरावती कार्यालयाने देणे संयुक्तिक राहील, असे अकोला कार्यालयातील अधिकारी यांनी सांगितले. त्यावर अमरावती कार्यालयातील माहिती अधिकारी यांनी अर्ज त्यांचेकडे उपलब्ध नाही असे सांगितले. परंतु, अकोला कार्यालयातील अधिकारी यांनी त्यांना सदरच्या अर्जाची प्रत आयोगाचे समक्ष हस्तांतर केली. त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांची अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना, हा निर्णय मिळाल्यापासून अमरावती कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक ४.१२.२००८ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास अमरावती कार्यालयातील संबंधीत जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत अपील-

अपील क्रं.१२३०/अम/२००९

१) श्रीमती मुक्ताबाई महादेव अर्जुन,
चांदमारी फैल, हनुमान मंदीराजवळ,
ता खामगांव, जिल्हा बुलढाणा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा. ता.जि.बुलढाणा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी, तलाठी आस्थापना विभाग,
जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २९.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १२.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक २९.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१०.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा यांचेकडे, श्री व्ही.एस. पंधरे (नायब तहसिलदार) यांच्या विभागीय चौकशी बाबत माहिती तक्रारदार म्हणून मागितलेली दिसून येते. तसेच रिट पिटीशन क्रं.८४५२/०४ च्या संदर्भात माहिती द्यावी तसेच प्रत द्यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती पोस्टाने घेणार असे नमुद केले आहे. अपीलकर्ता यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर मागितलेली माहिती संकलीत झाल्यानंतर आपणास पाठविण्यात येईल, असे कळविले होते. तसेच प्रभारी अधिकारी, सामान्य आस्थापना विभाग यांचेकडे सदरची माहिती असल्यामुळे त्यांना दिनांक १७.११.२००८ रोजी पत्र देवून माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविले होते. त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २५.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु, त्यानंतर माहिती अधिकारी, तलाठी आस्थापना विभाग यांनी दिनांक १.१२.२००८ रोजी मा. उच्च न्यायालय मुंबई येथील रिट पिटीशन ८४५२/०४ ही रिट मा. उच्च न्यायालयाशी संबधीत असल्याने त्यांचेकडून अधिकृत प्रत घेण्यात यावी. २. श्री व्ही. एस. पंधरे, मंडळ अधिकारी सध्या नायब तहसिलदार यांचे खाते चौकशी प्रकरणामध्ये कार्यवाही सुरु आहे. चौकशीची प्रकरणे खाते चौकशी अधिका-याकडे देण्याची कार्यवाही सामान्य आस्थापना शाखेकडून करण्यात येते. त्यांचेकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर आपणास पुरविण्यात येईल, असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १८.१२.२००८ रोजी देण्यात आला असून विभागीय चौकशीचा प्रस्ताव मा. आयुक्त, अमरावती यांचेकडे तात्काळ सादर करण्याबाबत स्पष्टपणे विभागाला निर्देश देण्यात आले. चौकशी मध्ये साक्षीदार बोलाविण्याच्या संदर्भात विभागीय चौकशी सुरु झाल्यानंतर नियमाप्रमाणे आवश्यक असल्यास अपीलार्थीस साक्षीदार म्हणून बोलाविण्यात येईल. रिट पिटीशन ८४५२/०४ ची प्रत कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे अपीलार्थीने सदर प्रत मा. आयुक्त कार्यालय अमरावती यांचेकडून प्राप्त करुन घेण्यास सांगण्यात आले व अपील निकाली काढण्यात आल्याचे दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी ज्यावेळेस माहिती मागितली होती त्यावेळेस विभागीय चौकशी सुरु झालेली नव्हती. मात्र, आता विभागीय चौकशी पुर्ण झालेली असून अहवाल प्राप्त झाला आहे व तो अहवाल पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आला आहे. त्यामुळे सदरची माहिती ही उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याकरीता सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

१) अपीलकर्ता यांची अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना, हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत श्री पंधरे यांच्या विभागीय चौकशीचा अहवाल व अहवाल पुढील कार्यवाहीसाठी सादर केलेल्या अधिका-यांचे नांव व तारीख ही माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत अपील-

अपील क्रं.१२३८/अम/२००९

१) श्री श्रीराम बळीराम शिंदे,
श्री पुंडलीक बळीराम शिंदे,
रा.शिवाजी वार्ड, वाशिम रोड, पुसद
ता. पुसद, जिल्हा यवतमाळ-४४५२०४. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, पुसद
ता. पुसद, जिल्हा यवतमाळ. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, पुसद,
ता. पुसद, जिल्हा यवतमाळ. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ३०.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक ३०.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी, राज्य माहिती आयोगाकडे त्यांचे लेखी निवेदन दिनांक २२.१.२०१० नुसार, जी माहिती मागितली होती, सदर माहिती त्यांना पुर्ण प्राप्त झाली असून समाधान झाल्याचे नमुद करुन अपील निकाली काढण्याकरीता विनंती केल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांची अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत अपील-

अपील क्रं.१२४३/अम/२००९

१) श्री देविदास किसनराव मोरे
रा. सुंदरखेड, वार्ड नं.५, चिखलीरोड,
सौ. सरपंच रिंढे यांच्या घरासमोर, ता.जि.बुलढाणा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, बुलढाणा. ता.जि. बुलढाणा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सचिव,
ग्राम पंचायत सावळा सुंदरखेड, ता.जि.बुलढाणा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ३०.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ११.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक ३०.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. परंतु, अपीलकर्ता यांनी, जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती मिळाली व तक्रार राहीली नाही, असे राज्य माहिती आयोगास त्यांचे लेखी निवेदन दिनांक ३०.१.२०१० दिलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

## मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ११२१/२००९ व अपील क्रं.५४/नाग/२०१०

१) श्री संदीप सुंदर जैस्वाल
सुंदरजीवन अपार्टमेन्ट, आनंद साई मार्ग, क्लार्क टाऊन,
कडबी चौक, नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथममिक)
जिल्हा परिषद, नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सचिव
सिंधी हिंदी विद्या समिती, नागपूर, पाचपावली, नागपूर. उत्तरवादी

अपील क्रं.३७/नाग/२०१०

१) श्री हरीष बाखरु, जन माहिती अधिकारी तथा सचिव
सिंधी हिंदी विद्या समिती, नागपूर
काका त्रिलोकचंद रुघवानी रोड, पाचपावली, नागपूर-१७. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथममिक)
जिल्हा परिषद, नागपूर. उत्तरवादी

३) श्री संदीप सुंदर जैस्वाल (अर्जदार)
सुंदरजीवन अपार्टमेन्ट, आनंद साई मार्ग, क्लार्क टाऊन,
कडबी चौक, नागपूर.

( आदेश पारित दिनांक ३०.१.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक ४.१२.२००९ रोजी दोन व ११.१२.२००९ रोजी एक अशाप्रकारे राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक ३०.१.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपील क्रमांक ११२१/२००९ व अपील क्रमांक ५४/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १७.९.२००९ रोजी सचिव, सिंधी हिंदी विद्या समिती नागपूर यांचेकडे, "Details of MID DAY MEAL, provided to the students during school time, numer of students, Name & Address, Class in which they are taking Education, Name of the School, which are run by Sindhi Hindi Vidhya Samiti, Nagpur. How many Gas Cylinders are used in a month, its bills from where it is purchased or was purchased within last ७ years, who are the cooking persons appointed, their name, address, salary & qualification.**

**Details of strength of students in each class in every school run by Sindhi Hindi Vidya Samiti, Panchpaoli, Nagpur and teaching staff appointed on the basis of that strength." अशी माहिती मागितली असून माहितीचा कालावधी १० वर्षे दिलेला आहे. माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमुद केले आहे. तसेच अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००९ व दिनांक १७.९.२००९ रोजी दोन अर्जाच्या माध्यमातून जन माहिती अधिकारी म्हणून सचिव, यांना माहिती मागितलेली दिसून येते. परंतु, एक अर्ज त्यावर एक प्रथम अपील व त्यावर एक द्वितीय अपील अशी अधिनियमात तरतुद असल्यामुळे अपीलकर्ता यांच्या इतर अर्जाचा विचार करता येत नाही.**

**३. दोनही अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना महासचिव, सिंधी हिंदी विद्या समिती यांनी खालीलप्रमाणे उत्तर दिलेले दिसून येते.**

**"In response to your application under reference, I would like to bring to your kind notice that the information sought vide application under reference cannot be disclosed to your goodself as the same amounts to roving and fishing enquiries, which is not permissible under the law. Further, information could not be given to your goodself as the same has no relationship to any public activity or interest. It seems that you are misusing the provisions of the act for your personal malafide interest, which is against the purpose of the act". सदरच्या उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१०.२००९ व दिनांक ३०.१०.२००९ रोजी दोन प्रथम अपीले दाखल केलेली आहेत. दोनही प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक २७.११.२००९ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी, अपीलातील दोन मुद्याबाबत माहिती दिनांक ३०.११.२००९ पर्यंत अपीलकर्ता यांना**

देण्यात यावी. तसेच शालेय पोषण आहार संबंधात मागीतलेल्या माहितीची व्याप्ती पाहता एकत्रित करण्यासाठी निश्चितपणे काही कालावधी लागणार असल्याने ती माहिती २० डिसेंबर पर्यंत देण्यांत काही प्रत्यवाय नसावा. माहिती अधिकारी यांनी जन सामान्यांना कोणत्याही प्रकारची माहिती ही दिलीच पाहिजे. अपवाद फक्त अशा माहितीच्या जेणे करुन देशाच्या संरक्षणा संबंधी काही प्रश्न उदभवतील. मात्र या प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी माहिती न देऊन अपीलकर्ता यांची तसेच माहिती अधिकार अधिनियमाची एक प्रकारे अवहेलना केलेली आढळते. मी अपीलीय अधिकारी म्हणून जन माहिती अधिकारी तथा सचिव, सिंधी हिंदी विद्या समिती यांना असेही निर्देशित करत आहे की, भविष्यात अशा प्रकारे त्यांनी पुन्हा चुक करु नये.,असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु, त्यानंतरही अपीलकर्ता यांना माहिती मिळालेली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपील क्रमांक ३७/२०१० मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २७.११.२००९ रोजी सचिव तथा माहिती अधिकारी यांना, अर्जदार यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता जे आदेश दिलेले आहे, त्या आदेशाच्या विरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्यात आलेले आहे.

द्वितीय अपील मेमो मध्ये संस्थेचे सचिव यांनी प्रथम अपीलाच्या सुनावणीत त्यांनी जे मुद्दे मांडले त्या मुद्यांचा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी विचार केलेला नाही, असे द्वितीय अपीलाचे कारण दिलेले आहे. अपील मेमो मधील मुद्दा क्रमांक ५ मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांची मान्यता आहे असे जे नमुद केलेले आहे ते चुकीचे व खोटे आहे. तसेच जी माहिती मागितलेली आहे ती त्रयस्थ पक्षाची माहिती आहे व अपीलामध्ये सुनावणी घेण्याच्या कार्यपध्दती बद्दल आक्षेप घेतलेला आहे. परंतु, या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे कारण त्यांनी दिलेले नाही.

अपील क्रमांक ११२१/२००९ व ५४/२०१० यामध्ये अपीलकर्ता यांनी स्वत: युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितलेली आहे ती सिंधी हिंदी विद्या समिती यांचे सचिवाकडे मागितलेली आहे. सिंधी हिंदी विद्या समिती यांच्या अनेक शाळा आहेत व त्या सर्व शाळा १०० टक्के अनुदानित आहे, असे त्यांचे अपील मेमोमध्ये नमुद केले आहे. व त्यामुळे त्यांना ही माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु, माहिती उपलब्ध करुन देण्याची त्यांनी टाळाटाळ केली व अधिनियमाच्या तरतुदीं प्रमाणे माहिती कां उपलब्ध करुन देता येत नाही याचे कारण न कळविता, सदरची माहिती मागताना ही चौकशीच्या स्वरुपाची दिसून येते. व ती माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. तसेच कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी संबंध नाही, असे कारण देवून व दुष्ट हेतूने माहिती मागत आहे असे कारण देवून ती नाकारली. व ते अधिनियमाच्या तरतुदींशी सुसंगत नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे.

अपील क्रमांक ३७/२०१० मध्ये संस्थेचे सचिव यांनी प्रथम अपील दाखल केले आहे व त्याबाबत त्यांनी प्रथम अपील मेमो मध्ये कोणतेही संयुक्तिक कारण दिलेले नाही. मात्र युक्तीवाद करताना त्यांचे वकील श्री नितीन लालवानी यांनी युक्तीवाद करताना मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांचे नगर युवक शिक्षण संस्था, नागपूर विरुध्द महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, विदर्भ रिजन, नागपूर याचिका क्रमांक ५१३२ ऑफ २००८ डिसाईडेड ऑन २०.८.२००९ मधील निर्णयाप्रमाणे सिंधी हिंदी विद्या समिती या संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होत नाही व त्यामुळे अर्जदार अपीलकर्ता यांस माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही असे सांगितले. त्यावर अर्जदार अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, सिंधी हिंदी विद्या समिती या संस्थेच्या अनेक शाळा आहेत. व या सर्व शाळांना १०० टक्के अनुदान प्राप्त होते. ही बाब संस्थेचे सचिव यांनी सुध्दा मान्य केलेली आहे व त्यामुळे संस्थेस शाळेकरीता अनुदान मिळते हे वादातीत आहे. त्यामुळे सदरची संस्था ही अधिनियमाचे कलम २ (ज) मध्ये दिलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या संज्ञेच्या व्याख्येमध्ये समाविष्ट होते व त्यामुळे त्यांना अधिनियमाच्या तरतुदी लागू होत असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे असा युक्तीवाद केला. तसेच त्या युक्तीवादाच्या समर्थनार्थ त्यांनी मा. उच्च न्यायालय, केरळ यांचे समोरील याचिका क्रमांक ४६६८ of २००७, with W.P.(c) Nos. ४९३३, ६६६७, ६७१४, ६७७४, ९५४७, ९५४८, ९५९२, ९५९४, ९५९५, १२२४४, १२७३० and १३७१४ of २००७, dated ४.७.२००७ च्या निर्णयाचा आधार दिलेला आहे. व त्यामध्ये अनुदानित महाविद्यालयाच्या संदर्भात माहिती मागितली होती. त्यामध्ये **(A) Right to Information Act (२२ of २००५), S.२(h)- 'Public authority' -Private aided colleges controlled and substantially financed directly or indirectly by funds provided by appropriate Govt. - colleges also privy to information relating to students and staff which is not private or sensitive information -private or sensitive information- private aided college covered by definition of 'public authority'.**

**It has been observed by your Lordship in short, every facet of the functions of these aided private colleges is strictly controlled and financed by the Government. For coming within the definition of Public authority either control or financing by Government need be satisfied. In this case, both the conditions are satisfied. In the above circumstances, I have no doubt in my mind that these aided private colleges are bodies controlled and substantially financed directly or indirectly by the funds provided by appropriate Government. Further, these colleges deal with information relating to educational activities pertaining to students who pay fees to the Government and teachers and staff whose salaries are paid by the Government. When these colleges are financed and controlled by the Government and Universities and they are privy to information relating to students and staff those information do not have the character of private or sensitive information and the public have a right of access to such information so as to ensure transparency in the conduct of the management of the colleges in which the public are witally interested. Denial of such information would be against the very object of the statute. Essentially much of these information relate to**

**students, teachers and staff of these colleges, and not to any information to any private activities of the management of the colleges. That being so, these colleges would certainly answer the definition of public authority under Section २(h) of the Act.**

परंतु, सदरच्या युक्तीवादाच्या संदर्भामध्ये संस्थेचे सचिव यांचे वकील यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, अर्जदारानी त्यांच्या संस्थेच्या प्रत्येक शाळेत माहिती मागणे संयुक्तिक राहील. अर्जदारानी मागितलेली माहिती ही सचिव यांना मागितली आहे. व शासनाचे अनुदान हे संस्थेस मिळत नाही. व त्यामुळे संस्थेचे सचिव, मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांचा निर्णय हा विना अनुदानित संस्था व महाविद्यालयाच्या संदर्भात आहे. त्यामुळे सदरच्या निर्णयाचा विचार अनुदानित शाळेच्या संस्थेबाबत लागू होणार नाही. तसेच अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना पुन्हा असे सांगितले की, सिंधी हिंदी विद्या समितीच्या संस्थेच्याकार्यालयामध्ये त्यांच्या सर्व शाळेकरीता माहिती अधिकारी हा सचिव आहे असे फलक लावलेले आहे व त्यामुळे त्यांच्याकडे माहिती मागितली. त्यांनी प्रत्येक संस्थेचे माहिती अधिकारी मुख्याध्यापक आहे असा फलक लावला असता तर त्यांच्याकडे माहिती मागितली असती. असे असले तरी शासन नवीन शाळा मंजूर करतांना जी संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम, १९५० च्या प्रमाणे तसेच सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट, १८६० प्रमाणे नोंदणी
झालेली आहे अशाच संस्थांना शाळा सुरु करण्याची मंजूरी मिळते. वैयक्तिक व्यक्तीला शाळा सुरु करण्याची मंजूरी दिली जात नाही. माध्यमिक शाळा संहिता ही शासनाने प्रसिध्द केली आहे. सदरच्या माध्यमिक शाळा संहिता, अशासकिय माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना अनुदानासाठी शासनाकडून लागू करण्यात आलेली संहिता आहे. व ही संहिता १९६३ पासून अंमलात आलेली आहे. सदरच्या संहितेमध्ये माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा सुरु करण्यासाठी परवानगी मिळविण्याचा अर्ज परिशिष्ट-१ मध्ये दिलेल्या नमुन्यात करावा असे मान्यतेच्या शर्ती, मंजूरी, मान्यता नाकारणे व काढून घेणे या भागात दिलेले आहे. तसेच २.८ मध्ये नवीन माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत खालील निकष पूर्ण करणा-या व्यवस्थापनाचीच शिफारस करण्यात येईल.

(१) संस्था नोंदणी अधिनियम १८६० आणि किंवा मुंबई सार्वजनिक विश्वसत अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
(२) संस्थेत मागील सलग दोन वर्षात किमान तीस हजार रुपये निधी शिल्लक असावा. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जी संस्था आदिवासी उपयोजना क्षेत्रात माध्यमिक शाळा सुरु करु इच्छिते अशा संस्थांच्या बाबतीत रुपये १०,०००/- चा निधी संस्थेत शिल्लक असावा किंवा वरील रकमेइतके संबंधीत संस्थेबाबत बँकेमार्फत हमीपत्र दिले गेले असावे.
(३) संस्थेने मागील सतत किमान दोन वर्षाचा सनदी लेखपालामार्फत लेखा परीक्षा अहवाल सादर केलेला असावा.
(४) ज्या ठिकाणी नवीन शाळा सुरु करावयाची आहे त्या ठिकाणी शाळेसाठी संस्थेच्या मालकीची किंवा भाडयाची किमान जागा वा इमारत उपलब्ध असावी.
(५) संस्थेच्या एकूण सदस्यांपैकी किमान ३० टक्के सदस्य महिला असाव्यात.
(६) संस्थेतील कोणत्याही सदस्यास भारतीय दंड संहितेच्या तरतुदीनुसार गंभीर गुन्हयाबाबत तुरुंगवासाची शिक्षा झालेली नसावी.

वरील निकष पूर्ण करणा-या व्यवस्थापनाची शिफारस करण्यात येईल अशी तरतुद आहे. यावरुन नवीन शाळा सुरु करावयाची परवानगी ही फक्त नोंदणीकृत संस्थांना मिळते हे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे अनुदानासाठी अर्ज, अशा प्रकारची जी तरतुद आहे त्यामध्ये सुध्दा ८६.२ मध्ये सहाय्यक अनुदानाची पात्रता देण्यात आली आहे. त्याप्रमाणे- खाजगी मालकीच्या शाळा(म्हणजे १८६० चा संस्था नोंदणी अधिनियम क्रमांक एकवीस किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० किंवा शासनाने याबाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या अन्य कोणत्याही अधिनियमानुसार नोंदणी न केलेल्या शाळा, जातीय शाळा आणि शासनाने बिगर सहाय्यक अनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या शाळा) हया लोकनिधीतून कोणतेही सहाय्यक अनुदान मिळण्यास पात्र असणार नाहीत. तसेच अनुदानाचे प्रकार यामध्ये- मान्यताप्राप्त शाळा मंजुरी प्राधिका-याच्या स्वेच्छा निर्णयानुसार निधी उपलब्ध असेल तर खालील प्रकारची अनुदाने मिळण्यास पात्र असतील. मात्र ज्या संस्था अशा शाळा चालवीत असतील त्या संस्थांची वेळोवेळी दुरुस्त केलेल्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी केलेली असली पाहिजे.

(१) वेतन अनुदान
(२) वेतनेतर अनुदान
(३) इमारत अनुदान आणि
(४) शासन वेळोवेळी मंजूर करील अशी इतर अनुदाने.

यावरुन संस्थांनी अटी व शर्ती पूर्ण केल्यानंतरच अनुदान मंजूर होते. व त्यामुळे सदरचे अनुदान प्रत्यक्ष शाळेस देण्यात आलेले असले तरी ते संस्थेच्या माध्यमातून देण्यात येते. याचा अर्थ सदरचे अनुदान हे मान्यताप्राप्त किंवा अटी व शर्ती पूर्ण करणा-या संस्थेसच असते असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. त्यातही नियंत्रणाचा विचार केल्यास माध्यमिक शाळा संहितेमध्ये खाजगी शाळेच्या संदर्भात कशा प्रकारचे नियंत्रण आहे याबद्दलचे संपूर्ण नियम दिलेले आहेत. तसेच महाराष्ट्र शाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या अटी व शर्ती विनियमन अधिनियम, १९७७) यामध्ये सुध्दा खाजगी शाळेच्या संदर्भात तरतुद करण्यात आलेली आहे. व त्यामुळे शाळेला अनुदान मिळते परंतु, संस्थेला अनुदान मिळत नाही हे म्हणणे बरोबर नसल्यामुळे संस्थेस शाळेच्या कामकाजाच्या संदर्भात माहिती मागितली तर संस्थेच्या माहिती अधिका-यांनी ती देणे आवश्यक आहे व त्यामुळे अनुदानित शिक्षण संस्था ही सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत समाविष्ट होते, अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे अपील क्रमांक ११२१/०९ व अपील क्रमांक ५४/२०१० हे मंजूर करण्यास पात्र असून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही जन माहिती अधिकारी म्हणून सचिव, सिंधी हिंदी विद्या समिती यांनी अपीलकर्ता यांना पुरविणे संयुक्तिक राहील. अपील क्रमांक ३७/२०१० खारीज करण्यास पात्र आहे.

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ११२१/२००९ व अपील क्रमांक ५४/२०१० हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १५.९.२००९ व दिनांक १७.९.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेली सर्व मुद्येनिहाय माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी तथा सचिव, सिंधी हिंदी विद्या समिती यांनी विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यातयावी.**

**२) अपील क्रमांक ३७/२०१० खारीज करण्यात येत आहे.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**